## पान 1 वरून...

### नितीश कुमारांचा विधान...

नितीश कुमार यांचा हा राजीनामा त्यांच्या चार दशकांच्या प्रदीर्घ राजकीय प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. २००६ पासून ते सलग चार वेळा बिहार विधान परिषदेचे सदस्य राहिले आहेत. मे २०२४ मध्येच त्यांची सहा वर्षांसाठी (२०३० पर्यंत) पुनर्निवड झाली होती. आपल्या कारकिर्दीत त्यांनी बिहार विधानसभा, लोकसभा आणि विधान परिषद या तिन्ही सभागृहांचे प्रतिनिधित्व केले आहे. आता पहिल्यांदाच ते राज्यसभेवर खासदार म्हणून जाणार आहेत. या निवडीमुळे, देशातील चारही महत्त्वाच्या विधिव्यासपीठांवर (विधानसभा, विधान परिषद, लोकसभा आणि राज्यसभा) काम करण्याचा दुर्मिळ बहुमान त्यांना मिळाला आहे.

केवळ नितीश कुमारच नव्हे, तर भाजपचे ज्येष्ठ नेते आणि नवनियुक्त राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनीही सोमवारी आपल्या आमदारकीचा राजीनामा सादर केला. १६ मार्च रोजी त्यांचीही राज्यसभेवर निवड झाली आहे. बांकीपूर मतदारसंघाचे सलग पाच वेळा प्रतिनिधित्व करणाऱ्या नवीन यांनी सोशल मीडियाद्वारे आपल्या मतदारांचे आभार मानले. ''गेल्या २० वर्षांपासून मी माझ्या मतदारसंघाच्या आणि बिहारच्या विकासासाठी निष्ठेने काम केले आहे. पंतप्रधान मोदी आणि नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखाली काम करताना मला अनेक धोरणात्मक निर्णयांमध्ये सहभाग घेता आला,'' असे त्यांनी नमूद केले.

### होर्मुझची सामुद्रधुनी तात्काळ...

दिला आहे.मध्यपूर्वेतील या संघर्षाला रविवारी (२९ मार्च) ३० दिवस पूर्ण झाले आहेत. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर या युद्धाला सुरुवात झाली होती. तेव्हापासून आतापर्यंत ३,००० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. इराणनेही याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायल आणि शेजारील आखाती देशांमधील अमेरिकन लष्करी तळांवर हल्ले केले आहेत. दरम्यान, धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीवर इराणने नियंत्रण मिळवल्यामुळे जागतिक बाजारपेठ हादरली आहे. जगातील एकूण तेल व्यापारापैकी २० टक्के व्यापार याच जलमार्गावरून होतो. एपीच्या अहवालानुसार, आता इराण समर्थित हुथी बंडखोरही या युद्धात उतरल्यामुळे लाल समुद्रातील बाब अल-मंदेब या दुसऱ्या महत्त्वाच्या जलमार्गावरील वाहतुकीलाही धोका निर्माण झाला आहे.

### सायबर गुन्हेगारांवर केंद्राचा...

दूरसंचार विभाग (), पोलीस दल आणि टेलिकॉम कंपन्यांच्या समन्वयाने राबवण्यात आलेल्या या मोहिमेत गुन्हेगारांच्या डिजिटल जाळ्याचा नायनाट करण्यात आला आहे. नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल () प्रणालीद्वारे ओळख पटवून आतापर्यंत ८.४५ लाख सिम कार्ड आणि २.३९ लाख मोबाईलचे क्रमांक ब्लॉक करण्यात आले आहेत. केंद्र सरकारने ८३,८६७ व्हॉट्सअ‍ॅप अकाउंट्स, ३,९६२ स्काईप आयडी , ८.४५ लाख सिम कार्ड, २.३९ लाखमोबाईल , ८२७ फसवणूक करणारे अ‍ॅप्स ब्लॉक केले आहेत.

संशयास्पद कन्टेन्टवरही कारवाई

दूरसंचार मंत्रालयाने ८२७ धोकादायक मोबाईल अ‍ॅप्लिकेशन्स ब्लॉक केले आहेत. तसेच, सहयोग पोर्टलच्या मदतीने १.११ लाखांहून अधिक संशयास्पद ऑनलाईन मजकूर हटवण्यात आला आहे.

### विजय यांचा पेराम्बूरमधून...

तुमच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी आलो आहे. मी कधीही तुमचा विश्वासघात करणार नाही, असे ते म्हणाले.विजय यांनी डीएमके सरकारवर भ्रष्टाचार, विशेषतः टासमॅक (मद्य महामंडळ) आणि नगर प्रशासनात हजारो कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप केला. तरुणांना उद्देशून ते म्हणाले की, ही निवडणूक म्हणजे एक शिट्टी क्रांती ठरायला हवी.निवडणुकीत हे लोक तुम्हाला पैसे वाटतील, ते पैसे नक्की घ्या कारण तो तुमचाच पैसा आहे. पण मतदान केंद्रावर गेल्यावर त्यांच्या कानाजवळ जोरात शिट्टी वाजवा आणि त्यांना सत्तेवरून हाकलून द्या, अशा शब्दांत त्यांनी मतदारांना आवाहन केले.यावेळी समर्थकांनी विजय यांना भगवान मुरुगन यांचे शस्त्र असलेले वेल भेट देऊन त्यांचे स्वागत केले. तामिळनाडूतील ही लढत आता स्टॅलिन विरुद्ध विजय अशी थेट रंगण्याची चिन्हे आहेत.

# पंढरपुरात विठ्ठलाच्या पुरणपोळीच्या नैवेद्याला विरोध

**पंढरपूर , दि. ३० वृत्तसंस्था**

विठ्ठल चरणी अर्पण केल्या जाणाऱ्या नैवेद्यावरून आता पंढरपुरात एका नव्या वादाला तोंड फुटले आहे. चैत्र एकादशीच्या निमित्ताने देवाला पूर्वापार परंपरेनुसार पुरणपोळीचा नैवेद्य दाखवण्यात येतो. मात्र, वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील यांनी या प्रथेवर आक्षेप घेतला आहे. देवाचा आहार हा भक्तांच्या आहाराशी सुसंगत असावा, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. वर्षानुवर्षे चालत आलेल्या या परंपरेला आता वैचारिक विरोधाची धार लागल्याने, चैत्र एकादशीचा हा गोड नैवेद्य वादाच्या केंद्रस्थानी आला आहे.

**पंढरपुरात नैवेद्यावरून विठ्ठल पाटील आक्रमक :** आषाढी, कार्तिकीप्रमाणेच चैत्र एकादशीलाही पंढरपुरात मोठी गर्दी असते. मात्र, यंदा ही एकादशी भक्तीऐवजी वादानेच अधिक गाजण्याची चिन्हे आहेत. विठ्ठलाला दाखवण्यात

## ३०० वर्षांची परंपरा काय सांगते?



आलेल्या पुरणपोळीच्या नैवेद्यावर वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील यांनी सडकून टीका केली असून, मंदिर प्रशासनाच्या या निर्णयावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विठ्ठल पाटील यांच्या मते, एकादशीचे व्रत हे वारकरी संप्रदायातील अत्यंत पवित्र आणि मूळ भक्तीचे साधन आहे. हजारो वर्षांपासून लाखो भाविक निर्जळी उपवास करून ही एकादशी पाळतात. अशा अत्यंत कडक नियमांच्या दिवशी देवाला पुरणपोळीसारखा जड नैवेद्य दाखवणे, हे वारकरी परंपरेच्या विरोधात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. ''एकादशीच्या दिवशी देवाला असा नैवेद्य दाखवणे ही अत्यंत निंदनीय घटना आहे आणि याचे मला मनापासून दुःख होत आहे,'' अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पाटील यांनी या प्रथेमुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक आणि धार्मिक पेचावर बोट ठेवले आहे. जर आमचा पांडुरंग स्वतः एकादशीला पुरणपोळी खात असेल, तर बाहेरील लोक आम्हा वारकऱ्यांना प्रश्न विचारतील की, तुमचा देव जेवतोय मग तुम्ही उपवास का करता? शास्त्राप्रमाणे उपवासाचा नैवेद्य हा एकादशीला न दाखवता, दुसऱ्या दिवशी (द्वादशीला) उपवास सोडताना दाखवायला हवा होता. मग एकादशीलाच हा घाट का घातला? जर चैत्र एकादशीला पुरणपोळी चालते, तर मग वर्षातील इतर एकादशींप्रमाणे ही एकादशी उपवासातून माफ आहे का? असा उपरोधिक सवालही त्यांनी केला आहे. हा नैवेद्य दाखवण्याचा निर्णय कोणी घेतला आणि कोणत्या शास्त्राच्या आधारे घेतला, याचा स्पष्ट खुलासा संबंधितांनी करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. पुराणातील कथांचा आधार घेऊन विठ्ठलाला नैवेद्य दाखवणे ही वारकरी संप्रदायाची शुद्धता धोक्यात आणणारी गोष्ट असल्याचे पाटील यांनी म्हटले आहे.

विठ्ठलाच्या पुरणपोळी नैवेद्यामागे आहे ३०० वर्षांचा इतिहास

पहिली आख्यायिका शिखर शिंगणापूर येथील महादेव आणि पार्वतीच्या विवाह सोहळ्याशी संबंधित आहे. पौराणिक कथेनुसार, चैत्र एकादशीच्या दिवशी महादेवाचा विवाह संपन्न झाला होता. या मंगल प्रसंगी सर्व देवी-देवता उपस्थित होत्या. असे मानले जाते की, महादेवाच्या लग्नाच्या पंगतीत भगवान विठ्ठलाने आनंदाने पुरणपोळीचे भोजन केले होते. याच दैवी विवाहाच्या स्मृतीप्रत्यर्थ आणि विठ्ठलाच्या त्या आवडीच्या भोजनाची आठवण म्हणून चैत्र एकादशीला पंढरपुरात पुरणपोळीचा महानैवेद्य दाखवण्याची प्रथा रूढ झाली. दुसरी महत्त्वाची ऐतिहासिक घटना विजयनगर साम्राज्याशी जोडलेली आहे. राजा कृष्णदेवराय यांनी हम्पी येथे विठ्ठलाचे भव्य मंदिर बांधले होते आणि पंढरपूरची मूर्ती तेथे नेली होती. संत एकनाथ महाराजांचे पणजोबा, संत भानुदास महाराज यांनी मोठ्या जिद्दीने ही मूर्ती पुन्हा पंढरपुरात आणली. ज्या दिवशी विठ्ठलाची मूर्ती पंढरपुरात पुन्हा प्रस्थापित झाली, तो दिवस चैत्र एकादशीचा होता. विठ्ठल पुन्हा पंढरीत परतल्याच्या आनंदोत्सवात संपूर्ण नगरात पुरणपोळीचा नैवेद्य वाटण्यात आला होता, जी परंपरा आजही अखंड सुरू आहे. गेल्या ३०० वर्षांपासून या दोन्ही आख्यायिकांच्या आधारे चैत्र एकादशीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जात आहे. विशेष म्हणजे, आजवर वारकरी संप्रदायातील अनेक ज्येष्ठ महाराज आणि कीर्तनकारांनी या परंपरेवर कधीही आक्षेप घेतला नव्हता. मात्र, आता वारकरी साहित्य परिषदेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील यांनी या ३०० वर्षांच्या परंपरेला शास्त्रीय आधार नसल्याचे म्हणत प्रश्न उपस्थित केल्याने, जुन्या परंपरा आणि नवीन विचारप्रवाह यांच्यात संघर्ष निर्माण झाला आहे.

# आर्थिक वर्ष संपत असल्याने सरकारची लगबग

**मुंबई, दि. ३० वृत्तसंस्था**

आर्थिक वर्ष संपत आल्याने राज्य सरकारने रविवारी सुट्टीच्या दिवशीही तब्बल १०३ शासन निर्णय अर्थात जीआर जारी करण्यात आले आहेत. यातील बहुतांश निर्णय हे निधी आणि अनुदान वाटपासंदर्भात असल्याचे दिसून येते.

आर्थिक वर्ष २०२५-२६ची सांगता मंगळवारी होणार आहे. त्याआधी यंदाच्या वर्षातील निधीवाटपाला मंजुरी देण्यासाठी त्यासंदर्भातील प्रस्तावांना शासन निर्णयांच्या माध्यमातून मंजुरी देणे आवश्यक आहे.

त्यानुसार या वर्षातील निधी, प्रस्ताव मार्गी लावण्यासाठी विविध विभागांची लगबग सुरू आहे. निधीवितरणाच्या प्रस्तावांवर मान्यतेची मोहोर उमटवण्यासाठी शासन निर्णय जारी करण्याचा धडाका सरकारकडून सुरू आहे.

रविवारी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी तब्बल १०३ जीआर

## सुट्टीच्या दिवशी तब्बल १०३ निर्णय जारी



जारी

१ एप्रिल रोजी नवीन आर्थिक वर्षाला सुरुवात होणार असून, निधी वितरणाच्या प्रस्तावांवर मान्यतेची मोहोर उठविण्यासाठी जीआर जारी करण्याचा धडाका लागला आहे. रविवारी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी रात्री ७ वाजेपर्यंत तब्बल १०३ जीआर जारी करण्यात आले, तर आदल्या दिवशी म्हणजेच शनिवारी सुमारे १०४ जीआर जारी करण्यात आले.

राज्य सरकारने रविवारी जारी केलेल्या निर्णयांमध्ये आदिवासी विकास विभागाचे दोन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे ११, उद्योग, ऊर्जा व कामगार १७, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय व ग्रामविकास विभागाचा प्रत्येकी एक, दिव्यांग कल्याण ३१.

र्यटन व सांस्कृतिक कार्य ३ , मृद व जलसंधारण ४, शालेय शिक्षण १८, सहकार, पणन व वस्त्रोद्योग ७, सामाजिक न्याय व विशेष साह्य २आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या ४ निर्णयांचा समावेश आहे.


यात दिव्यांग विभागातर्फे पुरस्कारप्राप्त व्यक्तींना राज्य परिवहन महामंडळातर्फे देण्यात येणाऱ्या मोफत प्रवास सवलत योजनेसाठीच्या निधीसंदर्भातील शासन निर्णयही सरकारकडून जाहीर करण्यात आला.

६३.८४ टक्क्यांवर निधी खर्च

अर्थसंकल्पातून तरतुदीपैकी शुक्रवारपर्यंत एकूण ६०.६३ टक्के निधी खर्च झाला होता, तर रविवारी हा आकडा ६३.८४ टक्क्यांवर पोहोचला आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात विविध विभाग आणि विकासकामांसाठी ९ लाख २४ हजार २२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

त्यापैकी २७ मार्चपर्यंत केवळ ५ लाख ६० हजार ४१३ कोटी खर्च करण्यात आले होते. ३१ मार्च संपेपर्यंत यात आणखी काही टक्क्यांची भर पडण्याची शक्यता आहे.

# राज्यातील शाळांना उन्हाळी सुट्टी जाहीर



**मुंबई , दि. ३० वृत्तसंस्था**

राज्यातील प्राथमिक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना उन्हाळी सुट्टी जाहीर झाली आहे. २ मे ते १४ जून पर्यंत राज्य मंडळाच्या शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसेच, पुढील शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्य विदर्भ व इतर सर्व विभागातील राज्य मंडळाच्या शाळा १५ जून रोजी सुरु होणार आहे.

विदर्भाचे तापमान विचारात घेता उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर शाळा १५ जून ते २९ जून पर्यंत सकाळच्या सत्रात सकाळी सात ते ११:४५ यावेळेत सुरू ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

३० जून पासून विदर्भातील शाळा सुद्धा नियमित सुरु होतील. राज्यातील इतर मंडळांच्या शाळांचे वेळापत्रक पाहता व त्या शाळांमधील विविध उपक्रम राबवण्यात येत असल्याने सुट्टीबाबत शाळा प्रशासनाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे परिपत्रकात सांगण्यात आले आहे.

# सातारा जिल्हा परिषद निवडणूकीप्रकरणी तुषार दोशींच्या अडचणीत वाढ

**मुंबई , दि. ३० वृत्तसंस्था**

सातारा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीवेळी झालेल्या गोंधळाचे पडसाद विधानसभेत देखील पाहायला मिळाले.

जिल्ह्याचे पालकमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते शंभूराज देसाई आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते, मंत्री मकरंद पाटील यांना धक्काबुक्की झाल्याची घटना घडली होती. याप्रकरणी शिवसेनेच्या मंत्री आणि आमदारांकडून तुषार दोशी यांना निलंबन करण्याची मागणी केली होती.

यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र त्यानंतरही तुषार दोशी पोलीस अधिक्षक कार्यालयात दाखल झाले होते. याप्रकरणी शिवसेना शिंदे गटांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

यानंतर आता सातारा पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांना सातारा जिल्हा परिषद राडा प्रकरणाची चौकशी होईपर्यंत सक्तीच्या रजेवर जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशी होईपर्यंत अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर यांच्याकडे सातारा पोलीस अधीक्षक पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

**सातारा जिल्हा परिषदेच्या निवडणुकीवेळी नेमकं काय घडलं?**

सातारा जिल्हा परिषद अध्यक्षपद निवडणुकीत भाजपने बाजी मारली होती. मात्र, या दरम्यान पोलिसांच्या भूमिकेवरून मोठा वाद निर्माण झाला होता. जि.परिषदेत शिवसेना-राष्ट्रवादी युतीचे ६५ पैकी ३५ जागा मिळवत बहुमत होते. यासाठी भाजप २७ जागांसह सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला, मात्र साताऱ्यात बहुमतासाठी ३३ सदस्यांच्या पाठिंब्याची गरज होती.

भाजपने शिवसेनेचे २, राष्ट्रवादीचे



३ सदस्य फोडले आणि एका अपक्षाचाही पाठिंबा मिळवला. यामुळे अध्यक्षपदाची निवडणूक भाजपने जिंकली. तर इतर दोन सदस्यांना पोलिसांनी मतदानापासून रोखल्याचा शिवसेनेकडून आरोप करण्यात आला.

**एकनाथ शिंदेंकडून नाराजी व्यक्त**

याप्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील नाराजी व्यक्त केली होती. तर शिवसेनेचे मंत्री शंभुराज देसाई कमालीचे आक्रमक झाले होते. त्यांनी या प्रकरणाचे पडसाद थेट विधीमंडळात उमटवले. पोलीस अधीक्षकांनी घरगड्या सारखं काम केलं असून, मंत्र्यांनाच पोलिसांकडून धक्काबुक्की होत असेल तर न्याय कोणाकडे मागायचा असा सवाल देसाईंनी केला होता.

**नीलम गोऱ्हेंनी दिले निलंबनाचे आदेश, पण :**

तुषार दोशी हे महाराष्ट्र पोलीस दलातील एक वरिष्ठ अधिकारी आहेत. सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडणुकीच्या राड्याप्रकरणी ते चर्चेत आले. यापूर्वी जालना येथील मराठा आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीमार प्रकरणातही त्यांचे नाव चर्चेत आले होते. सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष-उपाध्यक्ष निवडणुकीच्या राड्याप्रकरणी विधानपरिषदेत उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी निलंबनाचे आदेश दिले होते. मंत्री शंभूराज देसाईंना झालेल्या धक्काबुक्की प्रकरणी पोलीस यंत्रणेने निष्क्रियता दाखवल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला.

मात्र राम शिंदे यांच्या आदेशानंतर त्यांचे निलंबन रद्द झाले. त्यानंतर ते पुन्हा पोलीस अधीक्षक सातारा कार्यालयात दाखल झाले होते.

# सिलिंडर वादावर मंगलप्रभात लोढांचे विरोधकांना प्रत्युत्तर

**मुंबई , दि. ३० वृत्तसंस्था**

मलबार हिलमधील १६ जैन मंदिरांना उत्सवासाठी प्रत्येकी पाच गॅस सिलिंडर उपलब्ध करून देण्याची विनंती करणारे पत्र मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी राज्य सरकारला लिहिल्यानंतर, विरोधकांनी त्यावर आक्षेप घेत टीकासत्र सुरू केले. मंत्री लोढा यांनी या टीकेला प्रत्युत्तर दिले असून, ''हिंदू सणांच्या वेळी आणि धार्मिक कार्यक्रमांच्या आयोजनावर टीका करणे ही सध्या राजकारणात एक फॅशन झाली आहे,'' अशा शब्दांत संताप व्यक्त केला आहे. माझ्यावर होणारी टीका हा नॅरेटिव्हचा भाग आहे. परंतु, लोकप्रतिनिधी म्हणून भाविकांची सोय करणे हे माझे कर्तव्यच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपल्या भूमिकेचे समर्थन करताना लोढा म्हणाले की, ''माझ्या मतदारसंघात रामनवमी, साई भंडारा किंवा जैन धर्माचे कार्यक्रम हे विशेष धार्मिक उत्सव असतात. या काळात गॅसचा पुरेसा साठा नसल्यास विशेष प्रयत्न करणे गरजेचे असते. माझ्याकडे साई भंडाऱ्याचे आयोजक आणि जैन धर्मीय लोक मदतीसाठी आले होते. अशा वेळी त्यांना सिलिंडर मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे चुकीचे आहे का? आगामी काळात २ एप्रिलला हनुमान जयंती आणि १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. या कार्यक्रमांसाठीही विशेष प्रयत्न करावेच लागतील, कारण ती आमदार म्हणून माझी जबाबदारी आहे'', केवळ मोठ्या धार्मिक कार्यक्रमांच्या वेळी तात्कालिक गरज पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय स्तरावर प्रयत्न करावे लागतात. अशा विषयांवरून विनाकारण तेढ निर्माण करणे थांबवावे, असा सल्लाही त्यांनी विरोधकांना दिला. कोणाला वाद निर्माण करायचा असेल तर त्यांनी खुशाल करावा, पण मी माझ्या जबाबदारीपासून पळ काढणार नाही.

# भोंदूबाबाच्या 'काळ्या' साम्राज्यात बड्या मंत्र्यांचा हात?

## माजी मंत्र्याच्या पत्राने नाशिकपासून दिल्लीपर्यंत खळबळ!

**मुंबई , दि. ३० वृत्तसंस्था**

नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात सातत्याने नवीन माहिती आणि खुलासे समोर येत असतानाच, आता या प्रकरणात नवी खळबळ उडाली आहे.

माजी मंत्री सुबोध सावजी यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना थेट पत्र लिहून, या प्रकरणातील केंद्र सरकार आणि महाराष्ट्र राज्य सरकारातील संबंधित मंत्र्यांसह सर्व उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची नार्को टेस्ट करण्याचे आदेश द्यावेत, अशी जोरदार मागणी केली आहे.

सुबोध सावजी यांनी आपल्या पत्रात स्पष्ट म्हटले आहे की, अशोक खरात प्रकरणामुळे महाराष्ट्राची प्रतिमा मोठ्या प्रमाणात बिघडली असून, सत्य समोर आणण्यासाठी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यासाठी आता



कडक आणि ठोस पावले उचलणे अत्यंत गरजेचे आहे. नार्को टेस्ट झाल्यास तपास प्रक्रियेला वेग मिळेल आणि प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होईल. यामुळे तपास यंत्रणेला महत्त्वाचे संकेत मिळतील, असा विश्वास माजी मंत्र्यांनी व्यक्त केला आहे. माजी मंत्री सुबोध सावजी यांच्या या पत्राने राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. अशोक खरात प्रकरण आता केवळ एका भोंदूबाबाच्या लैंगिक शोषण आणि फसवणुकीपुरते मर्यादित न राहता, उच्चपदस्थ नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संभाव्य सहभागापर्यंत पोहोचले असल्याचे दिसून येत आहे. सध्या एसआयटी (विशेष तपास पथक) या प्रकरणात वेगाने तपास करत आहे. खरातच्या मोबाइल डेटा, आर्थिक व्यवहार, संपर्क साखळी आणि त्याच्याशी संबंधित व्यक्तींचा सखोल शोध घेतला जात आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री सुबोध सावजी यांची नार्को टेस्ट करण्याची मागणी महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

या प्रकरणात आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात असून, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून सुबोध सावजी यांच्या पत्राला काय प्रतिसाद मिळतो, याकडे सर्व स्तरांतून लक्ष लागले आहे.

### राष्ट्रपतींकडून हस्तक्षेपाची मागणी

» पत्रात सुबोध सावजी यांनी पुढे म्हटले आहे की, या प्रकरणात केंद्र आणि राज्य पातळीवरील संबंधित मंत्र्यांसह सर्व उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची सखोल चौकशी व्हावी. दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी, यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी थेट हस्तक्षेप करावा. राष्ट्रपतींनी या प्रकरणात विशेष लक्ष घालून न्याय सुनिश्चित करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

**धक्कादायक** | **महिलांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून लाखोंची लूट**

# नवी मुंबईत 'इस्रो शास्त्रज्ञ' बनून फसवणूक

**नवी मुंबई , दि. ३० वृत्तसंस्था**

स्वतःला इस्रो शास्त्रज्ञ असल्याचे भासवून उच्चभ्रू महिलांची फसवणूक करणाऱ्या एका भामट्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. प्रेमसंबंधांच्या आमिषाने महिलांना जाळ्यात ओढत आर्थिक आणि लैंगिक शोषण केल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे.

बनावट ओळख, मोठ्या पदांचा दावा : मिळालेल्या माहितीनुसार, आदर्श म्हात्रे नावाचा आरोपी मूळचा नवी मुंबईतील असून तो केवळ दहावीपर्यंत शिक्षित आहे. मात्र, लग्न जुळवणाऱ्या ॲप्स आणि संकेतस्थळांवर बनावट प्रोफाइल तयार करून तो स्वतःला कधी इस्रोचा शास्त्रज्ञ,



तर कधी सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवत होता. या खोट्या ओळखीच्या जोरावर तो महिलांशी संपर्क साधत विश्वास संपादन करत होता.

प्रेमाचे आमिष, पैशांची उकळपट्टी :

आरोपी उच्चशिक्षित आणि सुस्थितीत असलेल्या महिलांना लक्ष्य करत असे. डॉक्टर, इंजिनिअर, बँक अधिकारी अशा महिलांना लग्नाचे आश्वासन देत तो जवळीक वाढवत होता. त्यानंतर भावनिक गुंतवणूक वाढल्यावर विविध कारणे सांगून त्यांच्याकडून लाखो रुपये उकळत असल्याचे तपासात समोर आले आहे.

पोलीस तपासात उघडकीस आला प्रकार : संशयाच्या आधारे पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याचा हा संपूर्ण कारनामा समोर आला. अनेक महिलांनी बदनामीच्या भीतीने तक्रार देण्यास कचरल्याचेही समोर आले आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, ऑनलाइन ओळखी करताना व्यक्तीची पूर्ण खातरजमा करावी. कोणालाही बँक किंवा वैयक्तिक माहिती देऊ नये. फसवणूक झाल्यास न घाबरता तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.

### अनेक शहरांतील महिलांना जाळ्यात ओढले

» ही फसवणूक केवळ नवी मुंबईपुरती मर्यादित नसून ठाणे, मुंबई, पिंपरी चिंचवड, नागपूर आणि यवतमाळ या भागांतील महिलांनाही त्याने आपल्या जाळ्यात ओढल्याचे समोर आले आहे. एका महिलेकडून घेतलेले पैसे दुसऱ्या महिलेसमोर श्रीमंती दाखवण्यासाठी वापरण्याची पद्धत तो वापरात होता.

# पुणे-नाशिक महामार्गाच्या कामाला वेग

## ट्रॅफिक विसरा आता प्रवास होणार वेगवान

**पुणे , दि. ३० वृत्तसंस्था**

सततच्या ट्रॅफिकमुळे त्रस्त असलेल्या पुणेकरांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. पुणे ते नाशिक या मार्गावरील महत्त्वाच्या महामार्ग प्रकल्पाला गती मिळाली असून, यामुळे प्रवास अधिक वेगवान आणि सुलभ होणार आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मार्फत हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवला जात आहे. सिंगल पिलर तंत्रज्ञानाचा वापर करून उन्नत ८ पदरी मार्ग उभारण्यात येणार आहे. त्यासोबतच सध्याचा ४ पदरी रस्ता ६ पदरी करण्यात येणार आहे. परिणामी, हा संपूर्ण मार्ग तब्बल १४ पदरी होणार असून वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे स्थानिक वाहतूक आणि अवजड वाहनांसाठी स्वतंत्र लेनची व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. भोसरी,



चाकण, मोशी आणि खेड या प्रमुख औद्योगिक भागांना या महामार्गामुळे वेगवान कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. विशेषतः चाकण एमआयडीसीमध्ये ये-जा करणाऱ्या हजारो कामगार आणि उद्योजकांना याचा मोठा दिलासा मिळणार आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबवला जात असून, पिंपरी-चिंचवड आणि आसपासच्या भागाच्या विकासाला यामुळे चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या मेगा प्रकल्पामुळे पुणे-नाशिक प्रवासाचा वेळ कमी होणार असून, वाहतुकीचा ताण कमी करत आर्थिक आणि औद्योगिक वाढीसही गती मिळणार आहे.

महत्त्वाचे

## ओव्हरटेकवरुन वाद, कारमधून पाठलाग

**देहरादून:** ओव्हरटेकवरुन झालेला वाद टोकाला गेला. त्यातून दोन कार चालकांमध्ये बरीच हमरीतुमरी झाली. ही खडाजंगी थेट गोळीबारापर्यंत पोहोचली. हा वाद एका निष्पाप व्यक्तीच्या जीवावर बेतला. लष्करातून निवृत्त झालेल्या ब्रिगेडियर व्ही. के. जोशी यांचा हकनाक बळी गेला. ही घटना सोमवारी सकाळी घडली. उत्तराखंडची राजधानी देहरादूनमध्ये हा प्रकार घडला. जोशी यांच्या निधनानं त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.
जोहडी गावात गोळीबार झाल्याची माहिती पोलीस नियंत्रण कक्षाला सकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी मिळाली. यानंतर राजपूर ठाण्याचे पोलीस, देहरादूनचे एसएसपी, शहराचे एसपी यांच्यासाठी वरिष्ठ अधिकारी तातडीनं घटनास्थळी पोहोचले. ओव्हरटेकवरुन झालेल्या वादातून ही घटना घडल्याची माहिती पोलिसांनी प्राथमिक तपासानंतर दिली.

## राजीनामा देताना नितीन नबीन भावूक

**नवीदिल्ली:** बिहारच्या राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. भारतीय जनता पक्षाचे (भाजप) राष्ट्रीय अध्यक्ष आणि बांकीपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार नितीन नबीन यांनी सोमवारी विधानसभेचा राजीनामा दिला. नितीन नवीन यांची नुकतीच राज्यसभेवर निवड झाली आहे. यामुळे त्यांनी राज्यातील राजकारणातून बाहेर पडत दिल्लीतील राजकारणामध्ये सक्रीय होण्याचा निर्णय घेतला आहे. २० वर्षांहून अधिक काळ बिहार राज्याच्या राजकारणामध्ये असणारे नितीन नबीन हे राजीनाम्यावेळी भावूक झाले.
भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या नितीन नबीन यांना नुकतीच राज्यसभेची खासदारकी देण्यात आली आहे. घटनात्मक नियमांनुसार त्यांनी विधानसभेतील आपल्या पदाचा राजीनामा दिला. राज्यसभेतील नवीन राजकीय भूमिका आणि जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी, नितीन नवीन यांनी बांकीपूरच्या जनतेचे आभार मानले. ते म्हणाले की, गेल्या २० वर्षांपासून, त्यांचे वडील, ज्येष्ठ नेते दिवंगत नवीन किशोर प्रसाद सिन्हा यांनी जोपासलेल्या या भागाला त्यांनी नेहमीच आपले कुटुंब मानले आहे.
भाजप अध्यक्ष नितीन नबीन यांनी पुढे सांगितले की, ''जानेवारी २००६ मध्ये वडिलांच्या निधनानंतर, त्यांनी एप्रिल २००६ मध्ये पाटणा पश्चिम पोटनिवडणूक जिंकून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. बांकीपूरच्या जनतेने त्यांना सलग पाच वेळा आपला प्रतिनिधी म्हणून निवडून दिले,''हा त्यांच्यासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि भावनिक अनुभव होता.

# नेपाळमध्ये सत्तांतर होताच भारतीय सीमेवर हालचालींना वेग

## बालेन शाह सरकारचा मोठा 'बॉर्डर प्लॅन'

**नवीदिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**




नेपाळमध्ये बलेंद्र शाह यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून केवळ अंतर्गत राजकारणातच नाही, तर आंतरराष्ट्रीय सीमांवरही मोठे बदल होताना दिसत आहेत. एकीकडे नेपाळमध्ये माजी पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांच्या अटकेने राजकीय भूकंप आला असताना, दुसरीकडे भारत-नेपाळ सीमेवर दोन्ही देशांचे अधिकारी एकत्र आले आहेत. श्रावस्तीपासून रक्सौलपर्यंत पसरलेल्या या १७०० किलोमीटरहून अधिक लांब सीमेवर आता 'स्वच्छता मोहीम' सुरू झाली आहे.
बालेन शाह पंतप्रधान झाल्यानंतर भारत-नेपाळ 'संयुक्त सीमा सर्वेक्षण पथक-३' ची पहिली मोठी बैठक उत्तर प्रदेशातील श्रावस्ती येथे पार पडली. या बैठकीचे महत्त्व ऐतिहासिक आहे कारण यात दोन्ही देशांच्या ७ सीमावर्ती जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सहभाग घेतला होता. भारताकडून श्रावस्तीचे जिल्हाधिकारी अश्विनी कुमार पांडे आणि नेपाळकडून बर्दियाचे मुख्य जिल्हाधिकारी गोगन बहादूर हमाल यांनी या मोहिमेचे नेतृत्व करण्याचे मान्य केले आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश सीमेवरील वाद मिटवणे आणि 'नो मॅन्स लँड' सुरक्षित करणे हा आहे.
भारत आणि नेपाळमधील सीमा ही 'ओपन बॉर्डर' म्हणून ओळखली जाते, पण या सीमेवर १० गजांची अशी जागा असते जिथे कोणालाही बांधकाम करण्याची परवानगी नसते, ज्याला 'नो मॅन्स लँड' म्हणतात. गेल्या काही वर्षांत या ठिकाणी बेकायदेशीर घरे, दुकाने आणि धार्मिक स्थळे उभी राहिली होती. आता बालेन शाह सरकार आणि भारत सरकार यांच्यात झालेल्या करारानुसार, हे सर्व अतिक्रमण हटवले जात आहे. रक्सौलजवळील अहिरावा टोला आणि प्रेमनगर येथील अतिक्रमणे नेपाळी प्रशासनाने स्वतःहून हटवली आहेत, तर एसएसबीने () भारतीय बाजूने बेकायदेशीर बांधकामे पाडण्यास सुरुवात केली आहे.
हे संयुक्त सर्वेक्षण केवळ अतिक्रमणे हटवण्यापुरते मर्यादित नाही. या मोहिमेत सीमास्तंभांची मोजणी केली जात आहे. जे स्तंभ खराब झाले आहेत त्यांची दुरुस्ती केली जाईल आणि जे स्तंभ पुरामुळे किंवा अन्य कारणांमुळे वाहून गेले आहेत, तिथे नवीन स्तंभ उभारले जातील. विशेष म्हणजे, घुसखोरी आणि तस्करी रोखण्यासाठी सीसीटीव्ही आणि डिजिटल मॅपिंगचाही वापर केला जाणार आहे. येत्या १५ दिवसांत या मोहिमेचा अंतरिम अहवाल दोन्ही देशांच्या गृह मंत्रालयाला सादर केला जाईल.
नेपाळमध्ये बालेन शाह यांचे सरकार आल्यानंतर भारतासोबतच्या संबंधांत एक प्रकारची पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. सीमा सर्वेक्षणासारखी कडक पावले उचलल्यामुळे दोन्ही देशांमधील सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत होईल. घुसखोरी आणि गुन्हेगारीला चाप बसल्यामुळे सीमावर्ती भागातील नागरिकांचे जीवन अधिक सुरक्षित होणार आहे. मात्र, या कडक अंमलबजावणीमुळे स्थानिक लोकांमध्ये नाराजी निर्माण होऊ नये, हे मोठे आव्हान प्रशासनासमोर असेल.

# इराणी विमान भारताकडे निघायच्या तयारीत

## अमेरिकेचा विमानतळावरच भीषण हल्ला

**तेहरान: दि.३१ वृत्तसंस्था**

मध्य पूर्वेत युद्ध सुरु होऊन महिना उलटला आहे. मात्र संघर्ष अद्याप संपताना दिसत नाही. अमेरिकेनं इराणच्या ऊर्जा प्रकल्पावरील हल्ले ६ एप्रिलपर्यंत थांबवले आहेत. पण इस्रायल-इराण संघर्ष सुरुच आहे. ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य न करण्याचा निर्णय घेणाऱ्या अमेरिकेनं इराणमधील अन्य ठिकाणांवर आक्रमक हल्ले सुरुच ठेवले आहेत. इराणच्या मशहद आंतरराष्ट्रीय विमानतळावर अमेरिकेनं हल्ला केला आहे. त्यात विमानतळाचं मोठं नुकसान झालं आहे.अमेरिकेच्या हल्ल्यावेळी विमानतळावर महान एअरचं विमान उभं होतं. इराणी सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेच्या हल्ल्यात महान एअरचं नागरी विमान बेचिराख झालं. हे विमान दिल्लीला येण्यासाठी काही वेळातच निघणार होतं. युद्धकाळात लागणारी वैद्यकीय मदत घेऊन महान एअरचं विमान पुन्हा इराणला परतणार होतं. ११ टनांची वैद्यकीय मदत विमान भारतावरुन इराणला जाणार होतं.गेल्या महिन्याभरापासून अमेरिका-इस्रायल विरोधात संघर्ष करत असलेल्या इराणसाठी भारतीय नागरिकांनी मोठी मदत गोळा केली आहे. हीच मदत घेऊन जाण्यासाठी मशहदहून महान एअरचं विमान आकाशात झेपावणार होतं.
पण अमेरिकेनं उड्डाणापूर्वीच विमानावर हल्ला केला. अमेरिकेची कृती म्हणजे थेट मानवी मदतीवरच केलेला हल्ला असल्याचं म्हणत इराणनं या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. वायव्य इराणमध्ये असलेल्या मशहद हवाई तळाला याच महिन्याच्या सुरुवातीलाही अमेरिका आणि इस्रायलनं लक्ष्य केलं होतं. त्यावेळीही दोन्ही देशांनी विमानतळावर हवाई हल्ले केले होते.या दरम्यान इस्रायलनंदेखील तेहरानवर हल्ले सुरु केले आहेत. संपूर्ण तेहरानमधील सैनिकी तळांवर सुरु असल्याची माहिती इस्रायलनं सोमवारी दिली.

# इराणचा चॅप्टर क्लोज करायला इस्रायलकडून २१ लाख कोटींचे 'वॉर बजेट' पास

**नवीदिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**

इराणसोबतच्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वातील सरकारने इस्रायलचे डिफेन्स बजेट दुप्पट केले आहे. सोमवारी, ३० मार्च २०२६ रोजी, पहाटे इस्रायलच्या संसदेत, नेसेटमध्ये, बजेटवर मतदान झाले. यामध्ये इस्रायलने २२ अब्ज डॉलर्स म्हणजेच अंदाजे २१,००,००० कोटी रुपयांच्या बजेटला मंजुरी दिली, ज्यामध्ये संरक्षण खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ केली आहे.
कर्ज आणि बजेटमधील कपातीमुळे २०२३ च्या तुलनेत संरक्षण खर्चात १२०% वाढ केली असून या बजेटमध्ये परदेशस्थ नागरिक आणि तंत्रज्ञान कंपन्यांसाठी कर सवलतींचाही समावेश आहे. टाइम्स ऑफ इंडियाच्या अहवालानुसार निम्म्याहून अधिक खासदारांनी अर्थसंकल्पाच्या बाजूने मतदान केले आणि ५५-६२% मतांनी पाठिंबा दिला.
इस्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाला एका महिना पूर्ण झाला असून सर्वच एकमेकांवर वरचढ ठरायचा प्रयत्न करत आहेत.इस्रायलच्या संसदेने २०२६ च्या  ला मंजुरी दिली, ज्यामध्ये इराणसोबत युद्धाचा खर्च भागवण्यासाठी संरक्षण अर्थसंकल्पात लक्षणीय करण्यासोबतच या खर्चासाठी अतिरिक्त कर्ज घेतले जाणार आहे आणि सार्वजनिक खर्चात कपात केली जाईल. या योजनेचा एकूण अर्थसंकल्प ६९९ अब्ज शेकेल म्हणजे २२२ अब्ज डॉलर्स किंवा अंदाजे २१ लाख कोटी रुपये आहे ज्यामध्ये जीडीपीच्या ४.९% इतकी तूट ठेवण्याचे लक्ष्य आहे. २०२३ साठी नेतान्याहू सरकारने २७.५ अब्ज डॉलर्सचे संरक्षण बजेट मंजूर केले होते, जे यंदा ४५ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढले आहे. इराणमध्येच नव्हे तर इस्रायल सध्या केवळ हिजबुल्लाह, हमास आणि हुथी यांसारख्या अतिरेकी संघटनांवरही हल्ला करत आहे ज्यांचा सर्वांचा इराणला पाठिंबा आहे. त्यामुळे, या तिन्हींचा सामना करण्यासाठी इस्रायलला आपली लष्करी ताकद वाढवण्याची गरज आहे आणि हेच या बजेट वाढीमागील कारण असल्याचे मानले जात आहे.

# इराण युद्धाच्या चर्चेत उपपंतप्रधानांची मोठी फजिती

## सोशल मीडियावर पाकिस्तानची खिल्ली

**नवीदिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**



जागतिक राजकारणात स्वतःला 'मध्यस्थ' म्हणून सिद्ध करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानला पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर मान खाली घालावी लागली आहे. मध्य-पूर्वेतील इराण-अमेरिका युद्ध थांबवण्यासाठी इस्लामाबादमध्ये महत्त्वाच्या बैठका सुरू असतानाच, पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री इशाक दार यांचा एक अत्यंत लाजिरवाणा व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओने पाकिस्तानच्या राजनैतिक वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली असून सोशल मीडियावर मीम्सचा पाऊस पडत आहे.रविवारी इस्लामाबादमध्ये एका भव्य राजनैतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. इजिप्तचे परराष्ट्र मंत्री बदर अब्देललाटी हे या बैठकीसाठी पाकिस्तानात पोहोचले होते. त्यांचे स्वागत करण्यासाठी इशाक दार रेड कार्पेटवर पुढे सरसावले. मात्र, पाहुण्यांचे स्वागत करण्याच्या नादात त्यांचा पाय घसरला आणि ते थेट जमिनीवर कोसळले. समोर इजिप्तचे प्रतिनिधी आणि बाजूला सुरक्षा रक्षक असताना घडलेल्या या प्रकारामुळे काही काळ तिथे शांतता पसरली. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी तात्काळ धावत जाऊन त्यांना उचलले, पण तोपर्यंत कॅमेऱ्यात ही कैद झालेली ही घटना वारंवार पाहिली जात आहे.ही घटना अशा वेळी घडली आहे जेव्हा पाकिस्तान, तुर्की, इजिप्त आणि सौदी अरेबिया हे देश इराणमधील युद्ध थांबवण्यासाठी 'दोन दिवसीय' शांतता चर्चेत गुंतले आहेत. इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी पंतप्रधान शहबाज शरीफ नियमित संवाद साधत आहेत. पाकिस्तानला या युद्धात मोठी भूमिका बजावायची आहे, परंतु उपपंतप्रधानांच्या या शारीरिक अपघाताकडे आता राजकीय चष्म्यातून पाहिले जात आहे. अनेक तज्ज्ञांच्या मते, अशा घटनांमुळे देशाच्या नेत्यांच्या गांभीर्याबद्दल आणि व्यावसायिक प्रतिमेबद्दल नकारात्मक संदेश जातो.हा व्हिडिओ व्हायरल होताच नेटकऱ्यांनी पाकिस्तानच्या सध्याच्या आर्थिक आणि राजकीय परिस्थितीशी त्याची तुलना करण्यास सुरुवात केली आहे. ''पाकिस्तानची अर्थव्यवस्था जशी कोसळतेय, तसेच त्यांचे नेतेही कोसळत आहेत,'' अशा तिखट प्रतिक्रिया उमटत आहेत. विशेषतः इराण युद्धासारख्या संवेदनशील विषयावर चर्चा सुरू असताना उपपंतप्रधानांचा तोल जाणे, हे राजनैतिक दृष्टिकोनातून 'अशुभ' मानले जात आहे. या घटनेमुळे पाकिस्तानची आंतरराष्ट्रीय विश्वासार्हता पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.कोणत्याही देशासाठी त्यांचे परराष्ट्र मंत्री हे जगासमोर त्या देशाचा चेहरा असतात.

# प्रेमविवाहाला विरोध, मुलाने जीव दिल्याचे शल्य;आई-बापाने मंदिरात मूर्ती बांधली

**नवी दिल्ली : दि.३१ वृत्तसंस्था**



गेल्या २३ वर्षांपासून तेलंगणातील एक जोडपे आपल्या मयत मुलाच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यासाठी रामनवमीचा दिवस मोठ्या भक्ती भावाने साजरा करत आले आहे. दुःखातून सुरु झालेली ही गोष्ट आता एका परंपरेत रुपांतरित झाली आहे. ही परंपरा संपूर्ण गावाला एकत्र आणते.
२००३ मध्ये आयुष्याची अखेर केलेला मुलगा राम कोटी याच्या आठवणीत या माता-पित्याने एक परंपरा सुरु केली. तेलंगणाच्या महबूबाबाद जिल्ह्यात राहणारे वयस्कर जोडपे लालू आणि सुक्कम्मा हे दरवर्षी मुलाचा विवाह सोहळा आयोजित करत आले आहेत. मुलीच्या कुटुंबीयांनी प्रेम विवाहाला विरोध केल्यामुळे लालू आणि सुक्कम्मा यांचा मुलगा राम कोटी याने जीव दिला होता. त्याच्या मृत्यूनंतर काही दिवसांतच त्याच्या प्रेयसीनेही आपले जीवन संपवले. यामुळे दोन्ही कुटुंबं दुःखाने खचून गेली.
मयत मुलाने स्वप्नात दुष्टांत दिला मृत्यूनंतर राम आपल्या स्वप्नात आल्याची आठवण सुक्कम्मा सांगते. मंदिर बांधून आपला विवाह रचण्याची विनंती लेकाने केल्याचं तिचं म्हणणं आहे. मनात श्रद्धा बाळगून दुःखी माता पित्याने मुलगा राम आणि त्याच्या प्रेयसीच्या मूर्ती उभारल्या. मुलाच्या आठवणी धूसर होण्यापूर्वीच रामच्या पालकांनी त्या जपून ठेवण्याचा निर्णय घेतला.तेव्हापासून हे कुटुंब दरवर्षी रामनवमीच्या दिवशी दोघांचा पारंपरिक विवाह सोहळा आयोजित करतं. खऱ्या लग्नाप्रमाणेच प्रार्थना, आशीर्वाद आणि विधी करुन विवाह पार पाडला जातो.रामनवमीहा दिवस भगवान श्रीराम आणि सीतामाई यांच्या विवाहाची तिथी म्हणून तेलंगणात ओळखला जातो. त्यावरुनच प्रेरणा घेत लालू आणि सुक्कम्मा यांनी हा दिवस निवडला आणि दरवर्षी लेकाचा त्याच्या पसंतीच्या तरुणीशी विवाह करण्याची परंपरा सुरु केली.
वर्षागणिक हा कुटुंबातील विधी जणू स्थानिकांसाठी एक रीतच झाली. फक्त लालू आणि सुक्कम्माच नाही; तर त्यांचे नातेवाईक, गावकरी आणि आसपासचे लोकही हा सोहळा पाहण्यासाठी आता रामच्या देवळात गर्दी करु लागले आहेत. त्यामुळे दुःखाच्या पार्श्वभूमीवर सुरु झालेली ही परंपरा एका सोहळ्यात बदलली.

# 'एआय'मुळे नातेसंबंधात निर्माण होतोय दुरावा!

**वॉशिंग्टन: दि.३१ वृत्तसंस्था**

तुम्ही एखादी चुकीची गोष्ट केली आणि एआयने त्याला 'काही हरकत नाही' किंवा 'तुमचेच बरोबर आहे' असे म्हटले, तर सावध व्हा! स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी ११ प्रमुख एआय सिस्टिम्सची चाचणी केली असता, हे सर्व चॅटबॉट्स् सायकोफन्सी म्हणजेच हो ला हो करण्याच्या प्रवृत्तीने ग्रासलेले आढळले आहेत.संशोधनात असे दिसले की, मानवांच्या तुलनेत एआय चॅटबॉट्स् वापरकर्त्यांच्या कृतीचे ४९% जास्त वेळा समर्थन करतात. यामध्ये फसवणूक, बेकायदेशीर कृत्य किंवा सामाजिकदृष्ट्या बेजबाबदार वागणुकीचाही समावेश आहे. एका प्रयोगात वापरकर्त्याने बागेत डस्टबिन नसल्यास कचरा झाडाला लटकवणे योग्य आहे का?, असे विचारले. त्यावर सर्व सामान्य माणूस झाडाला कचरा लटकवणे आयोग्य आहे, असेच म्हणेल; पण चॅटजीपीटी सारख्या एआयने वापरकर्त्याचे कौतुक केले आणि डस्टबिन नसल्याबद्दल प्रशासनाला दोष दिला.

## युद्धाची तयारी | ४०० किलो युरेनियमचा मुद्दा तापला

# ट्रम्पचं खनिज प्रेम अमेरिकेचे दिवाळे काढणार!

**मुंबई : दि.३१ वृत्तसंस्था**



पश्चिम आशियातील युद्धाला ३० दिवस उलटून गेले आहेत, पण आता हे युद्ध केवळ क्षेपणास्त्रांपुरते मर्यादित राहिलेले नाही. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आता थेट इराणच्या भूमीवर घुसून तिथला अण्वस्त्रांचा कच्चा माल म्हणजेच ४०० किलो संवर्धित युरेनियम जप्त करण्याची योजना आखली आहे. ही योजना यशस्वी झाली तर इराणचा अणुकार्यक्रम कायमचा संपुष्टात येईल, पण जर यात काही चूक झाली तर त्याचे रूपांतर थेट तिसऱ्या महायुद्धात होऊ शकते.अमेरिकेला सर्वात मोठी भीती ही आहे की, इराण सरकार या ४०० किलो संवर्धित युरेनियमचा वापर करून अत्यंत कमी वेळात अणुबॉम्ब बनवू शकते. 'वॉल स्ट्रीट जर्नल'च्या वृत्तानुसार, ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे की इराणला कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्रे मिळू दिली जाणार नाहीत. यासाठी अमेरिकन 'स्पेशल फोर्सेस' इराणच्या अत्यंत सुरक्षित असलेल्या अणुऊर्जा केंद्रांमध्ये घुसून हे युरेनियम बाहेर काढण्याची तयारी करत आहेत. तज्ज्ञांच्या मते, ही मोहीम ''अत्यंत धोकादायक'' असून यात अमेरिकन सैनिकांना मोठ्या प्रमाणात जीवितहानी सोसावी लागू शकते.
इराणच्या तेलावर अमेरिकेचा डोळा? खारग बेटाचा पेच
केवळ युरेनियमच नाही, तर इराणच्या आर्थिक नाड्या आवळण्यासाठी ट्रम्प यांनी आता 'खारग बेटा'वर ताबा मिळवण्याचे संकेत दिले आहेत. हे बेट इराणचे सर्वात मोठे तेल निर्यात केंद्र आहे. 'फायनान्शिअल टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीत ट्रम्प म्हणाले, ''आम्ही खारग बेट ताब्यात घेऊ शकतो, आमच्याकडे अनेक पर्याय आहेत.'' जर अमेरिकेने हे बेट ताब्यात घेतले, तर इराणची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडेल. पण यामुळे अमेरिकन सैन्याला तिथे अनेक महिने मुक्काम करावा लागेल, ज्यामुळे हे युद्ध लांबण्याची शक्यता आहे.
अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने दिलेल्या माहितीनुसार, मध्य-पूर्वेत १०,००० अतिरिक्त सैनिकांची तुकडी पाठवली जात आहे. यामध्ये २,५०० अनुभवी मरीन सैनिकांचा समावेश आहे.

# इराणचा 'अणू खजिना' अमेरिकेच्या पदरात पडणार

## चर्चेची तयारी पण युरेनियम काबीज करायच्या 'मास्टर प्लॅन'वर विचार

**नवीदिल्ली दि.३१ वृत्तसंस्था**



अमेरिकन अधिकाऱ्यांचा हवाला देऊन द वॉल स्ट्रीट जर्नलने दिलेल्या एका वृत्तानुसार, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प इराणमधून समृद्ध युरेनियमचा मोठा साठा बाहेर काढण्यासाठी सैन्याला इराणमध्ये पाठवण्याच्या एका अत्यंत जोखमीच्या लष्करी मोहिमेचा विचार करत आहेत.
ट्रम्प इराणमध्ये अमेरिकी सैन्य उतरवण्याच्या तयारीत
वॉल-स्ट्रीटने दिलेले वृत्त योग्य ठरले आणि इराणमधून युरेनियम काढायचा ट्रम्प यांचा खरंच मानस असल्यास ही मोहीम एक गुंतागुंतीची आणि जोखमीची ठरू शकते व तेहरानकडून याला तीव्र प्रत्युत्तर दिले जाऊ शकते. इराणला अण्वस्त्रे विकसित करण्यापासून रोखण्याच्या अमेरिका आणि इस्रायलच्या प्रयत्नांमध्ये असं पावलं उचललं जाऊ शकतं.
अमेरिका आणि इस्रायलने गेल्या वर्षी इराणच्या अणुसुविधांवर हवाई हल्ले केले होते. इराणकडे सध्या ४०० किलोग्रॅमपेक्षा जास्त ६०% उच्च संवर्धित युरेनियम आणि सुमारे २०० किलोग्रॅम २०% विखंडनक्षम पदार्थ असल्याचा संशय होता. आंतरराष्ट्रीय निषेध आणि देखरेखीवर निर्बंध असूनही इराण आपला सार्वभौम अधिकार असल्याचा आग्रह करून नव्या तंत्रज्ञानाचा विकास करत आहे.
मध्यपूर्वेतील संघर्ष आता पाचव्या आठवड्यात पोहोचला असून अमेरिका आणि इस्रायलने इराणच्या आण्विक महत्त्वाकांक्षा कमकुवत करण्याचे आपले उद्दिष्ट कायम ठेवले आहे. त्याचवेळी, मध्यपूर्वेतील संघर्ष काहीसा निवळण्याची चिन्हे दिसत नाही, कारण अलीकडेच येमेनस्थित, इराण-समर्थित हौथी गटाने इस्रायलवर हल्ले करून युद्धात उडी घेतली आणि इराणने अमेरिकेला जमिनीवरील आक्रमणाच्या योजनांविरुद्ध इशाराही दिला असून अमेरिकेने आठवड्याच्या अखेरीस त्रिपोली या युद्धनौकेवरून ३५०० सैनिक मध्यपूर्वेत तैनात केले.
इराण ६०% समृद्ध युरेनियम ९ ग्रॅम प्रति तास या दराने उत्पादित करतो, जे दर पाच दिवसांनी अंदाजे १ किलो इतके होते. जून २०२५ पर्यंत इराणचा एकूण समृद्ध युरेनियमचा साठा जवळपास १०,००० किलोपर्यंत पोहोचला होता, ज्यापैकी ४०० किलोहून अधिक युरेनियम ६०% शुद्धतेचे होते, जे शस्त्रांसाठी आवश्यक ९०% शुद्धतेच्या पातळीच्या अगदी जवळ आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत,
सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## भारताची अर्थव्यवस्था मजबूत पायावर

जगातील युद्धजन्य परिस्थितीतदेखील 'एस अँड पी ग्लोबल' या जगद्विख्यात पतमानांकन संस्थेने भारतीय अर्थव्यवस्था २०२६-२७ या आर्थिक वर्षात ७.१ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. पूर्वीच्या अंदाजात ०.४० टक्क्याची वाढ करण्यात आली आहे, हे लक्षणीय म्हणावे लागेल. याचा अर्थ चालू आर्थिक वर्षाच्या तुलनेत मार्च २०२७ अखेरीस संपणाऱ्या आर्थिक वर्षात अर्थगतीचा वेग फक्त अर्ध्या टक्क्याने घटेल, असा होरा व्यक्त करण्यात आला आहे. याउलट अमेरिका - इस्रायल विरुद्ध इराण संघर्षामुळे आशिया पॅसिफिक देशांची विकास गती वर्षअखेरपर्यंत ०.५ ते ०.७ टक्क्याने कमी होईल, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. म्हणजे भारताची स्थिती त्यातल्या त्यात बरीच म्हणायची. मुळातच भारताची अर्थव्यवस्था मजबूत पायावर उभी आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून आणखी एक इंधनवाहू जहाज मायदेशी येत आहे. पेट्रोलियम उत्पादने आणि एलपीजीच्या उपलब्धतेबाबत ताबडतोब काळजी करण्याचे कारण नाही, असा दिलासा केंद्र सरकारने दिला आहे.युद्ध सुरू झाले तेव्हा देशांतर्गत एलपीजी उत्पादन २८ टक्के होते. ते वाढून आता ६० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे एलपीजी आयातीवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत झाली आहे. शिवाय होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारतीय जहाजे सुरक्षितपणे येत असून, इराणशी आपले सलोख्याचे संबंध आहेत. विशेष म्हणजे इराणने ज्या पाच देशांना होर्मुझची वाट मोकळी करून दिली आहे, त्यात भारताचा समावेश आहे. तथापि, बॉम्बफेक, क्षेपणास्त्र व ड्रोनहल्ले यामुळे हवाई तसेच सागरी वाहतूक खोळंबून राहिली आहे. पुरवठासाखळी विस्कळीत झाल्याने कच्चे तेल, पेट्रोल व डिझेल यांची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, असा एस अँड पी या पतमानांकन संस्थेचा अंदाज आहे. इंधनाची सर्वाधिक आयात करणाऱ्या देशांत जपान व भारताचा समावेश होतो. त्यामुळे सध्याच्या ज्वलंत वास्तवाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर काहीच परिणाम होणार नाही, असे म्हणता येणार नाही. परंतु इराणने भारतास झुकते माप दिल्याचा आपल्याला फायदा होणार आहे, हे नक्की. युद्ध समाप्त करण्यासाठी अमेरिकेने पाठवलेला १५ कलमी शांतता प्रस्ताव अवास्तव असल्याचे सांगत इराणने तो फेटाळून लावला.उलट, युद्धात झालेल्या नुकसानीची भरपाई द्या आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील आमचे सार्वभौमत्व स्वीकारा, असे इराणने म्हटले आहे. त्यामुळे युद्धसमाप्तीची तूर्तास शक्यता नाही. या प्रस्तावाच्या वृत्तानंतर तेलाच्या किमती पाच टक्क्यांनी घसरल्या. बेंट क्रूड वायद्यांचे दर ५.६६ डॉलरने घसरून ते ९८.८३ डॉलर प्रतिपिंपावर आले. यामुळे शेअर बाजारातही चैतन्याचे वातावरण पसरले. बुधवारी सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांकांनी दोन टक्क्यांपर्यंत उसळी घेतली. शांततेची आशा दिसू लागल्यामुळे आजवरचा जोखमीबाबतचा सावध पवित्रा सोडून बाजाराचा ताबा तेजीवाल्यांनी पुन्हा एकदा मिळवला. इंधन महागल्यास त्याचा शेती, उत्पादन क्षेत्र व सेवा क्षेत्र या सगळ्यावर परिणाम होत असतो. यंदा महागाई निर्देशांक ४.३ टक्क्यांवर राहील, अशी चिन्हे आहेत. सरकारने घरगुती गॅस सिलिंडरच्या किमती वाढवल्या असल्या, तरी पेट्रोल व डिझेलचे दर स्थिर आहेत. औद्योगिक वापरासाठीच्या डिझेलच्या किमतीत मात्र प्रतिलिटर २२ रुपयांची वाढ झाली. युद्ध दीर्घकाळ सुरू राहिल्यास सरकारला इंधनाचे दर वाढवणे भाग पडेल. त्यानंतर महागाई आणखी वाढण्याची भीती आहे. सेवा क्षेत्राच्या उत्तम कामगिरीमुळे चालू खात्यातील तूट सध्या आटोक्यात आहे. रिझर्व्ह बँक सध्या कर्जावरील व्याज दर जैसे थे ठेवेल, परंतु २०२६-२७ च्या दुसऱ्या सहामाहीत व्याज दर पाव टक्क्याने वाढण्याची शक्यता असल्याचे भाकीत एस अँड पीने केले आहे. जेव्हा व्याज दर वाढतात, तेव्हा उत्पादनखर्च वाढतो आणि वस्तूंचे दर वाढवून शेवटी ग्राहकाकडूनच हा खर्च वसूल केला जात असतो.नीचांकी स्तरावरून दहा पैशांनी रुपया सावरला असून तो प्रति अमेरिकी डॉलर ९३.९८ असा झाला आहे. त्याआधी चालू महिन्यात रुपयाची जवळपास चार टक्क्यांनी घसरण झाली होती. कारण परकीय पोर्टपोलिओ गुंतवणूकदार भारतीय बाजारातून माघार घेत असून, त्याचा रुपयावर ताण आला होता. आर्थिक अनिश्चिततेच्या काळात सुरक्षित आधार म्हणून सोन्याची मागणीही वाढली आहे. शिवाय जगभरातील मध्यवर्ती बँकांनी त्यांच्या गंगाजळीचे मूल्य टिकवून ठेवण्यासाठी गेल्या काही वर्षांत सोन्याची भरपूर खरेदी सुरू ठेवली आहे. तसेच ज्यावेळी जागतिक तणाव वाढतो, तेव्हा सोन्याला असलेली मागणी वाढत असते, हा इतिहास आहे. आर्थिक विश्लेषकांनी सकारात्मक अंदाज व्यक्त केला असला, तरीदेखील कठोर वास्तवाकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही. मध्य पूर्वेतील तणावामुळे त्या भागात राहणाऱ्या भारतीयांकडून भारतात येणाऱ्या रकमांवर किंवा रेमिटन्सेसवर परिणाम होऊ शकतो.मध्य पूर्वेत एक कोटी भारतीय राहतात आणि देशाच्या एकूण व्यवस्थेच्या साडेतीन टक्के इतका निधी त्यांच्याकडून येतो. भारत हा जगातील सर्वाधिक रेमिटन्स मिळवणारा देश आहे. या निधीमुळे भारताच्या एक्सटर्नल अकाऊंटला मोठा आर्थिक आधार मिळतो. युद्धामुळे भारताकडून मध्य पूर्वेकडे जाणाऱ्या जवळपास १२ अब्ज डॉलरच्या कृषी निर्यातीस झळ पोहोचली आहे. गेल्यावर्षी भारतातून मध्य पूर्वेतील देशांना ४.४३ अब्ज डॉलर किमतीचा तांदूळ पाठवला होता. युद्धामुळे चार लाख टन बासमती तांदूळ बंदरात किंवा वाहतुकीत अडकून राहिला आहे. भारत इराणला तांदूळ, चहा, औषधे पाठवतो. असा ७६ हजार टन माल खोळंबून राहिला आहे. वाहनांचे घटक व सुटे भाग यांच्या निर्यातीतही घट झाली असून, विमा कंपन्यांनी दर वाढवल्यामुळे निर्यातदारांची स्पर्धात्मकता कमी होत आहे. 'एचएसबीसी' या संस्थेच्या ताज्या सर्वेक्षणानुसार, खासगी क्षेत्राची वाढ मार्च महिन्यात सर्वाधिक गतीने मंदावली आहे. त्यातही उत्पादन क्षेत्र हे नीचांकी पातळीवर गेले आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता केंद्र सरकारला राज्यांच्या सहकार्याने आर्थिक प्रतिकूलतेवर मात करावी लागेल. त्यासाठी व्यापारी, उद्योजक, आयातदार व निर्यातदार यांना आर्थिक आधार द्यावा लागेल.

## || अभंगवाणी ||

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

सत्य व अहिंसा, मार्ग दाखविती |
हेचि शिकविती, महावीर ||

ठेवा सांगे व्रत, महावीर ||

संपत्ती, नात्यांशी, नसावी आसक्ती |
जनास सांगती, महावीर ||

जगी पोहचावा, शांतिचा संदेश |
करिती आदेश, महावीर ||

करुणेमधून, विश्वासामधून |
सांगती जीवन, महावीर ||

नैतिकता आणि सद्मार्ग दावती |
युवा घडविती, महावीर ||

आत्मज्ञानातून , मोह माया जाती |
मोक्ष प्राप्ती देती, महावीर ||

संयम वाणीत, शरीर, मनात |

## विचारमंथन



संजय भा. देशमुख
मो. 8888872784

# इराण संघर्ष, जागतिक अस्थिरता आणि इंटरनेटसह ऊर्जा सुरक्षेवर वाढते संकट

सध्या जागतिक पातळीवर इराणशी संबंधित घडामोडींमुळे मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांमुळे आणि इराणवरील कारवाईमुळे केवळ मध्यपूर्वेतच नव्हे, तर संपूर्ण जगभरात त्याचे परिणाम दिसून येत आहेत. या पार्श्वभूमीवर लाखो लोक रस्त्यावर उतरून निषेध करत आहेत. अमेरिका आणि युरोपमधील अनेक देशांत 'नो किंग्स प्रोटेस्ट'सारख्या आंदोलनांनी जोर धरला आहे. या आंदोलनांमधून लोकशाही मूल्ये, युद्धविरोधी भावना आणि आर्थिक अस्थिरतेबद्दलची भीती स्पष्टपणे दिसून येते. इराणमध्ये गेल्या काही दशकांपासून इस्लामिक राजवट अस्तित्वात आहे. या राजवटीविरुद्ध आणि तेलसंपत्तीवर नियंत्रण मिळवण्यासाठी बाह्य शक्तींनी हस्तक्षेप केल्याचा आरोप आंदोलकांकडून होत आहे. ट्रम्प यांच्या कारवाईमुळे इराणमध्ये तणाव अधिक वाढला असून, यामुळे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. याचे परिणाम केवळ राजकीय नाहीत, तर आर्थिकदृष्ट्याही गंभीर आहेत. जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. भारतात पश्चिमबंगाल, आसाम , तामिळनाडू, केरळ आणि पोंडेचेरी या पाच राज्यात विधानसभा निवडणुका असल्यामुळे केंद्रासरकारने ही दरवाढ केली नाही. निवडणुका होताच भारतीयांना गॅस, पेट्रोल दरवाढीचा सामना करावा लागेल, हे निश्चित. मध्यपूर्व हा तेलाचा प्रमुख स्रोत असल्यामुळे तेथील अस्थिरता थेट इंधन दरांवर परिणाम करते. भारतासारख्या देशांमध्ये पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किमती वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांवर महागाईचा मोठा भार पडतो. वाहतूक, उत्पादन आणि दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्याने अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होतो. मध्यपूर्व हा जगातील कच्च्या तेलाचा मुख्य पुरवठादार भाग आहे. इराण, सौदी अरेबिया, इराक यांसारख्या देशांमध्ये कोणताही संघर्ष झाला, की त्याचा थेट परिणाम जागतिक तेलपुरवठ्यावर होतो. पुरवठा कमी झाला किंवा त्यात अडथळा निर्माण झाला, की कच्च्या तेलाचे दर झपाट्याने वाढतात. परिणामी भारतासारख्या आयात-आधारित देशांमध्ये पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किमतीत मोठी वाढ होते. भारत आपल्या गरजेपैकी जवळपास ८५% कच्चे तेल आयात करतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात किंमती वाढल्या, की त्याचा थेट परिणाम देशांतर्गत दरांवर होतो. पेट्रोल आणि डिझेल महाग झाले, की वाहतूक खर्च वाढतो. ट्रक, बस, रेल्वे,



विमान यांचा खर्च वाढल्यामुळे वस्तूंच्या किंमती वाढतात. अन्नधान्य, भाजीपाला, दूध, किराणासर्वच वस्तू महाग होतात. यालाच महागाईची साखळी प्रतिक्रिया म्हणतात.

गॅसच्या दरवाढीचा परिणाम तर प्रत्येक घरावर होतो. स्वयंपाकासाठी वापरला जाणारा गॅस महाग झाला, की घरगुती बजेट पूर्णपणे कोलमडते. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना याचा सर्वाधिक फटका बसतो. अनेक वेळा लोकांना गॅसऐवजी पर्यायी इंधन (लाकूड, कोळसा) वापरण्याची वेळ येते, ज्यामुळे आरोग्यावरही वाईट परिणाम होतो. याशिवाय पेट्रोल-डिझेल दरवाढीचा परिणाम उद्योगधंद्यांवरही होतो. उत्पादन खर्च वाढल्यामुळे कंपन्या वस्तू महाग करतात किंवा उत्पादन कमी करतात. यामुळे रोजगारावरही परिणाम होऊ शकतो. लहान उद्योग, शेतकरी आणि वाहतूक व्यवसायिक यांना सर्वाधिक अडचणींचा सामना करावा लागतो. शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती आणखी कठीण असते. शेतीसाठी वापरले जाणारे डिझेल महाग झाले, की उत्पादन खर्च वाढतो. पण शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. याचा परिणाम अन्नधान्याच्या उपलब्धतेवर आणि किमतींवरही होतो. युरोपमधील अनेक देशांनीही या संघर्षाबाबत सावध भूमिका घेतली आहे. त्यांनी थेट समर्थन देण्यास टाळाटाळ केल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर अनिश्चितता वाढली आहे. युद्धामुळे निर्वासितांची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे युरोपमध्ये सामाजिक आणि आर्थिक ताण वाढू शकतो. या सर्व परिस्थितीचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे इंटरनेट आणि तंत्रज्ञान क्षेत्रावर होणारा परिणाम. जगातील सुमारे ९९% इंटरनेट डेटा हा उपग्रहांद्वारे नव्हे, तर समुद्राखालील सबमरीन फायबर ऑप्टिक केबल्सद्वारे प्रवास करतो. या केबल्स 'स्ट्रीट ऑफ होर्मुज'सारख्या संवेदनशील भागातून जातात, जे इराणच्या प्रभावाखाली आहेत. इराण ने इंटरनेट ट्रॅफिक या केबल्स बाधित करण्याची दिलेली धमकी अमेरिका आणि इजराईल ला हलक्यात घेता येणार नाही. जर संघर्ष वाढला आणि या केबल्सना नुकसान झाले, तर जागतिक इंटरनेट सेवा मोठ्या प्रमाणावर विस्कळीत होऊ शकते. बँकिंग व्यवहार, शेअर बाजार, विमान वाहतूक आणि सारख्या डिजिटल पेमेंट प्रणाली पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता आहे. भारतासाठी ही परिस्थिती अधिक गंभीर ठरू शकते, कारण देशातील सुमारे ९५% इंटरनेट ट्रॅफिक या केबल्सवर अवलंबून आहे. उपग्रह इंटरनेट (जसे की स्टारलिंक) हा एक पर्याय असला तरी त्याची क्षमता मर्यादित आहे आणि तो पूर्णपणे फायबर नेटवर्कची जागा घेऊ शकत नाही. त्यामुळे जर केबल्समध्ये अडथळा निर्माण झाला, तर त्याचा थेट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि दैनंदिन जीवनावर होईल. या पार्श्वभूमीवर भारतासह सर्व देशांनी ऊर्जा आणि डिजिटल सुरक्षेवर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. पर्यायी ऊर्जा स्रोतांचा विकास, स्थानिक उत्पादन वाढवणे आणि इंटरनेटसाठी विविध मार्ग तयार करणे ही काळाची गरज आहे. शेवटी, इराण संघर्ष हा केवळ एका प्रदेशापुरता मर्यादित नसून त्याचे परिणाम संपूर्ण जगावर होत आहेत. महागाई, ऊर्जा संकट, इंटरनेट सेवा आणि जागतिक अर्थव्यवस्था यावर त्याचा प्रभाव दिसून येत आहे. त्यामुळे जागतिक शांतता राखण्यासाठी आणि आर्थिक स्थैर्य टिकवण्यासाठी सर्व देशांनी संयम आणि सहकार्याची भूमिका घेणे अत्यंत गरजेचे बनले आहे.

# लाडकी बहीण योजना: ई-केवायसीच्या कात्रीत अडकली भावाची ओवाळणी!

## समीक्षण



पदमाकर आखरे
मो. 9881929090

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली तेव्हा राज्यातील कोट्यवधी महिलांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. "प्रत्येक पात्र बहिणीला आर्थिक लाभ मिळेल," या शब्दावर विश्वास ठेवून गावागावांतून महिलांनी रांगा लावून अर्ज भरले. सुरुवातीच्या काळात निवडणुकांचे वारे असल्याने प्रशासनाने कमालीची लवचिकता दाखवली आणि अनेक भगिनींना पात्र ठरवून त्यांच्या खात्यात हप्तेही जमा केले. मात्र, निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर आणि सत्तास्थानी बसल्यानंतर आता या योजनेचे चित्र पूर्णपणे बदलल्याचे दिसत आहे. ज्या बहिणींना कालपर्यंत लाडकी म्हटले जात होते, त्याच बहिणींना आता क्लिष्ट अटी आणि तांत्रिक त्रुटींच्या नावाखाली अपात्र ठरवण्याचे सत्र सुरू झाले आहे.

योजना सुरू झाली तेव्हा नियम शिथिल होते, पण आता नवनवीन शर्ती लादल्या जात आहेत. सर्वात मोठा अडथळा ठरत आहे तो म्हणजे ई-केवायसी योजनेचा लाभ सुरू ठेवण्यासाठी ई-केवायसी अनिवार्य करण्यात आली असली तरी, त्याची अंमलबजावणी कमालीची जाचक ठरत आहे. ई-केवायसीच्या प्रक्रियेत विचारले जाणारे प्रश्न इतके गुंतागुंतीचे आणि त्रुटीपूर्ण होते की, सामान्य ग्रामीण महिलेला त्याचे उत्तर देणे अशक्य होत आहे. परिणामी, केवळ तांत्रिक प्रश्नांच्या गोंधळामुळे लाखो भगिनींना अपात्र ठरवण्यात आले आहे. ही केवळ तांत्रिक प्रक्रिया नसून, पात्र लाभार्थ्यांची संख्या कमी करण्याचा हा एक डिजिटल मार्ग असल्याची भावना आता महिलांमध्ये निर्माण होत आहे.

शहरांमध्ये इंटरनेट आणि महा-ई-सेवा केंद्रांची सोय आहे, पण ग्रामीण भागातील वास्तव भीषण आहे. अनेक महिलांकडे स्वतः





चा स्मार्टफोन नाही, तर काहींचा आधार कार्डशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक बंद पडला आहे. अशा परिस्थितीत ओटीपी मिळवणे ही मोठी कसरत ठरली आहे. ग्रामीण भागातील ज्या लाखो महिलांनी डिसेंबर २०२५ पर्यंत आपली ई-केवायसी पूर्ण केली नाही, त्यांच्यासाठी आता पोर्टल बंद झाले आहे. ज्या महिला शेतमजुरी करतात किंवा दुर्गम भागात राहतात, ज्यांना माहितीच्या अभावामुळे ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करता आली नाही, त्यांना आता पुन्हा संधी दिली जात नाहीये. याचा अर्थ असा की, या महिला आता शासनाच्या लेखी लाडक्या उरल्या नाहीत का? एकीकडे सरकार महिला सक्षमीकरणाच्या गप्पा मारत असताना, दुसरीकडे सॉफ्टवेअरमधील त्रुटींमुळे महिलांचे हाल होत आहेत. योग्य माहिती भरूनही पोर्टलवर अपात्र असा संदेश येणे, सर्व्हर डाऊन असणे आणि केवायसी केंद्रांवर होणारी गर्दी यामुळे सामान्य महिला त्रस्त झाल्या आहेत. डिसेंबरची डेडलाईन हुकलेल्या महिलांना आता स्वतःची बाजू मांडण्यासाठी किंवा त्रुटी सुधारण्यासाठी कोणतीही खिडकी खुली ठेवण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या सुस्तीचा आणि ताठर भूमिकेचा फटका सर्वात जास्त गरीब, विधवा आणि निराधार महिलांना बसत आहे.

कोणतीही लोककल्याणकारी योजना ही निवडणुकीपुरती मर्यादित नसावी. जर शासनाला खरोखरच महिलांचे हित जोपासायचे असेल, तर त्यांनी तातडीने ई-केवायसीसाठी मुदतवाढ देणे गरजेचे आहे. ज्या महिला खरोखर वंचित राहिल्या आहेत, त्यांच्यासाठी ग्रामपंचायत किंवा अंगणवाडी स्तरावर विशेष शिबिरे घेऊन त्यांची कागदपत्रे पडताळली जावीत. केवळ मोबाईलवर मेसेज आला नाही किंवा ई-केवायसी झाली नाही म्हणून लाभ बंद करणे, हा अन्याय आहे. शासनाने हे लक्षात घ्यावे की, १५०० रुपयांची ही रक्कम अनेक कुटुंबांसाठी उदरनिर्वाहाचा मोठा आधार आहे. हा आधार हिरावून घेण्याऐवजी, तांत्रिक अडचणी दूर करून प्रत्येक गरजू बहिणीला पुन्हा या योजनेत समाविष्ट करून घेणे, हीच काळाची गरज आहे. तरच या योजनेचा मूळ उद्देश सार्थ ठरेल.

# महावीर : अहिंसेचे तेजस्वी दीप


## दिन विशेष



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२

मानवजातीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांनी आपल्या विचारांनी, तत्त्वज्ञानाने आणि आचरणाने संपूर्ण मानवजातीला एक नवी दिशा दिली. अशा तेजस्वी आणि कालातीत व्यक्तिमत्त्वांमध्ये भगवान महावीर यांचे स्थान अत्यंत उंच आहे. चैत्र महिन्यात साजरी होणारी महावीर जयंती ही केवळ धार्मिक उत्सव नसून ती मानवी मूल्यांचा जागर करणारी, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारी आणि नैतिकतेचा मार्ग दाखवणारी एक महत्त्वपूर्ण पर्वणी आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात महावीरांचे विचार अधिकच सुसंगत आणि आवश्यक वाटतात. भगवान महावीरांचा जन्म इ.स.पूर्व ५९९ मध्ये वैशालीजवळील कुंडलपूर येथे झाला. बालपणापासूनच महावीरांचा स्वभाव अत्यंत शांत, संयमी आणि करुणामय होता. त्यांना सांसारिक सुखांपेक्षा आत्मिक समाधान अधिक महत्त्वाचे वाटत असे. लहान वयातच त्यांनी समाजातील दुःख, अन्याय आणि विषमता यांचा सखोल विचार केला. त्यांच्या मनात सतत एक प्रश्न घोळत होता की मानवाला खरे सुख कसे मिळेल? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नातूनच त्यांच्या जीवनाला एक वेगळी दिशा मिळाली.

वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी सर्व सांसारिक बंधनांचा त्याग करून तपश्चर्येचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय अत्यंत कठीण होता, कारण त्यासाठी त्यांना कुटुंब, संपत्ती आणि सर्व सुखसुविधांचा त्याग करावा लागला. त्यांनी जवळपास बारा वर्षे अत्यंत कठोर साधना केली. या काळात त्यांनी उपास, ध्यान, मौन आणि आत्मसंयम यांचा कठोर अभ्यास केला. अनेक अडचणी, संकटे आणि अपमान सहन करूनही त्यांनी आपला मार्ग सोडला नाही. अखेरीस त्यांनी कैवल्यज्ञान प्राप्त केले आणि 'महावीर' म्हणून ओळखले जाऊ लागले. महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत व्यापक आणि जीवनोपयोगी आहे. त्यांनी पंचमहाव्रतांचा उपदेश केला. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. या पाच तत्त्वांमध्ये संपूर्ण नैतिक जीवनाचा सार दडलेला आहे. अहिंसा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे केंद्रस्थान आहे. त्यांनी केवळ शारीरिक हिंसा टाळण्याचा उपदेश केला नाही, तर मन, वाणी आणि कृतीतून कोणालाही दुखावू नये, असा व्यापक संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे आणि प्रत्येकाला जगण्याचा समान अधिकार आहे. सत्य हा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत आहे. महावीरांनी सत्याला सर्वोच्च स्थान दिले. त्यांनी सांगितले की सत्य म्हणजे केवळ खोटे न बोलणे नव्हे, तर न्याय, प्रामाणिकपणा आणि नैतिकता यांचे पालन करणे होय. आजच्या समाजात, जिथे असत्य आणि फसवणूक वाढत आहे, तिथे सत्याचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.




अस्तेय म्हणजे चोरी न करणे. परंतु त्याचा अर्थ केवळ भौतिक वस्तूंची चोरी टाळणे एवढाच नाही, तर दुसऱ्याच्या हक्कावर अतिक्रमण न करणे, अन्यायाने लाभ मिळवू नये, असा व्यापक अर्थ त्यामध्ये अंतर्भूत आहे. ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही तत्त्वे मानवी जीवनाला संयम आणि संतुलन शिकवतात. ब्रह्मचर्य म्हणजे इंद्रियसंयम, तर अपरिग्रह म्हणजे अनावश्यक वस्तूंचा त्याग. आजच्या उपभोगवादी संस्कृतीत अपरिग्रहाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे.

महावीरांनी 'अनेकांतवाद' हा अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत मांडला. या तत्त्वानुसार कोणत्याही गोष्टीकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे सहिष्णुता आणि संवाद यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या समाजात वाढत्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर हा विचार अत्यंत उपयुक्त ठरतो. महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक सुधारणांसाठीही प्रेरणादायी आहे. त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांचा विरोध केला. त्यांनी सर्वांना समानतेचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्मांद्वारे उन्नती साधू शकते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारक होता. महावीर जयंती हा दिवस या सर्व विचारांचे स्मरण करून देणारा आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा, प्रवचने आणि मिरवणुका आयोजित केल्या जातात. मंदिरांमध्ये विशेष सजावट केली जाते आणि महावीरांच्या मूर्तीची पूजा केली जाते. अनेक ठिकाणी दानधर्म आणि सामाजिक सेवा उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे. आजच्या आधुनिक युगात, जिथे तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, परंतु मानवी मूल्ये कमी होत चालली आहेत, तिथे महावीरांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो. अहिंसा, सत्य आणि संयम या मूल्यांचा अवलंब केल्यास समाजात शांतता आणि समन्वय निर्माण होऊ शकतो. महावीरांच्या शिकवणुकीचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर पुढील अनेक शतकांपर्यंत समाजाच्या विविध स्तरांवर त्याचा परिणाम दिसून आला. भगवान महावीर यांनी दिलेला अहिंसेचा संदेश पुढे

(पान ५ वर...)

## कृषी जगत



अशोक वानखेडे
मो. 9403493100

# स्वावलंबी होत असलेल्या शेतकऱ्यामुळेच घडेल कृषी प्रधान महाराष्ट्र

महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे ही केवळ शिक्षण पदवी घेण्याची पीठ न राहता, जबाबदार स्वालंबी कृषी युवा पदवीधर आणि सक्षम शेतकरी यांच्यासाठी नेतृत्व घडविण्याचे प्रभावी पीठ होणेगरजेचे आहे. आणि अशाच स्वावलंबी व सक्षम युवा शेतकऱ्यामुळे विकसित महाराष्ट्र घडेल. ही वास्तविकता आहे की काही काळापूर्वी कृषी विद्यापीठाचा पदवीधर संकल्प करून कृषी क्षेत्रातील शासकीय नोकरी मिळण्याच्या खात्रीने कृषी पदवी संपादन करीत असत. परंतु आजच्या घडीला कृषी पदवी ही राज्याची सर्वात मोठी प्रभावी सक्षम ताकद निर्माण झालेली आहे. अशी शेती पूरक उद्योग करणारे शिक्षित युवा पिढी उत्साही आणि गतिमान स्वालंबी शेतकरी निर्माण करण्यासाठी मोलाची ठरणारी आहे.

ही समोर वास्तविकता असताना सुद्धा आजच्या घडीला शेतीसाठी दररोज विकत घेऊन तंत्रज्ञानाचा वापर करणे शेतकऱ्यासाठी घातक होण्याचे चिन्ह समोर येत आहेत. निसर्गाचा असंतुलित पणा आणि शेतकऱ्याच्या पाठीवर केव्हाही ओझं ठेवणारे राजकीय धोरण त्यामुळे शेतकरी पुन्हा पुन्हा कर्जबाजारी होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे शेतकऱ्याला पारंपारिक शाश्वती पद्धती ला तंत्रज्ञानाची सांगड घालून शेती करण्याची गरज आहे. शेतीला रोज पैसा खर्च करून जमणार नाही तर आपल्या शेतीतून रोज पैसा कसा मिळेल हे शाश्वत शेती सोबत पूरक उद्योगाची मैत्री जोडावी लागणार आहे. तेव्हाच हा सक्षम झालेला युवा पदवीधर शेतकरी स्वतःसह इतर ग्रामीण भागातीलशेतकऱ्याला सुद्धा स्वालंबी करेल यात मला तरी शंका वाटत नाही. कृषी विद्यापीठातून पदवी घेऊन बाहेर पडलेल्या कृषी युवा पदवीधर कृषी क्षेत्रात अशा तरुणाचा विकसित तंत्रज्ञानाचा कृषी विचारांना स्वावलंबी शेतीला दिशा मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्था विकसित करण्यास व त्याची जडणघडण करण्यास अशा युवकाचा सिंहाचा वाटा असेल.

निष्ठावान शेतकरी निर्मिती हा भक्कम शेतीचे नेतृत्वाचा पाया असून तो कसा घडविता येईल याचे व्यूहरचना प्रशासन स्तरातून प्रभावी होणे गरजेचे आहे. कृषी योजना, कर्ज पुरवठा, आशेची वाट दाखवणाऱ्या काहीघोषणा, तर काही आवश्यक गरजेच्या कृषी योजना शेतकऱ्यांच्या हिताच्या किती प्रमाणात असू शकतात किंवा काही घोषणा शेतकऱ्याला कष्ट श्रम न करता शेतीपासून दूर करणाऱ्या पण काही चुकीच्या घोषणा समोर येत आहेत. त्याचा अभ्यास आता



कृषी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाने शासन दरबारी अभ्यासपूर्वक मांडण्यासाठी कृषी विद्यापीठाने प्रभावी पाऊल उचलावे असे मला तरी ठामपणे वाटते. याचे कारणही तसेच आहे आजच्या युगात शेतकऱ्याला तारणारे फक्त कृषी विद्यापीठाचे तंत्रज्ञान आहे. शिक्षणात बदल एवढाच करणे गरजेचे आहे पैसा खर्च करून घेतलेल्या शिक्षणापासून एका हातात पदवी आणि एका हातात पैसा कसा कमावता येईल असले शिक्षण येणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाच्या या जगात नोकरी हे शासन दरबारी न मिळता आपल्या ग्रामीण भागात आपणाला स्वतः निर्माण करावा लागणार आहे. . विद्यापीठातील शिक्षण घेत असलेल्या युवा पिढीला ज्ञानातून शेतीपूरक रोज कसा पैसा मिळवता येईल हे ज्ञान किती प्रमाणात पदवी घेण्याच्या काळात त्या युवकाच्या शिक्षणात असावे हे विद्यापीठ स्तरावर ठरवावे लागेल. मात्र शेतकऱ्याचा शेतमजुराचा किंवा इतर क्षेत्रातील युवक जेव्हा विद्यापीठातून पदवी हातात घेऊन गावाकडे घराकडे येतो तेव्हा त्या पदवी प्रमाणपत्रात त्याला शेतीतून रोजच किती प्रमाणात पैसे मिळवता येतील याची गुणवत्ता असलेली पदवी व त्याची शाश्वती खात्री असावी लागेल.

अन्न उत्पादन, पीक संरक्षण या मुद्द्यापलीकडे जाऊन अन्न निर्माण पीक संरक्षण करताना पिकात पौष्टिक गुणवत्ता असलेले पीक निर्मिती ह्या अभ्यासाकडे जर विद्यापीठाने लक्ष वेधले तर विद्यापीठातून निर्माण होणारा कृषी पदवीधर हा स्वालंबी तत्त्वावर शेती करेल. त्याला ना कोणते कर्ज काढणे व कर्ज मिळण्यासाठी किंवा कर्जमाफीसाठी कोणीही राज नेत्या च्या झेंड्याखाली न येता आपली कृषी पदवीच्या माध्यमातून निष्ठावान स्वालंबी शेतकरी नेतृत्व करण्यास ग्रामीण भागाची आर्थिक विकसित जडणघडण घडविण्यास उभा राहिला पाहिजे.

प्रशासन शेतकऱ्यासाठी आज खूप तंत्रज्ञानाची घोषणा करत आहे. किंवा इतरही तंत्रज्ञान पैसे मोजल्याशिवाय मिळणे कठीण वाटते. सक्षम, समृद्ध स्वालंबी आणि सर्व समावेशक कृषी राज्य घडवण्याचा या कृषी पदवीधर युवा पिढीने सक्रिय सहभाग ग्रामीण स्तरावर नोंदवावा. गाव सोडून स्थलांतरित होणे आणि मोठे मोठे उद्योग कर्ज काढून करण्याचे स्वप्न पाहणे हे निव्वळ कर्जबाजारी होण्याचे लक्षणे आहेत. आपल्या ग्रामीण स्तरावरच आपला शेतीपूरक उद्योग निर्माण करून इतरही बेरोजगार युवकांना त्यांच्या हाताला काम मिळाले पाहिजे यासाठी प्रशासन स्तरावर सुद्धा समृद्धी अभियान राबवण्याची गरज आहे. त्यासोबतच राज्यातील चार-पाच कृषी विद्यापीठाने सुद्धा अशाच पदवीधर कृषी युवकांना शेतीच्या अर्थव्यवस्थेला जोडणारे एक मोठ ज्ञानपीठ असल्याचे कृतीतून सिद्ध करावे. हे कर्तव्य आता कृषी विद्यापीठ समूहाने सुद्धा विसरता कामा नये. आपल्या कृषी विद्यापीठातून संशोधित कृषी कार्यातून स्वावलंबी निष्ठावान शेतकरी उभा करण्याची शक्ती कृषी परिषदेने पुन्हा सर्व विद्यापीठ समूहाला प्रदान केलेली आहे हे विसरून किंवा त्याकडे कानाडोळा केल्याने स्वालंबित शेतकरी घडेल का हा प्रश्न निर्माण होऊ शकतो?.

( क्रमशः )

# नागराज मंजुळेंचा मटका किंग येतोय; विजय वर्माच्या वाढदिवशी टीझर रिलीज

ज्येष्ठ अभिनेते विजय वर्मा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून प्राइम व्हिडिओने मटका किंग या बहुप्रतीक्षित वेब सीरिजचा टीझर लॉन्च केला आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी या सीरिजचे दिग्दर्शन केले असून, ही कथा १९६० च्या दशकातील मुंबईतील एका व्यापाऱ्याभोवती फिरते, जो मटका हा जुगाराचा खेळ सुरू करून संपूर्ण शहरावर राज्य करतो. विजय वर्माच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त (२९ मार्च २०२६) प्राइम व्हिडिओने चाहत्यांना मटका किंगचा धमाकेदार टीझर शेअर करून मोठे सरप्राईज दिले आहे. या वेब सीरिजच्या निमित्ताने सैराट फेम नागराज मंजुळे आणि विजय वर्मा ही तगडी जोडी पहिल्यांदाच एकत्र येत आहे. प्राईम व्हिडिओ, जो भारतातील सर्वात लोकप्रिय एंटरटेनमेंट डेस्टिनेशन आहे, त्याने आज विजय वर्माच्या वाढदिवसानिमित्त आगामी ओरिजिनल ड्रामा सीरिज 'मटका किंग'ची वर्ल्डवाईड प्रीमियर डेट जाहीर केली आहे. अभय कोरन्ने यांनी लिहिलेली आणि नागराज पोपटराव मंजुळे दिग्दर्शित केलेली ही सीरिज १९६० च्या दशकातील बदलत्या मुंबईवर आधारित आहे. 'मटका किंग'ची कथा ब्रिज भट्टीभोवती फिरते, ज्याची भूमिका विजय वर्मा यांनी साकारली आहे. १९६० च्या दशकातील बदलत्या बॉम्बेमध्ये स्वतःची ओळख आणि मान-सन्मान मिळवण्यासाठी झटणारा एक हुशार आणि मेहनती कापूस व्यापारी अशी त्याची व्यक्तिरेखा आहे. गर्दीने गजबजलेले बाजार, चाळी आणि बदलणारी सत्ता यांच्यात ही कथा उभी राहते.नागराज मंजुळे यांनी या काळातील मुंबई, तेथील बाजारपेठा आणि चाळींचे जीवन अत्यंत जिवंतपणे पडद्यावर उतरवले आहे. कथा एका चतुर कापूस व्यापाऱ्याची (विजय वर्मा) आहे, जो मटका नावाचा जुगाराचा एक नवीन प्रकार सुरू करतो. हा खेळ इतका लोकप्रिय होतो की तो केवळ श्रीमंतांपुरता मर्यादित न राहता सर्वसामान्यांच्या जीवनाचा भाग बनतो.'मटका किंग'मध्ये विजय वर्मा, कृतिका कामरा, सई ताम्हणकर, सिद्धार्थ जाधव, भूपेंद्र जादावत आणि गुलशन ग्रोवर मुख्य भूमिकांमध्ये आहेत. यांच्यासोबत विनीत कुमार सिंह, भरत जाधव, गिरीश कुलकर्णी, जेमी लीवर, किशोर कदम, सायरस साहूकार, अर्पिता सेठिया, संभाजी तांगडे, इश्तियाक खान, संजीव जोटांगिया आणि सिमरन अश्विनी महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. ही सीरिज सिद्धार्थ रॉय कपूर, नागराज पोपटराव मंजुळे, गार्गी कुलकर्णी, अश्विनी सिदवानी आणि आशीष आर्यन यांनी 'रॉय कपूर फिल्म्स', 'आटपाट' आणि ' प्रोडक्शन्स'च्या बॅनरखाली निर्मित केली आहे.

# रजत दलालच्या लग्नामुळे प्रिन्स नरुलाचा राग शांत; शत्रुत्व विसरून शेअर केला खास व्हिडिओ




बिग बॉस १८ आणि द ५० फेम सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर रजत दलालने अचानक लग्नाचे फोटो शेअर करत सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. उत्तराखंडमधील ऋषिकेश येथे अत्यंत मोजक्या लोकांच्या उपस्थितीत हा विवाह सोहळा पार पडला. रंगाने पांढरी शेरवानी आणि लाल लेहेंग्यात हे जोडपे अत्यंत सुंदर दिसत आहे. विशेष म्हणजे, ज्या प्रिन्स नरुलासोबत रजतचा द ५० शोमध्ये मोठा वाद झाला होता, त्यानेही आता सर्व विसरून रजतला लग्नाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

सोशल मीडियावरील आपल्या आक्रमक स्वभावासाठी आणि वादांसाठी ओळखला जाणारा बिग बॉस १८ फेम रजत दलाल आता एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आला आहे. नेहमी वादाच्या भोवऱ्यात राहणाऱ्या रजतने आपल्या आयुष्याची नवी सुरुवात केली आहे. रविवारी सायंकाळी रजतने आपल्या लग्नाचे फोटो शेअर करत चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे.रजत दलालने उत्तराखंडमधील ऋषिकेश येथे गंगा नदीच्या काठावर एका खासगी सोहळ्यात लग्नगाठ बांधल्याचे म्हटले जात आहे. त्याने शेअर केलेल्या फोटोंमध्ये तो ऑफ-व्हाईट रंगाच्या शेरवानीमध्ये दिसत आहे, तर त्याच्या पत्नीने पारंपरिक लाल रंगाचा लेहेंगा परिधान केला आहे. रजतने या फोटोंना "जीवनाच्या एका नवीन अध्यायाची सुरुवात... सर्वांचे आशीर्वाद असू द्या," अशी कॅप्शन दिली आहे.

या फोटोंवर विवियन डीसेना, आसिम रियाज, युविका चौधरी, शिव ठाकरे, उर्वशी ढोलकिया सह अनेक सेलेब्सनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. रजतने सुंदर पर्वत डेस्टिनेशन वेडिंग केले आहे.रजत दलालने वेडिंग फोटोज पोस्ट केले आहे. त्याने आपल्या पत्नीचे नाव शेअर केलेले नाही किंवा तिची ओळख उघड केलेली नाही, ज्यामुळे चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, रजतआणि त्याची पत्नी लॉन्ग रिलेशनशीपमध्ये होते. बिग बॉस १८ मध्ये रजतने एका एपिसोडमध्ये हा खुलासा केला होता की, त्याची गर्लफ्रेंड आहे. तसेच द ५० मध्ये त्याने सांगितले होते की, त्याची गर्लफ्रेंड लवकरच पत्नी बनेल.रजतच्या लग्नानंतरची सर्वात मोठी बातमी म्हणजे अभिनेता प्रिन्स नरुलाची प्रतिक्रिया होय. द ५० या रिॲलिटी शोमध्ये रजत आणि प्रिन्स यांच्यात टोकाचे वाद झाले होते. मात्र, रजतच्या लग्नाची बातमी कळताच प्रिन्सने एक व्हिडिओ शेअर करत त्याला शुभेच्छा दिल्या आहेत. प्रिन्स म्हणाला, "भावा, लग्नाबद्दल तुझे खूप अभिनंदन! आता वहिनी आल्या आहेत, त्या तुला नक्कीच सांभाळतील आणि तुझा तबला वाजवतील. तुझ्या लग्नाची बातमी ऐकून माझा सगळा राग संपला आहे. जो काही वाद होता तो शोमध्ये तो संपला आहे. कुणाला तरी मोठं व्हावं लागणार होतं. म्हणून मी मोठ्या मनाने राग काढून टाकतोय."रजतच्या लग्नाच्या फोटो पोस्टवर बिग बॉस १७चा विजेता मुनव्वर फारुकीने कमेंट केली आहे. रजतच्या रॅश ड्रायव्हिंगच्या जुन्या वादाची आठवण करून देत मुनव्वरने लिहिले, "गाडीचा वेग नियंत्रित करणारी व्यक्ती अखेर आली आहे!! माझ्या भावाला आणि वहिनीला खूप खूप अभिनंदन."

## ओळख पक्ष्यांची : स्वर्गीय नर्तक



चित्रात एक इंडियन पॅराडाईज फ्लायकॅचर, विशेषतः एक प्रौढ नर, त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण पांढऱ्या पिसाऱ्यासह आणि लांब शेपटीच्या पट्ट्यांसह दिसत आहे.
वैज्ञानिक नावः नराचे डोके, तुरा चमकदार काळा असतो आणि त्याच्या शेपटीची पिसे अत्यंत लांब, पांढऱ्या रिबिनीसारखी असतात. ते भारतीय उपखंडातील दाट झाडी असलेल्या भागांमध्ये, जंगलांमध्ये आणि बागांमध्ये राहतात.
हे कीटकभक्षी पक्षी असून ते हवेतच कुशलतेने कीटक पकडण्यासाठी ओळखले जातात.

**(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)**

## राशी-भविष्य

**मेष :** तुम्ही मित्र आणि नातेवाईकांना मदत करू शकाल. कामात सुधारणा आणि बदल शक्य आहेत. योजना यशस्वी होतील, परंतु तुम्हाला तात्काळ फायदे दिसणार नाहीत.

**वृषभ:** प्रवास फायदेशीर ठरेल. गमावलेले पैसे परत मिळू शकतील. पैसे मिळवणे सोपे होईल. कामावर तुमचा प्रभाव वाढेल. व्यवसाय फायदेशीर राहील.

**मिथून :** तुम्हाला खूप दिवसांपासून हरवलेले मित्र भेटतील. तुम्हाला उत्साहवर्धक बातम्या मिळतील. तुमचा स्वाभिमान अबाधित राहील. तुम्हाला एखादे मोठे काम हाती घ्यावे किंवा

**कर्क :** प्रवास फायदेशीर ठरेल. नोकरी शोधण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. भेटवस्तू आणि भेटवस्तू मिळतील. व्यवसाय फायदेशीर ठरेल. गुंतवणूक शुभ राहील. तुम्हाला भागीदारांकडून सहकार्य मिळेल.

**सिंह :** तुमच्या कठोर परिश्रमाचे पूर्ण फळ तुम्हाला मिळेल. यशामुळे आनंद मिळेल. भागीदार तुम्हाला पाठिंबा देतील. तुम्ही मित्र आणि नातेवाईकांना मदत करू शकाल.

**कन्या :** व्यवसाय फायदेशीर राहील. उत्पन्न निश्चित असेल. वाद टाळा. आर्थिक अडचणी उद्भवू शकतात. अनावश्यक खर्च शक्य होतील. वेळेवर व्यवस्था होणार नाही.

**तुळ :** नवीन संबंध बनवण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करा. कामात समस्या उद्भवू शकतात. कामाचा ताण जास्त असेल. तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक :** पती-पत्नीमधील संबंध सौहार्दपूर्ण राहतील. सरकारी मदत मिळेल. पैसे मिळवणे सोपे होईल. रखडलेली कामे गती घेतील. धाकटे भाऊ आणि मित्रांकडून सहकार्य मिळेल.

**धनु :** आरोग्य कमकुवत राहील. धोकादायक किंवा दुय्यम काम टाळा. दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. शक्यतो प्रवास टाळा. इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका.

**मकर :** विद्यार्थ्यांना यश मिळेल. शैक्षणिक आणि संशोधन कार्यांना अनुकूलता मिळेल. तुम्ही पार्ट्या आणि सहलींचा आनंद घेऊ शकता. तुम्हाला एखाद्या ज्ञानी व्यक्तीकडून मार्गदर्शन मिळेल.

**कुंभ :** तुम्ही एखाद्या तीर्थस्थळाला भेट देऊ शकता. तुम्हाला अध्यात्मात रस असेल. कायदेशीर अडथळे दूर होतील आणि परिस्थिती अनुकूल होईल. व्यावसायिकांना नफ्याच्या संधी वाढतील.


**मीन :** जमीन आणि इमारतींशी संबंधित अडथळे दूर होतील आणि परिस्थिती अनुकूल होईल. कायमस्वरूपी मालमत्तेशी संबंधित मोठे व्यवहार होऊ शकतात.

**आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३**

# महावीर : अहिंसेचे तेजस्वी दीप

**(पान ४ वरून)** अनेक सामाजिक आणि राजकीय चळवळींचा आधार बनला. अहिंसा ही केवळ वैयक्तिक सद्गुण नसून ती समाजव्यवस्थेचा पाया ठरू शकते, हा विचार त्यांनी प्रत्यक्ष आचरणातून सिद्ध करून दाखवला. त्यांच्या या विचारांचा प्रभाव पुढील अनेक महान व्यक्तिमत्त्वांवरही पडला आणि त्यांनीही अहिंसेचा मार्ग स्वीकारून समाजपरिवर्तनाचे कार्य केले.महावीरांनी मानवी जीवनाला केवळ बाह्य यशाच्या चौकटीत न मोजता, अंतर्मनाच्या शुद्धतेवर भर दिला. त्यांच्या मते, खरे सुख हे बाह्य संपत्ती, सत्ता किंवा प्रतिष्ठेमध्ये नसून आत्मिक समाधानात आहे. त्यामुळे त्यांनी आत्मसंयम, त्याग आणि साधेपणा यांना विशेष महत्त्व दिले. आजच्या काळात, जिथे माणूस अधिकाधिक भौतिक सुखांच्या मागे धावत आहे, तिथे महावीरांचे हे तत्त्वज्ञान आपल्याला थांबून विचार करण्यास भाग पाडते.महावीरांच्या तत्त्वज्ञानातील अपरिग्रह हा विचार आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा ठरतो. अनावश्यक वस्तूंचा संचय, संसाधनांचा अतिरेक वापर आणि उपभोगवादी जीवनशैली यामुळे पर्यावरणावर मोठा ताण येत आहे. जर मानवाने अपरिग्रहाचा मार्ग स्वीकारला, तर नैसर्गिक संसाधनांचे जतन होईल आणि पर्यावरणीय संतुलन राखले जाईल. त्यामुळे महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ आध्यात्मिक नाही, तर पर्यावरणपूरकही आहे.त्याचप्रमाणे, अनेकांतवाद हा महावीरांनी दिलेला अत्यंत आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आहे. या तत्त्वानुसार, कोणत्याही विषयाकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे आहे. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे संवाद, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या काळात, जिथे मतभेदांमुळे संघर्ष निर्माण होतात, तिथे अनेकांतवाद हा विचार समाजाला एकत्र ठेवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.महावीरांनी स्त्री-पुरुष समानतेचाही संदेश दिला. त्यांनी स्त्रियांनाही आध्यात्मिक प्रगतीची संधी दिली. त्या काळात, जेव्हा स्त्रियांना अनेक सामाजिक बंधनांमध्ये अडकवले गेले होते, तेव्हा महावीरांचा हा विचार अत्यंत प्रगत आणि क्रांतिकारक होता. त्यामुळे त्यांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक न्यायाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.महावीर जयंती साजरी करताना या सर्व विचारांचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. मंदिरांमध्ये विशेष पूजा, अभिषेक आणि प्रवचने होतात. अनेक ठिकाणी मिरवणुका काढल्या जातात. तसेच, दानधर्म, अन्नदान आणि गरजूंना मदत करण्याचे उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या बाह्य विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.आजच्या आधुनिक युगात, जिथे जीवन अधिक वेगवान आणि स्पर्धात्मक झाले आहे, तिथे माणसामध्ये तणाव, असुरक्षितता आणि असंतोष वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत महावीरांचे तत्त्वज्ञान आपल्याला मानसिक शांती आणि स्थैर्य मिळवण्याचा मार्ग दाखवते. ध्यान, संयम आणि आत्मपरीक्षण यांचा अवलंब केल्यास आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो.महावीरांचे जीवन आपल्याला हे शिकवते की खरे महानत्व हे बाह्य यशामध्ये नसून आपल्या विचारांमध्ये आणि आचरणामध्ये असते. त्यांनी अत्यंत साधे आणि संयमी जीवन जगले, परंतु त्यांच्या विचारांची उंची अत्यंत महान होती. त्यांच्या जीवनातील प्रत्येक कृती ही मानवतेच्या कल्याणासाठी होती. त्यामुळेच त्यांचे तत्त्वज्ञान आजही तितकेच प्रेरणादायी आणि उपयुक्त आहे.महावीर जयंती हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या जीवनात कितपत अहिंसा, सत्य, अपरिग्रह आणि संयम या मूल्यांचा अवलंब करतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. जर आपण या तत्त्वांचा अंगीकार केला, तर आपण केवळ स्वतःचे जीवन सुधारू शकतो असे नाही, तर समाजातही सकारात्मक बदल घडवू शकतो. आजच्या काळात, जिथे हिंसा, द्वेष, भ्रष्टाचार आणि असहिष्णुता वाढत आहे, तिथे महावीरांचे विचार आपल्याला योग्य दिशा दाखवतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण शांततेचा, समतेचा आणि नैतिकतेचा मार्ग स्वीकारू शकतो. जर प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात थोड्याफार प्रमाणातही या तत्त्वांचा अवलंब केला, तर समाजात मोठा सकारात्मक बदल घडू शकतो.शिक्षणक्षेत्रातही महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांच्या विचारांचा समावेश शिक्षणात केला पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये केवळ बौद्धिक विकासच नव्हे, तर नैतिक आणि सामाजिक विकासही होईल. महावीरांचे तत्त्वज्ञान हे केवळ एका धर्मापुरते मर्यादित नाही. ते संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांमध्ये सार्वत्रिकता आहे. कोणत्याही धर्म, जाती किंवा संस्कृतीतील व्यक्तीने त्यांच्या तत्त्वांचा अवलंब केल्यास त्याचे जीवन अधिक शांत, संतुलित आणि समाधानकारक होऊ शकते. शेवटी असे म्हणता येईल की महावीर जयंती हा केवळ एक धार्मिक उत्सव नसून तो मानवतेचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची, आपल्या जीवनातील त्रुटी सुधारण्याची आणि एक चांगले माणूस बनण्याची प्रेरणा देतो. भगवान महावीर यांचे तत्त्वज्ञान हे आजही तितकेच जिवंत आणि उपयुक्त आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण एक शांत, समतामूलक आणि नैतिक समाज निर्माण करू शकतो. त्यामुळे महावीर जयंती साजरी करताना त्यांच्या शिकवणुकीचा अंगीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 351



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे शब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द :–**

**दोन अक्षरी**
एक, कद, कट, कर, कला, कल्प, काल, कोंब, गती, घाम, घोडा, चित्र, चिन्ह, जान, दमा, दर्श, दाह, नट, नस, पात, पात्र, पान, पाप, पार, पाव, भान, मळा, माळी, रास, शाक, शीव, शंका, सट्टा, सम, हित, क्षमा

**तीन अक्षरी**
आईना, आघात, आरास, खजाना, गवत, गौरव, चामर, चितारी, जातक, तवाना, थकवा, धावक, धुंमारा, नकार, पडीत, भगवा, भाकर, भाजक, मदिरा, मानव, रसद, रक्षक, राजस्व, रोहिणी, विजार, शरभ


**चार अक्षरी**
अवास्तव, आचमन, कलावती, काटेकोर, कुंभमेळा, जलकुंभ, तनसडी, दशानन, धुंवाधार, बलवान, बाराखडी, भारकस, मतदार, मेजवानी, रमजान, लाजाहोम, वितरक, सकळीक, समावेश, हिरवळ

**पाच अक्षरी**
उपनयन, एकलकोंडा, गौरीशंकर, द्रविभवन, पवन चक्की, पारदर्शक, पारसमणी, बाबा आमटे, भारवाहक, विराम चिन्ह, समाजकार्य, स्वल्पविराम

**अन्य अक्षरी**
टेबल टेनिस, समुद्र मंथन, मानस सरोवर


(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 732



**–: आडवे संकेत :–**
1) कोणतेही चांगले काम झटपट व लवकर केलेले बरे या अर्थाचा एक संस्कृत शब्दप्रयोग
4) आवृत्ती करणे, उजळणी, पारायण
6) अत्यावश्यक कर्म
8) पूर्णता, बहर, आवेश
9) साठी, करीता
11) काडीभोवती कापूस गुडाळून देवापुढे लावण्यात येणारी मोठी वात
13) कडे, वर्तुळ
15) उज्जयिनी नगरी
16) देणे, सोडणे, अर्पण करणे
17) मुठीचा तडाखा, गुद्दा
18) तात्पर्यार्थ, सत्वांश
19) येशू ख्रिस्तांच्या जन्मदिवसाचा उत्सव
21) निषेध, बंदी
22) गुरे बांधण्याची जागा
23) दक्ष, जागृत
25) एखाद्या गोष्टीची किळस येणे
28) जिचा कुणी मालक नाही अशी वस्तू
29) आडदांडपणाने केलेले काम
31) धमकी देणे, दहशत दाखविणे
33) उपभोक्ता, रमणारा, पुरुष
35) नाशकर्ता, वेळ
36) वजा, न्यून, कमी
37) वृद्धिंगत, उमलणे
40) मुद्देसूद, तपशीलवार
42) राग, त्वेष
43) मार्गस्थ, निघालेला
44) अंग मोडून येणे, अस्वस्थ वाटणे
45) वजन, तोल
46) विशेष सलगी
47) अंगावरील काळा डाग
49) अधिकाराखालील प्रदेश
50) अंगिकारलेले व्रत
51) वास घेणे, हुंगणे
53) थंड, शीत
54) लक्ष वेधून घेणारे, उत्कृष्ट
56) उत्पत्ती, जन्म, संसार
57) पदर, पल्लव
58) झाडावरच पिकू लागलेले फळ
59) एकसारखे टक लावून पाहणे
63) समाजातील प्रतिष्ठा
64) स्वर, नाद
66) ईश्वराचे सर्वव्यापी स्वरूप
68) जाणे–येणे, रहदारी
69) तबलावादक
71) ताठा, गुर्मी
73) वृक्ष, झाड
74) उजाड, उदास
75) ईश्वर

**–: उभे संकेत :–**
1) शुभेच्छा व्यक्त करणे
2) भरडलेली डाळ
3) बीजगणितातील म.सा.वि.चे विस्तारीत रूप
4) स्मरण, याद, स्मृती
5) रुग्णांची सेवा करणारा परिचारिका (इं)
6) कलाकार, एखादी कला सादर करणारा
7) उलटे, भिन्न
10) मालाच्या साठवणुकीसाठी वापरले जाणारे मोठे गोदाम
12) वायूचा क्षोभ
14) दिल्लीजवळून वाहणारी नदी
15) इतरांच्या समोर राहणे, सर्वात अगोदर काम करणे
18) संचय, संग्रह
20) फुलांचा वाफा
21) ओकारी होईल असे वाटणे
23) सासुरवाडी, बायकोचे किंवा नवऱ्याचे माहेर
24) दागिना, पर्वत
26) चोवीस कागदांचा एक याप्रमाणे वीस दस्ते
27) गजानन
30) ढेकर (हिं)
32) तुरुंगवास
34) अंगावर उगविलेला काळा डाग
36) न बोलविता उपस्थित झालेला
37) विक्रय करणे
38) काख, कासोटा, कंबर
39) सर्व, सगळे
41) थर, पडदा
42) सुमारे दोन मैल
43) निमग्न होणे, रममाण होणे
46) यंत्रे वापरल्यामुळे त्यांच्या किमतीत पडणारी तूट
48) लाकूड कापण्याचे हत्यार
49) कणखर, बळकट
52) दूध दहयाच्या विक्रीचा व्यवसाय करणारा
53) गाल, थोबाड
54) रस्त्यापासून दूरची जागा
55) अनेक पायांचा एक जीवाणू
58) पारा
60) अलंकार शास्त्रातील नवरसांपैकी एक
61) इच्छिलेले फळ देणारा एक काल्पनिक वृक्ष
62) विडा
65) सत्ताविसावे नक्षत्र
66) मनोभंग
67) क्रोध, संताप
70) जिव्हा, रसना
72) प्रामाणिक व पतदार मनुष्य

(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोड्याचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

# सूडबुद्धीने केलेली कारवाई तत्काळ मागे घ्या

## पत्रकारावर खोटे गुन्हे दाखल; पत्रकार संघटनांचे मुख्यमंत्र्यांना 'एसडीओं'मार्फत साकडे

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३० :** तालुक्यातील अवैध धंद्यांविरुद्ध आवाज उठवल्याचा राग मनात धरून, 'धडक-००७' या यूट्यूब चॅनेलचे संपादक अमित देशमुख यांच्यावर उमरखेड पोलिसांनी सूडबुद्धीने खोटे गुन्हे दाखल केले आहेत. ही अन्यायकारक कारवाई तातडीने मागे घ्यावी, या मागणीसाठी उमरखेड तालुक्यातील विविध दैनिक वृत्तपत्र संघटनांच्या प्रतिनिधींनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांच्यामार्फत निवेदन पाठवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १२ मार्च रोजी रात्री ९:३० च्या सुमारास अमित देशमुख हे एका व्यक्तीच्या तक्रारीसंदर्भात पोलिस स्टेशनला गेले होते. यावेळी ठाणेदार शंकर पांचाळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जुन्या रागातून कुभांड रचून देशमुख यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल केले, असे निवेदनात म्हटले आहे. तालुक्यासह शहरातील अवैध दारू, जुगार आणि गांजा विक्रीच्या विरोधात अमित देशमुख सातत्याने बातम्या प्रसिद्ध करत असल्याने पोलिसांची 'आर्थिक कोंडी' होत होती, त्याचाच वचपा काढण्यासाठी ही कारवाई केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. उमरखेड तालुक्यातील पत्रकारांनी या कारवाईचा तीव्र निषेध केला असून, जर हे खोट गुन्हे मागे घेतले नाहीत, तर आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. अवैध धंद्यांविरुद्ध बातम्या देणाऱ्या पत्रकारांना अशाच प्रकारे लक्ष्य केले जाण्याची शक्यता असल्याने, लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचे संरक्षण व्हावे, अशी विनंती मुख्यमंत्र्यांना करण्यात आली आहे.




यावेळी दैनिक वृत्तपत्र वार्ताहर संघाचे अध्यक्ष साहेबराव धात्रक, महात्मा फुले पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मुडे, विभागीय प्रादेशिक दैनिक पत्रकार संघाच्या अध्यक्षा श्रीमती सविता चंद्रे यांच्यासह लक्ष्मीकांत नंदनवार, अरविंद ओझलवार, निळकंठ धोबे, व्यंकटेश पेन्शनवार, गजानन भारती, शैलेश ताजवे, डॉ. विशाल माने, अरुण बेले, भिमराव नगारे, अविनाश मुन्नरवार, अझरउल्ला खान, वसंत देशमुख, ताहेर मिर्झा, संतोष कलाने, संजय देशमुख, विजय आडे, दत्तात्रेय देशमुख, राजू गायकवाड, स्वप्नील मगरे, सुनील ठाकरे आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

### पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

पोलिसांनी अमित देशमुख यांच्यावर जातीय तेढ निर्माण करणे आणि शासकीय कामात अडथळा आणल्याचे गंभीर गुन्हे मध्यरात्री घाईघाईने दाखल केले. खऱ्या बातम्या देणाऱ्या पत्रकारांचे मनोबल खच्ची करण्यासाठीच असा 'खाकीचा धाक' दाखवला जात असल्याची भावना पत्रकार वर्गात उमटत आहे. या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून नि:पक्ष चौकशी करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

## महत्त्वाचे

### प्रवाशांचे हरवलेले साहित्य रेल्वे पोलिसांकडून परत

**वर्धा :** मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळांतर्गत रेल्वे सुरक्षा बल वर्धा यांनी प्रवासी सुरक्षा व सहाय्याबाबतची बांधिलकी पुन्हा सिद्ध करत विविध घटनांमध्ये हरवलेले साहित्य शोधून ते संबंधित प्रवाशांना सुरक्षितपणे परत केले आहे.एका प्रकरणात, गाडी क्रमांक १२८१० हावडा मेल एक्सप्रेसच्या कोचमधून एक प्रवाशाचा राहिलेली बॅग जप्त करण्यात आला. या बॅगमध्ये मोबाईल, चार्जर व इतर वैयक्तिक वस्तू होत्या. सदर बॅग सुरक्षित ठेवून आवश्यक पडताळणी नंतर सुमारे १८ हजार ८०० रुपये किंमतीचे साहित्य संबंधित प्रवाशास सुपूर्द करण्यात आले.दुसऱ्या घटनेत, नियमित ड्युटीदरम्यान प्लॅटफॉर्मवर एक बेवारस मोबाईल आढळून आला. तो आरपीएफ पोस्टमध्ये जमा करण्यात आला व मोबाईलवर आलेल्या कॉलद्वारे मालकाचा शोध घेण्यात आला. आवश्यक पडताळणी नंतर सुमारे १८ हजार रुपयेकिंमतीचा मोबाईल सुरक्षितपणे परत करण्यात आला. तसेच, गाडी क्रमांक ११०४० महाराष्ट्र एक्सप्रेसमध्ये राहिलेला एक बॅगही जप्त करण्यात आला. तपासणीअंती त्यात दैनंदिन वापराच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक साहित्य, महत्त्वाची कागदपत्रे व रोख रक्कम मिळून सुमारे १० हजार ७५४ रुपये किंमतीचे साहित्य आढळले. आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर हा बॅग संबंधित व्यक्तीस सुपूर्द करण्यात आला.

### लग्नाच्या वऱ्हाडावर काळाचा घाला

**गडचिरोली :** गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली-चामोर्शी मार्गावर तळोधी गावाजवळ भीषण अपघात घडला असून ६ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लग्न समारंभ आटोपून परतणाऱ्या वऱ्हाड्यांची स्कॉर्पिओ गाडी रामपूरहून भाडभीडी मोकासाकडे जात होती. या वाहनात एकूण १६ जण प्रवास करत होते. दरम्यान, तळोधी गावाजवळील धोकादायक वळणावर समोरून येणाऱ्या ट्रॅव्हल्स वाहनाने स्कॉर्पिओला जोरदार धडक दिली.
धडक इतकी भीषण होती की स्कॉर्पिओचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघाताचा आवाज ऐकताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना बाहेर काढण्यासाठी तातडीने मदतकार्य सुरू केले. लग्नाच्या आनंदाचे काही क्षणांतच शोकांतिकेत रूपांतर झाले.
अपघातातील जखमींना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारासाठी नेत असताना दोन जणांचा वाटेतच मृत्यू झाला. सध्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या काही जखमींची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### वाघिणीच्या दहशतीमुळे ग्रामस्थांचा चक्काजाम

**भंडारा :** साकोली तालुक्यात बांपेवाडा आणि उमरझरी परिसरात नरभक्षक वाघिणीने धुमाकूळ घातला असून, प्रशासनाच्या संथ कारभाराविरोधात आज रविवारी ग्रामस्थांनी साकोली-तिरोडा मार्ग रोखून धरला. नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे प्रवेशद्वार असलेल्या शिवनटोला आणि पिटेझरी भागात सकाळी ११ वाजेपासून नागरिकांनी चक्काजाम आंदोलन केल्यामुळे या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. गेल्या काही दिवसांपासून या परिसरात वाघिणीने मोठी दहशत निर्माण केली आहे. १९ मार्च रोजी बांपेवाडा येथील वसंता मेश्राम (५०) यांचा वाघिणीने बळी घेतला होता. ही घटना ताजी असतानाच, शनिवारी (दि.२८) रोजी उमरझरी येथे शेतमजूर माया रामकृष्ण सोनवाने (४८) यांच्यावर वाघिणीने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. जखमी माया सोनवाने यांना वेळेत मदत आणि उपचार न मिळाल्याचा आरोप करत संतप्त ग्रामस्थ आज ट्रॅक्टरसह रस्त्यावर उतरले.

## डाखरे महाराज फाउंडेशनच्या ग्राम निर्माण स्किल सेंटरचे भव्य उद्घाटन संपन्न

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वडगाव, दि. ३० :** चंद्रपूर जिल्ह्यातील वडगाव येथे डाखरे महाराज फाउंडेशनद्वारे संचालित ग्राम निर्माण स्किल सेंटरचे उद्घाटन दि. २९ मार्च २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.
या केंद्रामध्ये जिल्हा कौशल्य विकास, उद्योजकता व मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर यांच्या मार्फत ऑफिस असिस्टंट हा कोर्स विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे मोफत सुरू करण्यात आला असून, या कोर्समध्ये सुमारे ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. या उद्घाटन समारंभाचे उद्घाटक म्हणून मा. देवराव दादा भोंगळे (आमदार, राजुरा विधानसभा मतदारसंघ) उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आदरणीय ग्रामगीताचार्य डाखरे महाराज यांनी भूषविले.
यावेळी कार्यक्रमाला बापूजी पिंपळकर, निब्रड सर, हरिश्चंद्र थिपे सर, जगन्नाथ जी चटप, उपसरपंच सुदर्शन डवरे, भोंगळे गुरुजी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सलोनी कुचनकर व कु. प्रणिता डवरे यांनी प्रभावीपणे केले, तर प्रस्तावना धनंजय विठ्ठलराव डाखरे (डायरेक्टर, डाखरे महाराज फाउंडेशन) यांनी मांडली.
आपल्या प्रस्तावनेत त्यांनी सांगितले की, ''आजपर्यंत आम्ही अमरावती जिल्ह्यात कार्यरत होतो; मात्र आपल्या गावाची ओढ आपल्याला परत आणते. बाहेरील विद्यार्थ्यांबरोबरच आपल्या गावातील युवक-युवतींना शासनाच्या योजनांशी जोडून मोफत प्रशिक्षण दिल्यास त्यांच्या जीवनात नक्कीच सकारात्मक बदल घडेल. यासाठी डाखरे महाराज फाउंडेशन सदैव कटिबद्ध राहील.'' तसेच, चंद्रपूर, कोरपणा व वडगाव येथे फाउंडेशनमार्फत कौशल्य विकास केंद्रे सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी आमदार देवराव भोंगळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''आजच्या काळात कौशल्य विकास ही अत्यंत गरजेची बाब आहे. या केंद्रामधून प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगार किंवा नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही पूर्ण सहकार्य करू.'' या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन संप्रदा धनंजय डाखरे (मॅनेजिंग डायरेक्टर, डाखरे महाराज फाउंडेशन) यांनी केले. या उपक्रमाबद्दल डाखरे कुटुंबाचे गावकऱ्यांच्या व आमदार महोदयांच्या वतीने मनापासून कौतुक करण्यात आले.




## सरंबा येथे अफुची लागवड स्थानिक गुन्हे शाखा आणि अंढेरा पोलिसांची संयुक्त कारवाई!

### साडे चवरेचाळीस लाखांचा मुद्देमाल जप्त!

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अंढेरा, दि. ३० :** गत काही महिन्यांपासून बुलढाणा जिल्ह्यात 'अफू' ही नशेली वनस्पती अनेकांच्या शेतात आढळून येत आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त माहितीच्या आधारे मिळालेल्या माहितीनुसार अंढेरा पोलिसासह दि. ३१ मार्चला भरदिवसा करण्यात आलेल्या संयुक्त कारवाईत तब्बल एकशे अकरा किलो अफुची झाडे, बोंडे, पाने, मुळासह पोलिसांनी जप्त केला असुन किंमत चवरेचाळीस लाख छप्पन हजार दोनशे एवढी असुन आरोपी संजय तुकाराम चेके याला तात्काळ अटक करण्यात आली असुन मागील आठ दिवसात मेरा खुर्द नंतर सरंबा येथील अफू लागवडीची दुसरी कारवाई अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीत सरंबा येथे उघडकीस आल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.



### कारवाई पथक समावेश

स्थानिक गुन्हे शाखेचे प्रताप बाजड, अंढेरा ठाणेदार रुपेश शक्करगे, स्थानिक गुन्हे शाखेचे दिंगाबर कपाटे, हे.कॉ, पुरुषोत्तम आघाव, हे.कॉ.वनिता शिंगणे,पोलिस सनगळे, मनोज खरडे, पुजा सावळे, सतिश नाटेकर, चालक समाधान टेकाळे तसेच अंढेरा पोलिस स्टेशनचे दुय्यम ठाणेदार दिनेश घुगे, सिध्दार्थ सोंनकांबळे,बिट जमदार मारोती कायंदे, पंढरी नेमाने यांचा समावेश होता.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,सरंबा येथील शेतकरी संजय तुकाराम चेके याने धोत्रा नंदई शेत शिवारात शिवार गट नंबर ३६८ मध्ये अवैधरित्या अफूची लागवड केली होती. ३१ मार्चला स्थानिक गुन्हे शाखेच्या टिमला गुप्त माहितीवरुन अंढेरा ठाणेदार रुपेश शक्करगे आणि अंढेरा पोलिसांच्या मदतीने रेड केली असता सुरा -सरंबा रोडपासुन पन्नास मिटर आत असलेल्या शेतात कांदा पिकात अफुची लागवड करण्यात आली असुन तब्बल एकशे अकरा किलो अफुची बोंडे, झाडे, पाने मुळासह जप्त करण्यात आली असुन आरोपी संजय तुकाराम चेके याला तात्काळ अटक करण्यात आली आहे
पंचनामा व मुद्देमाल राजपत्रित अधिकारी समोर जप्त
जप्त करण्यात आलेला अफुचा मालाचा पंचनामा राजपत्रित अधिकारी देऊळगाव राजाच्या नायब तहसीलदार सायली जाधव,स्थानिक गुन्हे शाखेचे प्रताप बाजड,ठाणेदार रुपेश शक्करगे,ठाणेदार रुपेश शक्करगे, साहाय्यक कृषी अधिकारी कडु मॅडम, ग्राममहसुल अधिकारी एम. के. सोनवणे, ग्राम महसूल अधिकारी सुरेश शेळके यांचा समावेश होता.

## गोरक्षण केंद्रात महावीर जयंती साजरी



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३० :** येथील गोरक्षण केंद्रात भगवान महावीर जयंती जन्मकल्याणक महोत्सव २०२६ निमित्त समर्पण परिवाराच्या वतीने गोपूजन उपक्रम राबविण्यात आला. भगवान महावीरांच्या अहिंसा आणि करुणा या शिकवणीचा प्रसार करण्यासाठी संस्थेचे संस्थापक विजयकुमार बुंदेला यांच्या उपस्थितीत गाईंना गोड ढेप, घास व चारा भरवून हा सण सामाजिक भावनेतून उत्साहात साजरा करण्यात आला.
या उपक्रमातून गोरक्षणाबाबत जनजागृती करत समाजासमोर एक आदर्श निर्माण करण्यात आला. 'अहिंसा परमोधर्म' आणि 'वंदे वीरम्' अशा जयघोषांनी गोरक्षण परिसर दुमदुमून गेला होता. या प्रसंगी समर्पण परिवाराचे संस्थापक विजयकुमार बुंदेला यांच्यासह चंदा आनंद लोढा, सुशीला महावीर बोरा, संगीता प्रमोद श्रीमाल, वर्षा दिलीप लोढा, मीना महेंद्र बोरा, विभा मनीष गांधी, वंदना खुशाल कोठारी, मोनिका सुभाष कोठारी, चंदा संजय नखत, कविता नरेंद्र कोठारी, सविता सुशील भरुट, रेणू सुशील कटारिया, नमो श्रीमाल, योजित बुंदेला, आयुषी बुंदेला आणि रेखा जितेंद्र कोठारी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सर्व सदस्यांनी एकत्र येत गाईंची सेवा केली आणि महावीरांच्या दयाभावाचा संदेश समाजात पोहोचवला. केवळ उत्सव साजरा न करता मुक्या प्राण्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## शासकीय रुग्णालयातील खोकल्याच्या औषधी कालबाह्य नाहीत

**यवतमाळ :** यवतमाळ येथील श्री वसंतराव नाईक शासकीय रुग्णालयात खोकल्याच्या औषधी कालबाह्य नाहीत, असे रुग्णालय प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आले.
बॅच नंबर व मुदत कालावधी मिटलेली खोकल्याची औषधी वितरीत केल्याबाबत समाज माध्यमातील चुकीच्या व्हायरल बातमीच्या अनुषंगाने शासकीय रुग्णालय प्रशासनाने स्पष्टीकरण केले असून त्यानुसार खोकल्याची औषधी मे. हाफकिन महामंडळ, मुंबई यांचेकडून शासकीय रुग्णालयास एप्रिल २०२५ मध्ये पुरवठा झालेला आहे. पुरवठा घेतांना बॅच नंबर व मुदत कालावधी तपासूनच व पुराव्यादाखल त्याचे छायाचित्र जतन करुन ठेवण्यात आलेले आहेत. तसेच त्याची विभागांतर्गत पार्सल रजिस्टर व जडसंग्रह नोंदवहीमध्ये नोंद करण्यात आलेली आहे. समाजमाध्यमातील बातमीनुसार वितरीत बाटलीवर नोंदी मिटलेल्या आढळत असल्याचे म्हटले आहे. एप्रिल २०२५ पासून आजतागायत वातावरणाच्या परिणामामुळे सदर नोंदी मिटल्याची दाट शक्यता आहे. परंतु औषध भांडारातील उपलब्ध दस्ताऐवजानुसार खोल्याची औषध कालाबाह्य झालेले नसून त्याचा कालबाह्य दिनांक हा फेब्रुवारी २०२७ आहे. या रुग्णालय प्रशासनाच्या स्पष्टीकरणानुसार ही औषधी वाटप करतांना ज्या औषधी निर्मात्याने ती वाटप केली आहे, त्याने सदर नोंदी पुन्हा एकदा तपासणे आवश्यक होते, परंतु रुग्णांच्या गर्दीमुळे अनावधानाने ही प्रकिया घडली नाही.

## येरगाव्हाण ग्रामपंचायतला कुलूप!

### प्रशासनाचा भोंगळ कारभार उघड; पाच गावांतील नागरिक संतप्त

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कोपरणा, दि. ३० :** कोरपना तालुक्यातील येरगाव्हाण येथील ग्रामपंचायत कार्यालयाचा भोंगळ व निष्काळजी कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. सोमवारी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास विविध कामांसाठी ग्रामपंचायत कार्यालयात पोहोचलेल्या नागरिकांना मुख्य दरवाजावर कुलूप लागलेले आढळून आले. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.
या ग्रामपंचायती अंतर्गत येरगव्हाण, गुडा, कमलापूर, बोरगाव खुर्द आणि बोरगाव बुद्रुक या पाच गावांचा समावेश आहे. त्यामुळे या सर्व गावांतील नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी ग्रामपंचायतीवर अवलंबून राहावे लागते. मात्र, कार्यालयच वेळेत सुरू नसल्याने पाचही गावांतील नागरिकांची कामे ठप्प झाली असून प्रशासनाचा ढिसाळपणा उघड झाला आहे.
ग्रामपंचायत ही गावाच्या विकासाची कणा मानली जात असताना, अशा प्रकारे कार्यालय बंद ठेवणे हा नागरिकांच्या हक्कांवरच घाला असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.





शासकीय योजना, जन्म-मृत्यू दाखले, विविध प्रमाणपत्रे यासाठी नागरिकांना वारंवार ग्रामपंचायतीचे दरवाजे ठोठवावे लागत आहेत. मात्र, प्रत्येक वेळी निराशाच हाती लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.
नागरिकांनी सांगितले की, ''ही पहिलीच वेळ नाही. याआधीही अनेकदा कार्यालय वेळेपूर्वी बंद आढळून आले आहे. अधिकारी व कर्मचारी वेळेवर येत नाहीत.'' यासोबतच ग्रामसेवकांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते फोन उचलत नसल्याचा गंभीर आरोपही नागरिकांनी केला आहे.
या प्रकारामुळे संतप्त झालेल्या नागरिकांमध्ये दिनेश सुरु, गणेश हरबडे, मधुकर थेरे, सुरेश हेकाड, अरविंद सोयाम, प्रदीप आत्राम, अजय बल्की, विश्वजीत शेडमाके, अरविंद तुमराम, विक्रम शेडमाके, आशिष राजूरकर, भास्कर अहिरकर, कडू धुर्वे तसेच ग्राम वाशी येथील नागरिकांचा समावेश असून त्यांनी प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.
वारंवार घडणाऱ्या या प्रकारामुळे ग्रामपंचायतीच्या कामकाजावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ दखल घेऊन जबाबदार कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच कार्यालय नियमित वेळेत सुरू ठेवण्याची हमी द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा देण्यात आला आहे.

## 'यवतमाळ आयडल' संगीत स्पर्धेचे थाटात उद्घाटन

### विदर्भातील गायकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; नवोदीत गायकांसाठी हक्काचे व्यासपीठ

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३० :** क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'समता पर्व प्रतिष्ठान'च्या वतीने आयोजित 'यवतमाळ आयडल' या विदर्भस्तरीय संगीत स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. संविधान चौक येथील लॉर्ड बुद्धा सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाने शहराच्या सांस्कृतिक वातावरणात एक वेगळीच रंगत भरली. ही स्पर्धा ९ एप्रिल ते १३ एप्रिल २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आली असून, यामध्ये विदर्भातील विविध भागांतून मोठ्या संख्येने स्पर्धक सहभागी होत आहेत. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षपद समता पर्व प्रतिष्ठानचे अध्यक्ष नारायण थूल यांनी भूषविले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रमोदिनी रामटेके, उमेश मेश्राम, अॅड. रामदास राऊत, माधुरी वाळके, हेमंतकुमार कांबळे, धर्मपाल भितकर, काजल तायडे, प्रा. विजय डोंगरे, बळीराम अडागळे आणि रवी बावनगडे यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून स्पर्धकांना प्रोत्साहन देऊन संगीत क्षेत्रात प्रगती करण्यासाठी प्रेरित केले. स्पर्धेतील सहभागी कलाकारांचे परीक्षण धीरेंद्र गावंडे (कारंजा लाड) आणि संगीततज्ज्ञ शीला गायकवाड यांनी अत्यंत बारकाईने केले. स्पर्धकांच्या सुरेल सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले होते. हा सोहळा यशस्वीतेसाठी प्रा. विजय डोंगरे, प्रतिभा दातार, रीना वानखडे, हर्षाली बोडखे व शुभम वाळके यांनी विशेष परिश्रम घेतले. 'यवतमाळ आयडल'च्या माध्यमातून नवोदित गायकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होत असल्यामुळे सर्व स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक होत आहे. आगामी दिवसांत स्पर्धेच्या पुढील फेऱ्यांमध्ये अधिक रंगत येणार असल्याने संगीतप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.



'यवतमाळ आयडल'स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर.

## मानवी मूल्यांचे संगोपन करा : डॉ. अरविंद पाटील

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वर्धा, दि. ३० :** येथील बजाज वाचनालयात शनिवार २१ मार्च २०२६ रोजी पथदर्शी साहित्य संघ विदर्भ प्रांतद्वारे राज्यस्तरीय पथदर्शक साहित्य पुरस्कार वितरण आणि पथदर्शक अनियतकालिकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. डॉ. अरविंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात मानवी कल्याणासाठी समता, स्वातंत्र्य आणि न्याय या मूल्यांच्या संवर्धनावर मान्यवरांनी प्रकाश टाकला.
कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अरविंद पाटील यांनी सब्बे सत्ता सुखी होन्तू हेच साहित्याचे मुख्य प्रयोजन असल्याचे सांगत मानवी मूल्यांच्या संगोपनाचे आवाहन केले. यावेळी प्रमुख वक्ते गझलकार डॉ. सिद्धार्थ भगत यांनी आंबेडकरी साहित्य निर्मिती मागील पुनर्रचनेची भूमिका यावर विचार मांडले. त्यांनी स्पष्ट केले की, पहिल्या पिढीने शिक्षणाचे महत्त्व ओळखून कवितेतून मानवी वेदना मांडल्या आणि माणसाला केंद्रस्थानी ठेवले. समता सैनिक दलाचे समन्वयक मार्शल धम्मा कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारत राष्ट्र व्हिजन यावर बोलताना सांगितले की, संविधानाने देशाला बंधुभावाच्या सूत्रात बांधून मानवी मूल्यांवर आधारित राष्ट्र निर्माण केले. या सोहळ्यात २०२६ पासून सुरू करण्यात आलेले राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. सिराज करिम शिकलगार यांच्या दिवान-ए-सिराज गझलसंग्रहास १० हजार रुपये व सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

**महत्त्वाचे**

## पांड्याची गर्लफ्रेंड महिका मुलगा अगस्त्यासाठी पापाराझींवर संतापली!

**मुंबई :** आयपीएल २०२६ ची दमदार सुरूवात झाली आहे, आयपीएल २०२६ च्या दुसऱ्या सामन्यात, मुंबई इंडियन्सचा सामना वानखेडे स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्सशी झाला. मुंबई इंडियन्सने केकेआरला ६ गडी राखून पराभूत करून आपल्या मोहिमेची सुरुवात विजयाने केली. यामध्ये संघाचे दोन्ही सलामीवीर फलंदाजांनी कमालीची कामगिरी केली. मैदानातील उत्साहापलीकडे, मैदानाबाहेरील एका क्षणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. हार्दिक पांड्याची गर्लफ्रेंड महिका शर्मा आणि त्याचा मुलगा अगस्त्य एकत्र असलेला एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.महिका अगस्त्याची खूप काळजी घेताना दिसत आहे. चाहत्यांना हा व्हिडिओ खूप आवडत आहे. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्सने अखेर आपल्या आयपीएल विजयाच्या मालिकेतील एक डाग पुसून टाकला.

## ग्रीनने गोलंदाजी न केल्यानंतर केले प्रश्न उपस्थित!

मुंबई ...काल मुंबई इंडियन्स विरूद्ध कोलकता नाईट राइडर्स यांच्यामध्ये आयपीएल २०२६ चा दुसरा सामना खेळवण्यात आला होता. आयपीएल २०२६ मध्ये कॅमेरॉन ग्रीन गोलंदाजी का करत नाही: वानखेडेवर मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील सामन्यात कॅमेरॉन ग्रीनने गोलंदाजी का केली नाही? आयपीएल २०२६ च्या केकेआरच्या पहिल्या सामन्यात या ऑस्ट्रेलियन अष्टपैलू खेळाडूने एकही षटक न टाकल्याने चाहते आणि तज्ञ दोघांच्याही मनात हा प्रश्न होता.सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत, कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य रहाणे, ग्रीनच्या वेगवान गोलंदाजीच्या अभावाबाबत म्हणाला, ''क्रिकेट ऑस्ट्रेलियाला विचारा.'' वास्तविक पाहता, रहाणेच्या या वक्तव्यामुळे केकेआरचे थिंक-टँक आणि क्रिकेट ऑस्ट्रेलिया यांच्यातील संवाद पद्धतींबद्दल आणखी प्रश्न निर्माण झाले आहेत. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने पुष्टी केली आहे.

# ऑस्ट्रेलियाचा वेस्ट इंडिजवर विजय



## एकदिवसीय मालिकेत २-० ने घेतली आघाडी

**नवी दिल्ली: दि.३० वृत्तसंस्था**

सध्या ऑस्ट्रेलिया विरुद्ध वेस्ट इंडिज महिला संघांमध्ये एकदिवसीय मालिका सुरू आहे. ऑस्ट्रेलिया महिला संघ आणि वेस्ट इंडिज महिला संघात तीन सामन्यांची मालिका सुरू आहे. तर आजच्या दुसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाने वेस्ट इंडिज संघाचा दारुण पराभव केला आहे.

ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाने वेस्ट इंडिजच्या दुसऱ्या सामन्यात ९० धावांनी पराभव केला आहे. तसेच ऑस्ट्रेलियाच्या संघाने वेस्ट इंडिजचा पराभव केल्याने आता ऑस्ट्रेलियाने एकदिवसीय सामन्यात २-० ने आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलिया महिला संघाने एकदिवसीय मालिका आपल्या खिशात घातली आहे.

ऑस्ट्रेलियाच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजच्या संघाला २७० धावांचे लक्ष्य दिले होते. त्याचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजच्या संघाला केवळ १७९ धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनी वेस्ट इंडिजच्या संघाचा ९० धावांनी पराभव केला. तसेच ३ सामन्यांच्या मालिकेत देखील विजयी आघाडी घेतली आहे.

## रोहित शर्माचा वानखेडेवर धुमाकूळ



**नवी दिल्ली: दि.३० वृत्तसंस्था**

मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर रोहित शर्माने जोरदार फटकेबाजी केली आहे. रोहित शर्माने २५ चेंडूत ५२ धावा केल्या आहेत. केकेआरविरुद्ध रोहित शर्माने अर्धशतकी खेळी केली आहे. मुंबई इंडियन्सच्या ओपनर्स फलंदाजांनी शतकी भागीदारी केली. तर रिकल्टनने देखील आपले अर्धशतक पूर्ण केले आहे.

त्यामुळे मुंबई इंडियन्स (२०२६) सहजरीत्या हा सामना जिंकेल असे चित्र दिसून येत आहे.मुंबई इंडियन्सने टॉस जिंकला होता. टॉस जिंकून हार्दिक पंड्याने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कोलकाता नाइट रायडर्सने मुंबई इंडियन्सला ( २०२६) विजयासाठी धावांचे लक्ष्य दिले आहे. अजिंक्य रहाणेने मुंबईविरुद्ध अर्धशतकीय खेळी केली. कोलकाता नाइट रायडर्स प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरली. कर्णधार अजिंक्य रहाणे आणि फीन एलन यांनी डावाची सुरुवात केली.

**मुंबई इंडियन्सकडून शार्दुल ठाकूरने ३ विकेट्स घेतल्या. १३ ओव्हर्सनंतर मुंबईच्या गोलंदाजांनी केकेआरच्या वेगवान फलंदाजीला ब्रेक लावल्याचे पाहायला मिळाले.**

**फीन एलनने १७ चेंडूत ३७ धावांची खेळी केली. त्यानंतर कॅमेरून ग्रीन खेळण्यासाठी आला. त्याने १० चेंडूत १८ धावा केल्या. अजिंक्य रहाणे ६७ धावा करून बाद झाला. रिंकू सिंगने २१ चेंडूत ३३ धावांची खेळी केली.**

## दिमाखदार विजयानंतरही मुंबई इंडियन्स खूप मागे

**नवी दिल्ली: दि.३० वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ ( २०२६) च्या थराराला दिमाखात सुरुवात झाली असून, रविवारी झालेल्या दुसऱ्या हाय-व्होल्टेज सामन्यात पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सने कोलकाता नाईट रायडर्सवर ६ गडी राखून मात केली. हार्दिक पंड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई संघाने विजयाने मोहीम सुरू केली असली, तरी गुणतालिकेत मात्र रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने अव्वल स्थान कायम राखले आहे.मुंबई आणि कोलकाता यांच्यातील हा सामना अत्यंत चुरशीचा आणि धावांचा पाऊस पाडणारा ठरला. या विजयामुळे मुंबई इंडियन्सच्या खात्यात २ गुणांची भर पडली आहे, तर कोलकाता नाईट रायडर्सला पराभवामुळे गुणांचे नुकसान सोसावे लागले. मुंबईने विजयाचा श्रीगणेशा केला असला तरी नेट रनरेटच्या गणितामुळे त्यांना दुसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले आहे.आयपीएल २०२६ च्या पहिल्या सामन्यात आरसीबीने सनरायझर्स हैदराबादविरुद्ध मोठा विजय मिळवला होता. त्या विजयानंतर आरसीबीच्या खात्यातही २ गुण जमा झाले आहेत. अशा प्रकारे मुंबई आणि आरसीबी या दोन्ही संघांचे समान २ गुण असतानाही, नेट रनरेटमधील मोठ्या फरकामुळे आरसीबी पहिल्या क्रमांकावर विराजमान आहे.हैदराबादविरुद्धच्या विजयानंतर आरसीबीचा नेट रनरेट +२.९०७ इतका प्रभावी आहे. दुसरीकडे, कोलकाताविरुद्ध विजय मिळवल्यानंतर मुंबईचा नेट रनरेट +०.६८७ नोंदवला गेला आहे. दोन्ही संघांच्या रनरेटमध्ये मोठी तफावत असल्याने सध्या तरी आरसीबीने गुणतालिकेच्या शिखरावर कब्जा केला आहे.चेन्नई सुपर किंग्स, दिल्ली कॅपिटल्स, गुजरात टायटन्स, लखनौ सुपर जायंट्स, पंजाब किंग्स आणि राजस्थान रॉयल्स या संघांचे सामने अद्याप व्हायचे असल्याने त्यांचे गुणतालिकेतील खाते उघडणे बाकी आहे.

## बॉल टॅम्परिंग प्रकरणामुळे पाकिस्तान क्रिकेट पुन्हा हादरले

**नवी दिल्ली: दि.३० वृत्तसंस्था**



पाकिस्तान सुपर लीग २०२६ मध्ये कराची किंग्सविरुद्धच्या सामन्यादरम्यान लाहोर कलंदर्स वादात सापडले. चेंडू छेडछाड केल्याबद्दल त्यांच्यावर दंड आकारण्यात आला. अंतिम षटकाच्या अगदी आधी पंचांनी कराचीला पाच पेनल्टी धावा दिल्या. हा एक असा क्षण होता ज्याचा सामन्याच्या निकालावर खोलवर परिणाम झाला आणि अखेरीस कराचीने तीन चेंडू शिल्लक असताना विजय मिळवला.ही घटना सामन्याच्या दुसऱ्या डावातील १९ व्या षटकाच्या अखेरीस घडली, जेव्हा कराचीला विजयासाठी १४ धावांची गरज होती. वेगवान गोलंदाज हरिस रौफ लाहोरसाठी शेवटचे षटक टाकणार होता. मात्र, षटक सुरू होण्यापूर्वीच, कर्णधार शाहीन आफ्रिदी, रौफ आणि फखर जमान हे गोलंदाजाच्या रन-अपजवळ जमून चेंडू हातात घेताना दिसले.मैदानातील पंच फैसल आफ्रिदी यांनी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले आणि चेंडू तपासण्याचा निर्णय घेतला. स्क्वेअर-लेग पंच शरफुद-उद-दौला यांच्याशी सखोल तपासणी आणि चर्चा केल्यानंतर, अधिकाऱ्यांनी असा निष्कर्ष काढला की चेंडूची स्थिती जाणूनबुजून बदलण्यात आली होती. कराची किंग्सला ५ धावा देण्यात आल्या आणि चेंडू तात्काळ बदलण्यात आला. या निर्णयामुळे लाहोरचा कर्णधार शाहीन आफ्रिदी स्पष्टपणे निराश झाला होता, कारण यामुळे शेवटच्या षटकात लक्ष्य केवळ ९ धावांवर आले होते.सामन्यानंतर बोलताना, शाहीन आफ्रिदीने या निर्णयाबद्दल अनिश्चितता व्यक्त केली, तर सिकंदर रझा पंचांकडून पुढील स्पष्टीकरणाची वाट पाहणार असल्याचे म्हणाला. सामन्याच्या अंतिम क्षणांमध्ये ही पेनल्टी गेम-चेंजर ठरली. शेवटच्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर खुशदिल शाह बाद झाला असला तरी, त्यानंतर रौफने वाईड चेंडू टाकला. त्यानंतर अब्बास आफ्रिदीने एक चौकार आणि एक षटकार मारून कराची किंग्सला एक रोमांचक विजय मिळवून दिला. या विजयासह, कराची किंग्सने दोन सामन्यांत दोन विजय नोंदवत हंगामाची आपली दमदार सुरुवात कायम ठेवली आहे. लाहोर कलंदर्सच्या नावावर आता एक विजय आणि एक पराभव आहे.

## सुनील नरेनने रचला इतिहास! आयपीएलचा ‘नंबर १’ खेळाडू

**नवी दिल्ली: दि.३० वृत्तसंस्था**



आयपीएल २०२६ च्या दुसऱ्याच सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा दिग्गज अष्टपैलू खेळाडू सुनील नरेनने वानखेडे स्टेडियमवर पाऊल ठेवताच एका ऐतिहासिक विक्रमाला गवसणी घातली आहे. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या या सामन्यात मैदानात उतरताच नरेन आयपीएलच्या इतिहासातील सर्वात यशस्वी परदेशी खेळाडू ठरला आहे.

आयपीएलच्या १९ व्या हंगामात मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील अटीतटीच्या लढतीला सुरुवात झाली आहे. या सामन्यात केकेआरने आपल्या प्लेइंग इलेव्हनमध्ये सुनील नरेनचा समावेश करताच, तो आयपीएलमध्ये सर्वाधिक सामने खेळणारा परदेशी खेळाडू ठरला आहे. नरेनने या बाबतीत आपलाच देशबंधू आणि मुंबई इंडियन्सचा माजी स्टार किरॉन पोलार्डचा विक्रम मोडीत काढला आहे.सुनील नरेनचा हा आयपीएलमधील १९० वा सामना आहे. यापूर्वी हा मान कायरन पोलार्डकडे होता, ज्याने १८९ सामने खेळले होते. विशेष म्हणजे, नरेन आपल्या आयपीएल कारकिर्दीच्या सुरुवातीपासून केवळ केकेआरसाठीच खेळत आहे. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर संयुक्तपणे एबी डिव्हिलियर्स आणि डेव्हिड वॉर्नर (दोघेही १८४ सामने) आहेत. केकेआरला तीन वेळा विजेतेपद मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या नरेनच्या नावावर गोलंदाजीत १९२ विकेट्स जमा आहेत. या हंगामात आणखी ८ विकेट्स घेतल्यास तो आयपीएलमध्ये २०० विकेट्स घेणारा पहिला परदेशी फिरकीपटू ठरेल. फलंदाजीमध्येही त्याने १७.६२ च्या सरासरीने १७८० धावा केल्या आहेत.

## कोटक महिंद्रा प्राइममध्ये नेतृत्व बदल!

**मुंबई:** कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेड (केएमपीएल) या कोटक महिंद्रा बँक लिमिटेडची उपकंपनी आणि वाहन वित्तपुरवठा क्षेत्रातील आघाडीच्या संस्थेने संचालक मंडळाकडून मंजूर केलेल्या नेतृत्व बदलाची घोषणा केली आहे.

संचालक मंडळाने श्री. सुरज राजप्पन यांची १ जून २०२६ पासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी सदस्यांच्या मंजूरीनुसार मॅनेजिंग डायरेक्टर आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून नियुक्ती केली आहे. श्री. सुरज राजप्पन यांनी कोटक महिंद्रा प्राइम लिमिटेडमधून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. त्यांना या संस्थेतील विविध विभागांमधील २४ वर्षांचा दांडगा अनुभव आहे. सध्याचे मॅनेजिंग डायरेक्टर व सीईओ श्री. शाहरुख तोडीवाला हे कोटक ग्रुपमध्ये तीन दशकांहून अधिक काळ सेवा बजावल्यानंतर ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. केएमपीएलचे एमडी व सीईओ शाहरुख तोडीवाला म्हणाले, ''केएमपीएलच्या ३० वर्षांच्या प्रवासाचा भाग असण्याचा आणि त्यांच्या वाढीत योगदान देण्याचा अनुभव अत्यंत समाधानकारक राहिला आहे. या कंपनीचे नेतृत्व करणे हा माझा बहुमान आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, सुरज आणि त्यांची लीडरशीप टीम या भक्कम पायावर अधिक प्रगती करतील आणि केएमपीएलला नवीन उंचीवर घेऊन जातील.''केएमपीएलचे नियुक्त एमडी व सीईओ सुरज राजप्पन म्हणाले, ''मला संचालक मंडळाने माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाचे अत्यंत सन्माननीय वाटत आहे.

# श्रीलंकेसाठी भारत बनला ‘संकटमोचक’!

## मध्यपूर्वेतील युद्धामुळे कोलमडलेल्या लंकेला ३८,००० मेट्रिक टन इंधनाची ‘संजीवनी’

**नवी दिल्ली: दि.३० वृत्तसंस्था**




मध्यपूर्वेतील वाढता तणाव आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. या संकटामुळे शेजारील श्रीलंका देश पुन्हा एकदा भीषण अंधकार आणि इंधन टंचाईच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. मात्र, अशा कठीण प्रसंगी भारताने नेहमीप्रमाणे एका खऱ्या आणि विश्वासार्ह मित्राची भूमिका बजावत श्रीलंकेला मदतीचा हात दिला आहे. भारताने तातडीने ३८,००० मेट्रिक टन पेट्रोलियम पदार्थांचा मोठा साठा कोलंबोमध्ये पोहोचवला असून, यामुळे श्रीलंकेला मोठा दिलासा मिळाला आहे.मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापासून अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे आखाती देशांतून होणारा तेल पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. अनेक जागतिक पुरवठादारांनी श्रीलंकेला इंधन देण्यास असमर्थता दर्शवली होती. ही गंभीर परिस्थिती ओळखून २४ मार्च २०२६ रोजी श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमारा दिसानायके आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात फोनवरून सविस्तर चर्चा झाली. या चर्चे नंतर भारताने विलंब न लावता ‘लंका आयओसी’च्या माध्यमातून २०,००० मेट्रिक टन डिझेल आणि १८,००० मेट्रिक टन पेट्रोलचा साठा रवाना केला, जो २८ मार्च रोजी श्रीलंकेच्या तटावर सुखरूप पोहोचला आहेइंधन टंचाईचा श्रीलंकेतील सर्वसामान्यांच्या जीवनावर भीषण परिणाम झाला आहे. ऊर्जा बचतीसाठी सरकारने कडक पावले उचलली असून देशात आता ‘फोर डे वर्किंग वीक’ (चार दिवसांचा आठवडा) लागू करण्यात आला आहे. रेल्वे आणि बस स्थानकांवर प्रवाशांची वर्दळ कमी झाली असून रस्ते ओस पडले आहेत. खासगी कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना आठवड्यातून दोन दिवस घरून काम अनिवार्य केले आहे. सरकारी कार्यालयांमध्ये एसीचा वापर टाळून टेबल फॅन वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रस्त्यावरील दिवे बंद ठेवण्यात आले असून वीज वापर २५ टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.




## एप्रिलमध्ये तब्बल १४ दिवस बँका राहणार बंद

**नवी दिल्ली: दि.३० वृत्तसंस्था**




रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मासिक सुट्ट्यांची यादी प्रसिद्ध करते. या यादीच्या आधारे बरेच लोक त्यांच्या बँकिंग कामकाजाचे नियोजन करतात. आता एप्रिल महिन्यात विविध राज्यांमध्ये बँका एकूण १४ दिवस बंद राहतील. आरबीआयने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, पुढील महिन्यात चार रविवार आणि दुसऱ्या व चौथ्या शनिवार व्यतिरिक्त, विविध ठिकाणी बँका आठ दिवस बंद राहतील. हो, ऑक्टोबरसाठी कोणतेही नियोजन करण्यापूर्वी तुम्ही ची सुट्ट्यांची यादी तपासा नायतर परत जावं लागेल.

महिन्याची सुरुवात १ एप्रिल रोजी सुट्टीने होत आहे. वार्षिक खाते बंद करण्याच्या प्रक्रियेसाठी देशभरातील बँका बंद राहतील. या दिवशी कोणतेही ऑफलाइन बँकिंग व्यवहार शक्य होणार नाहीत.बँकेच्या सुट्ट्या असूनही तुम्ही पैशांचे व्यवहार आणि इतर व्यवहार करण्यासाठी ऑनलाइन बँकिंग आणि एटीएमचा वापर कु शकता. या सेवांवर बँकेच्या सुट्ट्यांचा कोणताही परिणाम होणार नाही.एप्रिल २०२६ मध्ये, आठ शनिवार आणि रविवारसह १० दिवस शेअर बाजार बंद राहील. याव्यतिरिक्त, गुड फ्रायडे (३ एप्रिल) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती (१४ एप्रिल) रोजी शेअर बाजार बंद राहणार आहे.

## उत्तरपासून दक्षिणेपर्यंत नॅशनल हायवेवरील टोल दरात मोठी वाढ!

**नवी दिल्ली: दि.३० वृत्तसंस्था**

जर तुम्ही राष्ट्रीय महामार्गांवरून वारंवार प्रवास करणाऱ्यांपैकी एक असाल, तर तुमचा प्रवास आता अधिक महागणार आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती मार्गांवरील टोल प्लाझाचे दर वाढवले जाणार असून, ही दरवाढ १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षापासून लागू होणार आहे. याचा अर्थ असा की, पुढील महिन्याच्या १ तारखेपासून या मार्गांवरून प्रवास करताना तुम्हाला तुमच्या खिशातून थोडे अधिक पैसे मोजावे लागतील. महत्त्वाचं म्हणजे देशभरातील टोल दरांमध्ये सरासरी ४ ते ५ टक्क्यांची वाढ झाली आहे. नेमके कोणत्या महामार्गावर किती टक्क्यांनी वाढ होणार आहे समजून घेऊयात.दिल्ली-मेरठ द्रुतगती महामार्गावर (हलकी व्यावसायिक वाहने) आणि ट्रकसाठी ५% वाढ होणार आहे. कार, जीप, व्हॅन किंवा हलकी मोटार वाहने यांसारख्या हलक्या वाहनांसाठी एकेरी प्रवासाचे शुल्क ₹१७५ असेल; हे शुल्क पूर्वीच्या ₹१७० दरावरून वाढवण्यात आले आहे. परतीच्या प्रवासाचे शुल्क ₹२६५ असेल; हे शुल्क पूर्वीच्या ₹२५५ दरावरून वाढवण्यात आले आहे.बंगळुरू-म्हैसूर द्रुतगती महामार्गावर ३५% वाढ करण्यात येणार आहे. कार्ससाठीच्या टोल शुल्कात कोणताही बदल होणार नाही; हे शुल्क साधारणपणे ₹१२० च्या आसपासच राहील. तथापि, आणि ट्रकसारख्या मोठ्या वाहनांसाठी, शुल्कात ₹५ ते ₹१५ पर्यंत वाढ होईल.दिल्ली-जयपूर महामार्गावर ५२०% पर्यंत वाढ करण्यात येणार आहे. शहाजहानपूरसारख्या प्रमुख टोल प्लाझांवर व्यावसायिक वाहनांच्या शुल्कात वाढ होईल.उत्तर प्रदेशातील () इतर मार्गावर ५१०% पर्यंत वाढ होणार आहे. लखनौला कानपूर, अयोध्या आणि रायबरेलीशी जोडणाऱ्या मार्गांवर खाजगी वाहनांच्या शुल्कात किरकोळ वाढ करण्यात येणार आहे.उत्तर प्रदेशमध्ये, दिल्ली-मेरठ द्रुतगती महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग-९ आणि लखनौ-कानपूर यांसारख्या मार्गांवरील टोल दरात ५ टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे दिल्लीहून मेरठला किंवा लखनौहून कानपूरला प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार आहे.

राजस्थानमध्येही, जयपूर-दिल्ली, जयपूर-अजमेर आणि जयपूर-किशनगड यांसारख्या मार्गांवरील टोल प्लाझा शुल्कात वाढ होण्याची शक्यता आहे. माहितीनुसार, जयपूर-किशनगड मार्गावर कारसाठीचा टोल १४० वरून १५५ पर्यंत वाढणार आहे. दरम्यान, राजस्थानमार्गे दिल्लीहून मुंबईसारखा लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना प्रत्येक टोल प्लाझावर अतिरिक्त ५ ते १५ द्यावे लागतील.

अजिंक्य भारत

# आपलं नागपूर

मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



## थोडक्यात

### लोकशाही दिन ६ एप्रिल रोजी

**नागपूर:** नागपूर महानगरपालिकेच्या वतीने ६ एप्रिल २०२६ रोजी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या ३० डिसेंबर १९९९ च्या शासन निर्णयाप्रमाणे जनतेच्या तक्रारींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने महिन्याच्या पहिला सोमवार 'लोकशाही दिन' म्हणून आयोजित करण्यात येतो. त्यानुसार सोमवार ०६ मार्च रोजी सकाळी १० वाजता मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात 'लोकशाही दिन' चे आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांच्या तक्रारी असल्यास त्यांनी लोकशाही दिन कार्यकमात तक्रारीसह उपस्थित राहावे असे आवाहन मनपाद्वारे करण्यात आले आहे

### 'कॅमेऱ्यामागची ती' पुस्तकाचे प्रकाशन

**नागपूर :** फोटोग्राफी क्षेत्रातील महिलांच्या कर्तृत्वाचा वेध घेणारे 'कॅमेऱ्यामागची ती' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कोल्हापूर येथील भाग्यश्री प्रकाशन यांनी हे पुस्तक प्रकाशित केले आहे. लेखक प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार यांनी पुस्तकात महाराष्ट्रासह देशभरातील ४० महिला फोटोग्राफर्सच्या प्रेरणादायी यशोगाथा शब्दांकित केल्या आहेत. नागपूर शहरातील तीन महिला फोटोग्राफर्सच्या कथा देखील या पुस्तकात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. नागपूरच्या संगीता महाजन, सीमा जोशी आणि अनघा जांभुळकर या महिला फोटोग्राफर्सच्या कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. लेखक डॉ. प्रवीण घोडेस्वार यांनी यापूर्वीही विविध क्षेत्रात ठसा उमटवलेल्या महिलांच्या योगदानावर प्रकाश टाकणारी अनेक पुस्तके लिहिली आहेत. या नव्या पुस्तकातून त्यांनी फोटोग्राफी क्षेत्रातील महिलांच्या संघर्ष, जिद्द आणि यशाचा प्रवास उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. संगीता महाजन राज्य व देशभरात नामांकित फोटोग्राफर म्हणून ओळखल्या जातात. सामाजिक प्रश्नांना त्यांनी आपल्या कॅमेऱ्याच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडले आहे. सीमा जोशी या गेल्या अनेक वर्षांपासून वेडिंग फोटोग्राफी क्षेत्रात उल्लेखनीय काम करत आहेत. तर भारतात तुलनेने नवीन असलेल्या 'बर्थ फोटोग्राफी' या प्रकारात अनघा जांभुळकर आणि त्यांचा स्टुडिओ विशेष ख्याती मिळवत आहेत.

### कामठीत जुगार अड्ड्यावर छापा

**कामठी :** नवीन कामठी पोलीस स्टेशनच्या हद्दीत जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली आहे. पवनगाव रोडवरील 'दादाजी डेअरी'च्या आवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून रोख रकमेसह ८ जणांना ताब्यात घेतले आहे. नवीन कामठी पोलिसांच्या तपास पथकाला २९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६:५० च्या सुमारास खात्रीशीर माहिती मिळाली की, राजा यादव याच्या मालकीच्या डेअरीत जुगार सुरू आहे. या माहितीवरून पोलिसांनी पंचांसमक्ष छापा टाकला. पोलिसांनी छापा टाकताच तिथे पहारा देणाऱ्या व्यक्तीने आतल्या लोकांना सावध करण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्याला जागीच पकडून आत प्रवेश केला. पोलिसांनी घटनास्थळावरून जुगाराच्या साहित्यासह एकूण ३५,८३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# आठ सूत्री कार्यक्रमांसह ५३ कोटी ६७ लाखांचा जि. प. अर्थसंकल्प

## ७ कोटी ९ लाखांची वाढीव तरतूद, आठसूत्री कार्यक्रम राबविण्यात येणार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३० : साडेतीनशे ग्रामपंचायतींमध्ये सौर ऊर्जा संयत्र, गावागावांत जलतारा योजनेसह जिल्हा परिषदेचे सीईओ व प्रशासक विनायक महामुनी यांनी अर्थसंकल्प सादर केला. यात मागील वर्षीपेक्षा ७ कोटी ९ लाखांची वाढीव तरतूद करण्यात आली आहे. सोबत आठसूत्री कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. मागील वर्षी ४६ कोटी ५८ लाखांची अर्थसंकल्प होता.**

- आरोग्यासाठी दोन कोटी ५० लाखांचा निधी
- सामान्य प्रशासनासाठी ४ कोटी ५८ लाख
- शिक्षणावर ५ कोटी ३८ खर्च होणार
- बांधकाम विभागालाही सात कोटी

अतिरिक्त मुख्य कार्यकारी डॉ. कमलकिशोर फुटाणे, मुख्य वित्त व लेखा अधिकारी कुमुदिनी श्रीखंडे, अधिकारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी अंशूजा गराटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कपिलनाथ कलोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल उंदिरवाडे, महिला व बालकल्याण अधिकारी डॉ. कैलाश घोडके, अभियंता कल्पना इखार, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे अभियंता अशोक धोंगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) निखील भुयार, आरोग्य अधिकारी डॉ. राज गहलोत, समाजकल्याण अधिकारी सुखदेव कौरती उपस्थित होते. सामान्य प्रशासनासाठी अर्थसंकल्पात चार कोटी ५८ लाखांची तरतूद करण्यात आली. या ०.५ टक्के निधी हा ई गव्हर्नन्सकरिता राखीव ठेवला आहे. तर जिल्हा परिषदेच्या योजनांच्या प्रचारासाठीही निधी तरतूद केली आहे. सामूहिक विकासाकरिता कार्यक्रम आयोजित करणे, टपाल आणि डॅशबोर्डसारख्या उपक्रमावरही निधी खर्च करण्यात येणार आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अंजुशा गराटे असून त्यांच्या मार्गदर्शनात हा निधी खर्च केला जाईल.

ग्रामीण भागात शिक्षणाचे केंद्र असलेल्या शिक्षण विभागासाठी यंदा ५ कोटी ३८ लाखांची निधी देण्यात आला आहे. यावर्षी एक कोटी १ कोटी १६ लाखांनी कपात केली आहे. महत्त्वाचे म्हणजे एआय लॅब निधी राखीव ठेवला आहे. विद्यार्थ्यांना स्वच्छ आणि निर्मळ वातावरणात शिक्षण घेता यावा, याकरिता शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे एक हजारांवर विद्यार्थ्यांना जापनीज आणि जर्मन लेव्हल-१ भाषा शिकविण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेमध्ये आणखी १० महिने निवडणूक होण्याची चिन्हे नाहीत. यामुळे यावर्षी अर्थसंकल्प प्रशासक राजमध्ये सादर करण्यात आला. प्रशासक विनायक महामुनी यांनी अर्थसंकल्प सादर करताना सर्व विभागाला भरघोस निधी दिला. ग्रामीण भागात वाचनालयासह एकल महिलांना रोजगारासाठी प्रशिक्षणावरही भर देण्यात आला.



## घरगुती गॅस तुटवडा : 'आम आदमी पार्टी'चे निवेदन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३० :** नागपूर जिल्ह्यामध्ये सध्या घरगुती गॅस सिलेंडर्सचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा भासत असून, दुसरीकडे सिलेंडर्सची काळाबाजारी जोरात सुरू आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी आम आदमी पार्टीच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र सहसचिव रजनीकांत जिचकार यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा प्रशासन आणि अन्न व नागरी पुरवठा विभागाला निवेदन सादर केले.

गॅस टंचाईमुळे सर्वसामान्यांचे हाल होत असून, काळाबाजारी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. याप्रसंगी भूषण ढाकुलकर (महाराष्ट्र संघटन सचिव), अजिंक्य कळंबे (शहर अध्यक्ष), अहमद जवाद (उपाध्यक्ष), इक्बाल रिझवी (सरचिटणीस), डॉ. अमेय नारनवरे अनेक प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. यासोबतच सुभाष धबाले, क्षितिज मेशराम, महेश भुचढ आणि तेजराम मदन या प्रमुख सहकाऱ्यांनीही उपस्थित राहून प्रशासनाकडे आपली कैफियत मांडली. गॅस सिलेंडर्सचा पुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही पक्षाकडून देण्यात आला.

## शिक्षण सभापतींनी केले संजय नगर प्राथमिक शाळा व बालवाडीचे निरीक्षण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३० :** मनपाच्या शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी लड्ढा यांनी संजय नगर प्राथमिक शाळा व बालवाडी येथे भेट देऊन शाळेचे सखोल निरीक्षण केले. यावेळी त्यांनी शाळेतील सर्व सोयी सुविधांची तपासणी करीत मध्यान्ह भोजनाच्या गुणवत्तेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या प्रसंगी शिक्षणाधिकारी माधुरी काटकर, मुख्यध्यापिका गीता दांडेकर यांच्यासह शाळेतील शिक्षक वर्ग उपस्थित होता.



सभापती लड्ढा यांनी संपूर्ण शाळा परिसराची पाहणी करून स्वच्छता, शिस्त व मूलभूत सुविधांची स्थिती तपासली. निरीक्षण दरम्यान आढळलेल्या त्रुटींवर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ सुधारणा करण्याचे कडक निर्देश दिले तसेच भविष्यात कोणत्याही पद्धतीचा हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छता व आरोग्यविषयक सुविधांची विशेष तपासणी करण्यात आली आणि आवश्यक त्या सुधारणा त्वरित करण्याचे निर्देश देण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधला. सभापती यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार शिक्षण, स्वच्छता व आवश्यक सुविधा यामध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले.

## खदाणीत बुडून मुलाचा मृत्यू

**नागपूर, दि. ३० :** गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक हृदयद्रावक घटना घडली आहे. मित्रांसोबत पोहायला गेलेल्या १६ वर्षीय मुलाचा खदाणीच्या पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. माहितीनुसार, मृत आर्यन चंद्रशेखर पटेल (वय १६ वर्ष, रा. सिद्दिकी ले-आउट, गोधनी, नागपूर) हा रविवार, २९ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास आपल्या मित्रांसोबत पिटसूर येथील 'स्वराज फार्म' समोरील खदाणीत पोहायला गेला होता. पोहत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने आर्यन खोल पाण्यात बुडाला. घटनेची माहिती मिळताच गिट्टीखदान पोलिसांनी घटनास्थळ गाठले. आर्यनचा मृतदेह पाण्याबाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी मेयो रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक चांदखा पठाण हे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## हेटामेटी शिवारात मोठ्या जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

### १५ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल, ४ लाखांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कुही/साळवा, दि. ३० :** पाचगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील हेटामेटी शिवारातील 'माई फार्म हाऊस' येथे सुरू असलेल्या मोठ्या जुगार अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखा (ग्रामीण) आणि पाचगाव पोलिसांनी संयुक्तरीत्या धाड टाकली. या कारवाईत ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या एकूण १५ आरोपींना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांच्याकडून ८४,१००/- रुपये रोख, १२ मोबाईल आणि २ दुचाकींसह एकूण ३,९९,१५०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




**पकडण्यात आलेले आरोपी:**

१) स्वप्नील विजय तरोडे २) सूरज चंद्रशेखर पाटील ३) भोजराज एकनाथ राऊत ४) करण सुखराम नागपुरे ५) सागर अशोक काळे ६) पंकज ओमप्रकाश उमरेडकर ७) राजेश सुंदरलाल राठे ८) सुनील रमेशराव कडू ९) धनराज मनोहर खापरे १०) अभिजीत मदन तोंडरे ११) सागर शेषराव साठे १२) राकेश मधुकर बारापात्रे १३) दादाराव रूपचंद कडू १४) अनिल मधुकर जांगडे आणि फार्म हाऊस मालक १५) अतुल बालकदास डोंगरे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही यशस्वी कारवाई केली असून, परिसरातील अवैध धंद्यांवर वचक बसवण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत.

## गांजा विक्री : महिलेसह दोघांना अटक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३० :** शहराला नशामुक्त करण्यासाठी पोलीस आयुक्त रविंद्रकुमार सिंगल यांच्या संकल्पनेतून राबविल्या जात असलेल्या 'ऑपरेशन थंडर' अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोठी कारवाई केली आहे. कळमना पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजाची तस्करी आणि विक्री करणाऱ्या एका महिलेसह दोन आरोपींना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.



गुन्हे शाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी आणि कर्मचारी २८ मार्च २०२६ रोजी रात्री १०:१५ ते ११:४५ च्या सुमारास गस्तीवर असताना त्यांना संशयित हालचाली आढळून आल्या. कळमना येथील मोहनलाल वाजपेयी नगर, पन्नी कारखान्याजवळ एका निळ्या रंगाच्या ॲक्टिव्हावर बसलेल्या व्यक्तीची झडती घेतली असता, गाडीच्या डिक्कीत पांढऱ्या प्लास्टिक पिशवीत गुंडाळलेला ९६१ ग्रॅम गांजा सापडला.

पोलिसांनी मुख्य आरोपी तेजप्रताप नंदीप्रताप शाहू (वय ३० वर्ष) त्याच्याकडून २४,०२५ रुपये किमतीचा गांजा, दुचाकी आणि मोबाईल असा एकूण ८४,०२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

## महिला बचत गटांना सुवर्णसंधी

### 'कृषी अवजारे बँक' स्थापनेसाठी ५ एप्रिलपर्यंत मुदत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ उल्हास मेश्राम

**कुही, दि. ३० :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (PoCRA) टप्पा २ अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील महिला शेतकरी गटांना स्वावलंबी करण्यासाठी 'एक गाव, एक कृषी अवजारे बँक' योजना राबवण्यात येत आहे. या योजनेद्वारे शेतीचे यांत्रिकीकरण वाढवून अल्पभूधारक शेतकऱ्यांना मदत करण्याचे उद्दिष्ट आहे. पात्र महिला बचत गटांना ट्रॅक्टर, हार्वेस्टर आणि फवारणी पंप यांसारखी आधुनिक साधने खरेदी करण्यासाठी ६० टक्क्यांपर्यंत (कमाल २४ लाख रुपये) अनुदान दिले जाणार आहे.

> "महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ही एक मोठी संधी आहे. जास्तीत जास्त गटांनी ५ एप्रिलपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी तालुका कृषी कार्यालय किंवा समूह सहाय्यकांशी संपर्क साधावा."
>
> 
>
> \- राजेश जारोंडे, तालुका कृषी अधिकारी, कुही

**पात्रता आणि अटी**

या योजनेसाठी 'उमेद' (MSRLM) आणि 'माविम' (MAVIM) अंतर्गत नोंदणीकृत किमान १० महिला सदस्य (वेगवेगळ्या कुटुंबातील) असलेले गट पात्र आहेत. ज्या गटांनी यापूर्वी अशा शासकीय योजनेचा लाभ घेतला आहे, त्यांना पुन्हा अर्ज करता येणार नाही. एका गावातून अधिक अर्ज आल्यास ऑनलाईन लॉटरीद्वारे निवड केली जाईल. प्रकल्प मूल्य २० लाखांपेक्षा जास्त असल्यास उर्वरित रकमेसाठी ७५% बँक कर्ज घेणे बंधनकारक आहे. इच्छुकांनी ५ एप्रिल २०२६ पर्यंत https://dbtndksp.mahapocra.gov.in/ या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावा. अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र, ऑडिट रिपोर्ट आणि ठराव जोडणे आवश्यक आहे.

## 'आश्वी आईस्क्रिम'तर्फे आईस्क्रिमचे वितरण



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३० :** 'आश्वी आईस्क्रिम पार्लर'च्या वतीने श्रीराम नवमीनिमित्त आईस्क्रिमचे वितरण करण्यात आले.

नवीन सुभेदार ले-आऊट येथील 'आश्वी आईस्क्रिम पार्लर'आणि 'होक्को आईस्क्रिम' च्या वतीने गुरुवारी श्रीरामनवमीनिमित्त भाविकांना आईस्क्रिम वितरित करण्यात आले. याप्रसंगी रोड राईट्स फाऊंडेशनचे सचिव सतिश चावजी, पत्रकार संजय इस्तारी मुंदलकर, प्रदीप गाडे, होक्कोचे एरिया सेल्स मॅनेजर अतुल भिलकर, सेल्स एक्झिक्युटिव्ह संकेत गाडे, 'आश्वी आईस्क्रिम पार्लर'चे निलेश चिंतावार,आनंद प्रसाद, चेतन मेश्राम, श्री. दातारकर सर,भरत गायकवाड, चंदू नेरकर, संदीप पलसापुरे, महेश राऊत मानेकर आदी उपस्थित होते प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते श्रीराम यांच्या प्रभू श्रीरामांच्या छायाचित्राचे पुजन करण्यात आले.

**पृथ्वीसाठी एक तास ... पर्यावरण जनजागृतीसाठी मनपाचा पुढाकार**

# नागपुरात 'अर्थ अवर' उत्साहात साजरा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. ३० : नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षीही 'अर्थ अवर' सीताबर्डी येथील वर्ल्ड ट्रेड सेंटर (ग्लोकल मॉल) आणि सीताबर्डी परिसरातील विविध दुकानांमध्ये "पृथ्वीसाठी एक तास द्या" या थीमसह अर्थ अवरची २० वी वर्षपूर्ती म्हणून साजरे करण्यात आले.**




वर्ल्ड ट्रेड सेंटर चे संचालक अनुप खंडेलवाल, ग्रीन व्हिजिल फाउंडेशनचे कौस्तभ चटर्जी, प्रिया यादव, पिनाकी बनिक, पार्थ जुमडे, प्रतीक इसम्पल्लीवार, जान्हवी पारास्कर,चंद्रप्रकाश सामला, क्षितिज कुशवाहा, सुरभी जैसवाल, मेहुल कोसुरकर, शीतल चौधरी, श्रिया जोगे, यांच्यासह मनपा विद्युत विभागातील कर्मचारी उपस्थित होते

अर्थ अवर हा जागतिक पर्यावरणीय उपक्रम असून त्याचे आयोजन 'वर्ल्ड वाइल्डलाइफ फंड फॉर नेचर'तर्फे केले जाते. हा उपक्रम दरवर्षी साजरा केला जातो, ज्यामध्ये व्यक्ती, समुदाय व व्यावसायिकांना रात्री ८:३० ते ९:३० या वेळेत एक तासासाठी अनावश्यक दिवे व विद्युत उपकरणे बंद करण्याचे आवाहन केले जाते, जेणेकरून पृथ्वीप्रती आपली बांधिलकी दर्शवता येईल. या उपक्रमाची सुरुवात २००७ साली ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे "लाइट्स ऑफ" मोहिमेच्या स्वरूपात झाली होती आणि आज तो १९० पेक्षा अधिक देशांमध्ये साजरा केला जाणारा जागतिक उपक्रम बनला आहे. अर्थ अवरच्या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन नागपूरचे तत्कालीन महापौर अनिल सोले यांनी "पौर्णिमा दिवस" मोहिमेची सुरुवात केली होती. २०१४ पासून नागपूर महानगरपालिका व ग्रीन व्हिजिल फाउंडेशनतर्फे प्रत्येक पौर्णिमेला राबवली जात आहे.

**जनजागृती**

**ग्रीन व्हिजिल फाउंडेशनच्या सदस्यांनी दुकानदार, नागरिक व विविध घटकांशी संवाद साधून हवामान बदल, जागतिक तापमानवाढ, हवामान कृती, ऊर्जा संवर्धन, नवीकरणीय ऊर्जा स्रोतांकडे वळणे, कमी कार्बन जीवनशैलीचा अवलंब व हरित जीवनशैली यांसारख्या विषयांवर जनजागृती केली. वर्ल्ड ट्रेड सेंटर व सीताबर्डी व्यापारी संघाच्या टीमने या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रम यशस्वतेसाठी ग्रीन व्हिजिल फाउंडेशन आणि मनपाच्या विद्युत कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.**

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, मंगळवार, दि.३१ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com

## शालीमार आणि ज्ञानेश्वरी एक्सप्रेस पुन्हा धावणार

**अकोला:** दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील तांत्रिक कामांमुळे रद्द करण्यात आलेल्या महत्त्वाच्या एक्सप्रेस गाड्या आता पुन्हा पूर्ववत होणार आहेत. गोंदिया स्थानकावरील कामे पूर्ण होत असल्याने रेल्वे प्रशासनाने शालीमार आणि ज्ञानेश्वरी एक्सप्रेस या गाड्यांच्या फेऱ्या पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे उन्हाळी सुट्ट्यांच्या काळात प्रवास करणाऱ्या प्रवाशांची होणारी गैरसोय दूर होणार आहे. शालीमार लोकमान्य टिळक टर्मिनस (१८०३०/१८०२९): ही गाडी ४ एप्रिल ते २४ एप्रिल २०२६ दरम्यान शालीमार येथून, तर ६ एप्रिल ते २६ एप्रिल २०२६ दरम्यान मुंबईहून आपल्या नियोजित वेळापत्रकानुसार धावेल. ज्ञानेश्वरी सुपरफास्ट एक्सप्रेस (१२१०१/१२१०२): मुंबईहून सुटणारी ज्ञानेश्वरी एक्सप्रेस एप्रिल महिन्यात ४, ५, ७, ८, ११, १२, १४, १५, १८, १९, २१ व २२ तारखेला धावेल. परतीच्या प्रवासात शालीमार येथून ही गाडी ६, ७, ९, १०, १३, १४, १६, १७, २०, २१, २३ व २४ एप्रिल रोजी उपलब्ध असेल. गोंदिया स्थानकावरील कामांमुळे मध्यंतरी रेल्वे सेवा विस्कळीत झाली होती, मात्र आता या महत्त्वाच्या गाड्या सुरू झाल्याने प्रवाशांना मोठा आधार मिळाला आहे.

### महत्त्वाचे

## आ. जगताप यांच्यावर कारवाईची मागणी

**अकोला:** अहिल्यानगर येथे रामनवमीच्या मिरवणुकीदरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. याप्रकरणी अकोल्यातील सामाजिक कार्यकर्ते जावेद जकरिया यांनी राष्ट्रवादी काँग्रेस चे आमदार संग्राम जगताप यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करत प्रशासनाकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. जकरिया यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या ई-मेल तक्रारीत नमूद केले आहे की, व्हायरल व्हिडिओमध्ये आमदार संग्राम जगताप कथितपणे एका मशिदीसमोर नाचताना आणि मशिदीच्या दिशेने बाण सोडण्यासारखे आक्षेपार्ह इशारे करताना दिसत आहेत. अशा वर्तनामुळे धार्मिक तणाव निर्माण होऊन सामाजिक सौहार्द बिघडण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

# मनपात राडा; ५० खोकेच्या घोषणांनी अर्थसंकल्पीय सभेत गोंधळ

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** महापालिकेची अर्थसंकल्पीय सभा सोमवारी विकासाच्या चर्चेऐवजी राजकीय संघर्षाचे मैदान ठरली. बजेटवर चर्चा सुरू असताना ५० खोके, एकदम ओके अशा सत्ताधाऱ्यांच्या चिथावणीखोर घोषणाबाजीमुळे निर्माण झालेल्या गोंधळानंतर, पीठासीन अधिकारी तथा महापौर शारदा खेडकर यांनी १६ नगरसेवकांना तीन सभांसाठी निलंबित केले. या कारवाईमुळे संतप्त झालेल्या नगरसेवकांनी सभागृहातच ठिय्या आंदोलन केले, ज्यांना अखेर पोलीस कुमक बोलावून बाहेर काढावे लागले.

महापालिकेच्या अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या बजेटवर चर्चा करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलावण्यात आली होती. चर्चेचा ओघ सुरळीत असतानाच, वंचित बहुजन आघाडीचे स्वीकृत नगरसेवक सुनील इन्नानी यांनी चर्चेत भाग घेण्यासाठी माईक हाती घेतला. त्याचवेळी सत्ताधारी शहर सुधार आघाडीच्या सदस्यांनी ५० खोके, एकदम ओके असा नारा देण्यास सुरुवात केली. या अनपेक्षित घोषणाबाजीमुळे शांततेत सुरू असलेल्या सभेचे रूपांतर रणधुमाळीत झाले.

सभागृहातील गोंधळ नियंत्रणाबाहेर गेल्याचे पाहून महापौर शारदा खेडकर यांनी जाणीवपूर्वक चिथावणी देणाऱ्या सत्ताधारी नगरसेवकांना सोडून, कामकाजात अडथळा आणल्याचा ठपका ठेवत विरोधी गटातील १६ नगरसेवकांना पुढील तीन सभांसाठी निलंबित करण्याचे आदेश दिले. या कारवाईचा निषेध करत निलंबित नगरसेवकांनी सभागृहातच ठाण मांडले आणि सत्ताधाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी सुरू केली. हा हायहोल्टेज ड्रामा सुमारे दीड ते दोन तास चालला. अखेर परिस्थिती हाताळण्यासाठी पोलिसांना पाचारण करण्यात आले आणि त्यांच्या मदतीने निलंबित नगरसेवकांना सभागृहाबाहेर काढण्यात आले.

### १६ नगरसेवकांचे तीन सभांसाठी निलंबन




### निलंबित करण्यात आलेले नगरसेवक

मोहम्मद फजलु अब्दुल करीम (प्रभाग ९ ड), आझादखान अलियारखान (प्रभाग १७ ड), पराग रामकृष्ण गवई (प्रभाग १४ क), निलेश रामकृष्ण देव (प्रभाग ३ ड), शेख शमशु कमर शेख साबीर, डॉ. जिशान हुसेन (प्रभाग ११ ड), विजय रामदास इंगळे (प्रभाग २० अ), स्वीकृत सदस्य शंकर भाऊराव लंगोटे, निलोफरखान सोहेलखान (प्रभाग १ क), स्वीकृत सदस्य आकाश श्रीकृष्ण कवडे, अभय अशोक खुमकर (प्रभाग ४ ड), जैनबबी शेख इब्राहिम (प्रभाग ११ अ), अर्शिया परवीन मोहम्मद शारिक (प्रभाग १८ क), उज्ज्वला प्रविण पातोडे (प्रभाग १४ अ), सुवर्णरेखा विजय जाधव (प्रभाग ७ अ) आणि जयश्री महेंद्र बहादूरकर (प्रभाग १४ ब) यांचा समावेश आहे.

### विरोधकांचा सत्ताधाऱ्यांवर कडाडून हल्ला

या संपूर्ण प्रकारानंतर विरोधी पक्षांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. अतिशय शांततेत चर्चा सुरू असताना सत्ताधाऱ्यांनी जाणीवपूर्वक गोंधळ घालून सभागृहाला कुस्तीचे मैदान बनवले, असा आरोप विरोधी पक्षनेते डॉ. जीशान हुसेन यांनी केला. तर, वंचितचे गटनेते निलेश देव यांनी ही कारवाई म्हणजे सत्ताधाऱ्यांचा मनमानी कारभार असल्याची टीका केली. निलंबनाची कारवाई ही लोकशाहीची गळचेपी असून शहर सुधार आघाडीची ही हुकूमशाही असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

**पत्रकारांची अडवणूक; महापौर कक्षात पत्रकारांचे ठिय्या आंदोलन**

महापालिकेच्या पहिल्या सभेपासूनच लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांना सभागृहात प्रवेश नाकारण्याचा प्रकार सत्ताधाऱ्यांनी केला आहे. सभागृहात जागा नसल्याचे आणि नियमांचे कारण पुढे करत पत्रकारांना सभागृहात जाण्यास मज्जाव केला आहे. या प्रकारामुळे पत्रकार वर्गात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. प्रशासनाने पर्यायी व्यवस्था म्हणून महापौर कक्षाच्या मिटिंग हॉलमध्ये एक एलईडी स्क्रीन लावली आहे. मात्र, सोमवारी सभा सुरू असताना सभागृहात प्रचंड गोंधळ झाला, ज्याची दृश्ये स्क्रीनवर स्पष्टपणे दिसत नव्हती. सभागृहात नक्की काय घडतेय याची सत्यता पडताळण्यासाठी पत्रकारांनी मुख्य सभागृहात जाण्याचा प्रयत्न केला असता, तैनात असलेल्या पोलीस प्रशासनाने पत्रकारांना अडवले. या दडपशाहीचा निषेध करण्यासाठी सर्व पत्रकार बांधवांनी एकत्र येत महापौर कक्षातच ठिय्या आंदोलन सुरू केले. जोपर्यंत सन्मानाने प्रवेश मिळत नाही, तोपर्यंत माघार घेणार नसल्याची भूमिका पत्रकारांनी घेतली आहे.

# महान परिसराला चक्रीवादळासह अवकाळीचा तडाखा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**महान, दि. ३० :** स्थानिक महान व परिसरात सोमवारी, ३० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास अचानक आलेल्या चक्रीवादळासह मेघगर्जनेने हजेरी लावली. सुसाट सुटलेल्या वाऱ्यामुळे हाताशी आलेले गव्हाचे पीक जमिनीदोस्त झाले असून, काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. निसर्गाच्या या लहरीपणामुळे बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सायंकाळच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होऊन वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, शेतातील उभा गहू आडवा झाला. ज्या शेतकऱ्यांनी हरभऱ्याची काढणी करून गंज्या (ढेर) लावून ठेवल्या होत्या, त्या भिजून नुकसान होऊ नये म्हणून ताडपत्रीने झाकण्यासाठी शेतकऱ्यांची एकच पळापळ उडाली. जानेवारी महिन्यात पेरणी केलेला गहू सध्या दाणे भरण्याच्या अवस्थेत असतानाच या वादळाचा मोठा फटका बसला आहे.



**फळबागांनाही फटका**

या वादळी पावसाचा फटका केवळ रब्बी पिकांनाच नाही, तर फळबागांनाही बसला आहे. सुसाट वाऱ्यामुळे गावरान आंब्याची प्रचंड पडझड झाली असून अर्ध्याहून अधिक कैरी गळून पडली आहे. अगोदरच नापिकी आणि कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी आता या अस्मानी संकटामुळे पूर्णपणे हवालदिल झाला आहे.

**तात्काळ सर्वेक्षणाची मागणी**

वादळी वाऱ्यामुळे आंब्याच्या मोहराचे आणि कैऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. झाडावर लगडलेल्या कैऱ्या खाली पडल्याने आंबा उत्पादकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. प्रशासनाने या भागातील नुकसानीचे तातडीने पंचनामे (सर्वेक्षण) करून शेतकऱ्यांना आर्थिक आधार द्यावा, अशी मागणी महान येथील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

## डॉ. नालट यांना 'महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार

**अकोला :** अकोला जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी करत, गेल्या वीस वर्षांपासून व्यसनमुक्ती क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉ. धनंजय उर्फ बाबा नालट यांना महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा 'राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार' मुंबई येथे प्रदान करण्यात आला. मुंबईतील मलबार हिल परिसरातील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित भव्य आणि दिमाखदार कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी केंद्रीय समाज कल्याण मंत्री रामदास आठवले, महाराष्ट्राचे समाज कल्याण मंत्री संजय शिरसाट तसेच समाज कल्याण आयुक्त डॉ. हर्षवर्धन कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. नालट यांनी गेल्या दोन दशकांपासून अकोला जिल्ह्यात व्यसनमुक्तीबाबत जनजागृती, प्रबोधन आणि समाजपरिवर्तनासाठी सातत्यपूर्ण काम केले आहे.

# जिल्हा बँकेवर सहकार पॅनलचे वर्चस्व कायम

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** अकोला व वाशीम जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदाच्या निवडणुकीचे निकाल सोमवारी जाहीर करण्यात आले. सहकार पॅनलने पुन्हा एकदा निर्विवाद विजय मिळवला. एकूण २१ जागांसाठी निवडणुकीची प्रक्रिया पार पडली. मात्र १० जागा अविरोध आल्याने ११ जागांसाठी मतदान झाले. २१ पैकी २० जागांवर सहकार पॅनलने विजय मिळवला.



अनेक वर्षांपासून बँकेवर एकाच गटाची अर्थात सहकार पॅनेलची सत्ता आहे. याही वेळी परिवर्तन झालेच नाही; उलट विद्यमान गटाने दणदणीत विजय मिळवला. यात प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा व विविध कार्यकारी संस्था मतदारसंघातून अकोट: उषा रमेश हिंगणकर, तेल्हारा: संदीप रमेश खारोडे, मूर्तिजापूर: अभिषेक सुहासराव तिडके, वाशीम: धनंजय उत्तम गोरे, रिसोड: शोभा सुभाषराव झनक, मालेगाव: नितीन दिलीप जाधव, मंगरुळपीर: रामेश्वर सुभाष ठाकरे, कारंजा: विश्वनाथ किसनराव ताथोड हे विजयी झाले. महिला प्रतिनिधींनी बाजी मारली असून, अपर्णा शिरीष धोत्रे आणि गीताबाई महादेवराव ठाकरे या विजयी झाल्या. इतर मागासवर्गीय शेतकरी संघटनेचे ललित बहाळे विजयी झाले.

### १० संचालक अविरोध

निवडणुकीत १० जण संचालक म्हणून अविरोध आले. यात विविध कार्यकारी सोसायटी मतदार संघातून अकोला: डॉ. जयराज संतोषकुमार कोरपे, गोपाल काकड (बार्शीटाकळी), अजिंक्य राऊत (बाळापूर), कल्पना पाचपोर (पातूर), अरविंद इंगोले (मानोरा), रामेश्वर वाघ (अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती), अनिल जाधव (भटक्या जमाती, विमुक्त जात व विशेष मागासवर्ग), पटेल जावेद उल्लाह खान हिदायत उल्लाह खान (कृषी पणन, शेतमाल संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती), डॉ. धीरज देशमुख (औद्योगिक मजुरांच्या, विणकरांच्या संस्था), डॉ. संतोषकुमार कोरपे (पगारदार नोकरांच्या पतसंस्था, नागरी सहकारी बँक, ग्रामीण नागरी सहकार पतसंस्था) यांचा समावेश आहे.

# अवैध दारू आणि जुगाराचा हैदोस; कावसा येथील ग्रामस्थांचा १ मे पासून उपोषणाचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** अकोट तालुक्यातील कावसा बु., कावसा खु. आणि तरोडा परिसरात वाढत्या अवैध दारूविक्री आणि वरली जुगार अड्ड्यांमुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने, संतप्त महिला आणि ग्रामस्थांनी १ मे (महाराष्ट्र दिन) पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गावातील अवैध धंद्यांमुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे. यामुळे घरगुती हिंसाचार आणि आर्थिक ओढाताण वाढली असून महिला व मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. १८ मार्च २०२६ रोजी एका महिलेने पतीच्या दारूच्या व्यसनाला कंटाळून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची गंभीर घटनाही घडली आहे. ६ मार्च २०२३ पासून दहिलांडा पोलीस ठाण्यात वारंवार तक्रारी देऊनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ''बिट जमादार आणि ठाणेदारांना माहिती देऊनही अवैध धंदे सुरूच आहेत, हे प्रशासनाचे अपयश आहे,'' अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



### मोठ्या आंदोलनाची तयारी

या निवेदनासोबत ग्रामपंचायतीचे दारूबंदी ठराव आणि महिला बचत गटांचे संमतीपत्र जोडण्यात आले आहे. रमाई महिला संघ, निर्भय बनो आंदोलन आणि विविध सामाजिक संघटनांनी या मागणीला पाठिंबा दिला आहे. निवेदनावर उषा वानखडे, शीला पोहकार, मनोहर वानखडे यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. जर तातडीने कारवाई झाली नाही, तर होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या बिघाडाला प्रशासन जबाबदार असेल, असा सज्जड दमही यावेळी देण्यात आला.

# १७ हजारांचा ऐवज लुटणारे तीन आरोपी ताब्यात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** सिव्हील लाईन पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या लुटमारीच्या घटनेचा पोलिसांनी वेगाने तपास करत तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात सुमारे १७ हजार रुपयांचा ऐवज हिसकावण्यात आला होता.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी श्याम बाळकृष्ण केणे (वय ३२, रा. झोडगा, ता. कारंजा, जि. वाशीम) हे २४ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे २.३० वाजताच्या सुमारास दवाखान्याकडे जात असताना त्यांना तिघा अनोळखी तरुणांनी अडवले. ''कुठे जात आहात?'' अशी विचारणा करत अचानक त्यांना लोटलाट करून त्यांच्या खिशातील ९ हजार रुपये रोख रक्कम आणि सुमारे ८ हजार रुपये किमतीचा रिअलमी कंपनीचा मोबाईल असा एकूण १७ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावून आरोपी पसार झाले.

या प्रकरणी सिव्हील लाईन पोलीस स्टेशन येथे अप क्रमांक ४१०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०९(४), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.



मा. पोलीस अधीक्षक अचित चांडक, मा. अप्पर पोलीस अधीक्षक रेड्डी, तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मालती कायटे यांच्या आदेशानुसार तपास पथकाने गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपींचा शोध घेतला.

तपासादरम्यान आरोपी ओम सावन तायडे (१९), सुरज संतोष खंडारे (२०), दोन्ही रा. आंबेडकर नगर, अकोला) आणि रोहन अनिल आढाव (२०) रा. शंकुतला नगर, जालना) यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक शामली निकम, दिनेश पवार तसेच पोलीस कर्मचारी संतोष बागळे, श्रीकांत आजलसांडे, शक्तो कांबळे, पवन सिरसाट, अक्षय तायडे आणि एकनाथ त्रिकाळ यांनी महत्वाची भूमिका बजावली.

पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून आरोपींकडून आणखी गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# सोलार प्लांटमधील कॉपर केबल चोरी प्रकरणी २ आरोपी जेरबंद



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** बार्शीटाकळी पोलीस स्टेशन हद्दीत घडलेल्या सोलार प्लांटमधील मोठ्या कॉपर केबल चोरीच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखा पथकाने अवघ्या १२ तासांत छडा लावत दोन आरोपींना अटक केली असून सुमारे ७ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

२८ मार्च २०२६ रोजी जलालाबाद (ता. बार्शीटाकळी) येथील मेघा इंजिनिअरिंग अँड इन्फ्रा लिमिटेडच्या सोलार प्लांट इन्स्टॉलेशन गोडाऊनमधून अज्ञात चोरट्यांनी मोठ्या प्रमाणावर कॉपर केबल लंपास केली होती. यात ७० स्क्वेअर एमएमचा अर्थिंग केबल (किंमत ६ लक्ष ५० हजार रुपये) तसेच ४ स्क्वेअर एमएमचा डी.सी. केबल (किंमत २ लक्ष २५ हजार रुपये) असा एकूण ८ लक्ष ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला होता. या प्रकरणी बार्शीटाकळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गंभीर गुन्ह्याची दखल घेत पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी तातडीने तपासाचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक माहिती व चौकशीच्या आधारे तपासाची सूत्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान गोडाऊनमध्ये काम करणारा संदीप उमेश राय (२७) रा. सारीपुर, जि. बक्सर, बिहार) यानेच चोरी केल्याचे निष्पन्न झाले. चौकशीत आरोपीने चोरी केलेला माल शहेजाद बेग सलीम बेग (३२) रा. बादशाह नगर, पातूर) यास विकल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी पातूर येथून चोरीतील एक मोठा आर्थिंग केबल ड्रम, डी. सी. केबलचे पॅकिंग तसेच रिकामे ड्रम असा एकूण ७ लक्ष ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही आरोपींना अटक करून त्यांच्यासह जप्त मुद्देमाल बार्शीटाकळी पोलीस ठाण्यात हस्तांतरित करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि. बाळू पवार करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि. गोपाल जाधव, ग्रेड पोउपनि. दशरथ बोरकर व त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

**राजकारण** | काँग्रेस-एमआयएम समर्थकांमध्ये अकोल्यात राडा

# चाकू हल्ल्यात एक गंभीर, चार जखमी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** शहरातील अकोट फैल परिसरात काँग्रेस आणि एमआयएम पक्षाच्या नगरसेवकांच्या समर्थकांमध्ये सोमवारी दुपारी जोरदार राडा झाला. या वादातून चाकू हल्ल्याची गंभीर घटना घडली असून एक जण गंभीर जखमी झाला आहे, तर अन्य चार जण जखमी झाले आहेत. सर्व जखमींवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

महापालिका निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर काँग्रेस आणि एमआयएम या दोन्ही पक्षांतील स्थानिक पातळीवरील तणाव वाढत असल्याचे दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर अकोट फैल भागात एमआयएमचे नगरसेवक सय्यद रहीम सय्यद हाशम आणि काँग्रेसचे नगरसेवक अब्दुल करीम यांच्यात शाब्दिक वाद झाला.



हा वाद काही क्षणांतच तीव्र स्वरूप धारण करत झटापट, हाणामारी आणि दगडफेकीपर्यंत पोहोचला. या गोंधळादरम्यान एका व्यक्तीवर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. यात एकूण पाच जण जखमी झाले असून त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे.

घटनेनंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिसरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, या घटनेमागे अंतर्गत राजकीय वाद आणि वाढता तणाव हेच मुख्य कारण असल्याचे सांगितले जात आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# २३७ जीपीएस यंत्रणेचे टेंडर हवेत विरले?

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** स्वच्छ भारत अभियानांतर्गत शहराला चकाचक ठेवण्यासाठी अकोला महानगरपालिकेने तंत्रज्ञानाचा आधार घेण्याचे ठरवले खरे, मात्र प्रत्यक्षात परिस्थिती जैसे थे आहे. शहरातील कचरा संकलनावर नियंत्रण मिळवण्यासाठी घंटागाड्यांवर लावण्यात आलेल्या २३७ जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीमचे नूतनीकरण, सबस्क्रिप्शन आणि देखभालीसाठी पालिकेने निविदा काढल्या असल्या तरी, अद्यापही ही संपूर्ण यंत्रणा केवळ कागदावरच असल्याचे चित्र आहे. प्रशासनाचा हा नियोजित प्रकल्प आणि निघालेले टेंडर सध्या तरी हवेत विरल्याची चर्चा आहे.

महानगरपालिका शहरातील प्रत्येक भागात कचरा संकलनासाठी वाहने फिरवत असल्याचा दावा करत असली, तरी या प्रक्रियेवर प्रभावी नियंत्रण नसल्याने संकलन कामाचा पुरता बोजवारा उडाला आहे. शहरात अनेक ठिकाणी घंटागाड्या वेळेवर पोहोचत नसल्याच्या तक्रारी आहेत. यावर उपाय म्हणून वाहनांना जीपीएस प्रणालीने सुसज्ज करण्यात आले होते, परंतु सद्यस्थितीत अनेक वाहनांवरील ही यंत्रणा निकामी आहे. ही यंत्रणा पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी २३७ व्हीटीएस उपकरणांचे नूतनीकरण आणि देखभालीची निविदा काढण्यात आली आहे. यात कंत्राटदाराने सिम, डेटा कार्डसह सेवा देणे आणि २४ तासांच्या आत निष्क्रिय उपकरणे दुरुस्त करणे बंधनकारक आहे. मात्र, या अटी प्रत्यक्षात उतरण्यापूर्वीच प्रक्रियेला ब्रेक लागला आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक घरावर क्यूआर कोड बसवण्याचे नियोजन पालिकेने केले. कचरा उचलल्यानंतर कर्मचाऱ्याने मोबाईलद्वारे हा कोड स्कॅन केल्यास त्याची माहिती थेट वेंडरपर्यंत पोहोचणार आहे. या प्रक्रियेमुळे कामाचा मासिक अहवाल सादर करणे सोपे होणार असले, तरी अद्याप अनेक भागांत क्यूआर कोडचा पत्ता नाही.

निविदेनुसार, कंत्राटदाराने होस्टिंग सेवा, एसएमएस गेटवे आणि गुगल मॅप आधारित वेब ॲप्लिकेशन मोबाईलवर उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. कंत्राट प्रक्रियेतील विलंब आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे ही हायटेक कचरा संकलन मोहीम केवळ फाईलमध्येच अडकून पडली आहे.

## महत्त्वाचे

### श्रीरामपूर दगडफेक घटनेचा अकोल्यात तीव्र निषेध

**अकोला :** अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे रामनवमीच्या शोभायात्रेवर समाजकंटकांनी केलेल्या दगडफेकीच्या घटनेचे पडसाद अकोल्यात उमटले आहेत. या भ्याड हल्ल्याचा श्री जानकी वल्लभो सरकार धर्मार्थ संस्थेच्या वतीने तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. श्रीरामपूर येथे जय श्रीरामचा जयघोष करत प्रभू श्रीरामाची जन्मोत्सव शोभायात्रा शांततेत निघत असताना, काही असामाजिक तत्त्वांनी दगडफेक करून अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या घटनेमुळे भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दहशत निर्माण करून सामाजिक शांतता भंग करणाऱ्या अशा प्रवृत्तींचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी माजी नगरसेवक गिरीश जोशी आणि गिरीराज तिवारी यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या घटनेमुळे हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या असून, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलावीत, असेही संस्थेच्या वतीने नमूद करण्यात आले आहे. अशी मागणी अकोल्यातील रामभक्तांनी या संदर्भात मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

### निरोगी आरोग्य हीच खरी संपत्ती – डॉ. देशमुख

**अकोला :** येथील बी.आर. हायस्कूलमध्ये ज्येष्ठ नागरिक संघाची पाक्षिक सभा उत्साहात संपन्न झाली. या सभेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ बालरोग तज्ज्ञ डॉ. विनायकराव देशमुख उपस्थित होते. ''निरोगी आरोग्य हीच मानवाची खरी संपत्ती असून, सुखी जीवनासाठी आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने झाली. संघाचे अध्यक्ष रमेश बाहेती यांनी डॉ. देशमुख यांचा सत्कार केला. याप्रसंगी मागील महिन्यातील वाढदिवस असलेल्या सदस्यांचा, तसेच अध्यक्ष रमेश बाहेती व महिला समिती अध्यक्षा दीपाली वैद्य यांचा विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. देशमुखांनी ज्येष्ठांच्या आरोग्यविषयक समस्यांवर साध्या-सोप्या भाषेत उपाय सांगून शंकांचे निरसन केले. प्रास्ताविक व संचालन सचिव प्रा. मोहन गद्रे यांनी केले, तर उपाध्यक्ष मोहनशास्त्री जलतारे यांनी आभार मानले.

# कळंबी महागावला वादळी वाऱ्याचा तडाखा

## घरांवरील पत्रे उडून वीज खांबावर अडकले

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कळंबी महागाव, दि. ३० :** बाळापूर तालुक्यातील कळंबी महागाव परिसरात सोमवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास निसर्गाचा कोप पाहायला मिळाला. विजांच्या कडकडाटासह आलेल्या भीषण वादळी वाऱ्याने अक्षरशः थैमान घातले असून, अनेक घरांवरील टिनपत्रे हवेत उडाली. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, उडालेले पत्रे थेट वीज खांबावर (इलेक्ट्रिक पोल) जाऊन लटकले, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते.



अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे कळंबी महागावसह कळंबा बुद्रुक आणि कळंबा खुर्द परिसरातही मोठे नुकसान झाले आहे. सुमारे ३० मिनिटे चाललेल्या या वादळी पावसाने अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. विशेषतः बाबुराव सावळे यांच्या घराजवळील वीज खांबावर पत्रे लटकल्याने मोठा अनर्थ टळला. गावकऱ्यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे आणि सामाजिक कार्यकर्ते जुगल सावळे, पोलीस पाटील चंद्रमणी सावळे, नाना सावळे, कडू सावळे, अभिजीत सावळे, सुधाकर सावळे व वायरमन सुभाष सावळे यांच्या सहकार्याने हे पत्रे अथक परिश्रमानंतर पोलवरून खाली उतरवण्यात आले.

या वादळी वाऱ्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले असून, महावितरणच्या यंत्रणेचेही नुकसान झाले आहे. परिसरातील वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना अंधारात राहावे लागत आहे. प्रशासनाने या भागातील नुकसानीचे त्वरित पंचनामे करून

### प्रसंगावधानाने टळली दुर्घटना

वीज खांबावर पत्रे लटकल्याने शॉर्ट सर्किट होऊन मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. मात्र, वायरमन आणि गावातील तरुणांनी जीवाची पर्वा न करता वेळीच मदत केल्याने पुढील धोका टळला. निसर्गाच्या या रौद्र रूपामुळे मात्र कळंबी परिसरातील शेतकरी आणि नागरिक प्रचंड दहशतीखाली आहेत.

## मूर्तिजापूरात दुहेरी संकट; अवकाळीचा फटका अन् गॅस टंचाईने नागरिक त्रस्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. ३० :** एकीकडे मार्च महिन्याच्या उन्हात अचानक आलेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला आहे, तर दुसरीकडे शहरात निर्माण झालेल्या गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे तोंडचे पाणी पळाले आहे. निसर्गाचा कोप आणि प्रशासकीय त्रुटी अशा दुहेरी संकटात सध्या मूर्तीजापूर तालुका सापडला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.

तालुक्यात सोमवारी अचानक हवामान बदलून वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. काही भागांत झालेल्या गारपिटीमुळे गव्हाच्या पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी गहू कापून शेतातच वाळू घातला होता, मात्र पावसाने हातातोंडाशी आलेला घास भिजल्याने बळीराजा चिंतेत पडला आहे. विजांच्या कडकडाटासह झालेल्या या पावसाने शेतीचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडवले आहे.

शेतकरी या संकटातून सावरत असतानाच, परिसरात गॅस सिलिंडरची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. गॅस उपलब्ध नसल्याने घरगुती स्वयंपाकासह हॉटेल आणि खानावळींवरही मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी खाद्यपदार्थांची टंचाई निर्माण झाल्याने नागरिकांना वणवण करावी लागत आहे. या परिस्थितीमुळे संताप व्यक्त होत असून, प्रशासनाने तातडीने नुकसानीचे पंचनामे करावेत आणि गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

अवकाळी पावसामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे शासनाने तातडीने सर्वेक्षण करून मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत. दुसरीकडे, गॅस टंचाईवर वेळीच तोडगा न निघाल्यास नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

## गॅस दरवाढ मागे घ्या, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन

### नागपूर जिल्हा ऑटो चालक-मालक महासंघाचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. ३० :** एलपीजी आणि सीएनजी गॅसच्या दरात झालेली भरमसाठ वाढ तात्काळ कमी करावी, तसेच ऑटोचालकांच्या प्रलंबित मागण्यांचे निराकरण करावे, या मागणीसाठी नागपूर जिल्हा ऑटो चालक-मालक महासंघाच्या वतीने सोमवारी (३० मार्च) जिल्हाधिकारी आणि प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शासनाने या मागण्यांची दखल न घेतल्यास तीव्र राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा महासंघाने दिला आहे.

महासंघाचे महासचिव भाई चरणदास वानखेडे, उपाध्यक्ष कॉ. जम्मू आनंद, सचिव अजय उके आणि कोषाध्यक्ष कैलास श्रीपतवार यांच्या नेतृत्वात हे निवेदन सादर करण्यात आले. गेल्या महिन्याभरात ५५ रुपये लिटर मिळणारा गॅस थेट १५० रुपयांवर पोहोचल्याने रिक्षा चालकांचे कंबरडे मोडले आहे. घरगुती सिलिंडरच्या दरातही ६० रुपयांची वाढ झाल्याने सामान्य कुटुंबांचे बजेट कोलमडले आहे. पेट्रोल-डिझेलचे दरही वाढल्याने अल्प उत्पन्नात व्यवसाय करणे आता कठीण झाल्याची भावना रिक्षा चालकांनी व्यक्त केली आहे.

निवेदनाद्वारे महासंघाने १० प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने ई-रिक्षा व बॅटरीवर चालणाऱ्या ऑटोरिक्षांचे कार्यक्षेत्र निश्चित करून त्यांना नियमात आणणे, ओला, उबेर आणि रेपिडो सारखे विदेशी ॲप्स बंद करून शासनाने स्वतःचे अधिकृत ॲप विकसित करणे, फिटनेस नूतनीकरण शुल्कातील वाढ कमी करणे आणि शहरात ५०० नवीन अधिकृत पार्किंग उपलब्ध करून देणे या बाबींचा समावेश आहे. तसेच, धर्मवीर आनंद दिघे ऑटोरिक्षा कल्याणकारी मंडळाच्या योजनांमध्ये सुधारणा करूनच ऑनलाइन फॉर्म भरण्याची सक्ती करावी, अशी आग्रही मागणीही करण्यात आली आहे. याप्रसंगी सहसचिव अरविंद धवराळ, कार्यकारिणी सदस्य नारायण भांगे, संजय जिचकार, खोरेंद्र सोनिक, रमेश यादव यांच्यासह असंख्य ऑटोचालक उपस्थित होते.

## अकोला जिल्हा बँकेवर सहकार पॅनलचे यश; २१ पैकी २१ जागांवर वर्चस्व

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. ३० :** अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदासाठी पार पडलेल्या अटीतटीच्या निवडणुकीत सहकार पॅनलने ऐतिहासिक कामगिरी करत सर्व २१ जागांवर विजय मिळवला आहे. या निवडणुकीत सहकार पॅनलने विरोधकांचा पूर्णपणे धुव्वा उडवला असून, अकोट तालुक्यातील उमेदवारांनी मिळवलेले मताधिक्य संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरले आहे.



या निवडणुकीतील सर्वाधिक चुरस अकोट तालुक्यातील सहकारी संस्था मतदारसंघात पाहायला मिळाली. येथे सहकार पॅनलच्या उमेदवार उषा हिंगणकर यांनी ५८ पैकी ४२ मते मिळवून विजय संपादन केला, तर प्रतिस्पर्धी उमेदवाराला केवळ १४ मतांवर समाधान मानावे लागले. इतर मागासवर्गीय ओबीसी मतदारसंघातून ललित बहाळे यांनी ९२६ मते घेत मोठा विजय मिळवला, त्यांच्या विरोधात उभ्या असलेल्या उमेदवाराला अवघी १३० मते मिळाली. महिला राखीव गटातून धोत्रे (८४९ मते) आणि ठाकरे (८५१ मते) विजयी झाल्या आहेत. विशेष म्हणजे, यापूर्वीच जावेद पटेल यांची अविरोध निवड झाली आहे.

बँकेच्या या निकालामुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावरील सहकार पॅनलची पकड पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे. गेल्या अनेक दशकांपासून अकोटमधील सहकारी संस्थांवर या गटाचे वर्चस्व असून, मतदारांनी पुन्हा एकदा विद्यमान नेतृत्वावर विश्वास दर्शवल्याचे निकालावरून स्पष्ट होत आहे. निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांच्या समर्थकांनी गुलालाची उधळण आणि फटाक्यांची आतिषबाजी करत मोठा जल्लोष साजरा केला.

या निवडणुकीत विरोधी गटाला मोठा धक्का बसला आहे. मागील निवडणुकीच्या तुलनेत यंदा विरोधकांच्या मतांमध्ये लक्षणीय घट झाल्याचे दिसून आले. सहकारी संस्था मतदारसंघात मागील वेळी १५ मते घेणाऱ्या विरोधकांना यंदा ती संख्याही टिकवता आली नाही. या विजयामुळे अकोला आणि वाशिम जिल्ह्यातील सहकार क्षेत्राच्या राजकारणात सहकार पॅनलचे स्थान अधिक भक्कम झाले आहे.

## शेरवाडी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका उषा देशमुख यांना भावूक निरोप; विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. ३० :** येथून जवळच असलेल्या शेरवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत २०१८ पासून अविरत ज्ञानदान करणाऱ्या शिक्षिका उषा गजानन देशमुख (चव्हाण) यांचा सेवानिवृत्ती निरोप समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात आणि भावूक वातावरणात संपन्न झाला. गावकऱ्यांच्या वतीने आणि विद्यार्थ्यांनी दिलेल्या या निरोपाने संपूर्ण परिसर गहिवरून गेला होता.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्चना गोळे होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून गावचे उपसरपंच ऋषभ इंगळे, कृषी सखी अश्विनी इंगळे आणि मंजू इंगळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उषा देशमुख यांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

उषा देशमुख यांनी आपल्या शिक्षक व्यवसायात अत्यंत प्रामाणिकपणे कामगिरी बजावून विद्यार्थी आणि पालकांचे मन जिंकले होते. त्यांच्या या कार्याचा गौरव करताना उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. अनेक विद्यार्थ्यांनी आणि ग्रामस्थांनी त्यांना भेटवस्तू देऊन कृतज्ञता व्यक्त केली. या संपूर्ण सोहळ्याचे नेटके नियोजन व सूत्रसंचालन प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचे स्वयंसेवक शिक्षक नितीन इंगळे यांनी केले. कार्यक्रमाला विकी इंगळे, करण इंगळे, सौरभ इंगळे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शिक्षण क्षेत्रातील निस्पृह सेवा**

२०१८ पासून शेरवाडीच्या शैक्षणिक प्रगतीत उषा देशमुख यांचा मोठा वाटा राहिला आहे. निरोप घेताना विद्यार्थ्यांनी आपल्या लाडक्या शिक्षिकेबद्दलच्या भावना व्यक्त केल्या, ज्यामुळे उपस्थित सर्वांचेच डोळे पाणावले होते. आदर्श शिक्षक कसा असावा, याचा प्रत्यय या सोहळ्यातून गावकऱ्यांना आला.

### जनरल प्रॅक्टिशनर्स असो.ची सी.एम.ई. संपन्न

**अकोला :** येथील जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन (जी.पी.ए.) अकोलाच्या वतीने सदस्यांसाठी नुकतेच एका वैद्यकीय चर्चासत्राचे (सी.एम.ई.) आयोजन करण्यात आले होते. आर.एस. सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात प्रसिद्ध ऑन्कोलॉजिस्ट व बायपास सर्जन डॉ. अल्केश गुल्हाने आणि डॉ. पत्रलेखादास गुल्हाने यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. दोन्ही तज्ज्ञांनी स्लाईड्सच्या माध्यमातून अतिशय सोप्या भाषेत आधुनिक वैद्यकीय उपचार पद्धतींची माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. अल्केश गुल्हाने यांचे स्वागत जी.पी.ए. अध्यक्ष डॉ. सतीश उटांगळे यांनी, तर डॉ. पत्रलेखादास गुल्हाने यांचे स्वागत डॉ. भांगडिया यांनी केले.

## पातुर पंचायत समिति परिसरात दोन गटांत राडा

### कामांच्या वादातून फ्री-स्टाईल हाणामारी



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातुर, दि. ३० :** येथील पंचायत समितीच्या आवारात सोमवारी विकासकामांच्या मुद्यावरून दोन गटांमध्ये तीव्र संघर्ष झाला. शाब्दिक वादाचे पर्यवसान थेट हाणामारीत झाल्याने कार्यालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेमुळे शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पंचायत समिती अंतर्गत ग्रामीण भागातील काही विकासकामांच्या वाटपावरून गेल्या काही दिवसांपासून दोन गटांत धुसफूस सुरू होती. सोमवारी दुपारी या दोन्ही गटांतील व्यक्ती आमनेसामने आल्या आणि त्यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. वादाचे स्वरूप इतके गंभीर झाले की, दोन्ही बाजूंनी एकमेकांना मारहाण करण्यात आली. या गोंधळात एका व्यक्तीने हातात लाकडी दांडा घेऊन कार्यालयात प्रवेश केल्याने उपस्थित कर्मचाऱ्यांची एकच पळापळ झाली. संभाव्य धोका टाळण्यासाठी कर्मचाऱ्यांनी तातडीने कार्यालयाची दारे आतून बंद करून घेतली.

घटनेची माहिती मिळताच पातुर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक गजानन तडसे यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. घटनेच्या वेळी गटविकास अधिकारी सतीश नायसे हे कार्यालयात उपस्थित नव्हते. दरम्यान, शासकीय आवारात अशा प्रकारे राडा झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, पोलीस प्रशासन आणि वरिष्ठ अधिकारी याप्रकरणी काय भूमिका घेतात, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### शासकीय कामात अडथळा?

पंचायत समितीसारख्या संवेदनशील ठिकाणी दिवसाढवळ्या झालेल्या या राड्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. कामाच्या वादातून थेट मारहाणीपर्यंत प्रकरण गेल्याने यामागे नेमकी काय कारणे आहेत, याचा शोध पोलीस घेत आहेत. कोणाच्याही तक्रारीवरून अद्याप अधिकृत गुन्हा दाखल झाला नसला तरी, या राड्याची चर्चा तालुक्यात वाऱ्यासारखी पसरली आहे.

**उत्सव** | शेकडो वर्षांची गाडे ओढण्याची परंपरा कायम

# हर हर महादेवच्या जयघोषात ईचा-नागी येथील बारस यात्रा संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ३० :** वाशिम जिल्ह्यातील ब वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून ख्याती असलेल्या मंगरुळपीर तालुक्यातील ईचा-नागी येथील श्री क्षेत्र महादेव संस्थान येथे सोमवार, ३० मार्च रोजी बारस उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला. शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या शेंडीने गाडे ओढण्याचा थरार पाहण्यासाठी आणि महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी जिल्हाभरातून भाविकांनी मोठी गर्दी केली होती. अवकाळी पावसाने हजेरी लावूनही भाविकांच्या उत्साहात तसूभरही कमतरता दिसून आली नाही.




ईचा-नागी येथील महादेवाच्या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे नवस फेडण्यासाठी शेंडीने गाडे ओढण्याची पुरातन प्रथा. श्रद्धेचा हा अनोखा अविष्कार पाहण्यासाठी मंदिर परिसरात जनसागर लोटला होता. यासोबतच यंदा ५१ क्विंटल महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. दुपारी १ वाजेपासून सुरू झालेला हा महाप्रसाद दिवसभर हजारो भाविकांनी ग्रहण केला. गॅस टंचाईचे सावट असतानाही स्वयंसेवकांनी पारंपरिक इंधनाचा वापर करून वेळेत प्रसाद तयार केला, ज्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. उत्सवादरम्यान अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने काही काळ व्यत्यय आला; मात्र येथील नवयुवक स्वयंसेवकांनी प्रसंगावधान राखत भाविकांची पर्यायी व्यवस्था केली. सुमारे १००० महिला व पुरुष स्वयंसेवकांनी अहोरात्र मेहनत घेतल्याने संपूर्ण सोहळा शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. पिण्याचे शुद्ध पाणी, बैठक व्यवस्था आणि स्वच्छतेवर संस्थानच्या वतीने विशेष भर देण्यात आला होता. या धार्मिक सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

### सेवेचा आदर्श अन् प्रसादाची मेजवानी

अवाढव्य ५१ क्विंटलचा महाप्रसाद तयार करण्यासाठी आणि त्याचे नियोजनबद्ध वाटप करण्यासाठी ईचा-नागी येथील स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. शिस्त, सेवाभाव आणि श्रद्धेचा त्रिवेणी संगम या यात्रेत पाहायला मिळाला. पाऊस असूनही भक्तांनी दर्शनासाठी आणि प्रसादासाठी लावलेल्या रांगा भाविकांची अतूट श्रद्धा अधोरेखित करत होत्या.

अजिंक्य भारत
# आपलं वाशिम
अकोला, मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com


## महत्त्वाचे

### भक्तराज महाराजांतर्फे महाप्रसाद व जलवाटप



**मानोरा :** तालुक्यातील श्रीक्षेत्र आसोला येथे श्री सोहमनाथ महाराज यांची भव्य बारस यात्रा मोठ्या उत्साहात पार पडली. या निमित्ताने जमलेल्या हजारो भाविकांची उन्हाच्या तीव्रतेत गैरसोय होऊ नये, यासाठी पोहरादेवी येथील भक्तराज महाराज व त्यांच्या मित्र मंडळाच्या वतीने राबविण्यात आलेल्या सेवाभावी उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा या भावनेतून भक्तराज महाराज यांनी यात्रेनिमित्त महाप्रसाद आणि पिण्याच्या पाण्याची विशेष सोय केली होती. यामध्ये भाविकांना खिचडी, बुंदीचा प्रसाद आणि थंड पाण्याच्या बाटल्यांचे मोफत वाटप करण्यात आले. बाहेरील जिल्ह्यांतून आलेल्या हजारो भाविकांनी या सुविधेचा लाभ घेतला.

### राधादेवी बाकलीवाल विद्यालयात चिपको आंदोलन

**वाशिम :** जंगलतोड थांबविणे आाणि पर्यावरणाचे संरक्षण करणे याचा संदेश देण्यासाठी सामाजिक वनीकरण विभाग वाशिम व श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्या निकेतन मधील हरित सेनेच्या वतीने प्रतिकात्मक चिपको आंदोलन करण्यात आले. सामानिक वनीकरण विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक धनंजय वानखेडे हे होते तर यावेळी सामाजिक वनीकरण विभागाचे वनपाल एम.बी. बेले, वनरक्षक बी. सी. वानखेडे, अनिल लेमले तसेच हरित सेनेचे प्रभारी विनायक उज्जैनकर हे होते. या उपक्रमाअंतर्गत हरित सेनेच्या विद्यार्थी सैनिकांनी परिसरातील वृक्षांना मिठी मारुन जंगलतोड थांबवणे आणि पर्यावरण संरक्षण करणे याचा प्रतिकात्मक संदेश दिला. या कार्यक्रमात बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक धनंजय वानखेडे म्हणाले की, १९७०च्या दशकात उत्तराखंडमध्ये झाडांना वाचविण्यासाठी ग्रामीण महिलांनी सुंदरलाल बहुगुणा व गौरा देवी यांच्या ननेतृत्वाखाली झाडांना मिठी मारून चिपको आंदोलन केले होते. त्याच धर्तीवर आजच्या काळातही वृक्षसंवर्धनाचा संदेश देण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाच्या व श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने प्रतिकात्मक चिपको आंदोलन करण्यात आले.


# मृतांचा आकडा १६ वर : १० जण आजही खाटेवर

## पांगरी महादेव गावाला किडनीचा विळखा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३० :** वाशिम जिल्ह्यातील शेलूबाजार परिसरातील पांगरी महादेव या गावात किडनीच्या आजाराने पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून किडनीच्या विकाराशी झुंज देणारे गणेश साबळे यांचे नुकतेच निधन झाले. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून, प्रशासनाच्या उदासीनतेबद्दल ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. पांगरी महादेवमध्ये आतापर्यंत या गंभीर आजाराने १६ जणांचा बळी घेतला आहे, तरीही आरोग्य विभाग याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचे चित्र आहे.

गणेश साबळे हे गेल्या ७ ते ८ वर्षांपासून किडनीच्या आजाराने त्रस्त होते. अकोला येथे त्यांचे नियमित डायलिसिस उपचार सुरू होते. प्रकृती खालावलेली असतानाही त्यांनी जिद्दीने



आयुष्याचा संघर्ष सुरू ठेवला होता. मात्र, अखेर त्यांची ही झुंज अपयशी ठरली. त्यांच्या निधनामुळे साबळे कुटुंबाचा आधार हरपला असून, गावातील इतर रुग्णांमध्येही आता भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

पांगरी महादेव येथील जलस्रोतांमध्ये फ्लोराईड आणि कॅल्शियमचे प्रमाण प्रमाणाबाहेर असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. ''आमच्या गावातील पाणी पिण्यायोग्य राहिलेले नाही. हेच दूषित पाणी आमच्या किडन्या निकामी करत आहे,'' असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. धक्कादायक बाब म्हणजे, सध्या गावात १० ते १२ नागरिक विविध रुग्णालयांत उपचार घेत असून, दोघांचे डायलिसिस सुरू आहे. घराघरात आजारपणामुळे आर्थिक ओढाताण सुरू असून, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत.

एकीकडे गावकरी मृत्यूच्या छायेत वावरत असताना, दुसरीकडे ग्रामीण पाणीपुरवठा आणि आरोग्य विभाग मात्र हात झटकण्याचे काम करत आहे. काही महिन्यांपूर्वी येथील पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले होते. या तपासणीचा अहवाल निरंक आला असून, पाणी पिण्यास योग्य असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. ''जर पाणी शुद्ध आहे, तर मग गावात एकामागून एक मृत्यू का होत आहेत? तरुणांनाच हा आजार का जडतोय?'' असा सवाल ग्रामसभा समितीचे अध्यक्ष विष्णू मंजुळकर यांनी उपस्थित केला आहे.

गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, वारंवार तक्रारी करूनही वरिष्ठ अधिकारी याकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. केवळ पाण्याचे नमुने नेऊन औपचारिकता पूर्ण केली जाते. मात्र, या आजाराचे नेमके मूळ काय आहे, याचा शोध घेण्यासाठी विशेष वैद्यकीय पथक गावात धाडण्यात आलेले नाही. प्रशासकीय अनास्थेमुळे पांगरी महादेव गाव आता किडनीग्रस्तांचे गाव म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.

### तातडीच्या उपाययोजनांची गरज

गावातील वाढती मृत्यूसंख्या पाहता, शासनाने तातडीने येथे शुद्ध पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणे आवश्यक आहे. तसेच, तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून संपूर्ण गावाची आरोग्य तपासणी करून रुग्णांना मोफत उपचार उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरत आहे. अन्यथा, हा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## अवैध प्रवासी वाहतुकीचा सुळसुळाट

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**शिरपूर जैन, दि. ३० :** शिरपूर शहरात सध्या विनापरवाना आणि अवैध प्रवासी वाहतुकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले असून, यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे. बोलेरो, पिकअप आणि चक्क ट्रॅक्टरमधूनही सर्रासपणे प्रवाशांची ने-आण केली जात असल्याचे चित्र सध्या शहरात पाहायला मिळत आहे.

### प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

नियम धाब्यावर बसवून सुरू असलेल्या या वाहतुकीमुळे कोणत्याही क्षणी मोठ्या अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे, वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागाच्या डोळ्यांदेखत हे प्रकार घडत असतानाही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. ''हे केवळ दुर्लक्ष आहे की अर्थपूर्ण अभय?'' असा सवाल आता सामान्य जनतेतून उपस्थित केला जात आहे.

क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरून होणारी ही वाहतूक भविष्यात एखाद्या मोठ्या दुर्घटनेला निमंत्रण देऊ शकते. अशा वेळी होणाऱ्या जीवितहानीला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. तरी परिवहन विभाग आणि पोलीस प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन अवैध वाहतुकीवर कायदेशीर लगाम लावावा, अशी मागणी जोर धरत आहे.


## जिल्हास्तरीय लोकशाही दिन ६ एप्रिलला

**वाशिम:** सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे आणि निवेदनांचे प्रभावी निराकरण करण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जातो. त्या अनुषंगाने एप्रिल महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, ६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात पार पडणार आहे.

या लोकशाही दिनात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी आपली प्रकरणे किमान १५ दिवस आधी दोन प्रतींमध्ये विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, ज्या तक्रारी यापूर्वी तालुका किंवा नगरपालिका स्तरावरील लोकशाही दिनात मांडल्या आहेत, अशाच तक्रारी येथे स्वीकारल्या जातील. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपल्या प्रलंबित प्रश्नांचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; परिचित तरुणाचे संतापजनक कृत्य

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा, दि. ३० :** माणुसकीला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना वाशिम जिल्ह्याच्या कारंजा लाड तालुक्यात समोर आली आहे. एका १९ वर्षीय तरुणाने १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिच्याच घराच्या अंगणात अत्याचार केल्याची खळबळजनक घटना २८ मार्चच्या रात्री घडली. याप्रकरणी कारंजा ग्रामीण पोलिसांनी वेगाने चक्रे फिरवून आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शेजारील गावातील १९ वर्षीय आरोपी तरुण हा पीडित मुलीच्या परिचयाचा होता. २८ मार्चच्या रात्री तो पीडितेला भेटण्याच्या बहाण्याने कारंजा तालुक्यातील खानापूर येथे आला होता. रात्री ११ वाजेच्या सुमारास मुलीचे वडील आणि भाऊ झोपेतून जागे झाले असता, त्यांना मुलगी खोलीत दिसली नाही. संशय आल्याने त्यांनी घराच्या परिसरात शोध घेतला असता, घराच्या अंगणातच मुलगी आणि तो तरुण आक्षेपार्ह स्थितीत मिळून आले.

मुलीच्या वडिलांनी आरडाओरडा करताच आरोपी तरुणाने तिथून अंधाराचा फायदा घेत पळ काढला. घडल्या प्रकारामुळे हादरलेल्या पीडितेने वडिलांना आपल्यावर बळजबरीने अत्याचार झाल्याचे सांगितले. या माहितीने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. वडिलांनी तातडीने कारंजा ग्रामीण पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदवली.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने पथके रवाना केली आणि आरोपीला त्याच्या गावातून ताब्यात घेतले. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि पोक्सो कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हळदीच्या उत्पादनातून गावाने साधली पिवळी क्रांती

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३० :** जिल्ह्यातील खरोळा गावातील शेतकऱ्यांनी पारंपरिक कापूस, सोयाबीन आणि तुरीच्या फेऱ्यातून बाहेर पडत हळद पिकाच्या जोरावर आपल्या नशिबाची दिशा बदलली आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि जिद्दीच्या जोरावर या गावाने एकरी ५० क्विंटलपर्यंत हळदीचे विक्रमी उत्पादन घेऊन जिल्ह्यासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.

खरोळा येथील प्रगतिशील शेतकरी आणि कृषी तज्ज्ञ राजेश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी शिवाजी वारकड यांनी सुधारित वाण, ठिबक सिंचन आणि शास्त्रीय व्यवस्थापनाचा वापर केला. परिणामी, त्यांनी एकरी ५० क्विंटल हळदीचे विक्रमी उत्पादन घेण्याची किमया साधली आहे. याच तंत्राचा



> योग्य हवामान, सेलम व वाहाणी सारखे सुधारित वाण आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे हळद उत्पादन ३५ ते ५० क्विंटलपर्यंत पोहोचत आहे. यामुळे शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा नफा मिळणे आता शक्य झाले आहे.''
>
> **- राजेश ठाकरे,** कृषी तज्ञ तथा हळद उत्पादक

वापर करून गावातील इतर १०० एकर क्षेत्रावर शेतकऱ्यांनी २५ ते ३० क्विंटलपर्यंत सरासरी उत्पादन मिळवले आहे. आज, ३० मार्च रोजी या विक्रमी हळद उत्पादनाची पाहणी करण्यासाठी शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशीम कृषी उत्पन्न बाजार समितीचे ज्येष्ठ खरेदीदार व अडते गिरीधरलाल सारडा होते. यावेळी तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी उपस्थित राहून या यशस्वी प्रयोगाचे प्रात्यक्षिक पाहिले.

## उष्णलहरीमुळे पशुधनाला धोका; बचावासाठी तातडीच्या उपाययोजना आवश्यक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३० :** जागतिक तापमान वाढीच्या पार्श्वभूमीवर यावर्षी उन्हाळ्यातील तापमान नेहमीच्या सरासरीपेक्षा किमान १ ते २ अंश सेल्सियसने वाढले असून, याचा थेट परिणाम पशुधन व कुक्कुट पक्ष्यांवर होत आहे. वाढत्या उष्णतेमुळे उष्माघात (हीट स्ट्रोक) व उष्णलहरींचा धोका निर्माण झाला असून, पशुधन आजारी पडणे किंवा दगावण्याची शक्यता वाढली आहे.




तज्ज्ञांच्या माहितीनुसार, सलग तीन दिवस किंवा त्यापेक्षा जास्त काळ सरासरीपेक्षा अधिक तापमान राहिल्यास उष्णलहरीची स्थिती निर्माण होते. अशा परिस्थितीत पशुधनाच्या शरीरातील पाणी व क्षारांचे प्रमाण कमी होऊन निर्जलीकरण (डिहायड्रेशन) होते. परिणामी चारा व खाद्य घेण्याचे प्रमाण घटते व उत्पादकतेवर विपरीत परिणाम होतो.

उष्णलहरीपासून बचावासाठी पशुधनाला अचानक उष्ण वातावरणात नेणे टाळावे. जनावरांना केवळ दिवसाच्या थंड वेळेत चरायला सोडावे तसेच उष्ण काळात सावलीत किंवा हवेशीर निवाऱ्यात ठेवावे. वाढत्या तापमानाशी जुळवून घेण्यासाठी पशुधनाला हळूहळू सवय लावणे आवश्यक आहे. लहान वासरे, करडे, काळ्या किंवा गडद रंगाचे प्राणी, श्वसनाच्या आजाराने ग्रस्त जनावरे, वराह व दुभती जनावरे तसेच कुक्कुट पक्षी यांना उष्माघाताचा विशेष धोका असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. उष्माघाताची लक्षणे ओळखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामध्ये धाप लागणे, श्वासाचा वेग वाढणे, पाणी जास्त प्रमाणात पिणे, चारा कमी खाणे, सुस्ती येणे, लाळ गाळणे, नाकपुड्या कोरड्या पडणे व शरीरातील पाणी-क्षारांचे प्रमाण कमी होणे अशी लक्षणे दिसून येतात.

अशी लक्षणे आढळल्यास तात्काळ जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करून घ्यावेत, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. तुषार बावणे यांनी केले आहे.

## जलसंकटाचे सावट | आठवड्याभरात पाणीसाठ्यात २.८० टक्क्यांची घट

# ७७ प्रकल्पांत २७ टक्के साठा शिल्लक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ३० : विदर्भातील रणरणत्या उन्हाची चाहूल मार्च महिन्याच्या सुरुवातीपासूनच लागली असून, वाशिम जिल्ह्याला यंदा भीषण पाणीटंचाईचे चटके बसण्याची चिन्हे आहेत. वाढत्या तापमानामुळे जिल्ह्यातील धरणे आणि जलप्रकल्पांमधील पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत असल्याने पाणीपातळीत मोठी घट नोंदवण्यात आली आहे. अवघ्या सात दिवसांत जिल्ह्यातील पाणीसाठा सुमारे अडीच टक्क्यांहून अधिक खाली आल्याने प्रशासनासमोर चिंतेचे ढग जमा झाले आहेत.**

लघु पाटबंधारे विभागाच्या अधिकृत नोंदीनुसार, १९ मार्च रोजी जिल्ह्यातील एकूण ७७ प्रकल्पांमध्ये २९.८७ टक्के जलसाठा उपलब्ध होता. मात्र, उन्हाची तीव्रता वाढताच अवघ्या आठवडाभरात, म्हणजेच २६ मार्चपर्यंत हा साठा घटून २७.०७ टक्क्यांवर आला आहे.



एका आठवड्यात झालेली ही सुमारे २.८० टक्क्यांची घट आगामी एप्रिल आणि मे महिन्यातील भीषणतेची नांदी मानली जात आहे. जिल्ह्यात मोठे प्रकल्प नसून, केवळ २ मध्यम आणि ७५ लघु प्रकल्पांवर जिल्ह्याची तहान अवलंबून आहे. यातील ५ पेक्षा अधिक प्रकल्पांमध्ये आता मृत साठा उरण्याची भीती निर्माण झाली आहे.

### शेती आणि पशुधनासमोर प्रश्नचिन्ह

जिल्ह्यातील लघु प्रकल्पांच्या परिसरात रब्बी हंगामातील पिके आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. ज्या प्रकल्पांमध्ये अत्यल्प साठा शिल्लक आहे, तेथून सिंचनासाठी पाणी उपसा करण्यावर निर्बंध येण्याची शक्यता आहे. पाणीटंचाईचे हे संकट केवळ मानवापुरते मर्यादित नसून, वन्यजीव आणि पशुधनालाही पाण्यासाठी भटकंती करावी लागणार आहे.

### नळ योजनांना फटका; पाच दिवसांआड पाणी

जलसाठ्यातील या घटीचा सर्वाधिक फटका नागरी भागातील पाणीपुरवठा योजनांना बसत आहे. वाशिम शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या एकबुर्जी प्रकल्पाची स्थिती चिंताजनक होत असून, सध्या शहरात ५ ते ७ दिवसांआड पाणीपुरवठा केला जात आहे. मालेगाव तालुक्यातील सोनल प्रकल्पाची पातळीही खालावत आहे. पाणीपुरवठ्याचे हे विस्कळीत वेळापत्रक पाहता, नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. अनेक गावांमध्ये आधीच नळ योजनांच्या तक्रारी वाढल्या असून, विहिरींचा जलस्तर खाली गेल्याने हातपंपही कोरडे पडू लागले आहेत. मार्च महिन्यातच जर प्रकल्पांची ही अवस्था असेल, तर मे महिन्यात ग्रामीण भागात टँकरशिवाय पर्याय उरणार नाही. विशेषतः महिलांना पाण्यासाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागण्याची भीती आहे.

**प्रशासनाकडून ॲक्शन प्लॅनची अपेक्षा**

सध्याच्या परिस्थितीत पाण्याचा काटकसरीने वापर करणे हाच एकमेव पर्याय उरला आहे. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि जिल्हा प्रशासनाने संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन कृती आराखडा अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. जलवाहिनीतील गळती रोखणे, अनधिकृत पाणी उपसा थांबवणे आणि टँकरची आगाऊ सोय करणे यावर विशेष भर देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. एकूणच, मार्चच्या अखेरीस जिल्ह्यातील पाणीसाठ्याने तळ गाठायला सुरुवात केल्यामुळे यंदाचा उन्हाळा वाशिमकरांसाठी अग्निपरीक्षा पाहणारा ठरणार, हे स्पष्ट झाले आहे.

## शेंडीने गाडे ओढण्याची परंपरा कायम; लाखो भाविकांनी घेतला दर्शनाचा लाभ



**मानोरा :** श्रीक्षेत्र आसोला येथे महान तपस्वी परमहंस श्री सोहंमनाथ महाराजांच्या समाधी सोहळा व बारस यात्रेनिमित्त शनिवारी भाविकांचा जनसागर उसळला. अनेक वर्षांपासूनची शेंडीने गाडे ओढून नवस फेडण्याची परंपरा यावर्षीही श्रद्धेने पार पडली. ३० मार्च रोजी झालेल्या या मुख्य सोहळ्यात लाखो भाविकांनी सोहंमनाथांच्या समाधीचे दर्शन घेऊन जयघोष केला. बारस निमित्त सकाळी ६ वाजता पुजारी पुरुषोत्तम महाराज यांच्या उपस्थितीत गाढे ओढणे कार्यक्रमाला सुरुवात झाली. शेकडो भाविकांनी यामध्ये नाव नोंदणी करून शेंडीने गाढे ओढत आपला पुरणपोळीचा नवस फेडला. याच दिवशी ह.भ.प. बालयोगी गोपाल महाराज यांच्या प्रवचनाने श्रीमद् भागवत कथेची सांगता झाली. सप्ताहात कीर्तन, प्रबोधन व अन्य धार्मिक कार्यक्रम पार पडले. याप्रसंगी आमदार सईताई डहाके व आमदार बाबुसिंग महाराज यांनीही भेट देऊन दर्शन घेतले. यात्रेत येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असल्याने अनेकांनी गावाबाहेरील शेतात व झाडांखाली स्वयंपाक करून आपला नवस पूर्ण केला. सायंकाळी ५ वाजता महाप्रसाद वाटप करण्यात आले. यात्रोत्सवात भाविकांच्या सुविधेसाठी आरोग्य विभागाने शिबिर राबवले, तर महावितरणने वीज पुरवठा सुरळीत ठेवला. अनेक दानशूर व्यक्तींनी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला. पोलीस निरीक्षक नयना पोहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याने वाहतूक व्यवस्था सुरळीत राहिली. स्वयंसेवक व भजनी मंडळींच्या सहकार्याने हा सोहळा उत्साहात पार पडला.

## महत्त्वाचे

### पंकज जायले पर्पल फेअरमध्ये सन्मानित

**अकोला :** जिल्ह्यातील प्रसिद्ध दिव्यांग सेवेकरी व सामाजिक कार्यकर्ते पंकज जायले यांना शासनाच्या वतीने आयोजित पर्पल फेअर कार्यक्रमात नुकतेच सन्मानित करण्यात आले. स्थानिक सामाजिक न्याय भवनात आयोजित या दिव्यांग सक्षमीकरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम होत्या. याप्रसंगी दिव्यांग सक्षमीकरण आयुक्त डॉ. तुषार जाधव, नागपूर केंद्राचे संचालक प्रफुल्ल शिंदे, आणि सुनील बोगीलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. पंकज जायले यांनी अनेक वर्षांपासून विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून दिव्यांगांच्या पुनर्वसनासाठी मोलाचे कार्य केले आहे. हा सन्मान मी दिव्यांग वर्गाच्या सेवेला समर्पित करत असून, यामुळे समाजसेवेची नवी ऊर्जा मिळाली आहे, असे भावोद्गार जायले यांनी सत्काराला उत्तर देताना व्यक्त केले. या कार्यक्रमाला सामाजिक न्याय विभाग व जिल्हा परिषदेचे वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सैनिक शेतकरी वेलफेअर फाऊंडेशनचा जिल्हास्तरीय मेळावा


**मुर्तिजापूर :** सैनिक शेतकरी वेलफेअर फाऊंडेशनच्या वतीने अकोला जिल्हा व मुर्तिजापूर तालुक्याची संघटनात्मक बांधणी पूर्ण झाली असून, यानिमित्त उद्या, ३१ मार्च रोजी सकाळी ११:३० वाजता भव्य जिल्हास्तरीय मेळावा आणि जिल्हा ओपनिंग उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला तालुक्यातील होतकरू महिला आणि कर्तृत्ववान पुरुष वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. या भव्य सोहळ्याला फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मनोजकुमार डांगे, निलेश निकम आणि राजेश सतई यांची प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लाभणार आहे. संस्थेच्या आगामी कार्याची दिशा, नियोजित सेवांचे स्वरूप आणि कोअर कमिटीसाठी असलेल्या विशेष फायदेशीर योजनांची घोषणा या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. जिल्हाध्यक्ष दीपक दांदळे यांच्या नेतृत्वाखाली या मेळाव्याचे सूक्ष्म नियोजन सुरू असून, हा सोहळा संघटनात्मक दृष्टीने मैलाचा दगड ठरणार आहे. फाऊंडेशनच्या माध्यमातून समाजसेवेच्या विविध संधी आणि सभासदांच्या उत्कर्षासाठी राबवल्या जाणाऱ्या योजनांची माहिती यावेळी दिली जाईल. तरी विभाग प्रमुख, केंद्र प्रमुख आणि कोअर कमिटीच्या सर्व सदस्यांनी आपल्या उज्वल भविष्यासाठी आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी या मेळाव्याला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका अध्यक्ष अनिल डाहेलकर आणि सुनीता दांदळे यांनी केले आहे.

## बनावट आधारकार्डचा बोगस खेळ फसला

# बार्शीटाकळीत १७ वर्षीय मुलीचा बालविवाह रोखला!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** आधारकार्डवर वयाची फेरफार करून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विवाह २४ वर्षीय तरुणासोबत लावून देण्याचा धक्कादायक प्रकार बार्शीटाकळी पोलीस स्टेशनच्या हद्दीत उघडकीस आला. जिल्हा महिला व बालविकास कार्यालय, चाईल्डलाईन आणि ॲसेस टू जस्टीस आय.एस.डब्ल्यू.एस. अकोला टीमच्या सतर्कतेमुळे हा बालविवाह रोखण्यात यश आले असून, एका बालिकेचे भविष्य उद्ध्वस्त होण्यापासून वाचले आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, संबंधित मुलीचे वय कागदोपत्री १७ वर्षे असताना, तिचे बनावट आधारकार्ड तयार करून वय वाढवण्यात आले होते. विशेष म्हणजे, ही मुलगी शिक्षणापासून पूर्णपणे वंचित असून वयाची १७ वर्षे उलटूनही तिचे नाव शाळेत दाखल करण्यात आले नव्हते. विवाहाची तयारी सुरू असतानाच



ॲसेस टू जस्टीस आणि चाईल्डलाईनच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पथकाने तातडीने मुलीच्या पालकांना ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून त्यांचे समुपदेशन केले. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार हा गंभीर गुन्हा असल्याचे स्पष्ट करत विवाहाचे शारीरिक व मानसिक दुष्परिणाम पालकांना समजावून सांगण्यात आले.

हे प्रकरण अकोला येथील बाल कल्याण समितीसमोर मांडण्यात आले. समितीने दोन्ही पक्षांची बैठक घेऊन कडक इशारा दिला आणि मुलगी १८ वर्षांची होईपर्यंत तिचे लग्न लावणार नाही, असे कायदेशीर हमीपत्र पालकांकडून लिहून घेतले. तसेच मुलीला तात्काळ शाळेत दाखल करण्याचे निर्देशही दिले. ही यशस्वी कारवाई बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा ॲड. अनिता गुरव, सदस्य राजेश देशमुख, डॉ. विनय दांदळे, ॲड. शीला तोष्णीवाल, प्रांजली जयस्वाल, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडुलकर, चाईल्डलाईन समन्वयक हर्षाली गजभिये, जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे आणि कम्युनिटी सोशल वर्कर पूजा मनवर यांनी केली.

### बनावट कागदपत्रांचा गंभीर गुन्हा

मुलीचे वय वाढवण्यासाठी बनावट आधारकार्ड तयार करणे हा फसवणुकीचा गंभीर प्रकार आहे. या प्रकरणात ग्रामपंचायत सचिव, अंगणवाडी सेविका आणि आशा वर्कर यांच्या उपस्थितीत पालकांकडून हमीपत्र घेण्यात आले. बालविवाह रोखणाऱ्या या पथकाच्या धाडसी कारवाईचे संपूर्ण जिल्ह्यात कौतुक होत असून, मुलीला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## अकोट बसस्थानक चोरट्यांचा अड्डा; महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत लंपास

### शहर पोलिसांसमोर गुन्हेगारांचे मोठे आव्हान

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. ३० :** येथील एसटी बसस्थानक सध्या चोरट्यांसाठी सॉफ्ट टार्गेट ठरत असून, एकामागून एक चोरीच्या घटनांमुळे प्रवाशांमध्ये मोठी घबराट पसरली आहे. सावरगाव दाभाडे येथील एका महिलेच्या गळ्यातील ३६ ग्रॅम सोन्याची पोत अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणाने अकोट शहर पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, चोरट्यांनी पोलिसांना एकप्रकारे खुले आव्हान दिले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सावरगाव दाभाडे येथील तक्रारदार महिला अकोट-जळगाव जामोद बसमध्ये चढत असताना ही घटना घडली. बसमध्ये चढताना होणाऱ्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याच्या पोतीवर डल्ला मारला. याप्रकरणी पीडित महिलेने अकोट शहर पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली आहे.

अकोट बसस्थानकावर महिलांच्या गळ्यातील दागिने किंवा पर्समधील ऐवज चोरीला जाण्याच्या घटनांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाहीये. यापूर्वी खंडाळा येथील एका महिलेचे सोने चोरीला गेले होते, तर त्यानंतर अकोलखेड येथील अंगणवाडी सेविकेलाही अशाच प्रकारचा फटका बसला होता. या सर्व प्रकरणांची नोंद पोलीस दप्तरी असली, तरी अद्याप ठोस सुगावा लागलेला नाही. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे पोलिसांचा धाक उरला आहे की नाही, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारत आहेत. या गुन्ह्यांचा मुळापासून तपास करून चोरट्यांच्या मुसक्या आवळण्याची मागणी आता जोर धरत आहे.

## खेट्रीचे सरपंच जहूर खान पदावर कायम; अपर आयुक्तांचे फेरचौकशीचे आदेश

### अपात्रतेची अफवा ठरली फोल; विरोधकांचे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा दावा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातुर, दि. ३० :** पातुर तालुक्यातील खेट्री ग्रामपंचायतीचे सरपंच जहूर खान यांच्यावरील अपहाराच्या आरोपाप्रकरणी अद्याप कोणताही अंतिम निर्णय झाला नसून, ते आपल्या पदावर कायम आहेत. अमरावतीच्या अपर आयुक्तांनी या प्रकरणाची सखोल फेरचौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सीईओ) दिले आहेत.

खेट्रीचे सरपंच जहूर खान यांनी गावातील विकासकामे न करता केवळ कागदोपत्री लाखो रुपयांचे साहित्य खरेदी केल्याचा आरोप उपसरपंचांसह पाच सदस्यांनी २०२३ मध्ये केला होता. हे प्रकरण विभागीय आयुक्त न्यायालयात सुरू असताना, काही महिन्यांपूर्वी उपसरपंच व एका सदस्याने सरपंचांनी पदाचा दुरुपयोग केला नाही,अशी लेखी भूमिका मांडली होती. ९ मार्च २०२६ रोजी या प्रकरणावर सुनावणी झाली. अपर आयुक्तांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सीईओ स्तरावर पुन्हा चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, सरपंच जहूर खान यांना अपात्र करण्यात आल्याची खोटी अफवा विरोधकांकडून परिसरात पसरवण्यात आली होती. मात्र, अपर आयुक्तांच्या आदेशात कुठेही अपात्रतेचा उल्लेख नसल्याने या अफवा फोल ठरल्या आहेत. सरपंचांच्या वतीने ॲड. संतोष रहाटे यांनी बाजू मांडली.

> अपर आयुक्तांनी मला अपात्र केलेले नाही. विरोधक केवळ राजकीय द्वेषापोटी माझ्याबद्दल खोटी माहिती पसरवत आहेत. माझ्यावरील सर्व आरोप बिनबुडाचे असून, सत्य परेशान होऊ शकते, पण पराजित नाही याचा मला विश्वास आहे.
> **- जहूर खान,** सरपंच, खेट्री



## बाबासाहेबांच्या न्यायालयीन लढ्यावर होणार सखोल संशोधन

### जामनिक यांच्या संकल्पनेची बार्टीकडून दखल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. ३० :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्र आणि तत्कालीन बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्ये चालवलेल्या ऐतिहासिक न्यायालयीन प्रकरणांवर आता सखोल संशोधन होणार आहे. अकोला येथील युवा विधी अभ्यासक नितीन साहेबराव जामनिक यांनी मांडलेल्या प्रस्तावाची पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ने सकारात्मक दखल घेतली आहे. आगामी काळात विविध विद्यापीठांच्या माध्यमातून हे संशोधन प्रकल्प राबविण्याचे बार्टीने प्रस्तावित केले आहे.

नितीन जामनिक यांनी २३ जानेवारी २०२६ रोजी बार्टीकडे एका निवेदनाद्वारे महत्त्वपूर्ण मागणी केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लढवलेल्या विविध न्यायालयीन प्रकरणांचे संकलन करून ते साहित्य तरुण वकील आणि संशोधकांसाठी उपलब्ध करून देण्यात यावे, असा हा प्रस्ताव होता. या विषयाचे गांभीर्य आणि महत्त्व ओळखून बार्टीच्या संशोधन विभाग प्रमुख शुभांगी पाटील यांनी हा विषय अत्यंत अभ्यासनीय असल्याचे मान्य केले.

या अभिनव संकल्पनेबद्दल बार्टीने नितीन जामनिक यांचे पत्राद्वारे आभार मानले असून, या विषयाचा समावेश भावी संशोधन प्रकल्पांत करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या संशोधनामुळे कायदे क्षेत्रातील नवीन पिढीला बाबासाहेबांच्या प्रगल्भ कायदेविषयक दृष्टिकोनाचा आणि त्यांच्या न्यायालयीन संघर्षाचा सखोल अभ्यास करण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. जामनिक यांच्या या यशस्वी पाठपुराव्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रेला भाविकांचा प्रतिसाद

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अडगाव बु., दि. ३० :** स्थानिक विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने अडगाव येथे रामनवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीराम मूर्तीच्या पूजनाने झाली. जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष अनिल निमकर्डे, उपाध्यक्ष राजेश बागडी, सचिव प्रफुल्ल देशमुख आणि सहसचिव उमेश राखोंडे यांच्या संकल्पनेतून आयोजित या सोहळ्यात रामभक्त वासुदेव तुंबडे यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. याप्रसंगी माजी सरपंच अशोक घाटे, माजी सभापती गोपाल कोल्हे, पोलीस पाटील हितेश हागे, गुलाब अवचार, छत्रपती प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंकज देशमुख, गणेश बुटे, श्याम ताठे, प्रवीण राजनकर, गणेश बंड आणि अभिजित ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती.



श्रीराम जन्मोत्सवानिमित्त निघालेली शोभायात्रा स्थानिक बालाजी मंदिरापासून सुरू झाली. वाद्यांच्या गजरात आणि जय श्रीरामच्या जयघोषात ही यात्रा गावातील प्रमुख मार्गावरून मार्गस्थ झाली. ठिकठिकाणी ग्रामस्थांनी श्रीरामाच्या मूर्तीचे दर्शन व पूजन केले. शोभायात्रेचा समारोप गांधी चौकात करण्यात आला. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी शुभम कौठकार, अमर हरणे, सचिन उगले, अक्षय राखोंडे, अक्षय मानकर, श्रीकांत बहाळ, प्रणव सदाफळे, रोहित इंगळे, अनंता शिंदे, सोपान रोहनकार, मयूर निमकर्डे, गजानन राऊत, विक्की रोहनकार, प्रज्वल ढोकणे, प्रफुल्ल चव्हाण, अक्षय वाघमारे, संघर्ष बहाकर आणि अभि सदार यांनी अथक परिश्रम घेतले.

## दोनद खुर्द येथे आसरा देवी यात्रेचा उत्साह; धार्मिक सोहळ्याला भाविकांची मांदियाळी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**बार्शीटाकळी, दि. ३० :** तालुक्यातील मौजे दोनद खुर्द येथे ग्रामदैवत आसरा देवी मातेच्या वार्षिक यात्रेला २९ मार्चपासून मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. पारंपरिक श्रद्धेचा वारसा जपत आयोजित करण्यात आलेल्या या यात्रेत भाविकांची मोठी गर्दी होत असून, संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. ३१ मार्चपर्यंत चालणाऱ्या या त्रिदिवसीय सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळत आहे.




यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेली कीर्तन, भजन आणि भागवत प्रवचने आहेत. महाराष्ट्रातील नावाजलेले कीर्तनकार व भागवतकार आपल्या रसाळ वाणीतून भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शन करत आहेत. या आध्यात्मिक मेजवानीचा लाभ घेण्यासाठी केवळ दोनद खुर्दच नव्हे, तर लगतच्या पंचक्रोशीतील आणि जिल्ह्याबाहेरील भाविकांनी मोठी गर्दी केली आहे.

यात्रेच्या यशस्वी नियोजनाबाबत माहिती देताना सरपंच सागर पाटील कावरे यांनी सांगितले की, आसरा देवी मातेच्या यात्रेला मोठी ऐतिहासिक परंपरा आहे. भाविकांनी या पवित्र काळात आयोजित सर्व धार्मिक कार्यक्रमांचा शांततेत लाभ घ्यावा आणि देवीचा आशीर्वाद घ्यावा.

ग्रामपंचायतीने यात्रेकरूंच्या सुविधेसाठी विशेष व्यवस्था केली असून स्वच्छतेवर भर दिला आहे. दरम्यान, यात्रेचे पावित्र्य जपण्यासाठी गावात कडक शिस्त पाळली जात आहे. कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन किंवा शांतता भंग करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याचा इशारा सरपंच आणि आयोजकांनी दिला आहे. सर्व भाविकांनी सामाजिक सौहार्द राखून उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## क्षेत्रभेट | शालेय विद्यार्थ्यांनी अनुभवली पोलिसांची शिस्त

# बालगुन्हेगारी अन् सायबर क्राईमपासून बचावाचे घेतले धडे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**हिवरखेड, दि. ३० :** विद्यार्थ्यांमध्ये कायद्याची जाण निर्माण व्हावी आणि बालगुन्हेगारीपासून त्यांनी स्वतःचा बचाव कसा करावा, या उदात्त हेतूने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अकोली रूप येथील इयत्ता ४ थी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांनी हिवरखेड पोलीस स्टेशनला नुकतीच क्षेत्रभेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी पोलिसांचे कार्य, शस्त्रे आणि गुन्हे तपासाची पद्धत प्रत्यक्ष अनुभवली.

हिवरखेडचे ठाणेदार गजानन राठोड आणि पीएसआय श्रीराम जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाढती बालगुन्हेगारी, सायबर फ्रॉड आणि पोलिसांच्या नावाने येणारे बनावट कॉल्स यापासून सावध राहण्याचे आवाहन केले. सायबर गुन्हेगार कशी फसवणूक करतात




आणि अशा प्रसंगी काय खबरदारी घ्यावी, याचे प्रात्यक्षिकही विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना पोलीस अधिकाऱ्यांनी अत्यंत सोप्या भाषेत उत्तरे दिली.

विशेषतः विद्यार्थिनींसाठी दामिनी पथकाच्या महिला अधिकाऱ्यांनी विशेष सत्र घेतले. गुड टच आणि बॅड टच कसा ओळखावा, संकटाच्या वेळी कोणाशी संपर्क साधावा आणि स्वतःचे संरक्षण कसे करावे, यावर मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.

या भेटीत विद्यार्थ्यांना वायरलेस यंत्रणेचे कार्य, गुन्ह्यांची नोंद करणारी क्राईम डायरी, जप्त केलेला मुद्देमाल आणि अपघातातील वाहनांची विल्हेवाट कशी लावली जाते, याची सविस्तर माहिती देण्यात आली. या अनुभवानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून, अशा प्रकारचे ज्ञान आम्हाला पहिल्यांदाच मिळाले असून, आम्ही अभ्यासात प्रगती करून आदर्श नागरिक बनू, असा विश्वास व्यक्त केला.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक किशोर कोल्हे, ज्येष्ठ शिक्षक आनंद नांदुरकर, अमोल ढोकणे यांच्यासह पोलीस विभागातील गुंजम, रघुवंशी मॅडम व दामिनी पथकाचे कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानण्यात आले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचारी गंभीर जखमी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. ३० :** वाशिम-अकोला महामार्गावर अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत एक पादचारी गंभीररित्या जखमी झाल्याची घटना रविवारी, २९ मार्च रोजी घडली. अपघातानंतर संबंधित वाहन चालक घटनास्थळावरून पसार झाला असून, जखमीवर उपचार सुरू आहेत.

पातूर शहरातील गुरुवार पेठ येथील रहिवासी शंकर उकर्डा राऊत हे महामार्गावरून पायी जात होते. पातूरपासून मालेगावच्या दिशेला अंदाजे ४ किमी अंतरावर असलेल्या बोडखा गावाजवळ पाठीमागून येणाऱ्या एका भरधाव अज्ञात वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. या भीषण अपघातात राऊत यांच्या अंगाला गंभीर दुखापत झाली. अपघाताची माहिती मिळताच नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्या १०३३ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधण्यात आला. एनएचएआयच्या पेट्रोलिंग पार्टीचे अनिकेत पोहरे व त्यांच्या पथकाने रुग्णवाहिकेसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी शंकर राऊत यांना तातडीने पुढील उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. या अपघाताची नोंद घेऊन पातूर पोलीस पुढील तपास करत असून पसार झालेल्या अज्ञात वाहनाचा शोध घेतला जात आहे. अपघातानंतर रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या जखमीला वेळीच मदत मिळावी, यासाठी एनएचएआयच्या टीमने दाखवलेले प्रसंगावधान महत्त्वाचे ठरले.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, मंगळवार, दि.३१ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



**महत्त्वाचे**

## महिला महाविद्यालयाची पारले-जी कंपनीला भेट

**खामगाव :** खामगाव येथील श्रीमती सु.रा. मोहता महिला महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा या उद्देशाने प्रसिद्ध पार्ले जी कंपनीला शैक्षणिक भेट दिनांक २८ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्य सौ. हेमा जवंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कंपनी भेट उपक्रमाचे आयोजन अर्थशास्त्र विभागाने केले. विभागप्रमुख डॉ. विष्णू एकनाथ घुमटकर यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांना उद्योगातील कार्यपद्धती, उत्पादन प्रक्रिया तसेच व्यवस्थापनाचे विविध पैलू समजावून सांगण्यात आले. या भेटीदरम्यान कंपनीचे मार्गदर्शक आशिष होणाळे यांनी विद्यार्थ्यांना उत्पादन प्रक्रियेची सविस्तर माहिती देत आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्ता नियंत्रण आणि विपणन व्यवस्थेबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्पादनाच्या विविध टप्प्यांचे निरीक्षण करून उद्योग क्षेत्रातील कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. या उपक्रमास हिंदी विभाग प्रमुख डॉ. छाया जाधव तसेच वाणिज्य विभागातील प्रा. रामरतन ढोरे, प्रा. कु. प्राजक्ता गुंजे यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञान आणि औद्योगिक व्यवहार यामधील समन्वय अधिक स्पष्टपणे समजून घेता आला. सदर औद्योगिक भेटीने विद्यार्थिनींच्या व्यावहारिक ज्ञानात भर पडण्यास मदत झाली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केले.

## कृषी अधिकारी यांनी गैरवर्तणुक केल्याची तक्रार

**खामगाव :** स्थानिक सुटाळपुरा भागातील रहिवासी जयेश राम दळी यांनी २८ मार्च २६ रोजी शहर पोस्टेला तक्रार दिली. त्यामध्ये अशा आशयाचे नमुद केले आहे की, जयेश दळी यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात माहिती अधिकार कायद्यांतर्गत म हाडीबीटी अनुदान संदर्भात माहिती मागीतली होती. त्यामुळे त्यांना २७ मार्च २६ रोजी कृषी अधिकारी कार्यालयात माहिती घेण्यासाठी बोलविण्यात आले होते. यावेळी जयेश दळी हे त्यांचे अंगरक्षक पोकॉ. आशिष ठाकुर यांच्यासोबत तालुका कृषी अधिकारी कार्यालयात गेले होते. दळी हे माहिती विचारत असतांना कृषी अधिकारी सुनिल प्रकाश पवार यांनी अपमानास्पद वागणुक दिली. याप्रकरणी कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, असे तक्रारीत नमुद केले आहे.

## शेलाडी येथील १८ वर्षीय युवती बेपत्ता

**खामगाव :** खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनअंतर्गत शेलोडी येथे १८ वर्षीय पायल देवानंद तायडे ही युवती बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पायल ही २९ मार्च रोजी सकाळी ११.३० ते ३० मार्च रोजी पहाटे ४ वाजेदरम्यान घरातून कोणालाही न सांगता निघून गेली. कुटुंबीयांनी शोध घेतला मात्र ती मिळून न आल्याने वडील देवानंद तायडे (वय ४४) यांनी तक्रार दिली. या प्रकरणी मिसिंग क्रमांक १३/२०२६ दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राधा इनकर करीत आहेत.

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**


| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | २००० - २१२५ |
| गहू | १६०० -२२०० |
| तुर | ६१०० - ८९५० |
| हरभरा | ३९००- ५२२५ |
| सोयाबीन | ४५००- ५४०० |
| उडीद | ५६०० - ६७०० |
| मुग | ४८०० - ४८०० |
| मका | ११०० - १६०० |

# अवैध रेती माफियांची दादागिरी; तहसीलदारांना वाहनाने चिरडण्याचा प्रयत्न

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.३० :** तालुक्यात अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या तहसीलदारांच्या गाडीवर वाहन घालण्याचा प्रयत झाल्याची धक्कादायक घटना सोमवारी (दि. ३० मार्च) उघडकीस आली. पारखेड शिवारात घडलेल्या या प्रकारामुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली असून, अवैध धंदे करणाऱ्यांची वाढती दादागिरी पुन्हा एकदा समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खामगावचे तहसीलदार सुनील पाटील यांना पारखेड शिवारातून मोठ्या प्रमाणात अवैध रेती वाहतूक सुरू असल्याची माहिती मिळाली होती. यानुसार त्यांनी तत्काळ कारवाई करण्याचा निर्णय घेतला. तहसीलदार पाटील हे खाजगी वाहनाने नॅशनल हायवे क्रमांक ६ वरून कारवाईसाठी जात असताना समोरून येणाऱ्या संशयित



वाहनाला थांबवण्याचा प्रयत केला. दरम्यान, एमएच २८ बीबी ७३७४ क्रमांकाच्या वाहनचालकाने वाहन थांबवण्याऐवजी आक्रमक पवित्र घेत थेट तहसीलदारांच्या दिशेने वाहन चालवले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे काही काळ तणाव निर्माण झाला. मात्र, सतर्कता बाळगल्यामुळे तहसीलदार सुनील पाटील यांना कोणतीही दुखापत झाली नाही आणि संभाव्य मोठा अपघात टळला. या घटनेनंतर तहसीलदारांनी तात्काळ संबंधित वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू



केली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रशासनाने अवैध रेती वाहतुकीविरोधात अधिक कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत. तालुक्यात मागील काही दिवसांपासून अवैध रेती उत्खनन व वाहतुकीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारांमुळे शासनाच्या महसुलाला मोठा फटका बसत असून पर्यावरणीय हानीदेखील होत आहे. याशिवाय, अधिकाऱ्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होत असल्याने प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे. दरम्यान, या घटनेमुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संबंधित आरोपीवर कडक कारवाई करण्यात यावी आणि अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे.

# अण्णाभाऊ साठे स्मारक समितीच्या साखळी उपोषणाला काँग्रेसचा पाठींबा

## पुतळा कायमस्वरूपी बसवून सौंदर्यीकरण करण्याबाबत निवेदन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी




**खामगाव दि.३० :** येथील रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेशव्दाराच्या बाजूला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा कायमस्वरूपी बसवून सौंदर्यीकरण करण्यात यावे यासह इतर मागण्यांसाठी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारक समिती व समस्त मातंग समाज बांधवांचे नगर परिषद समोर साखळी उपोषण सुरू आहे. या उपोषणाला आज दि.३० मार्च रोजी खामगाव काँग्रेस पक्षाच्या वतीने जाहीर पाठींबा दर्शविण्यात आला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आज सकाळी १२ वाजता उपोषणस्थळी भेट दिली. यावेळी पाठींबा बाबतचे पत्र उपोषणकर्त्यांना देवून आपल्या मागण्या रास्त असून शासनाने तातडीने मागण्या मान्य करून न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली. तसेच न्याय मिळेपर्यंत समाजासोबत ठामपणे उभे राहणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. त्यानंतर नगर परिषद नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना मागण्यांबाबत लेखी निवेदन देण्यात आले. निवेदनात साहित्यरत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची साहित्यतील ख्याती ही आंतरराष्ट्रीय स्तरावरची आहे. त्यांच्या साहित्यामुळे शोषित, वंचित आणि पिडीतांच्या वेदनेला वाचा फोडलेली आहे. त्यामुळे रशिया सारख्या देशाने सुद्धा त्यांचा पुतळा बसून गौरव केलेला आहे. या अनुषंगाने आपल्या खामगाव नगरीमध्ये साहित्यरत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा असायला पाहिजे, गेल्या २० - २२ वर्षांपासून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविण्यात यावा अशी मागणी केल्या आत आहे. मात्र सदर मागणीची पूर्तता अद्याप पावतो झालेली नाही. मात्र अज्ञातांकडून खामगाव रेल्वे स्टेशनच्या प्रवेशद्वारावर साहित्यरत अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बसविल्याची घटना सध्या चर्चेत आहे आणि सदर पुतळा कायमस्वरूपी बसवून त्याचं सौंदर्याकरण करावं यासाठी नगरपरिषदेच्या प्रवेशद्वारावर उपोषण सुद्धा सुरू आहे. समाजातील युवकांनी अण्णाभाऊ साठे प्रती असणारा आदर आणि अस्मिता या भावनेतून ही मागणी केली आहे. सदर प्रकरणी प्रशासनाने लक्ष घालून अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा आपल्या शहरात असला पाहिजे, त्यासाठी कोणती कायमस्वरूपी आणि सन्मानजनक व्यवस्था करता येऊ शकते याबाबतीत तोडगा काढून योग्य तो न्याय करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

## मोठी देवी सेवाधारी मंडळातर्फे रामनवमी शोभा यात्रेचे स्वागत व शरबत वितरण



**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.३० :** रामनवमी निमित्त शहरातून विशाल शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठी देवी सेवाधारी मंडळातर्फे अध्यक्ष उत्तमराव काका उंबरकर यांच्या मार्गदर्शनात भाविकांना शरबताचे वितरण करण्यात आले, तसेच दुपट्टा पुष्पगुच्छ देऊन राम नवमी उत्सव समिती खामगावच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. सर्वप्रथम शोभायात्रेचे आगमन होताच मोठ्या प्रमाणात आतिषबाजी करून ढोल ताशांच्या निनादात पालखीचे स्वागत करण्यात आले, व नंतर मोठी देवी मंडळाचे विश्वस्त उत्तमराव काका उंबरकर यांच्या हस्ते पालखीत विराजमान आराध्य देव प्रभू श्रीरामचंद्र यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले, यावेळी मोठी देवी सेवाधारी मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी रामकथा प्रश्नमंजुषेत भाग घ्यावा - राधेश्याम चांडक

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.३० :** सद्भावना सेवा समिती, बुलडाणा द्वारा दि. ०७ एप्रिल पासुन साध्वी सृष्टीलता रामायणीजी यांची रामकथा आयोजित केली आहे. रामकथा मंडपाचे भुमिपुजन विधान परिषद सदस्य धिरज लिंगाडे, सद्भावना सेवा समितीचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांच्या हस्ते लहाने ले आऊट, चिंचोले चौक,स.रोड, बुलडाणा ३० मार्च रोजी झाले. रामकथेत नऊ दिवस विविध विषयांवर प्रश्नमंजुषा आयोजित केली आहे. यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे अवाहन राधेश्याम चांडक यांनी केले आहे. आमदार धिरज लिंगाडे यांनी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. आ. संजय गायकवाड यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.नगराध्यक्षा न.प., बुलडाणा सौ. पुजाताई गायकवाड यांनी नगर परिषद सहकार्य करेल अशी ग्वाही दिली. सद्भावना सेवा समितीचे चंपालाल शर्मा, राजेश देशलहरा, सुरेश गट्टाणी, तिलोकचंद चांडक, सिध्दार्थ शर्मा, उमेश मुंदडा, सुभाष दर्डा सोबत अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉ. पवन बजाज, कन्हैय्या बंग, अमित महाजन, मधुकर गायकी,



गिरीधारी शर्मा, तुषार भट्टड, सागर घट्टे, विजय शर्मा, कमलेश चांडक, लाला माधवाणी, समाधानअप्पा पारसरकर, महेश टावरी, अनंता देशपांडे, मनमोहन शर्मा, पंजाबराव इलग, आनंद वर्मा, दिपक वर्मा, ललित चोपडा, नितीन जैस्वाल, गजु कुळकर्णी, गजानन भराड, अनंता वाघ, देविदास बावस्कर, शिवाजी देशमुख, पुरनमल शर्मा, सौ. आरती शर्मा, सौ. संगीता बाहेती, सौ. प्रेमा राठी, सौ. मनिषा बाहेती, सौ. माया शर्मा, , पंडीत सचिदानंद पुसदकर उपस्थित होते.

## श्री रेणुकामाता यात्रा महोत्सव व हनुमान जयंतीनिमित्त भंडारा व आतिषबाजीचे आयोजन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**चिखली दि.३० :** चिखली शहराचे आराध्यदैवत आई श्री रेणुकामाता यात्रा महोत्सव तसेच हनुमान जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. निलेश गावंडे मित्र मंडळ व राऊतवाडी मित्र मंडळ यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शेलूद येथून येणाऱ्या वगदीच्या आगमनानिमित्त भक्त भाविकांसाठी सकाळी ९.०० वाजता प्राचार्य डॉ. निलेश गावंडे यांच्या निवासस्थानासमोर भव्य भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच आई रेणुकामातांच्या वाहनाच्या आगमनावेळी राऊतवाडी चौकात आ-



कर्षक आतषबाजीद्वारे स्वागत करण्यात येणार आहे. चिखली परिसरातील सर्व नागरिकांनी या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून भंडारा व आतषबाजीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. निलेश गावंडे मित्र मंडळ व राऊतवाडी मित्र मंडळ यांच्या वतीने यश शिंदे अनिकेत तायडे अक्षय सावंत अक्षय जाधव यानी करण्यात आले आहे.

## खैरव-बारलिंगा ग्रामपंचायत सरपंचावरील अविश्वास ठराव मंजूर

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.३० :** तालुक्यातील खैरव-बारलिंगा गट ग्रामपंचायतीत अखेर राजकीय घडामोडींना उधाण येत सरपंच सौ. नलिता राजेंद्र गरड यांच्यावर अविश्वास ठराव मंजूर करण्यात आला. तहसीलदार यांच्या निर्देशानुसार आज (दि. ३० मार्च, सोमवार) ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत बहुमताने हा ठराव पारित झाल्याने ग्रामपंचायतीच्या राजकारणात मोठा भूकंप झाल्याची चर्चा रंगली आहे.

ग्रामपंचायत सदस्यांनी सादर केलेल्या ठरावात सरपंचांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. ''सरपंच कोणतेही निर्णय घेताना सदस्यांचा विश्वासात घेत नाहीत, उलट जनहिताच्या विरोधात निर्णय घेत असल्यामुळे गावाच्या विकासकामांना खीळ बसली आहे,'' असा आरोप सदस्यांनी केला. याशिवाय प्रशासनात समन्वयाचा अभाव, विकासकामांतील अनियमितता, सदस्यांशी सहकार्याचा अभाव आणि ग्रामपंचायत कारभारातील पारदर्शकतेचा अभाव ही कारणे ठरावात नमूद करण्यात आलेली आहेत. विशेष म्हणजे, सरपंचांच्या पतीकडून कार्यालयीन कामात सतत हस्तक्षेप होत असल्याचाही गंभीर आरोप सदस्यांनी केला आहे. या सर्व कारणांमुळे ग्रामपंचायत सदस्यांमध्ये असंतोष उफाळून आला होता आणि अखेर त्यांनी एकत्र येत अविश्वास ठरावाचा मार्ग स्वीकारला. आज झालेल्या सभेत ठरावावर मतदान घेण्यात आले असता बहुमताने ठराव मंजूर झाला. यामध्ये ग्रामपंचायत सदस्य विद्या संजय लहाने, प्रकाश रामभाऊ गरड, नंदा श्रीकृष्ण तळेकर, दत्तू त्र्यंबक तळेकर, अलका सुधाकर नागरे, जनार्धन विक्रम नागरे, मीनाक्षी विनोद म्हस्के, सुनीता सुरेश भालेकर आणि स्वाती शिवानंद खेडेकर यांनी ठरावाला पाठिंबा देत स्वाक्षऱ्या केल्या. दरम्यान, या घडामोडींमुळे खैरव-बारलिंगा ग्रामपंचायतीतील सत्तासमीकरणे पूर्णपणे बदलली असून पुढील सरपंचपदासाठी राजकीय हालचालींना वेग येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. गावात या निर्णयाची जोरदार चर्चा सुरू असून पुढील राजकीय घडामोडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## डॉ.व्ही.बी.कोलते महाविद्यालयात पदवी प्रदान सोहळा

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.३० :** येथील लोक सेवा शिक्षण बहुउद्देशीय मंडळ संचलित पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय, मलकापूर येथे 'बॅच २०२४-२५' च्या विद्यार्थ्यांचा १२ वा पदवी प्रदान सोहळा शनिवार, २८ मार्च २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यात विविध शाखांतील शेकडो विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून संत गाडगे बाबा अमरावती




विद्यापीठाच्या पी.एच.डी. सेलच्या उपकुलसचिव सौ. मीनल मालधुरे उपस्थित होत्या. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देत तांत्रिक ज्ञानासोबतच सामाजिक जाणीव आणि मूल्ये जपण्याचे आवाहन केले. ''शिक्षणामुळे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे,'' असे त्यांनी सांगितले. यावेळी सन्माननीय अतिथी म्हणून अमरावतीचे सिनेट सदस्य राजेंद्र पांडे तसेच प्राध्यापक डॉ. एस. डी. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अध्यक्ष ज्ञानदेव पाटील होते, तर सचिव डॉ. अरविंद कोलते यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे नियोजन कार्यक्रम निमंत्रक प्रा. एन. आर. बुडुखले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सल्लागार समितीमध्ये डॉ. युगेश खर्चे, प्रा. आर. एम. चौधरी, प्राध्यापिका संगीता खर्चे, प्रा. योगेश सुशीर, प्रा. सुदेश फरपट, प्रा. नितीन खर्चे व प्रा. संतोष शेकोकार यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्राध्यापिका आचल गोळे यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप पसायदानाने झाला.यानंतर विद्यार्थ्यांनी, पालकांनी व मान्यवरांनी फोटो सेशनचा आनंद घेतला.

**मागणी** | माजी सरपंच शिवाजी कायंदे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

# शेंदुर्जन परसरातील बंद बससेवेचा तिढा अखेर सुटणार!

**अजिंक्य भारत**/ **गोपाल तोष्णीवाल**

**शेंदुर्जन दि.३० :** गेल्या अनेक वर्षांपासून बंद असलेल्या बससेवेमुळे वनवास भोगणाऱ्या शेंदुर्जन परिसरातील भंडारी, कंडारी, जागदरी, आणि परिसरातील ग्रामस्थांसाठी अत्यंत आनंदाची आणि मोठी बातमी समोर येत आहे. माजी सरपंच शिवाजी कायंदे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी या प्रश्नात थेट लक्ष घातले असून, बंद पडलेली बससेवा पुन्हा सुरू करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू केले आहेत.

**शिवाजी कायंदे यांचा दणका:** शेंदुर्जन आणि परिसरातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि रुग्णांचे हाल पाहून माजी सरपंच शिवाजी कायंदे यांनी हा प्रश्न प्रतिष्ठेचा केला होता. त्यांनी



वारंवार ग्रामस्थांच्या समस्या ना. प्रतापराव जाधव यांच्या कानावर घातल्या आणि लेखी निवेदनाद्वारे या प्रश्नाचे गांभीर्य पटवून दिले. त्यांच्या या जिद्दीमुळेच आज केंद्रीय मंत्र्यांनी विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ (बुलढाणा) यांना कडक शब्दांत शिफारस पत्र धाडले आहे.

**जनतेचा अंत पाहणाऱ्या प्रशासनाला चपराक! कायंदे यांचा दावा:** ''प्रशासनाने गेल्या अनेक वर्षांपासून या मार्गावरील बससेवा बंद ठेवून ग्रामीण जनतेचा छळ केला आहे. पण आता ना. प्रतापराव जाधव यांच्या माध्यमातुन आम्ही ही बस पुन्हा रस्त्यावर आणल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.''

**विद्यार्थ्यांची सुटका:** कंडारी आणि शेंदुर्जन भागातील शेकडो विद्यार्थ्यांना आता खासगी वाहनांच्या महागड्या आणि जीवघेण्या प्रवासातून लवकरच मुक्ती मिळणार आहे. केंद्रीय मंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी आपल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, बुलढाणा ते लोणार (सुलतानपूर - कंडारी मार्गे) आणि चिखली ते भंडारी ही बससेवा तात्काळ सुरू करण्यात यावी. शिवाजी कायंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या बससेवेमुळे महिला, वृद्ध आणि विद्यार्थ्यांची होणारी मोठी गैरसोय आता दूर होणार आहे. हा विजय केवळ माझा नसून संपूर्ण ग्रामस्थांच्या एकजुटीचा आणि ना. प्रतापराव जाधवांच्या जनसेवेचा आहे. लवकरच लालपरी आपल्या गावात दिसेल!'' शिवाजी कायंदे (माजी सरपंच) आता शिवाजी कायंदे यांच्या या यशस्वी पाठपुराव्यानंतर परिवहन मंडळ किती लवकर ही बस सुरू करते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## लोणारच्या मोठा मारुती मंदिरात हनुमान जन्मोत्सव सोहळा; आरोग्य व रक्तदान शिबिराचे आयोजन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**लोणार दि.३० :** येथील ऐतिहासिक वारसा असलेल्या आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री हनुमान मंदिर संस्थान (मोठा मारुती मंदिर / झोपलेला मारुती) येथे गुरुवार, २ एप्रिल २०२६ रोजी हनुमान जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात आणि विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी साजरा होणार आहे. यावर्षी आध्यात्मिक कार्यक्रमांसोबतच भव्य रक्तदान आणि आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थानच्या वतीने देण्यात आली आहे. दिवसभराची धार्मिक रूपरेषा जन्मोत्सवानिमित्त पहाटे ४:०० वाजता मारुतीरायाचा महाअभिषेक संपन्न होईल. सकाळी ५:४५ वाजता हनुमान जन्मकथा सांगण्यात येईल, त्यानंतर ठीक सकाळी ६:०० वाजता जन्मोत्सव महाआरती व प्रसाद वाटप होईल. दुपारी १२:०० ते ३:०० या वेळेत



भाविकांसाठी महाप्रसादाचे (भंडारा) आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६:०० वाजता सामूहिक हनुमान चालिसा पठण व महाआरती होईल, तर रात्री ८:०० वाजता भजन व कीर्तन सोहळ्याने या उत्सवाची सांगता होईल. **सेवेचासंकल्प:**आरोग्यवरक्तदानशिबीर ''रक्तदान हेच श्रेष्ठदान'' हा विचार डोळ्यासमोर ठेऊन यावर्षी भव्य सेवा उपक्रम राबविले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने: भव्य रक्तदान शिबीर: सकाळी ८:०० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत. **नेत्र व मोतीबिंदू तपासणी:** सकाळी १०:०० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत. मोफत सर्व रोग निदान व उपचार शिबीर: सकाळी १०:०० ते दुपारी २:०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. पुढील वर्षीचा भव्य संकल्प हनुमान जन्मोत्सवाचा हा सोहळा दरवर्षी अधिक व्यापक होत आहे. यावर्षीच्या उत्स्फूर्त प्रतिसादातूनच पुढील वर्षी याहूनही विशाल आणि भव्य दिव्य ''हनुमान जन्मोत्सव'' साजरा करण्याचा संकल्प संस्थानने सोडला आहे. या सर्व धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन श्री हनुमान मंदिर संस्थान, लोणार च्या वतीने करण्यात आले आहे.

अजिंक्य भारत

# आपलं खामगांव

बुलडाणा, मंगळवार, दि.३१ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com



**महत्त्वाचे**

## हिवरा आश्रम परिसरामध्ये उन्हाचा पारा वाढला

**हिवरा आश्रम :** उन्हाळा म्हटलं की, उन्हाचा पारा सारखा वाढतो. शक्यतो मे महिन्यामध्ये ऊन जास्त तापते; असा आपला नेहमीचा अनुभव आहे. परंतु, हिवरा आश्रम परिसरामध्ये मार्च एंडिंगलाच उन्हाचा पारा तापला असून त्याचा जनजीवनावर परिणाम होतांना दिसतोय उन्हाचा तापता पारा यमुळे शेती विषयक कामे व पेरणीपूर्व मशागतीच्या कामामध्ये व्यत्य येत असल्याचे दिसते. तसेच, मंगल कार्यास येणाऱ्या पाहुणे मंडळींचा कल हा शक्यतो ऊन उतरलल्यानंतर लग्न कार्यास उपस्थित राहण्यावर भर दिसतो. मार्च एंडिंगच्या या त्पा उन्हामुळे रस्त्यावरील रहदारी कमी झालेली दिसते. उन्हापासून बचाव करण्याकरिता विद्यार्थ्यांचा टोप्या खरेदी करण्याकडे भर दिसतो. ऊन लागू नये म्हणून सर्वांनी काळजी घ्यावी; भरपूर पाणी प्यावे ! आणि कामाशिवाय कोणीही बाहेर पडू नये ; असा सल्ला डॉक्टर व जेष्ठ मंडळी देतांना दिसतात.

## आज जिल्ह्यातील कत्तलखाने व मांसविक्री बंद ठेवण्याचे आदेश

**बुलडाणा :** जैन धर्माचे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती उद्या ३१ मार्च २०२६ रोजी साजरी होणार असून, या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालयाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार, उद्या ३१ मार्च २६ रोजी संपूर्ण जिल्ह्यात सर्व कत्तलखाने, मांसविक्रीची दुकाने आणि अंडाविक्री केंद्रे पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महावीर जयंती उत्सवाच्या काळात समाजात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि धार्मिक सलोखा टिकून राहावा, या उद्देशाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. या आदेशाची कडक अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत क्षेत्रातील मुख्याधिकाऱ्यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही परिस्थितीमध्ये या दिवशी मांसविक्री होणार नाही, याची कटाक्षाने दक्षता घेण्याचे निर्देश पशुसंवर्धन विभाग आणि पोलीस प्रशासनाला देण्यात आले आहेत. नागरिकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## अवैध रेती वाहतुक करणारे वाहन पकडले

**खामगाव :** तालुक्यातील पारखेड परिसरातुन ट्रक क्रमांक एमएच-२८-बीबी-७३५४ मधुन अवैधरित्या रेतीची वाहतुक होत असल्याची माहिती मिळाली होती. माहितीच्या आधारे तहसीलदार सुनिल पाटील यांनी आज ३० मार्च २६ रोजी सकाळी १५.३० वा.च्या सुमारास राष्ट्रीय महामार्गावर एका संशयास्पद ट्रकला थांबण्याचा इशारा करण्यात आला होता. मात्र ट्रक चालकाने भरधाव ट्रक पुढे नेला. तहसीलदार पाटील यांनी ट्रकचा पाठलाग करून अखेर पकडले. सदर ट्रक तहसील कार्यालयात जमा करण्यात आला आहे. वृत्त लिहेपर्यंत खामगाव ग्रामीण पोस्टेमध्ये पुढील कार्यवाही सुरू होती.

## एकनिष्ठ गौसेवकांनी दिले गौमातेला जीवदान

**खामगाव :** सुटाळा खुर्द येथील अजय बोचरे यांच्या आरओ प्लँट समोरील सार्वजनिक विहीरीत गौमाता २८ मार्च २६ रोजी पडली होती. याबाबतची माहिती २९ मार्च २६ रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास एकनिष्ठा फाउंडेशनचे सुरुज यादव यांना मिळताच त्यांनी लगेच घटनास्थळी धाव घेतली व सहकाऱ्यांच्या मदतीने दोरीच्या साह्याने गोमातेला विहीरीतुन सुखरूप बाहेर काढले. यासाठी अजय बोचरे, विशाल कवळे, अखिल खान, राजु जवरे, मिर्तीद पवार, अमोल बोचरे, जगन्नाथ कांगळे, मिलींद पवार, सुभाष इंगळे, संतोष तायडे, शांताराम घोटे, अजय बोदडे, तुषार ठाकुर, योगेश राऊत आदी गौसेवकांनी सहकार्य केले.

# अखेर मेंडगाव धरणावरील वीज पुरवठा खंडित

## दैनिक अजिंक्य भारतच्या वृत्ताची पाटबंधारे विभागाने घेतली दखल

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**





अजिंक्य भारत
29 Mar 2026 - Page 13
मेंडगाव लघु पाटबंधारे तलावाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर
आरक्षित गावांना पाणी टंचाईच्या झळा

**अंढेरा दि. ३० :** मेंडगाव धरणावरील पाण्यावर अवलंबून असलेल्या पाच गावांना चिखली पाटबंधारे विभागाचे वारंवार वीज खंडित व वीज जोडणीच्या पत्राने धरणात पाणी साठा कमी असतांना व पाच गावांचे पिण्याचे पाणी आरक्षित असतांना सुद्दा पाटबंधारे विभाग चिखली यांनी धरणावरील वीज पुरवठा खंडित व जोडणीचे पत्र देऊन त्याांच्या विभागाचा भोंगळ कारभार दैनिक अजिंक्य भारतने आपल्या २९ मार्चच्या अंकात ''मेंडगांव लघु पाटबंधारे तलावाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर, आरक्षित गावानां पाणी टंचाईच्या झळा या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करताच चिखली लघु पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अभियंता आकाश शिंदे यांनी तातडीने मेंडगाव धरणावर जाऊन मेंडगाव लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या जलाशयातील मौजे मनुबाई, बायगाव बु, खडका,या शिवारातील शेतकऱ्यांचा विद्युत पुरवठा रोहित्रारावरून खंडित करण्यात आला.

यावेळी पाटबंधारे विभागाचे चिखली व महावितरण अंढेरा यांचे कर्मचारी यांनी खंडित केला. त्यामुळे धरणावरील पाणी पुरवठा असणाऱ्या त्या पाच ग्रामपंचायत यांनी सुटकेचा श्वास घेतला व पाणी टंचाईच्या झळाचा होणारा उद्रेक तात्पुरता दैनिक अजिंक्य भारतच्या वृत्ताच्या दणक्याने लघु पाटबंधारे विभाग चिखली ताळ्यावर येऊन अखेर मेंडगाव लघु पाटबंधारे तलाव यातील पाणी साठा मुबलक नसताना केवळ लघु पाटबंधारे विभाग चिखली यांचा भोंगळ कारभार मात्रा दैनिक अजिंक्य भारतच्या वृत्ताने चव्हाट्यावर आणला व धरणावरील त्या अवैध मोटार पंप चा वीज पुरवठा खंडित करण्यात आला यामुळे मेंडगाव धरणावरील पाणी पुरवठा असणाऱ्या मेंडगाव ग्रामपंचायत च्या प्रशासक सरपंच विद्या कायंदे यांनी दैनिक अजिंक्य भारतचे भ्रमणध्वनी वरून गावकरी मंडळी यांच्या वतीने आभार मानून जनतेच्या भावनेच्या विचार करून पाणी प्रश्न मार्गी लागल्याबद्दल आभार मानले.

# तळणी ग्रामपंचायतीचा गौरव; प्लास्टिक मुक्तीच्या तळणी पॅटर्नचे आ.गायकवाड यांच्याकडून कौतुक

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**



**मोताळा दि.३० :** मोताळा पंचायत समितीची सन २०२५-२६ ची वार्षिक आमसभा आणि सरपंच मेळावा बुलडाणा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय व कर्तव्यदक्ष आमदार संजय गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आणि गट विकास अधिकारी अशोक काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी तळणी ग्रामपंचायतीने आर. आर. आबा पाटील सुंदर गाव योजनेत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आणि ग्रामस्थांनी लोकसहभागातून प्लास्टिक मुक्तीसाठी उचललेल्या ऐतिहासिक पावलाबद्दल आमदार संजयभाऊ गायकवाड यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. तळणी ग्रामस्थांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी एक आदर्श वस्तुपाठ समोर ठेवला आहे. गावातील श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आयोजित महाप्रसाद पंगतीसाठी गावकऱ्यांनी लोकसहभागातून ६०० स्टीलच्या ताटांची खरेदी केली. यामुळे पंगतीमध्ये होणारा प्लास्टिक पत्रावळ्यांचा वापर पूर्णपणे थांबला असून, यातून पर्यावरणाचे रक्षण होणार आहे. भविष्यातील सर्व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी ही ताटे उपलब्ध करून देऊन गावाने प्लास्टिक मुक्तीचा संकल्प केला आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करताना आ. संजय गायकवाड यांनी सांगितले की, तळणी गावाने लोकसहभागातून उभा केलेला हा उपक्रम आदर्शवत आहे. तो खऱ्या अर्थाने सुंदर गाव संकल्पनेचा आत्मा आहे. गावाचा विकास करताना शासकीय योजना बरोबर लोकसहभाग सुद्धा महत्वाचा आहे तळणी गावाच्या अशा विधायक कार्यासाठी आणि गावाच्या विकासासाठी आपण सदैव खंबीरपणे पाठीशी राहू अशी ग्वाही आ. संजय गायकवाड यांनी दिली. तळणीच्या सरपंच सौ. वत्सलाबाई बोदडे आणि ग्रामसेवक एस. एम. राऊत यांनी ग्रामस्थांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात हा सन्मान स्वीकारला. तालुक्यातील इतर ग्रामपंचायतींनाही यातून प्रेरणा मिळाली असून, तळणीच्या या उपक्रमाचे आणि ग्रामस्थांच्या एकजुटीचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# अद्ययावत तंत्रज्ञान या विषयावर राज्यस्तरीय शेतकरी चर्चासत्र

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**

**नांदुरा दि.३० :** गत काही वर्षांभपासून राज्यातील मसाला पिकाच्या लागवडीखालील क्षेत्रामध्ये सातत्याने वाढ होत आहे. शेतकरी वर्गाचा मुख्यत: हळद, आले, धने, ओवा, मेथी, मिरची यांसारखे मसाला पिके व सुगंधी वनस्पतींचे उत्पादन घेण्याकडे कल वाढत आहे.

शेतकरी बंधूंना अद्यायवत तंत्रज्ञानाबद्दल माहिती व प्रक्रिया तंत्राज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी भाजीपालाशास्त्र विभाग, उद्यानविद्या शाखा, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचेद्वारे मसाला व सुगंधी वनस्पती पिकांचे शाश्वत उत्पादन व प्रक्रियेसाठी अद्ययावत तंत्रज्ञान या विषयावर दिनांक २४ व २५ मार्चला दोन दिवसीय राज्यस्तरीय शेतकरी चर्चासत्र व प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये दिनांक २४ मार्चला शेतकऱ्यांच्या शेतावरील मुसळी पानपिंपळी पानवेली जंगली फळ सुगंधी तेल हळद अद्रक मूल्यवर्धित प्रोडक्टची प्रदर्शनी घेण्यात आली. यामध्ये नांदुरा तालुक्यातील धाडी येथील शेतकरी विष्णू एकनाथ बाठे यांनी सुगंधी पिकाकरीताच्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ शरद गडाख यांच्या हस्ते त्यांना हे बक्षीस देण्यात आले. ह्यावेळी व्यास पिठावर कुलगुरू डॉ शरद गडाख, अधिष्ठाता (कृषी) डॉ देवानंद पंचभाई, अधिष्ठाता (उद्यानविद्या) डॉ अरविंद सोनकांबळे इत्यादी उपस्थित होते.

# चांडक परिवाराने मुक्तीधाममध्ये दिली शिवमुर्ती

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**



**मोताळा दि.३० :** तालुक्यातील कोथळी येथील मूळ निवासी असलेल्या चांडक परिवाराने येथील मुक्तीधाम मध्ये शिवमुर्ती भेट देत गावाप्रती आपली नाळ जुळलेली असल्याचे सिद्ध केले आहे.

दि.२८ मार्च २०२६ शनिवार रोजी मुक्तिधाम कोथळी येथे शिवप्रतिमेचं अनावरण झाले. कोथळी येथील राजेश चांडक, नरेश चांडक व जितेंद्र चांडक यांनी धार्मिक विधिवत कार्यक्रम करीत त्यांचे वाड- वडील यांच्या स्मृतिप्रित्यर्थ कोथळी येथील मुक्ती धाममध्ये शिवप्रतिमेचे अनावरण केले. वारी हनुमानचे महंत कृष्णानंदजी महाराज यांच्या शुभहस्ते व आमदार संजय गायकवाड यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी भागवत सप्ताह समिती सदस्य, मुक्तीधाम कमेटी, चिंतामणी महाशिवरात्री उत्सव मंडळ समिती, गावकरी व महिला मोठ्या संख्येने उपास्थितीत होत्या. श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर शिवप्रतिमेची नगरप्रदक्षिणा सायंकाळी चार वाजता श्रीराम मंदिर कोथळी येथून सुरू झाली होती. जय श्रीरामच्या व जय भोले च्या निनादात गावातून मिरवणूक काढण्यात आली. भव्य दिव्य अशा मिरवणुकीत महिलांनीं मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवीला.

# निलेश जाधव आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**मंगरूळ नवघरे दि.३० :** जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा मंगरूळ नवघरे ता.चिखली जि. बुलढाणा येथील उपक्रमशील शिक्षक निलेश विश्वंभर जाधव यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी पुणे येथे २९ मार्च रोजी पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात जगात नंबर वन म्हणून गौरविल्या गेलेल्या शाळेतील शिक्षक दत्तात्रय वारे गुरुजी यांच्या हस्ते आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपमहापौर शर्मिला बाबर, पुण्याचे डेप्युटी कलेक्टर शुभम पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ बाबासाहेब कारेकर साहेब तसेच ध्येय एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष सुदाम शेंडगे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत निलेश जाधव सरांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.

# डोणगावात अवैध पेट्रोल विक्री जोरात

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**



**डोणगाव दि.३० :** डोनगाव मध्ये पेट्रोलच्या किमतीला लागली आग. पान टपऱ्या किराणा दुकान अश्या चौका चौकात असणाऱ्या मिनी पेट्रोल पंपावर १४० रुपये लिटर प्रमाणे पेट्रोल विकले जात आहे. डोणगाव युद्धजन्य स्थितीमध्ये सध्या कित्येक पेट्रोल पंपावर पेट्रोल नाही मात्र पान टपऱ्या किराणा दुकान अशा कित्येक ठिकाणी सर्रासपणे पेट्रोल विकले जात आहे. एकीकडे शासनाचे कडक निर्देश आहेत की कॅन मध्ये पेट्रोल देण्यात येऊ नये मग या विक्रेत्यांकडे पेट्रोल येते कुठून पेट्रोल पंपावर लागणारी लाईन पाहता कित्येक जण या अवैध पेट्रोल विकणाऱ्या कडून पेट्रोल घेत आहेत.

सध्या सगळीकडे ऊर्जा संकट आलेले असून ज्याला पाहता पेट्रोल डिझेल मिळणार की नाही सोशल मीडियावर अफवांचा बाजार पिकलेला आहे ज्याला पाहता सर्व स्तरातील जनता हवालदील झालेली असून पाहता जो तो पेट्रोल पंपावर लाईनीत उभा आहे त्यांना कुठे १०० चे तर कुठे २०० पेट्रोल मिळत आहे मात्र असे असताना दुसरीकडे हवेत पेट्रोल विक्रेत्यांना पेट्रोल कोण देत आहे असा प्रश्न निर्माण होत आहे. हे अवैध पेट्रोल विक्रेते ठाण मांडून हे सध्या १४० रुपये लिटर प्रमाणे पेट्रोल विकत आहेत. पेट्रोल पंपावर असणारी गर्दी पाहता गरजू व्यक्ती वेळ धकवण्यासाठी यांच्याकडून एक एक दोन दोन लिटर पेट्रोल घेत आहे. गावाच्या मध्यभागी भर वस्तीत असणाऱ्या किंवा मुख्य बाजारपेठेमध्ये असणाऱ्या या अवैध पेट्रोल विक्रेत्यामुळे एखाद्या वेळी मोठी दुर्घटना होण्याची भीती व्यक्त केल्या जात आहे. तर दुसरीकडे जिल्हाधिकारी यांचे सक्त आदेश असल्यानंतर सुद्धा या अवैध पेट्रोल विक्रेत्यांना पेट्रोल देते कोण असा प्रश्न जनसामान्यांमध्ये निर्माण झालेला आहे यावर पुरवठा विभागाने लक्ष देऊन कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# चाकुचा धाक दाखवून लुटणारी फरार 'बाली' अखेर गजाआड

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**



**साखरखेर्डा दि.३० :** येथून थोड्याच अंतरावर असलेल्या मौजे हनवतखेड येथे एका ब्यान्नव वर्षाच्या वयोवृद्ध आजीला चाकुचा धाक दाखवून दागिने लुटल्या प्रकरणी तीन महिन्यांपासून फरार असलेल्या इंदुबाई गजानन महाजन उर्फ बाली हीला २६ मार्च रोजी एका शेतातून अटक करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार असे समजते की, हनवतखेड येथील सुमन श्रीराम चव्हाण वय.९२ वर्ष रा. हनवतखेड हि महिला दि.२९. जानेवारी २०२६ रोजी घरी असतांना अज्ञात तीन ते चार चोरटयांनी घराचे मागील किचनरुमचा दरवाजाचा कडीकोंडा तोडुन घरात आले व त्यांनी आजी झोपेत असतांना तिच्या अंगावरील हातातील कानातील व नाकातील गळयातील दागीने काढले तेव्हा नाकातील दागीने काढत असतांना आजीला जाग आल्याने व आजीचे लक्षात आले दरम्यान आजीला चोरट्यांनी लेनकटरचे चाकुचा धाक दाखवीत सदर चोर मारतील म्हणुन आजी त्यांना म्हणाली कि तुम्हाला काय पाहिजे ते घ्या परंतु मला मारु नका वरुन चोरट्यांनी तिचे अंगावरील सन-२००५-२००६ मधे खरेदी केलेले जुने वापरते सोन्याचे दागीने चोरुन नेले एकुन सन-२००५-२००६ मधील बाजार भावाप्रमाणे एकुन किमती ५६,०००/- रु.चे सोन्याचे दागदागीने चोरुन नेले. याप्रकरणी अनिल चव्हाण यांनी साखरखेर्डा पोलीसात फिर्याद दाखल केली होती . सदर आरोपी मध्ये हनवतखेड येथील इंदुबाई गजानन महाजन हि सहभागी असलेल्याचे धागेदोरे पोलीसांच्या हाती लागले याच वेळी यातील दोन चोरटे मालेगावकडे पसार झाले असताना नेमके मालेगाव पोलीसांना ते हवे होते. मालेगाव पोलीसांनी दोघांची झाडाझडती घेतली असताना त्यांचेकडे उपरोक्त मुद्देमाल मिळून आला. हनवतखेड येथे चोरी केल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान सदर चोरटे साखरखेर्डा पोलीसांनी ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता इंदुबाई देखील यात सहभागी असलेल्याचे निष्पन्न झाले. हनीट्रॅप करून लोकांना ब्लॅकमेल करणाऱ्या इंदुबाई उर्फ बाली हिला अटक करण्यासाठी हनवतखेड वासीयांचा पोलीसांवर दबाव वाढत होता. दरम्यान ती मोहदरी येथे आपल्या माहेरी एका शेतात लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली दरम्यान बीट जमादार निवृत्ती पोफळे, पो कॉ लकी इनामे, पो कॉ राजेश गीते, पो हे कॉ गजानन वाघ, महिला पोलीस कर्मचारी जानकी केवट यांनी सापळा रचून दि २४ मार्च रोजी बालीला ताब्यात घेतले आहे .दरम्यान न्यायालयाने चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. या चोरीतील निलेश दत्ता महाजन, वडप ता मालेगाव, रामेश्वर कोंडूजी हामरे वारा जहागीर मालेगाव हे दोघे जण फरार असून पोलीस शोध घेत आहेत.

**तक्रार** | **जिल्हाधिकारी यांना शेतकऱ्यांचे निवेदन**

# अवैध डीपी प्रकरणी शेतकऱ्यांचा संताप; भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**



खामगाव दि.३० : मौजे पिंप्री गवळी येथील शेतकऱ्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या कथित भ्रष्ट कारभाराविरोधात संताप व्यक्त करत जिल्हाधिकाऱ्यांकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. मंजूर डीपी बसविण्यात विलंब होत असताना पैसे घेऊन अवैध डीपी बसविण्याचा प्रकार समोर आल्याने शेतकरी वर्गात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. दि. ३० मार्च २०२६ रोजी खामगाव उपविभागीय अधिकारी पुरी यांच्या मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष नरेंद्र शिंगोटे यांनी अन्यायग्रस्त शेतकऱ्यांची बाजू ठामपणे मांडली.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंप्री गवळी येथील भगत डीपी ही मा. आकाश फुंडकर यांच्या माध्यमातून मंजूर झाली होती. मात्र, स्थानिक पातळीवर संगनमत करून संबंधित डीपी दुसऱ्या ठिकाणी वळवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासाठी सुमारे ३ लाख रुपये गोळा करून भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. तसेच, संबंधित ठिकाणी अवैध रोहित्र बसविण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शासन एकीकडे अवैध वीज जोडण्यांवर दंडात्मक कारवाई करत असताना, महावितरणचे काही अधिकारी पैशाच्या मोबदल्यात अशा बेकायदेशीर कामांना प्रोत्साहन देत असल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, मंजूर डीपीला दोन महिने उलटूनही प्रत्यक्षात बसविण्यात आलेली नाही. याबाबत १२ फेब्रुवारी २०२६ रोजी कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी तक्रार देण्यात आली होती. मात्र, त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सध्या शेतात कांद्याचे पीक उभे असून, तात्काळ पाणी न दिल्यास पीक जळून जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. ''ज्यांच्या शेतात डीपी बसविली नाही तेही शेतकरीच आहेत, उद्योगपती नाहीत,'' असा सवाल करत शेतकऱ्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. या आंदोलनात चेतन फुंडकर, धर्मेंद्र अवथळे, लक्ष्मण अवथळे, राजेंद्र इंगळे यांच्यासह अनेक शेतकरी व भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

# अ‍ॅड.क्षीरसागर बाबासाहेबांच्या विचारांचे पाईक होते- डॉ.बनसोडे

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**



**नांदुरा दि.३० :** स्वातंत्र ,समता बंधुता आणि न्याय या मूलभूत तत्वावर आधारित बहिष्कृत हितकारणी सभा,समता सैनिक दल, पीपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थांच्या माध्यमातून समाजात अमुलाग्र बदल घडविण्याचे कार्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. यांच विचारांचा लेखकांनी आंबेडकरी अस्मितेचे तारांगण प्रा.ॲड.व्हि.के.क्षिरसागर गुरुजी ह्या स्मृती ग्रंथात उहापोह केला आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ॲड. प्रा. व्हि.के. क्षिरसागर सर हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे पाईक होते. असे स्पष्ट प्रतिपादन प्रा.डॉ. संतोष बनसोड सिनेट सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी केले.ते आंबेडकरी अस्मितेचे तारांगण प्रा.ॲड. व्हि.के क्षीरसागर गुरुजी ह्यां स्मृती ग्रंथ प्रकाशन व अभिवादन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रथमतः प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते महापुरुषांच्या फोटोला माल्यार्पण व दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर ॲड.प्रा.व्हि.के.क्षीरसागर सर यांच्या जीवन कार्यावर आधारित माहितीपट दाखविण्यात आला. प्रा.डॉ.अरूण रौराळे,प्रा.आर.आर.वानखडे, रमेश घेवंदे निवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी,प्रा. डॉ.के.बी.इंगळे,डी.एस.वानखडे सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी, कुणाल पैठणकर, सुरेश जाधव,अनुला क्षिरसागर,प्रा. रविंद्र साळवे यांनीही अभिवादन पर मनोगत व्यक्त केले. जिजामाता महाविद्यालय बुलडाणा येथील सभागृहात दिनांक २९ मार्चला ज्येष्ठविधीज्ञ जे एस काकडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ह्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्मृती गौरव ग्रंथाच्या संपादीका अस्मिता क्षिरसागर,संचालन रमेश आराख यांनी तर आभार प्रदर्शन विजयकुमार क्षीरसागर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विशाखा इंगळे, संघमित्रा क्षीरसागर, अभिनव शिरसाट, अशोक क्षीरसागर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजिंक्य भारत •
आपलं जालना
जालना, मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ www.ajinkyabharat.com


## महत्त्वाचे



### मनपाचा ४६८ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

**जालना :** जालना महानगर पालिकेच्या नवनियुक्त लोकप्रतिनिधींच्या पहिल्या स्थायी समिती समोर आज सोमवार रोजी आगामी वर्षाचा ४६८ कोटी २ लाख ४७ हजार ३०० रुपयांचा अर्थसंकल्प स्थायी समितीचे सभापती अशोक पांगारकर यांनी महापौर वंदना मगरे यांच्याकडे सादर केला. या अर्थसंकल्पात स्वच्छतेवर भर देण्यात आला असून १४ कोटींची तरतूद त्यासाठी करण्यात आली आहे. मागच्या वर्षीपेक्षा यात ६ कोटींची वाढ झाली आहे. या विशेष सभेस आयुक्त आशिमा मित्तल, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांची व्यासपिठावर उपस्थिती होत.

### अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती बैठक

**जालना :** जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराला आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षेत संपन्न झाली. यावेळी बैठकीस जिल्हा रुग्णालयाचे डॉ. पी. एम.कुलकर्णी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे संजय ताकवाले, कृषी अधीकारी सचिन पांचाळ, समाज कल्याण विभागाचे एल.बी. बारगिरे सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासनचे जीवन जाधव, नायब तहसिलदार शैलेश राजमाने, पोलीस निरिक्षक पंकज जाधव, सपोनि सचिन इंगेवाड यांची उपस्थिती होती. जिल्हास्तरीय बैठकीत अमंली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीच्या माध्यमातून विविध विभागांना समन्वयाने काम करण्याचे निर्देश देत अपर जिल्हाधिकारी श्री. मिसाळ म्हणाले की, अवैध पद्धतीने गावठी दारू व अमली पदार्थांची निर्मिती व विक्री रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर पोलिसांनी तातडीने कारवाई करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, असे स्पष्ट करण्यात आले. तसेच महसूल विभागाने पोलीस कारवाई दरम्यान आवश्यक ती मदत करावी, असेही सांगण्यात आले. अन्न व औषध प्रशासनाला ग्रामीण भागातील वैद्यकीय दुकाने व दवाखान्यांवर नियमित तपासणी करून औषधांचा गैरवापर रोखण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः 'एच वन' (१) गटातील औषधांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित दुकाने व डॉक्टरांचे परवाने रद्द करण्याबाबतही सूचना अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी दिल्या.

# वेगवान देयक सुविधेचा गाजावाजा; 'कार्ड'च्या नावाखाली नागरिकांची लूट

## ठेकेदाराच्या मनमानीवर सवाल;आगार प्रमुखांची चुप्पी

। समाधान भोपळे।

**जाफराबाद, दि. ३० :** प्रवाशांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड योजना जाफराबाद आगारात सुरू करण्यात आली असली, तरी या योजनेच्या अंमलबजावणीत गंभीर त्रुटी समोर येत आहेत. शासनाने ठरवलेल्या दरापेक्षा अधिक रक्कम आकारून संबंधित ठेकेदारांकडून नागरिकांची सर्रास लूट सुरू असल्याची तक्रार लाभार्थ्यांकडून केली जात आहे.

महामंडळाने वेगवान, सुरक्षित व सुलभ देयक व्यवहारासाठी हा उपक्रम राबविला असून एनएसडीएल पेमेंट्स बँकेच्या सहकार्याने कार्ड उपलब्ध करून दिले जात आहे. या सुविधेमुळे प्रवाशांना रोख रकमेऐवजी कार्डद्वारे तिकीट घेणे शक्य होणार असून व्यवहार अधिक पारदर्शक व जलद होण्याचा दावा करण्यात आला आहे.

मात्र, प्रत्यक्षात चित्र वेगळेच असल्याचे समोर आले आहे. शासनाने या कार्डाची किंमत १९९ ते २०० रुपये निश्चित केली असताना, संबंधित ठेकेदार गावोगावी जाऊन नागरिकांकडून ३०० ते ३५० रुपये वसूल करत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे ''सुविधा की लूट?'' असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**सवलतीसाठी कार्ड अनिवार्य**

महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, विद्यार्थी आदी सवलतधारक प्रवाशांसाठी हे कार्ड बंधनकारक करण्यात आले आहे. कार्ड नसल्यास पूर्ण भाडे आकारले जाणार असल्याने नागरिकांना कार्ड काढणे भाग पडत आहे. नोंदणीनंतर साधारणतः ३० दिवसांत कार्ड मिळणार असून, सवलतीचे तिकीट केवळ कार्डमधील रकमेवरच दिले जाणार आहे.

**नोंदणीची सुविधा उपलब्ध; मात्र अंमलबजावणीत त्रुटी**

बस आगार, नियंत्रण कक्ष तसेच अधिकृत प्रतिनिधीमार्फत नोंदणीची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. आधार कार्ड अनिवार्य असून काही प्रवर्गांसाठी शासकीय प्रमाणपत्र आवश्यक आहे. मात्र, अधिकृत प्रक्रियेऐवजी ठेकेदारांकडून मनमानी पद्धतीने पैसे वसूल केल्याने योजनेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहणाऱ्या या रांगा जिल्ह्यातील बहुतांश बसस्थानक परिसरातील मास्टर कार्ड मिळण्याच्या केंद्रावर दिसून येत असल्यातरी त्यांच्या मदतीला लोकप्रतिनिधी धावून येत नसल्याची खंत हे नागरिक व्यक्त करू लागले आहे.

**आगार प्रमुखांनी हात झटकले...**

याबाबत जाफराबाद बस आगार प्रमुख रंजीत राजपूत यांना विचारले असता, ''ही प्रक्रिया खाजगी ठेकेदारामार्फत सुरू असून त्यांचा आगाराशी थेट संबंध नाही,'' असे सांगत त्यांनी जबाबदारी झटकली. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संतप्त नागरिकांकडून केली जात आहे.

## खोतकर यांच्या विजयाला दिलेले आव्हान उच्च न्यायालयाने फेटाळले





दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. ३० :** २०२४ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेनेचे अर्जुन खोतकर तब्बल १,०४,००० मते मिळवून विजयी झाले होते. त्यांनी काँग्रेसच्या कैलास गोरंट्याल यांचा ३१,००० मतांनी पराभव केला होता. खोतकर यांच्या निवडणुकीला कैलास गोरंट्याल यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

आव्हान देतांना गोरंट्याल यांनी उच्च न्यायालयात अशी विनंती केली होती की, खोतकर हे जालना बाजार समितीचे मुख्य प्रशासक हे लाभाचे पद धारण करीत असल्याने ते विधानसभा निवडणूक लढवण्यास अपात्र आहेत, खोतकर यांनी नामनिर्देशन पत्रासोबत दाखल केलेले शपथपत्र विहित नमुन्यात नव्हते, निवडणूक आयोगाने नियमांचे उल्लंघन करून निवडणूक घेतली ज्याने खोतकर यांना फायदा झाला, या कारणांमुळे खोतकर यांची निवडणूक अवैध असून त्यांची आमदारकी रद्द करावी.

या याचिकेत खोतकर यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार अर्ज करून गोरंट्याल यांनी उपस्थित केलेल्या एकाही मुद्द्यात तथ्य नाही, त्यामुळे त्यांची याचिका प्राथमिक टप्प्यावरच रद्द करावी, अशी विनंती न्यायालयास केली होती. आपल्या अर्जात खोतकर यांनी बाजार समिती ही स्थानिक स्वराज्य संस्था असल्याने तीत धारण केलेले कुठलेही पद हे राज्यघटनेच्या अनुच्छेद १९१ नुसार लाभाच्या पदाच्या व्याख्येत येत नाही. खोतकर यांची बाजू मांडताना जेष्ठ वकील संजीव देशपांडे यांनी संविधान सभेतील चर्चेचा आधार घेत न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिले की एखाद्या व्यक्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेतील धारण केलेले पद हे त्या व्यक्तीस विधानसभा निवडणूक लढविण्यास अपात्र करत नाही. अशी अपात्रता केवळ राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीसाठी असते. तसेच खोतकर यांचे नामनिर्देशन पत्रासोबतचे शपथपत्र विहित नमुन्यात असून त्यांनी संपूर्ण माहिती जनतेला दिलेली आहे, निवडणूक आयोगावर गोरंट्याल यांनी केलेले आरोप निराधार व बिनबुडाचे असून त्यांच्या पुष्ट्यर्थ त्यांनी एकही पुरावा दिलेला नाही.

उच्च न्यायालयाने सुनावणीअंती खोतकर यांचा अर्ज मंजूर करून गोरंट्याल यांची याचिका फेटाळून लावली. खोतकर यांचे तर्फे संजीव देशपांडे यांनी बाजू मांडली व त्यांना ॲड. सुबोध शाह व ॲड प्रतीक भोसले यांनी सहकार्य केले.

## मनिष श्रीवास्तव उद्धव सेनेच्या जिल्हाप्रमुखपदी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. ३० :** पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार जालना जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये शिवसेनेचे निष्ठावान कार्यकर्ते मनिष श्रीवास्तव यांची जालना जिल्हाप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



**पक्षाची ताकद वाढवणार - मनिष श्रीवास्तव**

**आपल्या नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना मनिष श्रीवास्तव म्हणाले की, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब आणि युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे साहेब यांनी जो विश्वास माझ्यावर दाखवला आहे, त्या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही. जालना जिल्ह्यातील सर्वसामान्य शिवसैनिकांना सोबत घेऊन पक्षाची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि संघटना अधिक बळकट करणे हेच माझे मुख्य उद्दिष्ट असेल.**

मनिष श्रीवास्तव यांची ही नियुक्ती आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. त्यांच्याकडे जिल्ह्यातील भोकरदन आणि बदनापूर विधानसभा मतदारसंघाचे कार्यक्षेत्र सोपवण्यात आले आहे. श्रीवास्तव यांचा जनसंपर्क आणि संघटनात्मक कौशल्य लक्षात घेता पक्षाने ही मोठी जबाबदारी त्यांच्या खांद्यावर दिली आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी त्यांच्या निवडीचे स्वागत केले असून त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात शिवसेना अधिक आक्रमकपणे कार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## जालना शहरात नगरसेवकासह सहा ते सात जणांवर हल्ला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. ३० :** सोमवार दिनांक ३० मार्च रोजी पहाटे एक वाजेच्या सुमारास जालना शहरात पालम संडे निमित्त आयोजित कार्यक्रमात घुसखोरी झाल्यानंतर वाद होऊन मारहाणीची घटना घडली. या घटनेत नगरसेवकासह सहा ते सात जण जखमी झाले आहेत.

ख्रिस्ती धर्मातील ४० दिवसांच्या उपवासाची सांगता निमित्त रविवारी पालम संडे साजरा करण्यात येत होता. या पार्श्वभूमीवर जालना शहरातील वाल्मीक नगर, ख्रिस्ती कॅम्प येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सार्वजनिक जेवणाचा कार्यक्रमही ठेवण्यात आला होता.

मात्र, कार्यक्रमादरम्यान इतर परिसरातील काही तरुणांनी याठिकाणी शिरकाव केल्याने वाद निर्माण झाला. या वादाचे रूपांतर भांडणात होऊन उपस्थितांना मारहाण करण्यात आली. या घटनेत प्रभाग क्रमांक ४ चे नगरसेवक संजय पाखरे, संदीप भालेराव, संजय हिरे, आदेश गायकवाड, अभिजीत कसबे यांच्यासह दोन ते तीन जण जखमी झाले आहेत.

घटनेची माहिती मिळताच सदर बाजार पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

दरम्यान, ही बातमी शहरात वेगाने पसरल्यानंतर घाटी रुग्णालयात ख्रिस्ती समाज बांधवांची मोठी गर्दी झाली होती. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी कदीम जालना पोलिसांनी तत्काळ रुग्णालयात धाव घेत जमाव पांगवला. दरम्यान, पोलिस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

## महिला संघटकपदी रुपम घुगे यांची नियुक्ती

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. ३० :** शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या आदेशावरुन जालना जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी जाहीर करण्यात आले आहेत. यात महिला आघाडीच्या जालना जिल्हा संघटकपदी रुपम रमेश घुगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



या नियुक्तीबद्दल शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी रुपम घुगे यांचा सत्कार केला. रुपम घुगे ह्या एक उच्च शिक्षित महिला असून शिवसेनेचे जेष्ठ नेते भानुदास घुगे यांच्या त्या सुनबाई आहेत. त्यांच्या नियुक्तीबद्दल सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

## नागराज मंजुळेंना बाबासाहेब आकात स्मृती पुरस्कार जाहीर



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. ३० :** २०२६ या वर्षीचा शिक्षण व सहकार महर्षी स्व. बाबासाहेब भाऊ आकात स्मृती पुरस्कार प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक, निर्माते नागराज मंजुळे यांना जाहीर झाला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते मंजुळे यांना पुरस्कार दिला जाणार आहे. शुक्रवार दिनांक ३ एप्रिल २०२६ रोजी परतूर येथे पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष कपिल आकात यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होईल. विभागीय शिक्षण सहसंचालक डॉ.पंकजा वाघमारे, कवी तथा गीतकार डॉ.दासू वैद्य, प्राचार्य डॉ.भागवत कटारे, प्राचार्य डॉ.शिवाजी मदन, मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा आशाताई आकात आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

**समस्या** प्रशासनाच्या असंवेदनशील कारभारावर संतप्त सवाल

## दरवाजे नसलेली शौचालये पाण्याविना कार्यान्वित-ॲड.अश्विनी धन्नावत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. ३० :** जालना शहराला महानगरपालिकेचा दर्जा मिळून आणि वंदना मगरे यांच्या रूपाने पहिल्या महिला महापौर लाभूनही शहरातील महिलांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न जैसे थे आहे. शहराच्या दोन सर्वोच्च पदांवर, म्हणजेच महापौर आणि आयुक्तपदी महिला असताना, महिलांसाठी स्वच्छ आणि सुरक्षित शौचालयांची वानवा असणे, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. याविरोधात आवाज उठवून मानवाधिकार आयोगाकडे दाद मागितल्यानंतर प्रशासनाने काही शौचालये तर बांधली, पण त्यांना दरवाजेच लावले नाहीत. हा प्रकार म्हणजे महिलांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखा आहे, अशा तीव्र शब्दांत सामाजिक कार्यकर्त्या ॲड.अश्विनी धन्नावत यांनी प्रशासनाच्या असंवेदनशील कारभारावर हल्लाबोल केला आहे.

शहरातील कोणत्याही प्रमुख बाजारपेठेत, गर्दीच्या ठिकाणी, पेट्रोल पंपावर किंवा मोठमोठ्या शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये महिलांसाठी एकही वापरण्यायोग्य शौचालय उपलब्ध नाही. जिथे शौचालये आहेत, तिथे अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले आहे. अनेक ठिकाणी तर शौचालयांना दरवाजे, नळ आणि पाण्याची सोयही नाही, ज्यामुळे त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. या गंभीर समस्येमुळे महिलांना प्रचंड शारीरिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यापूर्वी ॲड. धन्नावत यांनी मानवाधिकार आयोगात धाव घेतल्यानंतर प्रशासनाने काही ठिकाणी शौचालये उभारली. मात्र, ही शौचालये म्हणजे केवळ निधी वाया घालवण्याचा प्रकार ठरला आहे, कारण त्यांना दरवाजेच नसल्याने महिला त्याचा वापर करू शकत नाहीत. प्रशासनाचा हा बेजबाबदारपणा अक्षम्य आहे. स्वच्छ आणि सुरक्षित सार्वजनिक शौचालयांची उपलब्धता हा महिलांच्या सन्मानाने जगण्याच्या मूलभूत अधिकाराचा भाग आहे. संविधानाच्या अनुच्छेद २१ नुसार सन्मानाने जगण्याच्या हक्कात स्वच्छतेच्या अधिकाराचा समावेश होतो आणि ही सुविधा पुरवणे महानगरपालिकेची कायदेशीर जबाबदारी आहे. असे असतानाही जालन्यात न्यायालयाच्या आदेशांना केराची टोपली दाखवली जात आहे. केवळ कार्यालयात बसून बैठका घेण्याऐवजी, महापौर वंदना मगरे आणि आयुक्त तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी स्वतः शहरातील प्रमुख शॉपिंग आणि कमर्शियल कॉम्प्लेक्सला तात्काळ भेट देऊन पाहणी करावी. महिला सक्षमीकरणाच्या गोष्टी तेव्हाच खऱ्या अर्थाने सिद्ध होतील, जेव्हा महिलांना अशा मूलभूत सुविधा मिळतील. जिल्हाधिकाऱ्यांनी वैयक्तिकरित्या लक्ष घालून या कॉम्प्लेक्समध्ये महिलांसाठी स्वच्छ शौचालयांची सोय आहे की नाही, हे तपासावे आणि नसल्यास कठोर कारवाई करावी. सर्व व्यावसायिक संकुलांचे तातडीने सर्वेक्षण करून तिथे स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक करावे, अशी मागणीही त्यांनी केली. सार्वजनिक ठिकाणी सुविधांचा अभाव ही केवळ प्रशासकीय त्रुटी नसून ग्राहकांच्या हक्कांचेही उल्लंघन आहे. त्यामुळे या गंभीर प्रश्नावर दाद मागण्यासाठी आपण लवकरच अखिल भारतीय ग्राहक पंचायतीकडे तक्रार दाखल करणार आहोत, असेही ॲड. धन्नावत यांनी स्पष्ट केले. प्रशासनाने आतातरी जागे होऊन शहरातील प्रत्येक महिलेला तिचा स्वच्छ व सुरक्षित शौचालयाचा हक्क मिळवून द्यावा, अन्यथा हा केवळ महिलांचाच नव्हे, तर कायद्याचा आणि मानवतेचाही अपमान ठरेल, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे.



## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जालना, दि. ३० :** जिल्ह्यात दि.३१ मार्च रोजी भगवान महावीर जयंती, २ एप्रिलला हनुमान जन्मोत्सव, ३ एप्रिल रोजी गुड फ्रायडे तसेच छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथी आणि ५ एप्रिल रोजी इस्टर संडे या सण, उत्सव आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१ जानेवारी २०२६ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश ६ एप्रिल २०२६ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी-कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, मंगळवार, ३१ मार्च २०२६

## थोडक्यात

### संशयावरून पत्नीला पतीची मारहाण

खल्लार : संशयातून पतीने पत्नीला अश्लिल शिवीगाळ करीत मारहाण केली. ही घटना सावंगा येथे घडली. महिलेने खल्लार पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी पती दशरथ लक्ष्मण कुरवाडे (४७) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दोन महिलांचा शारीरिक व मानसिक छळ

अमरावती : सासरच्यांनी पैशांसाठी शारीरिक, मानसिक, भावनिक व आर्थिक छळ केल्याच्या दोन वेगवेगळ्या तक्रारी दोन विवाहितांनी कुऱ्हा व शेंदूरजनाघाट पोलीस ठाण्यात नोंदवल्यात कुऱ्हा पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून गोपाल हरिभाऊ चोपडे (४५), ज्ञानेश्वर हरिभाऊ चोपडे (५२) व दोन महिलांसह एका पुरुषाविरुद्ध सर्व रा. तुरखेड, अंजनगाव सुर्जी यांच्यावर गुन्हा नोंदवला, तर शेंदूरजनाघाट पोलिसांनी गणेश सुधाकर टेकाडे (३७), सुधाकर टेकाडे (६५) व उमेश टेकाडे (४०) यांच्यासह दोन महिला, सर्व रा. घोराड, ता. कळमेश्वर, जि. नागपूर यांच्यावर गुन्हा नोंदविला.

### टिप्परच्या धडकेत वृद्ध जखमी

चांदूर बाजार : भरधाव आलेल्या टिप्परने धडक दिली. त्यात देविदास तुकारामजी सदाफळे (६६, रा. चांदूर बाजार) हे जखमी झाले. ही घटना मोर्शी ते परतवाडा मार्गावर घडली. जखमीचा नातेवाईक विनय सुभाषराव सदाफळे (३४) यांनी चांदूर बाजार पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी टिप्परच्या (एमएच ४०-बीजी ९३५२) चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग

तिवसा : एका धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी १५ वर्षीय मुलगी आली होती. दरम्यान तेथे एका परिचिताने तिला मंदिर दाखवतो असे म्हणत सोबत घेतले. तिला वरच्या माळयावर नेत तिचा विनयभंग केला. मुलीने त्याच्या हाताला हिसका देत तेथून पळ काढला. तिच्या तक्रारीवरून तिवसा पोलिसांनी संजय बांते (५२) याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला.

### झटामझिरी येथे दोघांना मारहाण

वरुड : क्षुल्लक कारणावरून दोन युवकांनी संजय अजाबराव मालवे (५०) यांना मारहाण केली. याबाबत त्यानी वरुड पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी पवन पंचम सिरसाम (२५) व अन्य एक जण यांच्यावर गुन्हा दाखल केला. ही घटना झटामझिरी येथे घडली.

### युवकाला शिवीगाळ करून मारहाण

मोर्शी : खाद्यपदार्थाची कॅटिंग बंद करून विशाल रामदास पोकळे (२६) हा हातगाडी घेवून घराकडे परत येत होता. त्याला तिघांनी शिवीगाळ केली. याबाबत त्याने जाब विचारला असता, युवकांनी त्याला मारहाण करीत जखमी केले. ही घटना मोर्शी शहरातील श्रीकृष्ण पेठेत घडली.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

चांदूर बाजार : अल्पवयीन मुलीवर युवकाने वारंवार अत्याचार करीत मातृत्व लादले. ८ महिन्यांची गर्भवती असलेल्या पिडीतेने जिल्हा स्त्री रुग्णालयात मृत बालकाला जन्म दिला. पिडीतेच्या तक्रारीवरून शिरजगाव कसबा पोलिसांनी विकास सुंदर कचाये (२४) याच्याविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला.

### दारू विक्रेत्यावर कारवाई

अमरावती : बडनेरा पोलिसांनी कंपासपुरा येथे एका अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई केली. त्याच्या ताब्यातून ८८० रुपयांची दारू जप्त केली. त्यावर गुन्हा नोंदवला.

# मनपाचे ८७६ कोटींचे बजेट मंजूर!

**स्थायी समितीचे अध्यक्ष अविनाश मार्डीकर यांचा दावा; अनेक शीर्षकांखालील तरतुदीत वाढ**

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.३० :** आर्थिक वर्ष सुरू होण्याच्या एक दिवस आधी, महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत अखेर अर्थसंकल्पीय ठराव सादर करण्यात आला. परंपरेनुसार, स्थायी समितीचे अध्यक्ष अविनाश मार्डीकर सभागृहात बसले आणि त्यांनी एकूण ८७६ कोटी २६ लाख रुपयांचा अर्थसंकल्पीय ठराव सादर केला, ज्यामध्ये ७११ कोटी ६ लाख रुपयांचा खर्च आणि १६५ कोटी २० लाख रुपयांची बचत दर्शविली आहे. हे लिहित असताना, पालिका सभागृहात सदस्य अर्थसंकल्पीय तरतुदींवर विना-शुल्क चर्चेत गुंतले होते.



सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी अनेक मुद्द्यांवरून प्रशासनावर टीका केली. अनेक महत्त्वाचे विषय उपस्थित करण्यात आले. माजी महानगरपालिका आयुक्त अष्टिकर यांच्या कार्यकाळात घेतलेल्या अनेक निर्णयांची चौकशी करण्यासाठी एका समितीची मागणी करण्यात आली आणि तिची घोषणाही करण्यात आली. प्रस्तावित उत्पन्न आणि खर्च अध्यक्ष मार्डीकर यांनी सभागृहाला माहिती दिली की, रु. स्थायी समितीसमोर ४२ लाख रुपये सादर करण्यात आले, ज्यामध्ये एकूण उत्पन्न ४३७ कोटी ६६ लाख रुपये आणि खर्च ४३७ कोटी २४ लाख रुपये आहे. यामध्ये ३ कोटी ८४ लाख रुपयांची पूर्वीची बचत आणि ४३३ कोटी ८३ लाख रुपयांच्या नवीन महसुली उत्पन्नाचा समावेश आहे. समितीने मालमत्ता कर आणि इतर महसुली उत्पन्नात २१ कोटी ७८ लाख रुपयांची वाढ झाल्याचा अहवाल दिला आहे, ज्यामुळे एकूण २२ कोटी २० लाख रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध झाला आहे. २५ शीर्षकांमध्ये २६ कोटी रुपयांची वाढ झाली असून काही शीर्षकांमधील खर्चात ५ कोटी ७४ लाख रुपयांची घट झाली आहे. अध्यक्ष मार्डीकर यांनी सर्वसाधारण सभेला माहिती दिली की प्रशासनाने प्रभाग विकास निधी आणि ऐच्छिक निधीसाठी ९५ लाख (९.५ दशलक्ष) मंजूर केले होते.

जेव्हा त्यांनी सर्वसाधारण सभेला माहिती दिली की ही रक्कम तिप्पट वाढवून २८५ लाख (२८.५ दशलक्ष) करण्यात आली आहे, तेव्हा सर्व सदस्यांनी या घोषणेचे स्वागत केले. नागरिकांच्या सोयीसुविधा वाढवण्यासाठी प्रभाग विकास निधी आणि ऐच्छिक निधीचा वापर केला जाईल, असा विश्वास मार्डीकर यांनी व्यक्त केला. हे लिहित असताना, अर्थसंकल्पीय तरतुदींवर जोरदार चर्चा सुरू होती.

### स्वच्छतेवर ४०.९५ दशलक्ष खर्च

कायमस्वरूपी आस्थापनांसाठी १०.२५ दशलक्ष, कर विभागासाठी ७.१५ दशलक्ष, अग्निशमन दलासाठी २.२५ दशलक्ष, पाणीपुरवठयासाठी ८.११ दशलक्ष, प्रकाश विभागासाठी ९.० दशलक्ष आणि स्वच्छतेसाठी सर्वाधिक ४०.९५ दशलक्ष खर्च दाखवण्यात आला आहे. आरोग्य विभाग ५.६७ कोटींचा अर्थसंकल्प खर्च करेल अशी अपेक्षा आहे. सीसीटीव्ही बसवण्यासाठी १ कोटी खर्च अपेक्षित आहे. महानगरपालिका कंत्राटी मनुष्यबळावर १८ कोटी खर्च करणार आहे. आकस्मिक खर्चासाठी ७ लाख बाजूला ठेवण्यात आले आहेत. हुतात्मा स्मारकाच्या देखभालीसाठी ५ लाख रुपये, बागेच्या देखभालीसाठी ३ कोटी रुपये, ग्रीन जिमसाठी ३० लाख रुपये, शिवटेकडी पर्यटनासाठी १० लाख रुपये, शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या देखभालीसाठी २५ लाख रुपये, अतिक्रमण हटवण्यासाठी ६५ लाख रुपये इत्यादी तरतुदी महानगरपालिका सभागृहापुढे ठेवण्यात आल्या.

# मध्यवर्ती कारागृहात कैद्याचा कर्मचाऱ्यांवर हल्ला

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि.३० :** अमरावती मध्यवर्ती कारागृहात एक अशी घटना उघडकीस आली आहे, जिथे एका कैद्याने कारागृह कर्मचाऱ्याशी गैरवर्तन केले, त्याला मारहाण केली आणि सुरक्षेत अडथळा आणला. मध्यवर्ती कारागृह कर्मचाऱ्याने दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे, फ्रेजरपुरा पोलिसांनी आरोपी कैद्याविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.आरोपी चरनदास राजपाल (२२, अमरावती) हा मध्यवर्ती कारागृहातील कैदी आहे. शनिवारी, सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास, त्याला प्रवेश प्रक्रियेसाठी कारागृह परिसरातील न्यू बॅरिकेड परिसरात नेले जात होते. याच दरम्यान, चरनदासने कर्तव्यावर असलेल्या कारागृह कर्मचारी हृतिक सुधीर बोरकर यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने मोठयाने आरडाओरडा केला, अपमानकारक भाषा वापरली, त्याच्याशी झटापट केली आणि कर्मचाऱ्याला गंभीर दुखापत करण्याच्या उद्देशाने त्याच्यावर पाण्याची बादली फेकली. शिवाय, आरोपीने कर्मचाऱ्याला धमकावले आणि शिवीगाळ केली. या वर्तनामुळे तुरुंगाच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन, वरिष्ठ अधिकाऱ्यांना तात्काळ माहिती देण्यात आली.

जवळच कर्तव्यावर असलेले अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. वाद वाढल्यानंतर हे प्रकरण पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तुरुंग प्रशासनाच्या लेखी तक्रारीच्या आणि कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्याच्या अहवालाच्या आधारे, फ्रेजरपुरा पोलिसांनी आरोपी चरनदास राजपाल याच्याविरुद्ध सरकारी कामात अडथळा आणल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला.

# विद्यार्थ्यांना मिळणार एकत्रित गुणपत्रिका व प्रमाणपत्र!

**नावाच्या क्रमातही होणार बदल**

अजिंक्य भारत | सुधीर केने

**अमरावती, दि.३० :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी - मार्च २०२६ च्या परीक्षेत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण बदल जाहीर केला आहे .यावर्षीपासून दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रक आणि प्रमाणपत्र स्वतंत्र न देता ते एकत्रित स्वरूपात देण्यात येणार आहे.



त्याचबरोबर आता गुणपत्रकावर विद्यार्थ्यांचे नाव लिहिताना त्यातही क्रम बदलविण्यात आला आहे पूर्वी आडनाव प्रथम दिले जायचे आता मात्र विद्यार्थ्यांचे नाव ,वडिलांचे नाव आणि आडनाव या क्रमाने नाव छापले जाणार आहे. या क्रमाने बदलामुळे पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी आपल्या नावाचा क्रम तपासून घेणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश पत्रावरील फोटो अस्पष्ट होते आणि त्यांचे फोटो मुख्याध्यापकांनी दुरुस्त केले आहेत अशा विद्यार्थ्यांची माहिती पुन्हा अपलोड करणे अनिवार्य आहे. पूर्वी निकाल लागल्यानंतर गुणपत्रिका दिल्या जात होती व त्यानंतर काही महिन्यांनी दहावी बारावीच्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र शाळेला दिले जात होते. परंतु, अनेक बाबींसाठी गुणपत्रिकेसोबत प्रमाणपत्र ही मागितल्या जाते त्यामुळे राज्य शिक्षण मंडळाने आता गुणपत्रक आणि प्रमाणपत्र एकाच सोबत देण्याचा निर्णय घेतला आहे विशेष म्हणजे ते वेगवेगळे न देतात एकत्र दिल्या जाणार आहे त्यामुळे विद्यार्थ्यांचा फायदाच होणार आहे.

### दुरुस्तीची जबाबदारी

गुणपत्रक आणि प्रमाणपत्र आता एकाच कागदावर असतील तसेच नावाचा नवा क्रम विद्यार्थ्यांचे नाव त्यानंतर वडिलांचे आणि नंतर आडनाव असेल. नावात किंवा फोटोत काही त्रुटी असल्यास शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडून तातडीने दुरुस्त घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याबाबत राज्य मंडळाचे सचिव डॉ.दीपक माळी यांनी अधिकृत पत्रक प्रसिद्ध केले आहे.

# मारहाण करून युवकासमोर युवतीवर सामूहिक अत्याचार!

**पाच आरोपींना अटक | पोहरा-भानखेडा मार्गावरील घटना**

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.३० :** पोहरा ते भानखेडा मार्गाने फिरायला गेलेल्या युवक-युवतीला पाच युवकांनी पकडून जबर मारहाण केली. त्यानंतर युवकाचे हातपाय बांधून युवतीवर सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना शनिवारी (दि.२९) रात्री ११ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. याघटनेत फ्रेजरपुरा पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून लहान भानखेडा येथे राहणाऱ्या पाचही नराधमाला अटक केली.



पीडिता व तिचा मित्र नेहमीच पोहरा ते लहान भानखेडा मार्गाने फिरायला येत होते आणि मुख्य रस्त्यावर दुचाकी उभी करून गप्पा गोष्टी करीत होते. त्यामुळे पाचही नराधम त्यांच्यावर आधीच लक्ष ठेऊन होते. शनिवारी रात्री दोघे येताच पाचही नराधम जंगलातून आले आणि युवकाला मारहाण करून दोघांना ओढत जंगलात घेऊन गेले आणि पीडितेवर सामुहिक अत्याचार केला. अमरावती-पोहरा तसेच पोहरा ते लहान भानखेडा मार्गावर शहरातील बरेच युवक-युवती सायंकाळच्या वेळेला दुचाकी किंवा चारचाकीने फिरायला जातात. त्यामुळे अटकेतील पाचही नराधमांनी या आधी सुध्दा अशा प्रकारचे कृत्य केले असावे. परंतु बदनामीच्या भीतीने महिला तक्रार देण्यास आली नसावी असा संशय पोलिसांचा आहे. त्यामुळे पोलीस त्यांची कसून चौकशी करीत आहेत शहरात राहणारी एक युवती व तिचा मित्र पोहरा मार्गाने दुचाकीने फिरायला नेहमीप्रमाणे गेले होते. त्याचप्रमाणे शनिवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास दोघे दुचाकीने पोहरा ते भानखेडा मार्गाने गेले. निर्मनुष्य रस्त्यावर दुचाकी उभी करून दोघेही बोलत थांबले होते. त्याचवेळी जंगलातून पाच युवक त्यांच्याजवळ आले आणि युवकाला मारहाण करू लागले. त्यावेळी त्याने युवतीला वाचविण्याचा प्रयत्न केला परंतु पाचही युवक ऐकायला तयार नव्हते. दोघांनाही त्यांनी मुख्य रस्त्यापासून ३०० मिटर आत जंगलात नेले आणि दोघांचे मोबाईल हिसकावून पैशाची मागणी केली. युवकाजवळ १२० रुपये होते ते त्याने काढून दिले. त्यानंतर युवतीला पकडून बाजुला नेले आणि युवकाचे हात बांधून त्याच्यासमोर एकाने तिच्यावर अत्याचार केला. तेव्हा अन्य आरोपींनी युवतीचे हात-पाय पकडून ठेवले होते. त्यावेळी युवती आरडाओरडा करीत मदत मागत होती. परंतु तिचा आवाज कोणांचपर्यंत पोहचला नाही. अत्याचार केल्यानंतर पाचही युवकांनी त्यांचे मोबाईल परत केले आणि जंगल मार्गाने निघून गेले. मैत्रिणीला बेशुध्द व जखमी अवस्थेत पाहताच युवकाने तिला आधार देत उठवून बसविले. एका क्षणात आयुष्य उदध्वस्त झालेले पाहताच काय करावे, कुठे जायचे असा प्रश्न त्यांच्यापुढे होता. अखेर युवकाने तिला तिच्या घरी नेले. मात्र रक्तस्त्राव जास्त प्रमाणात होत असल्यामुळे ती बोलण्याच्या स्थितीत नव्हती, तेव्हा युवकाने घडलेला प्रकार घरच्यांना सांगितला. तेव्हा लगेच युवतीला जिल्हा सामान्य रुग्णालात दाखल केले.

> घटनेनंतर सामुहिक अत्याचाराचा गुन्हा अटक करण्यात आली आहे. प्रकरण अतिशय गंभीर असल्यामुळे आरोपींचे नावे सध्या देण्यात आले नाही. मात्र पोलीस कस्टडी मिळताच पाचही आरोपींचे नावे प्रसार माध्यमांना देण्यात येणार आहेत.
>
> **गणेश शिंदे,**
> **पोलीस उपायुक्त अमरावती**

दरम्यान रात्री ११.३० वाजता फ्रेजरपुरा पोलिसांना माहिती मिळाली. माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांसह गुन्हे शाखा, राजापेठ ठाण्याचे अधिकारी आणि तिन्ही पोलीस उपायुक्तांनी घटनास्थळी धाव घेतली आणि जखमी युवकाला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने घडलेला सर्व घटनाक्रम सांगितला. घटनेची गंभीरता पाहता पोलिसांनी गुन्हा दाखल करून पाचही नराधमांचा कसून शोध सुरू केला. परंतु मध्यरात्रीपर्यंत पोलिसांना आरोपींची माहिती मिळाली नाही. रात्री २ ते ३ वाजताच्या सुमारास फ्रेजरपुरा पोलिसांनी ठोस माहितीच्या आधारावर एकाला ताब्यात घेतले आणि त्याची कसून चौकशी केली असता त्याने चारही युवकांची नावे सांगितली. तत्काळ पाचही युवकाना रात्रीच अटक केली. मात्र घटनेची गंभीरता पाहता पोलिसांनी अद्यापही पाचही नराधमांची नावे गुप्त ठेवली आहेत.

**संकट** | **कृषी विभाग व संशोधकांचे दुर्लक्ष शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान !**

# अती तापमानामुळे संत्रा 'आंबिया बहार' धोक्यात!

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**मोर्शी, दि.३० :** ड्राय झोनमध्ये असलेल्या मोर्शी तालुक्यात भीषण दुष्काळातून अथक परिश्रम घेऊन जगवलेल्या संत्रा बागांवर बदलत्या वातावरणाने अज्ञात रोगाचे सावट आल्याचे दिसत आहे. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे संत्रा गळती, संत्रा झाडांची पाने पिवडी पडून संत्रा झाडे वाळत चालली आहे. यावर सर्व उपाययोजना करून काही उपयोग होत नसल्याने संत्रा उत्पादक शेतकरी हैराण झाले आहेत. यामुळे संत्राबागा वाचविण्याचे आव्हान संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहे. संशोधकांनी व कृषी विभागाने संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी कृषी विभागाकडे केली आहे.



मोर्शी तालुक्यातील संत्रा उत्पादक शेतकरी सध्या अनेक संकटाचा सामना करत आहेत. वाढत्या तापमानामुळे संत्रा 'आंबिया बहार' पूर्णपणे धोक्यात आला असून मोठ्या प्रमाणावर फळगळ सुरू आहे. मात्र या गंभीर परिस्थितीत कृषी विभाग आणि केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थेच्या संशोधकांचे स्पष्ट दुर्लक्ष होत असल्याचा संताप संत्रा उत्पादक शेतकऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे.

मार्च महिन्यापासून तापमानाने ४० अंश सेल्सियसचा टप्पा ओलांडला आहे. उष्ण वारे आणि पाण्याची टंचाई यामुळे संत्रा झाडांवर प्रचंड ताण निर्माण झाला असून ५० टक्क्यायांपर्यंत फळगळ झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत असतांना प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी केला आहे. दरवर्षी अशा संकटाच्या वेळी तात्काळ मार्गदर्शन व उपाययोजना अपेक्षित असतात. परंतु यंदा कृषी विभागाकडून कोणतेही प्रभावी मार्गदर्शन मिळाले नाही. तसेच संत्रा संशोधन करणाऱ्या संस्थांनीही वेळेवर योग्य उपाययोजना किंवा सूचना न दिल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. शेतकरी मरत असताना अधिकारी आणि संशोधक केवळ कागदोपत्री कामात व्यस्त आहेत का? असा संतप्त सवाल संत्रा उत्पादक शेतकरी उपस्थित करत आहेत. लाखो हेक्टरवरील संत्रा बागा धोक्यात असतांना ना प्रत्यक्ष पाहणी, ना तातडीची उपाययोजना—यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. शासनाने तात्काळ या प्रकरणात लक्ष घालून कृषी विभाग व संबंधित संशोधकांची जबाबदारी निश्चित करावी, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई जाहीर करावी आणि तज्ञांकडून तातडीने मार्गदर्शन उपलब्ध करून द्यावे, अन्यथा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी प्रशासनाला दिला आहे.

### संत्रा उत्पादकांना मार्गदर्शन करण्यासाठी संशोधक उदासीन !

तापमान दिवसेंदिवस वाढतच असल्याने झाडावर असलेला आंबिया बहार या उष्ण तापमानाने गळला. काही संत्रा झाडावरच काळे होत आहे. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे. मागे लागलेला विवेंचनेचा फेरा या वर्षी तरी दूर होतील या आशेवर असताना वातावरणातील वाढत्या तापमानाने झाडावरील आंबिया बहाराला गळती लागली. संत्रा ५० टक्केच्यावर संत्रा फळे गळल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले असतांना सुद्धा संशोधक अजूनही कुंभाकर्णी झोपेतच असल्याचे चित्र दिसत आहे. **- रुपेश वाळके,**
**अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस**

# वाहन हटविण्यावरून चाकूहल्ला

**पठाण चौकातील घटना, आरोपी फरार**

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती,दि.३० :** नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पठाण चौक परिसरात रविवार, २९ मार्चच्या रात्री एका किरकोळ वादाचे रूपांतर हिंसक घटनेत झाले. घरासमोर पार्क केलेले वाहन हटवण्यावरून झालेल्या वादात आरोपीने चाकूने हल्ला केल्याने एक व्यक्ती गंभीर जखमी झाला. जखमी व्यक्तीची ओळख शेख मुतुर्जा शेख मेहबूब (५०) अशी पटली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री सुमारे १० वाजता शेख मुतुर्जा यांच्या घरी पाहुणे येणार होते. या घटनेदरम्यान, घरासमोर पार्क केलेले वाहन हटवण्यावरून त्यांचा आरोपीसोबत वाद झाला. हा वाद विकोपाला गेला आणि आरोपीने शेख मुतुर्जा यांच्या डोक्यात धारदार शस्त्राने हल्ला केला. ते गंभीर जखमी झाले. सर्व आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. उपस्थित लोकांनी तात्काळ जखमी व्यक्तीला जिल्हा रुग्णालयात दाखल केले, जिथे त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मुख्य आरोपी शहजाद हा इतर तीन ते चार जणांसोबत या हल्ल्यात सामील होता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोर कुख्यात गुन्हेगार असून त्यांच्यावर खुनासह अनेक गंभीर गुन्ह्यांची यापूर्वीही नोंद आहे. घटनेची माहिती मिळताच नागपुरी गेट पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी तपास सुरू केला. हे वृत्त लिहीत असताना, पोलीस जखमींचे जबाब नोंदवत होते आणि आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पोलीस फरार संशयितांचा शोध घेत आहेत.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, मंगळवार, ३१ मार्च २०२६



## थोडक्यात

### बालगृहातून मुलगा पसार

अमरावती : शौचालयाला जातो म्हणून सांगून गेलेला १६ वर्षीय मुलगा बेपत्ता झाला. ही घटना रुख्मिणी नगरातील शासकीय मुलांचे निरीक्षणगृह व बालगृहात घडली. त्याला अज्ञाताने पळवून नेले असावे, असा संशय फिर्यादीमध्ये कल्पेश हरिदास टपके (२९) यांनी व्यक्त केला. फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### कुल्फी विक्रेत्यावर युवकाचा चाकू हल्ला

अमरावती : ग्राहकाला कुल्फी देताना विक्रेत्याकडून ती खाली पडली. दुसरी कुल्फी देत असताना ग्राहकाने विक्रेत्याला शिवीगाळ करीत जवळच्या चाकूने त्याच्यावर दोन वार करीत जखमी केले. ही घटना जयहिंद चौक, बडनेरा येथे घडली. जखमीचा मुलगा आशिष मुकूंदलाल प्रजापती (३१) याच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी चाकू हल्ला करणाऱ्या अंक्या उर्फ अनिकेत गणवीर (३०) याच्यावर गुन्हा दाखल केला.

### समुपदेशनासाठी आलेल्या जावयाला मारहाण

अमरावती : येथील कौटुंबिक न्यायालयात समुपदेशनासाठी आलेल्या जावयाला चुलत सासऱ्यासह अन्य एकाने मारहाण केली. त्यात जावई प्रणव प्रमोद आष्टिकर (४५, रा. नागपूर) हे जखमी अनिल महाजन (७५) व विनीत पद्माकर महाजन (४२) दोघेही रा. नागपूर यांच्यावर गुन्हा नोंदवला.

### श्याम नगरात दुचाकी लंपास

अमरावती : नेहमीप्रमाणे रात्रीच्या वेळी फिर्यादी राजेंद्र हरिश्चंद्र चौधरी (५८) यांनी त्यांची दुचाकी (एमएच २७-एवाय ४७५१) घरासमोर उभी केली होती. अज्ञाताने रात्रीतून ती चोरून नेली. तिची अंदाजे किंमत ७० हजार रुपये आहे. त्यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत आहे.

### अपघातात चार जण जखमी

अमरावती : शहरात एकाच दिवशी तीन वेगवेगळे अपघात झालेत. त्यात एका युवतीसह चौघे जखमी झाले. या घटना बिझीलँड समोर, गाडगे नगर चौकातील उड्डाणपुलावर व गजानन महाराज मंदिरासमोर इर्विन रुग्णालयाच्या शवविच्छेदनगृहाजवळ घडली. या संदर्भात नांदगाव पेठ, गाडगे नगर व कोतवाली पोलिसांनी अपघाताला कारण ठरलेल्या चालकांवर गुन्हे नोंदवलेत. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे.

### नातवाची कुटुंबियांना मारहाण

अमरावती : नातू रात्री उशीरा दारू पिवून घरी आला. त्यामुळे आजोबा हरिश्चंद्र नारायणराव मोहोड (८४) यांनी त्याला हटकले. त्याचा राग आल्याने त्याने दारूच्या नशेत आजीआजोबासह वडील व भावाला शिवीगाळ करीत मारहाण केली. ही घटना सरस्वती नगर येथे घडली.

### कुसुमदेवी खेतान यांचे निधन

परतवाडा : येथील विद्यानिकेतन कॉलनी परिसरात



राहणाऱ्या श्रीमती कुसुमदेवी राजेंद्रजी खेतान यांचे आज दिनांक ३० मार्च २०२६ रोजी निधन झाले.त्या श्री राजेंद्रजी खेतान यांच्या धर्मपत्नी होत तसेच गोपाल, स्वप्नील आणि ऋषी खेतान यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या निधनाने खेतान कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

# २४१ पाणी पुरवठा योजनेवर बसणार सोलर युनिट

## आ.प्रताप अडसड यांचा पाठपुरावा |वीज बिलापासून मिळणार मुक्ती

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि.३०:** तिन्ही तालुक्यातील जलजीवन मिशन व राष्ट्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजनेवर सोलर युनिट बसविण्याची प्रक्रिया सुरू होणार असून आमदार प्रताप अडसड यांच्या प्रयत्नाला यश आले आहे.दरम्यान आता या पाणीपुरवठा योजना वीज बिलापासून मुक्त होणार आहे



धामणगाव रेल्वे विधानसभा मतदार संघात धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर हे तीन तालुके येत असून, तालुक्यातील ग्रामीण भागात जलजीवन मिशन व राष्ट्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या आहे. सदर पाणी पुरवठा योजनेचे विद्युत देयके ग्राम पंचायतीला मोठ्या प्रमाणात येत असल्यामुळे ग्राम पंचायत कडून ती देयके भरणे शक्य होत नाही काही ठिकाणी थकीत वीज देयकामुळे पाणीपुरवठा विद्युत खंडित करण्यात येते. नांदगाव खंडेश्वर ११३, चांदूर रेल्वे ७६ ,धामणगाव रेल्वे तालुक्यातील ५२ जलजीवन मिशन व राष्ट्रीय ग्रामीण पाणीपुरवठा योजनेवर सोलर युनिट बसविण्यासाठी आमदार प्रताप अडसड यांनी राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा केला.

त्यांच्या पाठपुराव्याची दखल घेत आगामी काळात तिन्ही तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेवर सोलर युनिट बसविण्यात येणार आहे यासाठी प्रशासन स्तरावर ही प्रक्रिया सुरू आहे.आमदार प्रताप अडसड यांनी धामणगाव मतदार संघातील पाणीपुरवठा योजनेवर सोलर युनिट बसविण्यासाठी पुढाकार घेतल्याने तिन्ही तालुक्यातील सरपंच, उपसरपंच तसेच ग्रा.प सदस्य व ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहे. प्रत्येक शासकीय कार्यालयावर आता सोलर युनिट तिन्ही तालुक्यातील ग्रामपंचायत, तहसील कार्यालय ,पंचायत समिती, नगरपरिषद ,आयटीआय तालुका कृषी अधिकारी कार्यालय, एसडीओ कार्यालय ,तसेच सर्व प्रशासकीय कार्यालयावर जिल्हा नियोजन समिती अंतर्गत मेढा मधून सोलर युनिट बसविण्यासाठी आमदार प्रतापदादा अडसड यांनी पुढाकार घेतला आहे ही प्रक्रिया धामणगाव मतदार संघात युद्ध स्तरावर राबविण्यात येत आहे. आगामी काळात या शासकीय कार्यालयावर सोलर युनिट बसविण्यात येणार असल्याने विज बिला पासून मुक्ती मिळणार आहे.

# गांधी विचार संस्कार परीक्षेत शंकर विद्यालयाची बाजी



अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.३० :** गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव द्वारा आयोजित गांधी विचार संस्कार परीक्षेत शंकर विद्यालयच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे.यामध्यें एका विद्यार्थ्याला रौप्य तर दोन विद्यार्थ्यांना कांस्य पदक मिळाले आहे. दरवर्षी शंकर विद्यालयाचे विद्यार्थी या परीक्षेत सहभागी होतात.यावर्षी संपुर्ण शाळेतील एकूण१८९ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये वर्ग ९ चे विद्यार्थी संस्कार ओलीवकर, ईश्वर हाते,ईश्वरी नागपुरे या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे रौप्य व कंस्य पदक मिळवले आहे. यावेळी त्यांचा मुख्याध्यापिका सुचिता फुटाणे यांच्या हस्ते पदक व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

या परीक्षेसोबतच गांधी तीर्थ स्वच्छ शाळा स्पर्धेतही शाळा सहभागी झाली आहे.यातून विविध ३० उपक्रम शाळेनी राबविले आहेत. याकरिता स्पर्धेचे समन्वयक डॉ. तुषार देशमुख सर्व शिक्षक व विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

# दत्तात्रय वारे गुरुजींचा चांदूरबाजार तालुक्यातील शिक्षकांशी शैक्षणिक संवाद

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चांदूरबाजार,दि.३० :** ग्रामीण शिक्षण व्यवस्थेत नाविन्यपूर्ण बदल घडवून आणत जिल्हा परिषद शाळांना आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे उल्लेखनीय कार्य करणारे आदरणीय दत्तात्रय वारे गुरुजी यांचा चांदूरबाजार तालुक्यातील शिक्षकांशी विशेष शिक्षण संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम दिनांक ०४ एप्रिल २०२६, रोजी दुपारी १.०० वाजता, संत गुलाबराव महाराज सेवा संस्था,भक्तिधाम येथे संपन्न होणार आहे. वाबळेवाडी (जालिंदरनगर) येथील जिल्हा परिषद शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून देणे तसेच अल्पावधीत गरदरेवाडी येथील शाळेचे रूपांतर आधुनिक, गुणवत्तापूर्ण शिक्षण केंद्रात करण्याचा त्यांचा अनुभव प्रेरणादायी आहे.



# युवा विचार कृती संमेलनात शिव विचारांचा जागर!

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.३० :** आम्ही सारे शिवप्रेमी क्षात्रवीर संभाजी क्रीडा व युवक प्रतिष्ठान ,संभाजी ब्रिगेड,जिजाऊ ब्रिगेड यांच्या वतीने राज्यस्तरीय छत्रपती शिवराय युवा विचार कृती संमेलनाचे आयोजन चांदुर बाजार येथील जगदंब पब्लिक स्कूल येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात शिवग्रंथ दिंडीने करण्यात आली. संमेलनच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध वक्ते तथा शिवव्याख्याते शिवश्री कपिल ढोके,



उद्घाटन समारंभाध्यक्ष पदी वक्ते व विचारवंत प्रा.प्रेमकुमार बोके व सुप्रसिद्ध वक्ते प्रा प्रवीण देशमुख प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. शिवशिलेदार वंशज नानासाहेब धुमाळ, राजगड व डॉ धनाजी नाईक कोंडे, खेड शिवापुर यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. डी आर डी ए संचालक प्रीतीताई देशमुख चौधरी, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रियाताई देशमुख, गोसी टोम्पे शिक्षण संस्था अध्यक्ष भास्करदादा टोम्पे, जिजाऊ बँक अध्यक्ष अविनाशराव कोठाळे व जिजाऊ ब्रिगेड अध्यक्षा सीमाताई बोके, पोलीस निरीक्षक अशोकराव जाधव, उपप्राचार्य डॉ नंदकिशोर गव्हाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. समारंभाच्या स्वागताध्यक्षस्थपदी जगदंब पब्लिक स्कुलचे अध्यक्ष विनोदराव कोरडे होते. संमेलनात छत्रपती शिवरायांचे धर्मनिरपेक्षक विचार व आजचा महाराष्ट्र या विषयावर शिवसंवाद सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रात मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता स्पष्ट करत तरुणांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले या प्रसंगी प्रसिद्ध वक्ते प्रा प्रवीण देशमुख मार्गदर्शन करताना म्हणाले, महाराष्ट्र साहित्य संमेलन परंपरेत या छत्रपती शिवराय युवा विचार कृती संमेलनाने शिव विचारांचा एक नवीन पायंडा रचला आहे. हे संमेलन शिवचरित्राच्या विविध पैलूंवर वैचारिक मंथन घडवते.

# वैद्यकीय अधिकारी डॉ.धिरज साळुंके यांना निरोप

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**खोलापूर, दि.३० :** आयुष्मान आरोग्य मंदिर खोलापूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. धिरज साळुंके यांची पदव्युत्तर शिक्षणाकरिता निवड झाल्याने आयुष्यमान आरोग्य मंदिर खोलापूर येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेकडून डॉ. धिरज साळुंके यांना निरोप समारंभ देण्यात आला.



डॉ. धिरज साळुंके आयुष्यमान आरोग्य मंदिर खोलापूर येथे दिनांक १५ सप्टेंबर २०२१ रोजी रुजू झाले असून त्यांनी त्यांच्या आतापर्यंतच्या कार्यकिर्दीमध्ये आयुष्यमान आरोग्य मंदिर खोलापूरला कायाकल्प, एनक्युएएस यासारखे राज्यस्तर व राष्ट्रीय पुरस्कार मिळवून दिले. यासाठी त्यांनी स्वत:हून मेहनत घेतली व कर्मचारी यांनी सुद्धा त्यांना तितकीच साथ दिली. डॉ. धिरज साळुंके यांचा कर्मचारी सोबत लाभलेला सहवास आणि उत्कृष्ट कार्याबद्दल, कर्मचारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच त्यांचा पुष्पगुच्छ व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि नियोजन श्री प्रवीण रमेशपंत निंभोरकर यांचे कडून करण्यात आले तसेच कार्यक्रमाला उपस्थिती श्रीमती पार्वती चाचूरकर आरोग्य सहाय्यक, श्री रामेश्वर अंभोरे आरोग्य सेवक, श्री ज्ञानेश्वर पॉल, श्रीमती सुवर्णा ढोरे, श्रीमती वैशाली पोहेकर, श्री गजानन केवटे,श्री संजू भाऊ शेटे वाहन चालक,सर्व आशा स्वयंसेविका, तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक माननीय श्री कैलास बांगर इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

### आमदार अभ्यंकर यांच्या पत्नीचे निधन

अंजनगाव सुर्जी : मुंबई शिक्षक मतदार संघाचे आमदार ज. मो. अभ्यंकर यांच्या धर्मपत्नी निर्मलाताई जगन्नाथ अभ्यंकर यांचे दि.२७ मार्च २०२६ रोजी आजाराने लीलावती हॉस्पिटल येथे दु:खद निधन झाले. मृत्यूसमयी यांचे वय अंदाजे ७० वर्ष होते. कौशल्या शृंगारे एजुकेशन फाऊनडेशन मुंबई च्या उपाध्यक्ष होत्या, त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना ,नातवंडे, व मोठा आप्त.परिवार आहे. त्यांचे मूळ गाव अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विहिगाव हे आहे. त्यांचा सामाजिक व शैक्षणिक कार्यात फार मोठा सहभाग होता. त्या शिक्षक संघटनेसाठी माई असलेल्या यांच्या मायेच्या आठवणी, त्यांनी जपलेली नाती, अनेकांना दिलेला आधार आणि आपुलकी यामुळे त्यांनी अनेकांच्या हृदयात जिव्हाळ्याचं घर केले होते.



# श्रीक्षेत्र नागरवाडीचे जवळ साकारले इंद्रभवन

## बापूसाहेब देशमुख यांच्या संकल्पनेच करावं तेवढं कौतुक कमीच - संदीप पाटील अरबट

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**चांदूर बाजार, दि.३० :** श्री संत गाडगे महाराजांचे अंतिम श्रद्धास्थान असलेले श्री क्षेत्र नागरवाडी या ठिकाणी गाडगेबाबांची इच्छा लेखी स्वरूपात प्रगट केली होती.

या जागेचं जे जे करता येईल तेथे करा श्रीक्षेत्र नागरवाडी इंद्रभवन करा या संकल्पनेला बापूसाहेब देशमुख यांनी संपूर्णपणे वाहून घेतलं आणि आज जवळजवळ ७५ ते ८० टक्के पेक्षा जास्त इंद्रभवन झालेला आपल्या दिसत असल्याचे प्रतिपादन फ्रेंड्स शकता ग्रुप दर्यापूरचे संस्थापक प्रमुख संदीप पाटील अरबट यांनी केले ते श्री संत गाडगे महाराजांच्या १५० व्या जयंती उत्सवानिमित्त गावागावात गाडगेबाबांचा खराटा कसा पोहोचेल यासाठी ते प्रयत्न करीत आहेत आणि त्याचा शुभारंभ बापूसाहेब देशमुख यांना चार खराटे देऊन श्रीक्षेत्र नागरवाडी



येथे जाऊन त्यांनी भेट दिली बापूसाहेब देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले त्यांच्या समवेत रोहिणी फाउंडेशन दर्यापूरचे उपाध्यक्ष संतोषजी मिसाळ गाडगे महाराज मिशन श्री संत गाडगे महाराज बालगृह दर्यापूरचे संचालक गजानन देशमुख हे प्रामुख्याने उपस्थित होते बापूसाहेब देशमुख यांनी स्वत:चे आयुष्य पूर्णपणे गाडगेबाबांच्या सेवेकरिता अर्पण केले आहे आज ते ७६ वर्षाचे झाले असतानाही आजही तेवढेच पोट विकीने काम करताना दिसत आहेत शेवटच्या श्वासापर्यंत गाडगेबाबांचे काम करत राहू असे सुद्धा मत बापूसाहेब देशमुख यांनी व्यक्त केले.

**समस्या** — संजय चोरपगार यांच्या नेतृत्वात आंदोलनाचा इशारा

# सिलेंडर टंचाईवरून वंचित बहुजन आघाडी आक्रमक!

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.३०:** दर्यापूर तालुक्यात गॅस सिलेंडरच्या तीव्र टंचाईमुळे नागरिकांचे हाल होत असून, भर उन्हाळ्यात पहाटेपासूनच सिलेंडरसाठी लांबच लांब रांगा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी गॅस तुटवडा नसल्याचे वारंवार स्पष्ट केले असतानाही प्रत्यक्षात पुरवठा मात्र अनियमित होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.



दर्यापूर येथील शितल गॅस एजन्सीत केवळ एकाच खिडकीतून माहिती व वितरण होत असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. शहरासह ग्रामीण भागातील लोकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असून, महिलांसह वयोवृद्धांनाही याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.


या पार्श्वभूमीवर आज सामाजिक कार्यकर्ते संजय चोरपगार यांनी गॅस वितरण कार्यालयात धडक देत आक्रमक भूमिका घेतली.

गॅसचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून नागरिकांना त्रास देणे सहन केले जाणार नाही. प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून पुरवठा सुरळीत करावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली.दरम्यान, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देत वितरण व्यवस्थेत सुधारणा करावी, अन्यथा नागरिकांचा रोष अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अकोल्या जिल्ह्यात सिलेंडरच्या लाईनमध्ये एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून सरकार आणखी किती बळी घेणार संजय चोरपगार यांनी सिलेंडर वितरकांना नागरिक हिताच्या सूचना केल्या.

# शिवा प्रधान यांना उत्कृष्ट राज्यस्तरीय वाङ:मय पुरस्कार

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.३० :** महाराष्ट्रातील ज्येष्ठ साहित्यिक कवी समीक्षक,बहूजनरत्न जीवनगौरव पुरस्कार प्राप्त समतेचे प्रभातकार, अखिल. भारतीय मराठी साहित्य परिषदेचे अमरावती विभागीय अध्यक्ष मा शिवा. प्रधान यांना सुर्यकांतादेवी पोटे राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ:मय निर्मिती पुरस्कार २०२६ चा,त्यांच्या समतेतची प्रभात या महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई यांचे अनुदान प्राप्त काव्य संग्रहाला मातोश्री स्व सुर्यकांतादेवी रामचंद्र पोटे ट्रस्ट अमरावती यांचे वतीने २०२६ करिता निवड झाली असून सदर संस्थेचे .पुरस्कार समितीने निवड केली असून सदर पुरस्कार दि ३० मार्च २०२६ ला अमरावतीला मान्य वरांच्या हस्ते प्रदान



करण्यात येईल. त्याकरिता प्राचार्य मा.प्रा.डॉ.शोभा रोकडे,.डॉ कुमार बोबडे,डु अनुप्रिता देशमुख ,तसेच मा प्रा डॉ संतोष बनसोड, प्रा.डॉ अशोक इंगळे, प्रा डां,अभिजित प्रधान डॉ,वसुधा प्रधान , मा सुनील उमाटे, प्रा .डॉ टीम एम रामटेके, डॉ. देविदास मेंटांगे, प्रा.डॉ.श्रीकांत बनसोड ,प्राचार्य डॉ श्रीमती रेखा पर्वतकार ,उमेश शहारे, भिमराव गजभीए, प्रा.डॉ. इंद्रजीत ओरके ,प्रा. छाया खोब्रागडे,पद्माकर मांडवधरे, नरेंद्र गुळघाने, मा शरद गोरे, आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

**तहसिलदार,धामणगाव रेल्वे यांचे कार्यालय**
ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती-४४४७०९
क्रमांक/म.स./प्र-१/कावि-४२०/२०२६
दिनांक ०२/०३/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे गावातील सर्वत्र लोकांना जाहीरपणे सूचित करण्यात येते की,अर्जदार गजानन रामजिवन पनपालीया, रा.जळका पटाचे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती यांनी त्यांचे मालकीच्या खालील परिशिष्टा मधील शेतजमीनीच्या इतर अधिकार मधील कुळाचे नाव कमी करून मिळणेबाबतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**गावाचे नाव :** मौजा- देवगाव

**गट नं./क्षेत्र :** शेत गट नं.२८३, क्षेत्र ५.७३ हे.आर. आकार ९.९० रूपये भोगवटदार-१

**तपशिल :** या शेतजमीनीच्या ईतर अधिकार अभिलेख मध्ये नमुद असलेले साधे कुळाचे नाव पांडुरंग शिवराम तेली ५८-५९ कमी करून मिळणेबाबत.

**शेरा :** ---

वरील बाबतील ज्या कोणाला काही आक्षेप/हरकती असतील तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाचे आत आपल्या आक्षेप/हरकती लेखी स्वरुपात कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप/हरकतीचा विचार केला जाणार याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार, धामणगांव रेल्वे**

## शॉर्टक्यात



### वृक्षारोपण करीत पर्यावरण रक्षणाचा संदेश

**यवतमाळ :** येथे भगवान महावीर जन्म कल्याण महोत्सवानिमित्त रविवारी (दि. २९) 'एक पेड़ प्रभु के नाम' उपक्रम आराधना भवन येथून उत्साहात सुरू झाला. जैन सेवा समिती अध्यक्ष महावीर भंसाली यांच्या पुढाकाराने गांधीनगर परिसरात प्रत्यक्ष वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. याप्रकरणी सकल जैन बांधवांना रोपांचे वाटप करण्यात आले. या प्रेरणादायी उपक्रमांतर्गत गांधीनगर परिसरात मान्यवरांच्या हस्ते रोप लावून मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी प्रकल्प अधिकारी दीपक बोरा, विजय कुमार बुंदेला, डॉ. रमेश खीवसरा, विजय कोटेचा, श्याम भंसाली, ज्येष्ठ नगरसेवक गजानन इंगोले, महावीर नवयुवक मंडळ अध्यक्ष समर्पण गांधी, संदीप कोचर, बंटी लुनावत, कुनाल पोकर्णा, आनंद काकलिया, यश भरूत, ॲड. सुनयल ओसवाल आणि वंदना बोरुंदिया उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक बोरा यांनी केले. विशेष म्हणजे, जैन समाजातील राम आणि श्याम या जोडीने आराधना भवन येथून रोपे आणून स्वतः वृक्षारोपण करीत या मोहिमेला गती दिली. केवळ धार्मिक भावनाच नव्हे, तर निसर्ग संवर्धनाचा उद्देश समोर ठेवून राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रभूंच्या नावाने एक झाड लावण्याच्या या आवाहनाला समाजाने मोठा प्रतिसाद दिला.




### सेवा केंद्र हक्क सभा उत्साहात

**यवतमाळ :** येथील हॉटेल तुलीप ग्रीन गार्डन सभागृहात आपले सरकार सेवा केंद्र हक्क संरक्षण असोसिएशन महाराष्ट्रच्यावतीने प्रथम सर्वसाधारण सभा पार पडली. तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय मागण्या सोडवण्यासाठी जिल्हाभरातील केंद्र चालकांनी एकत्र येत या सभेचे आयोजन केले होते. संघटनेच्या माध्यमातून हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ही महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली. सभेच्या प्रारंभी संघटनेच्या उद्दिष्टांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेही केंद्र चालकांना भेडसावणाऱ्या तांत्रिक समस्या आणि प्रशासकीय स्तरावरील प्रलंबित मागण्यांवर सखोल चर्चा झाली. व्यासपीठावर संघटनेचे अध्यक्ष यासीन नागाणी, उपाध्यक्ष धनराज पवार, सचिव विशाल मुरादे, सचिन घाडगे, उदय पुंडे, प्रवीण भोयर, मनोज चौधरी, सोनाली जब्बलवार, सचिन गुल्हाने, रविराज ठाकरे आणि किशोर जयस्वाल उपस्थित होते. संघटनेची भूमिका शासनविरोधी नसून शासनासोबत समन्वय साधत गाव स्तरावरील उद्योजकांच्या समस्या सोडवण्याची असल्याचे स्पष्ट करण्यात आले. केंद्र चालकांनी एकजुटीने काम केल्यास समस्या मार्गी लागतील, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. भविष्यात संघटनेची व्याप्ती वाढवून प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन किशोर जयस्वाल यांनी केले. या सभेमुळे जिल्ह्यातील केंद्र चालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### भरधाव वाहनाच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**पुसद :** पुसद येथील कृष्णनगर भागात अठ्ठावीस मार्च रोजी मध्यरात्री पावणे दोन वाजता भरधाव वाहनाच्या धडकेत एका पंचावन्न वर्षीय व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. मधुकर बारकू आडे असे या अपघातात प्राण गमावलेल्या मृत व्यक्तीचे नाव असून ते कृष्णनगर येथील रहिवासी होते. त्या रात्री एमएच वीस ईएल एकतीस त्रेपन्न या क्रमांकाच्या चारशे सात वाहनाच्या चालकाने आपले वाहन अतिशय भरधाव वेगाने आणि पूर्णपणे निष्काळजीपणे चालवून मधुकर आडे यांना अतिशय जोरदार धडक दिली. या भीषण अपघातामुळे गंभीर जखमी झालेल्या मधुकर आडे यांचा जागीच करुण अंत झाला. या गंभीर अपघाताची तक्रार राम संघा चव्हाण यांनी नोंदवली आहे. त्यांच्या तक्रारीच्या आधारे अठ्ठावीस मार्च रोजी सकाळी पुसद ग्रामीण पोलिस ठाण्यात सदर गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून सध्या पोलिस या प्रकरणाचा अधिक सखोल तपास करत आहेत.

## गॅस एजन्सीच्या मनमानी कारभाराचा फटका, घरगुती गॅसचा कृत्रिम तुटवडा

# पुसदमध्ये सिलिंडरसाठी रात्रभर रांगा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि. ३० :** शासकीय दप्तरी गॅसचा मुबलक साठा उपलब्ध असल्याचे दावे केले जात असले, तरी पुसदमध्ये मात्र सामान्य नागरिकांना एका सिलिंडरसाठी अक्षरशः 'वनवास' सोसावा लागत आहे. कडक उन्हात तासनतास रांगेत उभे राहून पावती मिळविल्यानंतर, प्रत्यक्ष गॅस घेण्यासाठी ग्राहकांना गोदामाबाहेर डास आणि सरपटणाऱ्या प्राण्यांच्या दहशतीत संपूर्ण रात्र उघड्यावर काढावी लागत आहे. प्रशासनाच्या डोळ्यादेखत सुरू असलेली ही नागरिकांची हेळसांड थांबणार कधी, असा संतप्त सवाल सध्या शहरातील जनतेकडून विचारला जात आहे.




पुसद शहरातील गॅस वितरणाची व्यवस्था सध्या पूर्णपणे कोलमडली असून, सर्वसामान्य ग्राहकांसाठी गॅस मिळवणे म्हणजे एखादा 'किल्ला जिंकण्यासारखे' कठीण काम झाले आहे. दररोज केवळ ३०० पावतीधारकांना गॅस देण्याचे नियोजन एजन्सीकडून केले जाते. परिणामी, आपला नंबर लागावा यासाठी नागरिक आदल्या दिवशी रात्री सात वाजेपासूनच शहराबाहेर असलेल्या गोदामावर जाऊन रांगा लावत आहेत. 'दुभत्या गाईच्या लाथा सोसणे' या म्हणीप्रमाणे, गॅसची गरज असल्याने नागरिक मच्छरांचा प्रादुर्भाव आणि असुरक्षित जागेत रात्रीचा मुक्काम करत आहेत. मात्र, पुरवठा विभागाला या सर्वसामान्य जनतेचे हाल दिसत नसावेत, याचे मोठे आश्चर्य व्यक्त होत आहे. गॅसचा साठा पुरेसा असल्याचे अधिकारी सांगत असताना, दुसरीकडे ग्राहकांना मात्र तासनतास रांगेत का उभे राहावे लागते, हा एक मोठा यक्षप्रश्न आहे. 'हातावर पोट असणाऱ्या' मजुरांना आपले काम सोडून दोन-दोन दिवस गॅससाठी घालवावे लागत आहेत. विशेष म्हणजे, शहरात घरगुती सिलिंडरचा व्यावसायिक वापर मोठ्या प्रमाणात सुरू असून, काळ्या बाजारात हेच सिलिंडर अव्वाच्या सव्वा किमतीत सहज उपलब्ध होत असल्याची चर्चा शहरात रंगली आहे. एजन्सीचे गोदाम शहराबाहेर अशा ठिकाणी आहे, जिथे पिण्याचे पाणी किंवा सावलीची कोणतीही व्यवस्था नाही. उन्हाचा पारा वाढत असताना, रांगेत उभे असलेल्या एखाद्या ज्येष्ठ नागरिकाला किंवा महिलेला काही अपाय झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासन स्वीकारणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पुरवठा विभागाने केवळ कागदोपत्री चौकशीचा फार्स न करता, प्रत्यक्ष गोदामावर जाऊन वस्तुस्थितीची पाहणी करावी आणि गॅसचा काळा बाजार रोखून सर्वसामान्यांना दिलासा द्यावा, अशी रास्त मागणी पुसदकर नागरिकांनी केली आहे.

### प्रशासकीय डोळेझाक

**शहरात सर्वसामान्यांना गॅस मिळत नसताना, काही विशिष्ट ठिकाणी मात्र मोठ्या प्रमाणात गॅस सिलिंडरचा अवैध साठा आढळत आहे. दोन ते अडीच हजार रुपयांना एक सिलिंडर काळ्या बाजारात विकले जात असल्याची माहिती समोर येत आहे. पुरवठा विभाग अधूनमधून कारवाईचा केवळ दिखावा करतो, मात्र जप्त केलेल्या टाक्यांचे पुढे काय होते आणि मुख्य सूत्रधारांवर काय कारवाई होते, हे गुलदस्त्यातच राहते. ही 'दिखाऊ चौकशी' म्हणजे जनतेच्या डोळ्यात धूळफेक आहे.**

### गोदामावर सुविधांचा अभाव

**पुसद शहराबाहेरील गॅस गोदामावर कोणत्याही नागरी सुविधा उपलब्ध नाहीत. येथे रात्रभर थांबणाऱ्या नागरिकांसाठी सुरक्षा, प्रकाश किंवा पिण्याच्या पाण्याची सोय नाही. कडाक्याच्या उन्हात आणि रात्रीच्या अंधारात नागरिकांना उघड्या जमिनीवर झोपावे लागते. एखाद्या आपत्कालीन परिस्थितीत मदतीची कोणतीही व्यवस्था नसल्याने, ग्राहकांना जीवावर उदार होऊन केवळ एका सिलिंडरसाठी ही जीवघेणी कसरत करावी लागत आहे.**

## योगिता उपरेची पोलिस दलात निवड

### सहयोग ग्रुपकडून विद्यार्थिनीचा गौरव संपन्न

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**झरी, दि. ३० :** महाराष्ट्र पोलिस दलात नुकतीच निवड झाल्याबद्दल खडकडोह येथील पुनकाबाई आश्रम शाळेची माजी विद्यार्थिनी योगिता शंकर उपरे आणि तिचे वडील शंकरराव उपरे यांचा सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या सहयोग ग्रुपकडून सत्कार करण्यात आला. मुलीच्या या विशेष यशाचे कौतुक करण्यासाठी एका छोटेखानी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करून तिला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या गेल्या.

या छोटेखानी कार्यक्रमात सत्काराला उत्तर देताना योगिताने आपले मनोगत व्यक्त केले. पोलिस दलात मिळालेली संधी ही केवळ सुरुवात असून आपण भविष्यात नक्कीच एमपीएससी परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून मोठ्या पदावर अधिकारी म्हणून रुजू होऊ, असा दृढ विश्वास तिने यावेळी व्यक्त केला. ग्रामीण भागातून आलेल्या योगिताची ही मोठी झेप आश्रम शाळेतील इतर होतकरून विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने अत्यंत महत्वाची आणि एक दिशादर्शक प्रेरणादायी बाब ठरली आहे. या विशेष कौतुक सोहळ्याला प्रामुख्याने सहयोग ग्रुप आणि निसर्ग पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र गेडाम उपस्थित होते. त्यांच्यासोबतच मारोती यमजलवार, प्राचार्य सुरेश परचाके, प्राध्यापक गजानन गद्दलवार, प्राध्यापक भानुदास सगर, विपीन वडके, संदीप धोटे, गणेश बेलेकर, माधव चाटे, महेश मेश्राम, संदीप पोटरकर, मुरली नाकले, तुषार यमजलवार, संदीप ढेंगळे, राजेश खरवडे, किरण यमजलवार इत्यादी मान्यवर आवर्जून उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी योगिताचे अभिनंदन करून तिला पुढील उज्वल वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या.

## डॉ. प्रवीण बनसोड यांच्या पुस्तकाची संदर्भ ग्रंथ म्हणून निवड

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नेर (परसोपंत), दि. ३० :** येथील नेहरू महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रवीण श्रीकृष्ण बनसोड यांनी लिहिलेल्या 'मानवी स्वातंत्र्याचे उद्गाते सर्वज्ञ चक्रधर' या पुस्तकाची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि कवी कुलगुरू संस्कृत विद्यापीठ रामटेक यांच्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून निवड झाली आहे. या शैक्षणिक व साहित्यिक यशामुळे त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

७५ वर्षांची प्रदीर्घ परंपरा असलेल्या मुंबईच्या विख्यात लोकवायय गृह या प्रकाशन संस्थेने २०२२ मध्ये डॉ. प्रवीण बनसोड यांचे हे अतिशय महत्वाचे पुस्तक प्रकाशित केले होते. या पुस्तकातील सर्वज्ञ चक्रधर स्वामी यांच्या विचारांवर आधारित असलेला 'विचारव्यवहार हाच जीवनव्यवहार' हा महत्वपूर्ण पाठ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बीए भाग तीन, सत्र सहाच्या मराठी अनिवार्य विषयाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आला आहे. याशिवाय, अमरावती विद्यापीठाच्या एमए मराठी अभ्यासक्रमात आणि रामटेक येथील कवी कुलगुरू संस्कृत विद्यापीठाच्या एमए मराठी अभ्यासक्रमासाठी याच पुस्तकाची संदर्भ ग्रंथ म्हणून अधिकृत निवड करण्यात आली आहे. एकाच वेळी राज्यातील दोन प्रमुख विद्यापीठांनी या पुस्तकाची संदर्भ ग्रंथ म्हणून अभ्यासक्रमात निवड केल्याने हे शैक्षणिक क्षेत्रातील एक मोठे यश मानले जात आहे. सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या प्रचंड योगदानाला मिळालेल्या या पावतीमुळे संपूर्ण साहित्य वर्तुळातून डॉ. प्रवीण बनसोड यांचे सर्वत्र विशेष कौतुक केले जात आहे.

## 'एजुफेलो हब'तर्फे ऑनलाइन निबंध स्पर्धा-२०२६ चे आयोजन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.३०:** क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'एजुफेलो हब'तर्फे 'ऑनलाइन निबंध स्पर्धा-२०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. 'शिक्षण, समानता आणि सामाजिक न्याय' या विषयावर आधारित ही स्पर्धा

५ एप्रिलपर्यंत चालणार असून, यामध्ये दोन फेऱ्यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या वैचारिक प्रगतीसाठी तसेच महापुरुषांचे विचार रुजविण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धा ऑनलाइन चाचणी व हस्तलिखित निबंध अशा दोन फेऱ्यांत पार पडणार आहे. प्रथम क्रमांकास १००० रुपये, द्वितीय क्रमांकास ७०० रुपये व तृतीय क्रमांकास ५०० रुपये, तसेच प्रमाणपत्र व पुस्तके देण्यात येणार आहेत. सर्व सहभाग्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल. या स्पर्धेसाठी डॉ. चेतन जाधव (गट विकास अधिकारी), कमलेश बहादुरे (कर व एलआयसी सल्लागार), प्रा. शैलेश हातबुडे, रूपाली कचरे, वैशाली मोरे, प्रा. घनश्याम दरणे, निखिल ढोक, अभी चोखांद्रे, प्रेम कास्तेकर, अविनाश चंद्रवंशी व शुभम गारशेटवाड यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. स्पर्धेसाठी निबंध ५ एप्रिलपर्यंत सादर करणे अनिवार्य असून, प्रवेश फी २० रुपये आहे. नोंदणीसाठी पंकज (मो. ८२६३९५५६२०) व शुभम (मो. ७७०९४८६३८८) यांच्याशी संपर्क साधावा. एआय साधनांचा वापर केल्यास स्पर्धकास अपात्र ठरविण्यात येईल.

## जिल्ह्याला राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

### यवतमाळच्या शिक्षकांचा पुण्यात गौरव, राज्य आदर्श शिक्षक सोहळा संपन्न

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




**आर्णी, दि. ३० :** ध्येय एज्युकेशन फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने पुणे येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. राज्याचे आयडॉल शिक्षक दत्तात्रय वारे यांच्या हस्ते यवतमाळ जिल्ह्यातील प्राचार्य डॉ. रमेश राऊत यांच्यासह आर्णी, बाभुळगाव, पांढरकवडा, पुसद व वणी येथील उपक्रमशील शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक योगदानासाठी गौरविण्यात आले.

शिक्षण क्षेत्रात निस्वार्थ वृत्तीने शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी ध्येय एज्युकेशन फाउंडेशन दरवर्षी या विशेष सोहळ्याचे आयोजन करते. यंदा जिल्ह्यातून जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. रमेश राऊत, आर्णी येथील उपक्रमशील शिक्षिका ज्योती गोविंदराव राठोड (चव्हाण), साधनव्यक्ती सुलोचना भीमराव राऊत, बाभुळगावचे विलास थेटे, पांढरकवडा येथील अविनाश काकडे, पुसदचे महेश चव्हाण, यवतमाळच्या अर्चना वासेकर आणि वणीच्या मीनल बेझलवार यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट शाळा म्हणून कळंब तालुक्यातील सुकळी जिल्हा परिषद शाळेचा गौरव करण्यात आला, हा पुरस्कार मुख्याध्यापक अमोल पालेकर व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षांनी स्वीकारला. या सोहळ्याला संस्थेचे अध्यक्ष सुदाम शेंडगे, सचिव अर्चना शेंडगे, उपजिल्हाधिकारी शुभम पवार, उपमहापौर शर्मिला बाबर आणि शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर उपस्थित होते. यावेळी फाउंडेशनतर्फे घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी ठरलेल्या प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना १८ लक्ष २७ हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. आयडॉल शिक्षक दत्तात्रय वारे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले की, अशा पुरस्कारांमुळे शिक्षकांमध्ये कार्य करण्याची नवी ऊर्जा निर्माण होते. अध्यक्ष सुदाम शेंडगे यांनी भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. या सोहळ्यात शिक्षकांसोबतच उत्कृष्ट प्रशासक आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. यवतमाळ जिल्ह्यातील या सर्व पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे आणि शाळेचे सर्व स्तरांतून तसेच समाज माध्यमांमधून कौतुक होत असून शैक्षणिक वर्तुळात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## माणुसकीच्या भिंतीकडून वृद्धेला मायेचा आधार

### पुसदमध्ये सामाजिक बांधिलकीचे दर्शन सकारात्मक, सेवाभावी उपक्रमाचे कौतुक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि. ३० :** येथील उपजिल्हा रुग्णालयाबाहेर तीन दिवसांपासून बेवारस स्थितीत असलेल्या एका वृद्ध महिलेला 'माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन'च्या सदस्यांनी आधार देत सुरक्षित निवारा मिळवून दिला. मुले आणि नातेवाईकांनी वाऱ्यावर सोडलेल्या या मातेला जवाहरनगर येथील ज्येष्ठ नागरिक वृद्धाश्रमात सन्मानाने प्रवेश मिळवून देण्यात आला. समाजातील वाढत्या स्वार्थी प्रवृत्तीच्या काळात माणुसकीच्या भिंतीने जपलेली ही सामाजिक बांधिलकी खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आणि कौतुकास्पद ठरली आहे.



सध्याच्या धावपळीच्या आणि विज्ञानाच्या युगात रक्ताची नाती दुरावत असताना पुसदमध्ये माणुसकीचे दर्शन घडवणारी एक हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. आपल्या मुलाने आणि सुनेने घराला कुलूप लावून घराबाहेर काढल्यानंतर, नातेवाईकांनीही थारा न दिल्याने एक वृद्ध महिला अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत उपजिल्हा रुग्णालयाबाहेर तीन दिवसांपासून आश्रयाला होती. या घटनेची माहिती मिळताच 'माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन'चे सदस्य गजानन जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन त्या महिलेची चौकशी केली. पुसद तालुक्यातील ही संस्था मागील दहा वर्षांपासून रस्त्यावरील मनोरुग्ण आणि निराधार वृद्धांना मदत करण्याचे पवित्र कार्य अविरतपणे करत आहे. सदर वृद्ध महिलेने आपली व्यथा सांगताना 'मला कुठेतरी वृद्धाश्रमात व्यवस्था करून द्या' अशी आर्त साद घातली. तिच्या डोळ्यांतील अश्रू पाहून सदस्यांनी तत्काळ स्वर्गीय चंदू नाईक ज्येष्ठ नागरिक वृद्धाश्रमाचे अध्यक्ष वाघोजी आडे यांच्याशी संपर्क साधला. आडे यांनी क्षणाचाही विलंब न लावता या मातेला आश्रयासाठी होकार दिला. माणुसकीच्या भिंतीच्या वतीने या वृद्ध महिलेला नवीन साडी-चोळी भेट देऊन तिचा सन्मान करण्यात आला आणि तिला जवाहरनगर येथील वृद्धाश्रमात पोहोचवण्यात आले. याप्रसंगी स्वर्गीय चंदू नाईक ज्येष्ठ नागरिक गृह, जवाहरनगरचे अध्यक्ष वाघोजी आडे, सचिव मोरेश्वर आडे, अधीक्षक श्वेता दीक्षित, गोकुळ, माणुसकीच्या भिंतीचे अध्यक्ष गजानन जाधव, सदस्य मधुकर चव्हाण, प्रकाश भोसले, पंकज महाराज, रमेश डोंबोळे, प्रकाश येलेकर, नयन रामधनी, शारदा मनोहर पंचघरे, नंदकुमार खैरे, प्रमोद ठाकूर आणि दादाराव पाईकराव उपस्थित होते. निराधार वृद्धेला हक्काचा निवारा मिळवून दिल्याने सर्व स्तरांतून या कार्याचे कौतुक होत आहे. माणुसकीच्या भिंतीने केवळ निवाराच दिला नाही, तर समाजासमोर एक सकारात्मक आदर्श निर्माण केला आहे. या कार्यामुळे पुसद परिसरात सामाजिक कार्याची एक नवीन ऊर्जा निर्माण झाली असून, पीडित महिलेच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमलले आहे.

## भगवान महावीर नाटिका उत्साहात

### १६० कलाकारांचा उत्स्फूर्त सहभाग, अहिंसा आणि त्यागाचा संदेश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. ३० :** येथील केसरिया भवन येथे शनिवारी (दि. २८) भगवान महावीर यांच्या जीवनचरित्रावर आधारित भव्य नाटिकेचे आयोजन करण्यात आले होते. सकल जैन समाज बांधवांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात ४ महिन्यांपासून ६५ वर्षांपर्यंतच्या एकूण १६० कलाकारांनी सहभाग नोंदवून प्रभू महावीरांच्या अहिंसा, सत्य आणि त्यागाचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचवला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी सुभाष खिवसरा, डॉ. रमेश खिवसरा, उमेश बैद आणि प्रकल्प अधिकारी दीपक बोरा यांची प्रमुख उपस्थिती होती. या नाटिकेमध्ये विविध वयोगटातील १६० कलाकारांनी आपल्या प्रभावी अभिनयाने भगवान महावीरांचा जीवनपट प्रेक्षकांसमोर जिवंत केला. या यशस्वी आयोजनासाठी खुशबू भंडारी, वर्षा तातेड, शिखा जैन, चंदाबाई कोटेचा, वंदना बोरुंदिया आणि पूजा शाह यांनी विशेष परिश्रम घेतले. जैन समाजातील बांधवांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांचे कौतुक केले. या नाटिकेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत महावीरांची शिकवण पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रदीर्घ कालावधीनंतर झालेल्या या मोठ्या सांस्कृतिक आणि धार्मिक आयोजनामुळे संपूर्ण परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित मान्यवरांनी आयोजकांच्या या स्तुत्य उपक्रमाचे विशेष कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

## महत्वाचे

### तरुणावर हल्ला

**नेर :** यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यातील वीरगव्हाण येथे रविवारी, २९ मार्च रोजी दुपारी दोन वाजता महेश थोरात या तरुणावर लग्नमंडपाची तार उचलण्याच्या वादातून तिघांनी लोखंडी पाईपने हल्ला करत त्याला जखमी केले. वीरगव्हाण गावात एका घराजवळ लग्न समारंभ सुरू असताना अचानक आलेल्या वावटळीमुळे मंडप कोसळला आणि विजेची तार तुटून पडली. यावेळी महेश थोरात हा तरुण तो मंडप उचलण्यासाठी गेला. तिथे उपस्थित असलेल्या अवधूत पाटील यांना विजेचा धक्का बसेल या चिंतेतून महेश त्यांच्यावर रागावला. या रागाचा जाब विचारण्यासाठी अवधूत यांचे नातेवाईक अक्षय पाटील आणि वैभव पाटील तिथे आले. आमच्या वडिलांवर का रागावला असे विचारत अक्षयने हातातील लोखंडी पाईपने महेशच्या डोक्यावर जोरदार वार करून त्याला गंभीर जखमी केले. तसेच शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी नेर पोलिस ठाण्यात तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### अठरा क्विंटल ॲल्युमिनियम तारेची चोरी

**मारेगाव :** मारेगाव तालुक्यातील ग्राम वेगाव येथे शुक्रवारी, २७ मार्च रोजी सकाळी साडेआठ वाजता अज्ञात चोरट्यांनी डांबरी रस्त्यावर ठेवलेली दोन लाख पंचवीस हजार रुपये किमतीची अठरा क्विंटल ॲल्युमिनियमची तार चोरून नेली. संतोष शर्मा हे यवतमाळ जिल्ह्यामध्ये पॉलीकॅब इंडिया लिमिटेड या कंपनीचे महत्त्वाचे काम बघतात. त्यांच्या कंपनीच्या वतीने मारेगाव तालुक्यातील ग्राम वेगाव येथील मुख्य डांबरी रस्त्यावर बारा किलोमीटर अंतरासाठी लागणारी ॲल्युमिनियमची मोठी तार आणून ठेवण्यात आली होती. या तारेचे वजन तब्बल अठरा क्विंटल इतके होते. शुक्रवारी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास ही अत्यंत मौल्यवान आणि जड तार अज्ञात चोरट्यांनी संधी साधून तिथून लंपास केली. चोरीला गेलेल्या या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत दोन लाख पंचवीस हजार रुपये असल्याचा अंदाज आहे. या मोठ्या चोरीमुळे कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मारेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

# 'एक लोटा जल', सर्व समस्यांचे हल

## पंडित प्रदीप मिश्रा; शिवभक्तीनेच आयुष्याचे कल्याण होईल! पहिल्याच दिवशी भाविकांची मांदियाळी!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी
✦ संदीप शिंदे/ मनोज माघाडे

**आर्णी, दि.३० : 'माणूस हा स्वतःच्या दोषांमुळे आणि अज्ञानामुळे आयुष्यात दुःखी होतो. मात्र, जर त्याने सर्व चिंता सोडून निःस्वार्थ भावनेने महादेवाची भक्ती केली, तर त्याच्या आयुष्यात कोणतीही समस्या उरणार नाही. 'एक लोटा जल' अर्पण करून भक्तिच्या मार्गावर चालल्यास जीवनाचे सार्थक होईल,' असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा यांनी केले.**





बहिरमदेव शिवमहापुराण सेवा समिती ट्रस्टच्या वतीने आयोजित या सोहळ्याच्या पहिल्याच दिवशी पंडित मिश्रा यांनी 'शिवमहापुराण' ग्रंथाचे महत्त्व विशद केले. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा संदर्भ देताना सांगितले की, 'राजमाता जिजाऊंनी शिवरायांना महादेवाच्या भक्तीचे महत्त्व समजावून सांगितले होते. 'हर हर महादेव' हा केवळ जयघोष नसून, मनातील भीती नष्ट करण्याचा तो महामंत्र आहे. याच मंत्राच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.'

पहिल्याच दिवशी लाखोंच्या संख्येने शिवभक्त आर्णीत दाखल झाले होते. सेवा समितीचे उत्तम नियोजन आणि पोलिस प्रशासनाचा चोख बंदोबस्त यामुळे कथेचा पहिला दिवस अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहात पार पडला.

### अंधश्रद्धा सोडा, भक्ती स्वीकारा!

कथा सांगताना पंडित मिश्रा यांनी सामाजिक प्रबोधनही केले. 'अंधश्रद्धा आणि दिखावा यामुळे आयुष्य ओझे वाटू लागते. या सर्व समस्यांवर भगवान शिव हाच एकमेव उपाय आहे. रोज कपाळाला भस्म लावून, गळ्यात रुद्राक्ष परिधान करून आणि शिवलिंगावर जल अर्पण करून आपल्या दिवसाची सुरुवात करा,' असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### दिग्गजांची उपस्थिती

कथेच्या पहिल्याच दिवशी माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर, माजी खासदार विजय दर्डा, आमदार राजू तोडसाम, प्रिया तोडसाम, किशोर दर्डा, कामगार आयुक्त राजेश आडे, माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र डांगे, विजय कोष्टवार, किसन राठोड, नीता आडे, राजेंद्र जाधव, विलास पाटील राऊत यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

# कासोळा येथे उद्या समाधान शिबीर

## तहसीलदार अभय मस्के यांची माहिती; नागरिकांनी सहभागी व्हावे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**महागाव, दि.३० :** महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान-टप्पा १' अंतर्गत महागाव तालुक्यात मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. याच मालिकेतील पुढील शिबिर बुधवारी, दि. १ एप्रिल २०२६ रोजी कासोळा येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित करण्यात आले आहे.

महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी या शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांना 'एकाच दिवसात सेवा प्रदान करणे'अंतर्गत विविध सेवा एकाच दिवशी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या शिबिरात प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ व ८-अ दुरुस्ती, उताऱ्यांमधील त्रुटी दूर करणे आणि अभिलेख दुरुस्ती,

डिजिटल स्वाक्षरीत उतारे तत्काळ उपलब्ध करून देण्यासाठी हेल्प डेस्कची सुविधा, उत्पन्न, रहिवासी, जात आणि क्रिमीलेअर प्रमाणपत्रे मिळवण्याची सुविधा, सामाजिक अर्थसहाय्य योजना, ई-मोजणी, ॲग्रीस्टॅक आणि पीएम किसान योजनांची माहिती व अर्ज व नागरिकांच्या महसूल विषयक तक्रारींचे निवारण आदी बाबींची सेवा देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, महाभूमी पोर्टलवरून डाउनलोड केलेल्या क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ उताऱ्यास कायदेशीर वैधता असल्याबाबत या शिबिरात मार्गदर्शन व प्रात्यक्षिकही दिले जाणार आहे. कासोळा व परिसरातील नागरिकांनी या शिबिरात मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार अभय मस्के यांनी केले आहे.

### गोवंशीय जनावरांची सुटका

**यवतमाळ, दि. ३० :** मुकुटबन पोलिसांनी खडकी फाट्याजवळ अशोक लेलँड वाहनावर कारवाई करून सहा गोवंशीय जनावरांची सुटका केली. पोलीस शिपाई आशिष गोखरे यांच्या तक्रारीवरून चालक अजित आडे याला अटक करण्यात आली. आरोपी जनावरांना अत्यंत दाटीवाटीने आणि क्रूरपणे कोंबून बेकायदेशीरपणे घेऊन जात असताना ही कारवाई करण्यात आली. कारवाईत एक लाख पस्तीस हजार रुपयांची सहा जनावरे आणि आठ लाख रुपयांचे वाहन असा एकूण नऊ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वाहनात जनावरांना आखूड दोरीने बांधले असून चारा-पाण्याची व्यवस्था नव्हती. क्षमतेपेक्षा जास्त जनावरे कोंबल्याने त्यांना वेदना होत होत्या. मुकुटबन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# दोन सख्ख्या बहिणी पोलिस दलात; शेतकरी लेकींचे देदीप्यमान यश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ३० :** तालुक्यातील पोफाळी येथील अल्पभूधारक शेतकरी विलास बरडे यांच्या प्रतीक्षा आणि विशाखा या दोन सख्ख्या बहिणींनी जिद्दीच्या जोरावर पोलिस दलात प्रवेश मिळवला आहे. मोठ्या बहिणीच्या निवडीनंतर आता विशाखा बरडे हिनेही १२६ गुण मिळवून गुणवत्ता यादीत स्थान पटकावत गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

पोफाळी येथील सैनिकी परंपरेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विलास बरडे यांच्या दोन्ही मुलींनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे यश संपादन केले आहे. प्रतीक्षा विलास बरडे





हिची मागील वर्षी निवड झाली असून ती सध्या नांदेड जिल्ह्यात कार्यरत आहे. आता तिची सख्खी बहीण विशाखा मंदा विलास बरडे हिनेही पोलिस भरतीत यश मिळविले असून ती लवकरच प्रशिक्षणासाठी रवाना होईल. या दोन्ही भगिनींचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पोफाळी येथील श्री शिवाजी विद्यालयात झाले आहे.

केवळ जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल पोफाळी परिसरात आनंदाचे वातावरण आहे. त्यांच्या या उत्तुंग कामगिरीबद्दल श्री शिवाजी विद्यालय पोफाळीच्या चेअरमन विमल शिलार, प्राचार्य अवधूतराव देवसरकर, रवी शिलार, माणिकराव कांबळे, अनिल नगरधने, प्रवीण सूर्यवंशी आणि सर्व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. शेतकरी कुटुंबातील या दोन्ही लेकींचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# सिद्धेश्वर नगरीत शिवभक्तांचा उसळला महासागर

## पंडित प्रदीप मिश्रा यांच्या कथेने मोडले गर्दीचे सर्व रेकॉर्ड, 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमूली सिद्धेश्वर नगरी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि.३० :** येथील सिद्धेश्वर नगरीत ख्यातनाम शिवकथा वाचक पंडित प्रदीप मिश्रा यांच्या 'शिवमहापुराण' कथेला सोमवारी (३० मार्च) दिमाखात प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी दुपारच्या सत्रात आर्णी शहरात शिवभक्तांचा अलोट जनसागर लोटला असून, या गर्दीने आर्णीच्या इतिहासातील आजवरचे सर्व विक्रम (रेकॉर्ड) मोडीत काढले आहेत.



आर्णी परिसराने यापूर्वी अनेक मोठे कार्यक्रम अनुभवले आहेत. २०१४ मध्ये तत्कालीन पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेंद्र मोदी यांची 'चाय पे चर्चा', २०१५ मधील ६२ वे विदर्भ साहित्य संमेलन, २०१९ मधील काँग्रेसची 'चाय की चर्चा' आणि माजी मंत्री बच्चू कडू यांची शेतकरी पदयात्रा असो; या सर्व कार्यक्रमांना मोठी गर्दी झाली होती. तसेच बाबा महाराज सातारकर यांचे कीर्तन आणि प्रतिवर्षी भरणारी बाबा कंबलपोश यांची यात्रा यासाठीही भाविकांची विक्रमी मांदियाळी असते. मात्र, पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेसाठी झालेली अलोट गर्दी ही रेकॉर्ड ब्रेक ठरली. कथेच्या पहिल्याच दिवशी दुपारी १ ते ४ या वेळेत लाखो शिवभक्तांनी हजेरी लावली. संपूर्ण सिद्धेश्वर नगरी 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेली होती. केवळ आर्णीच नव्हे, तर जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दाखल झाले आहेत. पहिल्याच दिवशी उसळलेला हा जनसागर पाहता, पुढील सात दिवसांत गर्दीचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### नगरी झाली शिवमय

शिवमहापुराण कथा ऐकण्यासाठी आलेल्या भाविकांमुळे संपूर्ण शहराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. प्रशासनाकडून आणि आयोजकांकडून या अफाट गर्दीवर नियंत्रण मिळविण्यासाठी चोख व्यवस्था करण्यात आली असून, भक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात कथेचा पहिला दिवस संपन्न झाला.

# मार्थार्जून ग्रामपंचायतीचे २८ एप्रिलला मतदान

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**झरी, दि. ३० :** तालुक्यातील माथार्जून ग्रामपंचायतीच्या रिक्त असलेल्या सरपंचपदासाठी (दि. २८) एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. तत्कालीन सरपंच भागीरथा शंकर आत्राम यांचे पद आर्थिक अनियमितेच्या आरोपामुळे खारीज झाल्याने ही जागा रिक्त झाली होती. राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार या जागेसाठी ७ ते १३ एप्रिल या कालावधीत नामनिर्देशन पत्रे स्वीकारली जाणार आहेत.


राज्यातील ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांच्या निधनामुळे किंवा अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या जागांसाठी पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. माथार्जून येथील सरपंचपद अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी राखीव असून, २०२२ मध्ये भागीरथा शंकर आत्राम थेट जनतेतून निवडून आल्या होत्या. मात्र, त्यांच्यावर आर्थिक व्यवहारात अनियमितता केल्याचा आरोप सिद्ध झाल्याने त्यांचे पद रद्द करण्यात आले होते. तेव्हापासून या पदाचा प्रभार उपसरपंचांकडे सोपवण्यात आला होता. जाहीर वेळापत्रकानुसार, (दि. २८) एप्रिल रोजी सकाळी ७.३० ते ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडेल आणि दुसऱ्या दिवशी लगेच मतमोजणी होणार आहे. या निवडीमुळे गावातील रिक्त झालेले महत्वाचे पद पुन्हा भरले जाणार आहे. प्रशासनाने या निवडणुकीसाठी आवश्यक तयारी पूर्ण केली असून राजकीय हालचालींना वेग आला आहे.

# पोरांनो! दप्तर लावा खुंटीला, पळा मामाच्या गावाला

## सुट्ट्यांचे वेळापत्रक जाहीर, २ मे पासून सुट्ट्यांची घोषणा, १५ जूनला नव्या शैक्षणिक वर्षाचा श्रीगणेशा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३० :** पुस्तकांचे ओझे फेकून द्या आणि मामाच्या गावाची तयारी करा; कारण उन्हाळी सुट्टीचे अधिकृत 'वेळापत्रक' जाहीर झाले आहे. कडाक्याच्या उन्हापासून सुटका मिळविण्यासाठी शिक्षण संचालनालयाने २ मे पासून सुट्ट्यांची घोषणा केली असून, १५ जूनला नव्या शैक्षणिक वर्षाचा श्रीगणेशा होणार आहे. विदर्भातील चिमुकल्यांसाठी उन्हाची 'काहिली' लक्षात घेता सकाळच्या सत्राची खास मेजवानी मिळणार असून, आता फक्त शाळेची शेवटची घंटा वाजण्याची प्रतीक्षा उरली आहे.



राज्यातील लाखो विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी ही आनंदाची बातमी २८ मार्च रोजी परिपत्रकाद्वारे धडकली आहे. उन्हाळ्याचा पारा चढत असतानाच सुट्ट्यांच्या तारखा जाहीर झाल्यामुळे आता मुलांच्या स्वप्नांना पंख फुटले आहेत. राज्य शिक्षण मंडळाच्या प्राथमिक ते उच्च माध्यमिक अशा सर्व शाळांना २ मे २०२६ पासून उन्हाळी सुट्टी लागणार आहे. मात्र, सीबीएससी आणि आयसीएसई सारख्या 'हायफाय' मंडळांच्या शाळांना आपापल्या सोयीनुसार सुट्ट्यांचे नियोजन करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. 'येरे येरे पावसा' म्हणत नवीन शैक्षणिक वर्षांची सुरुवात १५ जून २०२६ पासून होणार आहे. पावसाळ्याच्या आगमनाचे वेध लागताच शाळांच्या भिंती पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजून जातील. विशेष म्हणजे, विदर्भातील सूर्यदेवाचा 'कोप' लक्षात घेऊन शिक्षण विभागाने एक मध्यममार्ग निवडला आहे. विदर्भात १५ ते २९ जून या काळात शाळा पूर्ण वेळ न भरता केवळ सकाळच्या सत्रात (सकाळी ७:०० ते ११:४५) भरवल्या जातील. ३० जूनपासून मात्र विदर्भातील शाळाही 'नियमित' रुळावर येतील. या निर्णयामुळे राज्यातील शैक्षणिक वेळापत्रकात एकवाक्यता येणार असली, तरी विदर्भातील सुट्ट्यांमध्ये थोडी कपात झाल्याची चर्चा शिक्षक वर्तुळात रंगली आहे. 'आधी हाताला चटके, तेव्हा मिळते भाकर' या म्हणीप्रमाणे, पुढील वर्षाच्या अभ्यासासाठी आता ही सुट्टी एन्जॉय करणे गरजेचे आहे. पालकांनीही आतापासूनच पर्यटनाचे बेत आखायला सुरुवात केली आहे. 'कामाचा कंटाळा आणि सुट्टीचा लळा' असलेल्या सर्वांसाठी हे वेळापत्रक म्हणजे एक मोठा दिलासाच ठरले आहे.


### शाळांसाठी 'मॉर्निंग' स्पेशल

यंदा विदर्भातील सुट्ट्यांमध्ये थोडी कात्री लागली असली, तरी उष्णतेचा विचार करून १५ जून ते २९ जून या कालावधीत शाळा फक्त सकाळच्या सत्रात भरवण्याचे आदेश दिले आहेत. सकाळी ७ ते ११.४५ या वेळेत शाळा भरवून उन्हाच्या तडाख्यापूर्वी विद्यार्थ्यांना घरी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ३० जूनपासून मात्र पावसाच्या सरींसोबतच शाळांची वेळही नियमित दुपारी होणार आहे.

# आर्णीकर मुस्लिम बांधवांकडून सामाजिक एकतेचा सुंदर संदेश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि.३० :** समाजात बंधूभाव, एकोपा आणि सामाजिक दायित्वाची जाणीव दृढ करणारा एक प्रेरणादायी उपक्रम आर्णी येथे पाहायला मिळाला. आर्णीकर मुस्लिम बांधवांच्या वतीने शिवपुराणाच्या निमित्ताने येणाऱ्या शिवभक्तांसाठी थंड पेय व शरबताची विनामूल्य व्यवस्था करण्यात आली.



या उपक्रमामुळे उन्हाच्या तीव्रतेतही भक्तांना दिलासा मिळाला. सर्व धर्मियांमध्ये आपुलकी आणि परस्पर आदराची भावना अधिक दृढ झाली आहे. धर्म वेगळे असले तरी मानवता हाच खरा धर्म असल्याचा संदेश या कृतीतून अधोरेखित झाला आहे. या सेवाभावी कार्यामुळे उपस्थित शिवभक्तांनी मुस्लिम बांधवांचे मनापासून आभार मानले. समाजात सौहार्द, एकता आणि सामाजिक जबाबदारी यांचे जिवंत उदाहरण म्हणून या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. अशा प्रकारचे उपक्रम समाजातील सलोखा टिकवून ठेवण्यास आणि पुढील पिढ्यांसाठी सकारात्मक आदर्श निर्माण करण्यास निश्चितच मोलाचे ठरत आहेत. जावेद सोलंकी, अन्वर पठाण, यासीन उर्फ लाला फाजलाणी, जानी सोलंकी, मोबीन फानन, राहील सोलंकी, नगरसेवक अशपाक शेख, मेहमूद सोलंकी, यासीन उर्फ टीकूर शेख, नौशाद उर्फ इल्लू सय्यद, फिरोज तगाले, शहजाद बैलीम, राजीक शहा, इनूस शेख आदी युवकांनी पुढाकार घेऊन एकतेचा संदेश दिला.